ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका
(तज्ज्ञ परिक्षित संशोधन पत्रिका)

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४३
(जानेवारी-जून २०२२/ खंड १४, अंक १)

❑ मुख्य संपादक ❑
**दि.व्यं.जहागिरदार**

❑ संपादक मंडळ ❑
**श्रीनिवास खांदेवाले**
**सुनिल शिंदे**
**प्रतिभा काळमेघ**
**आशीष महातळे**
**धीरज कदम**

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
**दि. व्यं. जहागिरदार**
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)–२६६१८५१

## अनुक्रमणिका

- विदेश नीती : भारतीय आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध – मृणालिनी फडणवीस ..................१
- अभिजीत बॅनर्जी आणि एस्थर डफ्लो यांच्या Poor Economics (Rethinking Poverty and the ways to end it) या ग्रंथातील विचार – आर.वाय. माहोरे .....................१०
- आभासी चलन प्रणालीची सद्य:स्थिती - विजय रमाकांत रोटे ......................१९
- अर्थशास्त्राचे २०२१ चे नोबेल पारितोषिक : श्रम अर्थशास्त्र व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणाला बहाल – प्रशांत हरमकर ......................२८

**–भारतीय अर्थव्यवस्थेची ७५ वर्षातील वाटचाल–**

- भारतातील दारिद्र्याचा यक्षप्रश्न: स्वरूप, मीमांसा आणि उपाययोजना – धीरज कदम.........................३७
- भारतीय शेतीचे बदलते स्वरूप (१९४७ ते २०२१) – करमसिंग राजपुत ...................५५
- कोरोना काळानंतर अर्थव्यवस्था गतीमान – वर्षा गंगणे .........................६५
- भारतातील विमा क्षेत्राचा विकास आणि आव्हाने – विठ्ठल घिनमिने .....................६९
- भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेत झालेले बदल – सिद्धार्थ मेश्राम ......................७५
- शेतमजुरांची स्थिती – काल आणि आजचे वास्तव – प्रतिभा काळमेघ .....................८४
- भारतातील युवकांसमोरील बेरोजगारीची समस्या – समित माहोरे .........................९२

**ग्रंथ परिचय**

- ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे आर्थिक अध्ययन – कुमुदिनी जोगी...................१०१
- ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ......१०४
- **विदर्भ अर्थशास्त्र परिषद – कार्यक्रम सुवर्ण महोत्सवी वर्षातील**............................१०७
- **संस्मरणे सदस्यांची**.........................११९

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी

**(२०२०-२१)**

**(कोविडमुळे कालखंड वाढवून २०२०-२२)**

- कार्याध्यक्ष
  डौ. निवूली पिड्डतुलकर
- अध्यक्ष
  डौ. विनोद गावैंडे
- उपाध्यक्षा
  डौ. ह्वाची देशपौंडे
- सचिव
  डौ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डौ. विज्ञ्ल मा. धिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डौ. दि.ज्ञौं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डौ. पुष्पा ज. उदासी (नागपूर शहर)
  डौ. सुनिल कृ.शिंदे (नागपूर ग्रामीण)
  डौ.विशाल वा. मालेकार (चैं पूर)
  डौ. एस.बी.भुरे (भैंडारा)
  डौ.महें पौं. गावैंडे (वर्धा)
  डौ. सैंजय ज. कोठारी (अमरावती)
  डौ. डि.के.राठोड (अकोला)
  डौ. दिलीप पा.महाजन (बुलढाणा)
  डौ.माधुरी पैं. राखैंडे (यवतमाळ)
  डौ.मधुकर श्री.ताकतोडे (वाशिम)

आजीव सदस्यता शुल्क : रू. १000/- आहे, ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, प्रभारी प्राचार्य, कढी महाविद्यालय, परतवाडा यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.


- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com


**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १५0 रू.
२) शैक्षणिक संस्था - २00 रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचा खंड १४, अंक १ (जानेवारी-जून २०२२) सादर करतांना मला आनंद होत आहे. विशेष म्हणजे हा अंक मागील अंकानंतर दोन वर्षांनी सादर होत आहे. मधल्या काळात कोविड-१९ चे विपरीत परिणाम जाणवत होते. आता या अंकाच्या निमित्ताने आपली सर्वांची भेट होत आहे. हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असून समस्त भारतीयांसाठी ही गौरवाची व आनंदाची बाब आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त काढलेला हा विशेषांक आहे. हा अंक प्रसिद्ध करण्यासाठी परिषदेचे कार्याध्यक्ष, वर्तमान अध्यक्ष, सचिव द्वय, कार्यकारिणीचे सदस्य तसेच संपादक मंडळाचे सभासद या सर्वांचे सक्रिय सहकार्य लाभले हे नमूद करणे गरजेचे आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्याचे दृष्टीने हा अंक आपणास वैशिष्टपूर्ण वाटेल. त्यात सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध ठिकाणी इ.स.२०१९-२० या वर्षात परिषदेतर्फे घेतलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली आहे. मान्यवर सभासदांनी परिषदेच्या जडणघडणीचा स्वतःच्या अनुभवांच्या आधारे आढावा घेतला आहे. या व्यतिरिक्त परिषदेतर्फे सतत जे अन्य उपक्रम राबविले जातात त्यांच्याबाबतची माहिती तक्त्यांद्वारे दिली आहे. यावेळी परिषदेचा इतिहास समोर आणण्यासाठी प्रयत्न केला गेला आहे. त्यांद्वारे चांगल्या स्वरूपात परिषदेच्या कार्याचे दस्तऐवजीकरण (Documentation) करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात आपले अनुभव, आठवणी लिहणाऱ्या सर्व ज्येष्ठ सभासदांचे परिषद आभार व्यक्त करते. तसेच २०१९- २० या वर्षातील कार्यक्रमांची नोंद घेऊन त्याचा अहवाल तयार करणे व अन्य उपक्रमांची माहिती गोळा करणे अशा कामांसाठी परिषदेचे सचिव विठ्ठल घिनमिने, राजेश चव्हाण आणि आर बी. भांडवलकर यांनी जी मदत केली त्याबद्दल मी या व्यक्तींचे आभार मानतो.

या अंकात ४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्ष कुलगुरू मृणालिनी फडणवीस यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाच्या सारांश दिला असून परिषदेच्या 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' या मालिकेतील Poor Economics या ग्रंथावर आर वाय माहोरे यांनी दिलेल्या भाषणाचा गोषवारा दिला आहे. सध्या आभासी चलन हा विषय चर्चेत आहे. या विषयावर माहिती पूर्ण लेख विजय रोटे यांनी लिहिला आहे. प्रशांत हरमकर यांनी अर्थशास्त्रात इ.स. २०२१ चे नोबेल

पारितोषिक मिळविणाऱ्या लेखकांचे आर्थिक विचार सोप्या व शास्त्रीय पद्धतीने मांडले आहेत.

२०२१-२२ हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने ७५ वर्षातील अर्थव्यवस्थेच्या वाटचालीचा वेध घेणारे ७ लेख प्रकाशित केले आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्व विषयांवर नाही तरी महत्वपूर्ण विषयावर हे लेख आहेत, दारिद्र्य प्रश्नाचा आढावा घेऊन त्यावरील उपाय स्पष्ट करणारा सविस्तर लेख विश्लेषणात्मक पद्धतीने धीरज कदमांनी लिहिला आहे. करमसिंग राजपूत यांनी शेतीच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घेतला आहे. कोरोना काळानंतर अर्थव्यवस्थेचे बदललेले जे स्वरूप आहे त्याचे विवेचन वर्षा गंगणे यांनी केले आहे तर, विमा क्षेत्राच्या विकासाचा आढावा विठ्ठल घिनमिने यांनी घेतला आहे. भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेत झालेल्या बदलावर सिद्धार्थ मेश्राम यांनी प्रकाश टाकला आहे, तर प्रतिभा काळमेघ यांनी शेतमजुरांच्या स्वरूपावर, समस्यांवर तसेच त्या दूर करण्याच्या उपाययोजनांवर विवेचन केले आहे. भारतीय बेरोजगाराची समस्या समित माहोरे यांनी अद्ययावत पद्धतीने व नवीन संकल्पनांच्या आधारे मांडली आहे. यासोबत गजानन भारती यांच्या 'ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचो आर्थिक अध्ययन' या पुस्तकाचे परीक्षण कुमुदिनी जोगी यांनी केले आहे.

हा अंक सिद्ध करतांना सर्व लेखकांनी जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार. अर्थमीमांसेला आपले दर्जेदार लेख मराठी/हिंदी/इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत लिहून पाठवावे. अर्थमीमांसेला आर्थिक बळ देण्यासाठी जाहिरातींची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावा. अखेरीस कॉम्प्युटर नेटवर्क चे नरेंद्र पांढरीकर यांनी सुबकपणे व वेळेत स्वतःची तब्येत ठीक नसतांनाही अंक उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १९ मार्च २०२२
स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**
मुख्य संपादक - 'अर्थमीमांसा'

# विदेश नीती : भारतीय आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध

**मृणालिनी फडणवीस**
कुलगुरू
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**(दि. १ व २ फेब्रुवारी २०२० मध्ये मोर्शी येथे संपन्न झालेल्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचा सारांश)**

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४४ वे अधिवेशन भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे दि. १ व २ फेब्रुवारी, २०२० दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. ही सर्वांसाठी आनंद व अभिमानाची बाब आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सर्व आजी व माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव, वर्तमान कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, उपाध्यक्ष डॉ. राजेश बुरंगे, नागपूर विभागातील सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने, अमरावती विभागातील सचिव डॉ. राजेश चव्हाण, या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुरेश बिजवे, या परिषदेच्या संयोजिका डॉ. लाजवंती टेमूणे, सर्व उपस्थित मान्यवर, निमंत्रित, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, माध्यम प्रतिनिधी या सर्वांना माझा सप्रेम नमस्कार.

सर्व प्रथम विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनासाठी माझी अविरोध निवड केल्याबद्दल मी सर्वांची अत्यंत आभारी आहे. विदर्भातील ही परिषद अत्यंत महत्वाचे काम करते आहे. आपण आपल्या वैचारिक पातळीचा व लिखाणाचा दर्जा सतत उंचावित आहोत, ही अभिमानाची बाब आहे. गेली ५० वर्षे सर्वांनी केलेल्या योगदानाचे हे प्रतिफळ आहे. साधारणपणे ३० वर्षांपेक्षा अधिक काळ मी या परिषदेसोबत जोडलेली आहे. तेव्हा इतर अशा व्यासपीठांच्या तुलनेत आपली कामगिरी निश्चित सरस आहे. या परिषदेची वाटचाल अशीच पुढे होत राहावी, ही शुभेच्छा. माझ्या आजच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय ''विदेश नीती : भारताचे आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध'' हा आहे. याविषयी मी येथे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून भारताचे विभिन्न देशासोबत वाढणारे संबंध राजकीय सोबत मोठया प्रमाणात आर्थिक घडामोडींना प्रेरित करणारे आहेत. आज भारताच्या आर्थिक व राजकीय लॅन्डस्केप कडे पाहिले तर तो फार वेगळा दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे अमेरिका व चीन बरोबर बदलेले गणित पूर्वीपेक्षा वेगळेच आहे. रशिया सोबत जुने व नवीन संबंधाचे वेगळेच धोरण दिसून आले आहे. जपानचा आर्थिक महत्वपूर्ण आधार एक चर्चेचा विषय ठरतो. युरोप मधील देश त्यातून फान्स भारताचा एक रचनात्मक सहभागी देश पण टीकेच्या प्रभावातून न सुटणारा ठरतो आहे. ASEAN समूहातील व ऑस्ट्रेलिया सोबत संबंध मोठया प्रमाणात वाढले आहेत. आफ्रिकेला बहाल केलेली मदत उपयोगी सिद्ध होत आहे. भारताची पोहोच दक्षिण अमेरिका, केरेबियन, पेसिफिक व बाल्टिक देशांसोबत वाढली आहे. तरी आरसेपमध्ये शिरकाव्यासाठी आपण

वेळ मागत आहोत. कारण आपली आतंरिक विकासाची तयारी अद्याप फार मजबूत नाही. आंतरराष्ट्रीय संबंध वाढविण्यासोबत आंतरिक तयारी म्हणजे उद्योगांचा विकास, उत्पादन, कृषीतील सक्षमता व सेवा क्षेत्रातील आपल्या तयारीचा ठसा वाढविल्या शिवाय आपण निर्यातीला अधिक बळकट करु शकत नाही. या पार्श्वभुमीवर आरसेप सकट इतर घडामोडीचे विश्लेषण आपल्या विषयासाठी महत्त्वाचे ठरते.

**भारत व रशियात होणारे प्रमुख आर्थिक करार:**

या वर्षी या दोन देशांनी ५.४३ अब्ज डॉलरचा करार ५ एस-४०० मिसाइल पध्दती करिता केला. त्याचा उपयोग आपल्या देशात अंतराळातील संशोधन, अणु करार व त्याचे रेल्वे व शेतीसाठी उपयोग अशा मुद्यांशी संबंधित आहे. हा करार २०२५ पर्यंत चालेल. रशिया या देशा सोबत आपले चांगले संबंध बघता आधी केलेले अनेक करार व आताचा करार आपली रशियावर अवलंबून असणारी प्रकृती दर्शवितो. हा करार अशा वेळेला झाला आहे, जेव्हा रशिया आणि अमेरिकेचे संबंध चांगले नाही आणि दुसऱ्या बाजूने भारत वॉशिंग्टन सोबत संरक्षण करार करण्याचे योजितो आहे. त्यामुळे रशिया सोबत होणाऱ्या या कराराला अमेरिकेने (CAATSA Countering America's Adversaries Through Sanctions Act) या कायदा खालील आणून आठवण दिली आहे की, या कायद्यानुसार रशिया, इराण व उत्तर कोरीया सोबत करार करता येत नाही. हा कायदा अमेरिकेनेच बनविला आहे. भारत आणि रशियानी ''सोची'' येथे एकमेकांसोबत घेतलेली भेट आपल्या विदेश नीतीला वेगळे वळण देईल असे वाटते. भारत हा अमेरिका, चीन व रशियाच्या जवळ जातो आहे. याची तीन कारणे आहे.

१. भारत आधीपासून रशियावर संरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. आपला त्यावर खर्च प्रचंड वाढत आहे.

२. रशियाने पाकिस्तानला यावर्षी संरक्षण संबंधी मदत केली आहे. हेलिकॉप्टर वगैरे दिले त्यामुळे आपल्या राष्ट्रीय सुरक्षिततेसाठी आव्हान तयार झाले आहे.

३. अमेरिकेच्या बदलत्या धोरणामुळे भारत अमेरिकेवर पूर्णपणे किंवा आंशिकरीत्या अवलंबून राहू शकत नाही.

भारत आणि अमेरिकेच्या व्यापार संबंधामध्ये NATO ची भूमिका महत्वाची आहे. २०१६ ला भारताला संरक्षण सहभागी म्हणून अमेरिकेने स्वीकारले आहे.

**भारत चीन कुहान संगोष्टी :**

या दोन देशांमध्ये सातत्याने होणारे संवाद सुरक्षा व्यवस्थेसोबत जोडले आहेतच पण इतर पदार्थ जसे बासमती नसलेले तांदूळ ज्यांची मागणी प्रचंड आहे त्याचा दीर्घकालीन करार होणे आहे. ब्रम्हपुत्रा नदीच्या जलविद्युत निर्माणीची आकडेवारी यावर सामंजस्य होणे अपेक्षित आहे. इतर भारतीय खाद्य पदार्थाची मागणी वाढत आहे.

सर्वात मोठी व्यापाराची दिशा म्हणजे तेल कंपन्यासोबत चर्चा करून ''तेल खरेदी समूह'' तयार करणे असा आहे. तेल क्षेत्रांची मक्तेदारी नसावी आणि आशियाई देशांना कच्चा तेलाची निर्यात होत राहावी यासाठी विशेष आयोजन करण्यात आले. ऑपेक देशांचे वर्चस्व नसावे आणि भारताच्या एकूण मागणीपैकी ६०% पुरवठा करण्यात यावा, अशी भूमिका होती. तेल उद्योगाचे विशेष समूह नसावे अशी चीन व भारताची भूमिका होती.

**आरसेप संधी आणि वेध :**

क्षेत्रीय सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी एक (Regional Compressive Economics Partnership) अभिनव भारत, चीन व जपान या तीन मोठया राष्ट्रांसाठी आणण्यात आला. त्यात क्षेत्रीय व्यापार संघ (ASEAN) एशियान यांचा समावेश करावा. त्यात ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरीया व न्यूझीलॅन्डचा सहभाग राहील. लोकसंख्या निकष व्यापारासाठी सर्वात मोठा ठरविण्यात आला. या देशांची एकत्रित लोकसंख्या ३.४ अब्ज किंवा जगाच्या ४९% आहे.

या देशांचा एकत्रित GDP ३०% (२२ अब्ज डॉलर) आहे. पूर्ण तयारी झाल्यानंतरही जगाचा सर्वात मोठा व्यापार संघ होणार आहे. उत्पन्न प्राप्ती २६० ते ६४४ अब्ज डॉलर अपेक्षित असून जागतिक उत्पादन क्षमता वाढविण्यास मदतगार ठरेल. तसेच आशियाई संघ झाले आहेत, ते सर्व समाविष्ट झाले आहेत. त्याचा विचार केल्यास भारताची भूमिका महत्वपूर्ण राहील. चीनच्या भरपूर वस्तु भारतात आयात केल्या जातात. भारताचा व्यापार शेष वारंवार समस्या संकट वाढत आहे. भारत एकमात्र देश आहे, ज्यांनी चीनबरोबर एकही FTA विदेशी व्यापारासाठी प्रयत्न केला नाही. भारताने Differential Market Access बाजार भिन्नता प्रवेश संधी ही रचना फक्त चीनसाठी भारताने केली आहे व इतर देश याचा अवलंब करायला तयार आहे. हा विभेद इतर देशांना लावण्यापूर्वी (जे आरसेपचे इतर देश आहेत) विचार होईल. कारण हे सर्व देश सीमा शुल्क कमी करण्याच्या प्रयत्नात आहे. ही बाब बऱ्याच वस्तुसाठी लागू पडते. काही अशा व्यवस्था करण्याची भारताची तयारी पण आहे. आरसेपसमुहाचे श्रीमंत देश जसे ऑस्ट्रेलिया व सिंगापुर भारताच्या विचाराचे सर्मथन करत नाही. भारतीय श्रमिकांना मुक्त गतिशीलतेच्या मुद्यांचे तर अजिबात समर्थन होत नाही.

**अलीकडील आरसेप हालचाली :**

आशियाई प्रांतातील ''आरसेप'' अत्यंत महत्वाचा आर्थिक आधार असलेला हा व्यापार कायदा २०२० पर्यंत अस्तित्वात येणार आहे. यासाठी भारतीय भागीदारी अनेक कारणांमुळे महत्त्वाची असून भारताने हल्लीच घोषणा केली आहे की, तूर्तास तो या करारात सामिल होणार नाही. आतापर्यंत ३ परिषदा यासाठी आयोजित करण्यात आल्या. ४ नोव्हेंबर, २०१९ ला बँकॉकला आयोजित करण्यात आलेली तिसरी बैठक. याच परिषदेत आपण सही केली नाही. म्हणजे भागीदारीवर समर्थन दर्शविले नाही.

भारतासकट १६ देश यात असून ब्रुनेई, इंडोनेशिया, लाओसा, मलेशिया, म्यानमार, फिलीपाईन्स, थायलॅन्ड आणि व्हिएतनाम हे १० देश असियान व्यापार संघाचे सदस्य आहेत. तसेच आशिया प्रशांत क्षेत्रातील सहा देश भारत, ऑस्ट्रेलिया, चीन, न्युझीलँड, जपान, दक्षिण कोरीया यांचा समावश आहे. आशिया परिसरात व जगात देखील या देशांचे वर्चस्व वाढत आहे. व्यापारी केन्द्र म्हणून ओळखले जाणारे हे देश आपली वेगळी प्रतिमा उभी करीत आहेत.

या कराराच्या माध्यमातून एक सामायिक बाजारपेठ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. याला भारतातून विरोध करण्यात येत आहे. या सामयिक बाजारपेठेमुळे तर चीन, जपान, दक्षिण कोरीया, न्युझीलॅन्ड, ऑस्ट्रेलियामध्ये जी उत्पादने निर्माण होतात, ती भारतात येतील आणि येथील लोकांना उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे भारतातील उत्पादने

इतर देशांना उपलब्ध होतील. मुख्य म्हणजे ही उत्पादने ज्या किंमतीत जपान किंवा दक्षिण कोरियात विकली जातात त्याच किंमतीत ती भारतात मिळतील. उदा. दुग्धजन्य पदार्थ निर्मीती व निर्यातीत ऑस्ट्रेलिया आणि न्युझीलंड जगात पहिल्या क्रमांकावर आहे. ही अग्रेसर असणाच्या परंपरागत लाभामुळे या देशातून काही दुग्धजन्य पदार्थाची निर्यात होत असते. समजा न्युझीलंडचे चीज चॉकलेट्सच्या किंमती न्युझीलंड प्रमाणे ठेवल्या म्हणजे भारतीयांना या वस्तुची किंमत न्युझीलॅन्डप्रमाणे द्यावी लागत असेल तर त्या वस्तु भरपूर महाग मिळतील. अशी पध्दत प्रत्येक निर्यात होणाऱ्या १६ देशांमध्ये तयार होणाऱ्या वस्तुसाठी लागू होईल.

वस्तु उपलब्ध होतील पण त्या महाग असतील. चीन आपल्याच आवडीच्या वस्तु आपल्यालाच विकण्याची अधिक मोठी मोहिम सुरु करेल. ही संकल्पना मुळात २०१३ साली मांडण्यात आली. विविध अंगी चर्चा झाल्याने २०१९ ला या करारावर स्वाक्षऱ्या होतील असे ठरले होते, आणि २०२० पासून या कराराची अंमलबजावणी होईल. नुसता महाग शब्द पाहिला तर संकल्पना स्पष्ट होत नाही. ही चांगली की वाईट असेही समजत नाही. काही याच्या चांगल्या ही बाजू आहेत, असे लक्षात येईल. जसे अनेक वस्तुंची उपलब्धता भारतीय लोकांना होऊ शकेल. अशा वस्तुंचे उत्पादन जर भारतात होतच नसेल तर त्याचा लाभ ग्राहकांना होऊ शकेल. पण त्याचे आणखीन कोणकोणते कंगोरे आहेत आणि भारताने का नकार दिला हे आपण समजावून घेऊ या.

१) भारताचे मत आहे की एक विशिष्ट मर्यादेबाहेर माल आयात होऊ लागला तर त्यावर कर लावण्याची मुभा असायला पाहिजे. पण अवाजवी आयातीच्या विरोधातील संरक्षणाची भारताची मागणी फेटाळली गेली.

२) या १६ देशांसोबत भारताचा मुक्त व्यापार करार द्विपक्षीय स्वरुपाचा आधीच झाला आहे. त्यातून मिळणारा प्रतिसाद नकारात्मक आहे. भारताला व्यापार तुट असून देखील हे द्विपक्षीय करार भारताच्या बाजूने आहेत. भारत सध्या या १६ देशांसोबत ६७ अब्ज डॉलरची निर्यात आणि १७२ अब्ज डॉलरची आयात करतो. २०१९ सालाची भारताची एकूण जागतिक तूट १८० अब्ज डॉलर्सची आहे. यामध्ये १०५ अब्ज डॉलर्सची तूट आरसेप देशांबरोबर आहे. आणि एकट्या चीन बरोबरची व्यापार तुट ही ५३ अब्ज डॉलर्सची आहे. आरसेपचा प्रमुख फायदा चीनला होणार आहे. कारण अमेरिका व युरोप यांच्या सोबत चीनचा व्यापार अतिशय संथ झाला आहे. अमेरिकेसोबत व्यापार त्यांच्यासाठी एक आर्थिक समस्या आहे. आपली फक्त चीन बरोबरची आयात या करारामुळे दुप्पटीने वाढेल. चीनकडे उत्पादनाचा साठा (फाजील पुरवठा) भरपूर वाढला आहे. त्यामुळे चीन उत्पादन व निर्यात करत राहील व वाढवित राहील. ही चीनची उत्पादन क्रांती आणि भारतातील लहान वस्तु जसे खारेदाणे, पापड, पेन, पेनस्टॅन्ड, शिक्षण क्षेत्रातील सामान इ. विकण्यास पुढे येईल व भारतीय उद्योगाला चांगलाच फटका बसेल. ही शीतयुध्दाची तयारी आहे का? असा प्रश्न पडतो.

**इतर देशांसोबतचे व्यापार आणि भारत :**

आपल्या वाढत्या लोकसंख्येबरोबर दुधाचा पुरवठा आपण करु शकत नाही. देशी गाईची संख्या मर्यादीत असून आपण विदेशी गाई (जर्सी जनावर) यांची संख्या गेल्या २५-३० वर्षापासून वाढवत आहे. अत्यंत उपयोगी व स्वस्त गाईचे दुध जे

घरोघरी मिळत होते ते कमी झाले आहे. देशी दुधाच्या जागी आपण उच्च जनन (हायब्रीड) जनावरांचे किंवा भेसळ दुध पीत आहोत. पंजाब व हरियाणामध्ये असणाऱ्या गाई पण हायब्रीड आहेत. शाहीवाल नावाची गाय, झेबू गाय राष्ट्रीय गोकुल चळवळीत गणली जाते. ही झेबू गाय दक्षिण आशियातील गाय आहे. कुबड (Humped) पण त्याचे जनन मोठ्या प्रमाणात स्वीझरलंडच्या गाई सोबत केले आहेत. पंजाब-हरियाणा दूध उत्पादनात अग्रेसर आहे. पण आपल्या स्वदेशी संपतीला आपण घालवून बसलो आहे व त्यासोबत या सामायिक करारामध्ये दुध, चीज, लोणी व इतर सर्व दुग्ध पदार्थ ऑस्ट्रेलिया व न्युझीलॅन्ड मधून येतील व आधीच कमी गुणवता असलेला आपला दुग्ध उत्पादक यांच्या सोबत स्पर्धा करू शकणार नाही. करमुक्त व्यापारात काही वस्तु स्वस्तात मिळतील पण स्थानिक उत्पादन व उत्पादकांवर त्याचा विपरीत परिणाम होईल. व्यापारतुटीची प्रश्न संपणार नाही. त्यामुळे भारताने सही करण्यास नकार दिला आहे. ह्या प्रक्रियेतून स्थानिक पातळीच्या व्यापाराचे नुकसान अधिक आहे.

३) सामाईक बाजारपेठेच्या निर्मीतीच्या करारात नॉनटरिफ बॅरियर हा एक महत्वाचा मुद्दा आहे. अनेक देशांकडून या बाजारपेठ निर्मितीमध्ये आयात शुल्क कमी केले जाऊ शकते. त्या शिवाय काही अप्रत्यक्ष कर या देशांनी लावलेले आहेत. पण त्याचा समावेश या करारात नाही. आज चीनची बाजारपेठ भारतासाठी अप्रत्यक्ष करामुळेच खुली नाही. चीनने आयात शुल्क कमी केले असले तरीही अप्रत्यक्ष कर खूप जास्त असल्याने भारताला चीनच्या बाजारपेठेत शिरकाव करता येत नाही. तसेच सिंगापूर मधल्या काही सेवा, ऑस्ट्रेलियात असलेल्या वस्तु व सेवा याच धर्तीवर आहेत. त्यामुळे अप्रत्यक्ष कराचा विचार व्हावा अशी ठाम भूमिका भारताची आहे. त्याला इतर राष्ट्रांचा विरोध आहे.

४) आयात शुल्क कमी करण्यासाठी भारताला एक आधारभूत वर्ष ठरवावे लागेल. त्या आधार वर्षापासून शुल्क कमी होईल ते भारताने ठरविले पाहिजे. पण आरसेपने २०१३ हे वर्ष आधारभूत ठरविले आहे. भारत याचा पण विरोध करतो आहे. कारण तेव्हा भारताचे आयातशुल्क कमी होते. ते २०१४ साली वाढले. त्यामुळे २०१४ हे वर्ष आधार वर्ष मानले जावे ही भारताची मागणी आहे. पण आरसेप या साठी तयार नाही. असा प्रश्न इतर १० आशियन देशात देखील असू शकतो. अजून त्यावर खुली चर्चा झाली नाही.

५) अप्रत्यक्ष व्यापार मुद्दा देखील महत्वाचा आहे. तो भारताने या परिषदेत (तिसरी) उपस्थित केला . चिनी माल किंवा अन्य देशातील वस्तू तिसऱ्या देशांकडून आपल्याकडे आल्या तर यासाठी कराची काही तरतूद केलेली नाही. यावर इतर देशांची प्रतिक्रिया थंड होती.

भारत अन्य देशाप्रमाणे मेक इन इंडिया, स्टार्ट अप इत्यादी योजना करतो आहे. मात्र स्पर्धा करण्यासाठी बराच काळ जाऊ द्यावा लागेल. त्यामुळे अटी मंजूर करून घेऊन आरसेप मध्ये रहावे असे काही ठोस निर्णय भारताला करावे लागणार. भारत कोणत्याही दडपणाखाली नाही हे सिद्ध होत आहे.

संपूर्ण जगात होत असलेल्या अनेक उलाढाली पश्चिम राष्ट्रांच्या आर्थिक निर्णयांवर प्रश्नचिन्ह लावणाऱ्या आहेत. प्रत्येक देशाला आंतरराष्ट्रीय व्यापारात आपली भूमिका बळकट करायची आहे. संस्थापक सदस्य असणे आणि

नंतर त्यात शामील होणे यात फरक असू शकतो. भारताने आज स्टार्ट अप इंडिया, स्टॅन्ड अप इंडिया, सुरू केला आणि असे प्रयोग चीन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर व इतर ही देशांमध्ये झाले असल्याने त्यांच्याकडे योजना तयार आहेत. आणि उत्पादन व निर्यातीसाठी मालाचा साठा आहे. आपल्याकडे ही तयारी नाही. विदेशी वस्तू भारतात येऊन लोकांना (दोन्ही प्रकारे गुणवत्तेप्रमाणे चांगल्या व किंमतीमध्ये वाजवी) मिळायला लागल्या की आपले उद्योग बंद पडणे, ढासळणे, बुडणे इत्यादी शक्यता फार मोठी आहे.

भारत कोणत्या वस्तूंच्या उत्पादनात पुढे आहे आणि सातत्याने येऊ शकतो तर ते उद्योग आहेत आरोग्य, परंपरागत नैसर्गिक उपचार, कायदा व व्यवस्थापकीय सल्ला, पर्यावरणशास्त्र, करमणूक, कपडा उद्योग, औषधीशास्त्र इत्यादी क्षेत्रात भारताची ताकद मोठी आहे.

**आरसेपमध्ये सामील झाले तर काय होऊ शकेल?**

आरसेपमध्ये भारताने सामिल व्हायलाच नको अशी भूमिका नक्कीच नसावी. पण आपल्याला काय साधता येईल हे तपासून पाहिले पाहिजे. काही संधी आपल्याला घेता येण्यासारखे आहेत. जसे सेवा क्षेत्रामध्ये भारतीय व्यवसायिकांना अधिक उलाढाल करता येईल. सेवा क्षेत्राच्या वाढीचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

आरसेपच्या माध्यमातून लघु व मध्यम प्रकारचे उद्योग प्रस्थापित करण्याची संधी आहे. ती वाढवण्यासाठी अधिक वाव मिळेल. भारत अधिक उत्पादन करण्याचे धाडस कधी करेल? किंवा जगाला लागणाऱ्या वस्तू तयार करेल का? असे नाही की, आपल्याला करता येणार नाही पण कुठे तरी आपण कमी पडतो आहोत त्याची जाणीव युवा वर्गाला मोठ्या प्रमाणात होणे फार आवश्यक आहे. आपण आपला फायदा कसा उचलायचा याचा नियोजित प्रवास सुरू करणे फार आवश्यक आहे. आपला हा प्रवास कसा वाढेल यासाठी लक्ष देण्याची गरज कायम आहे.

आरसेपचा नवा वाद आपली विदेशी नीती बळकट करण्यासाठी आणि व्यापार व्यवस्था स्पर्धक होण्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. आयात पर्याय देणे स्वातंत्र्य(संपूर्ण आर्थिक स्वावलंबन) अशी कल्पना आपण सध्यातरी करू शकत नाही. तरी देखील जागतिकीकरणाच्या काळात विनाखर्च लाभाच्या विश्लेषणाशिवाय नवीन व्यापार पद्धतीत हात घालने अधिकच धोक्याचे होईल. इतर देशांचा प्रश्न वेगळा असू शकतो. आपण सध्या कोणताही समन्वय न करणे चुकीच्या समन्वयापेक्षा बरे, असा देखील विचार पुढे येतो आहे.

**मतीतार्थ :**

फार अधिक देशांसोबत तडजोड करून व्यापार करणे, विविध पर्यायांचा शोध घेणे असे उपाय आपल्या विदेशी धोरणात बरेच परिणाम घडवून आणू शकेल. पण आपल्याला आपल्या व्यापारासाठी स्वातंत्र्याच्या देखील विचार करावा लागेल. आपण अमेरिका व रशिया (USSR आधीचा) अशा दोन ध्रुवीय महाशक्ती सोबत व्यापार चांगला करू शकलो. असे आपणास १९६२ सालच्या आसपास करणे शक्य होऊ शकले. त्या अनुभवातून आपण धडे घ्यायला हवे. चीनने देखील त्यांच्या १९५० ते १९७१ च्या विदेशी धोरणा आधारे सुधारणा केली. काही विशिष्ट देशांसोबत काही विशिष्ट वस्तूंचा व्यापार चालू ठेवला. सामान्य सिद्धांत म्हणून पाहिले तर आंतरराष्ट्रीय व्यापारातून अधिकाधिक अवलंबन स्वयंपूर्णतेकडे नेऊ

शकत नाही.

व्यापार रक्षण म्हणजे एका प्रकारे कुंपण घालणे असे आहे. व्यापाराची ही पद्धत कुठे वापरायची आणि अधिकाधिक देशांसोबत अधिक वस्तूंचा व्यापार कसा करायचा ही रचना किचकट असली तरी त्यातून योग्य मार्ग काढावा लागेल. ही सर्व प्रक्रिया एका खेळाप्रमाणे आहे. म्हणून आज जसे भारताला आरसेपच्या साठी सदस्यत्व नको वाटते. किंवा काही कालावधीनंतर विचार होईल असे वाटते, तसे इतर देशांची देखील भूमिका होती. आपल्याकडून केल्या गेलेले प्रयत्न ज्याचे नाव हाऊडी मोदी, मल्मामपुरम आणि कलदिवोस्टोक, व्यापार संबंध सुदृढ करण्याच्या उद्देशाने वाटचाल करणारे होते. अशा संबंधांना,(RIC- Russian India - China) सोबतच JAI(Japan-America-India) अशी नावे देण्यात आली. सौदी अरेबिया किंवा इजराइल व पॅलेस्टिनीयन देशांसोबत काम करण्याचा निर्णय असो उद्देश एवढाच होता की, ठराविक व्यापाराच्या बाबतीत व बदलत्या व्यापार जडणघडणीत देशांसाठी उत्तम व्यापार व्यवस्था उपलब्ध करणे. यासाठी चांगल्या विश्लेषणाची चमू तयार असणे, म्हणजेच ठाम स्वरूपाची मतप्रणाली तयार होणे असे आहे. त्यानंतर निर्णय घेणे उपयुक्त ठरेल.

आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधांचा आपण एक महत्त्वाचा भाग अभ्यासला की कमी जोखिमेची विदेशी नीति भारताने स्वीकारली तर तो फार थोड्या प्रमाणात प्रगती करू शकेल. त्याविरुद्ध आपण मोठ्या उलाढाली करताना परंपरागत न्युक्लीयर, राजकीय किंवा आर्थिक बाबींचे विश्लेषण त्यात समाविष्ट राहणार, अशा उलाढाली(big calls) मोठ्या स्वरूपाच्या असतील. त्यात जोखीम राहीलच पण नीट सुसूत्रीकरण केल्यास आणि योग्य मोजमाप झाल्यास, असलेल्या गतिमान व्यवस्थेसोबत आपल्याला आंतरराष्ट्रीय नामांकन मिळू शकेल. म्हणून पुढील काळात जोखीमेचा मार्ग स्वीकारावा लागेल.

पुढील काळात आपली विदेशी नीति इतर देशांच्या विदेश नीतिवर आधारित राहणार असे आवश्यक नाही, तरी छोटीशी चूक व्यापाराची दिशा बदलणारी ठरू शकेल. तेव्हा आपल्याला मिळणारी संधी आणि अटी लक्षात ठेवून धोरणे तयार करावे लागतील. त्या जोखीमेतून मिळणाऱ्या फायद्याचे फळे उपभोगता येतील. आंतरराष्ट्रीय राजकीय रंग नाकारता येत नाही. आपला जम्मू व काश्मीरचा मुद्दा युएनओ सोबत कायम चर्चेत आहे. ही बाब एंगलो अमेरिकन युती अंतर्गत असलेल्या उद्देशाबाबत चुकीच्या पद्धतीने समजण्यात आली. यातून शीतयुद्धाच्या प्रश्नांची गंभीरता लक्षात घ्यायला हवी. आपण साईनो-सोव्हियट फरकाबाबत पाहिजे त्या आकाराकडे पोहचू शकलो नाही. १९६०, १९८० व २००१ या काळात पाकिस्तानचे अमेरिकन व चीन संबंध आपण खोलात पाहू शकलो नाही. भारताने वेगवगळ्या पध्दतीने विजय मिळवला, पण विदेशी व्यापारासाठी अमेरिकेवर अधिक निर्भर राहावे लागले. प्रामुख्याने भारत रूस संबंध चांगलेच टिकले. १९९१ नंतर आपली नीती जागतिकीकरणासाठी बदलत गेली.

Indo-Soviet Treaty आणि India-US Nuclear Deal हे जगातले सर्वात महत्त्वपूर्ण करार झाले. आता जेव्हा जग क्षेत्रीय शक्तीकडे बदलत आहे. तेव्हा आपल्याला बहुव्यापार पध्दतीचा विचार करुन अंमलात आणावा लागेल. भारतासह इतर देश मोठया प्रमाणात आर्थिक व राजकीय पुर्नसंतुलन

या क्षेत्रीय शक्तीसाठी करणार आहे किंवा करावे लागणार आहे. सध्या सर्व महत्त्वपूर्ण देश धोरणात्मक बदलांच्या दृष्टीकोणातून वाटचाल करत आहेत.

सध्या आपल्या देशात रुढ असलेली विदेश नीती ती पूर्वी तयार केलेल्या धोरणाप्रमाणे कामात वापरल्या जात आहे. त्याच्या संक्रमण काळातून आपण बाहेर आलेलो नाही. त्यावर जागतिकरणाचा पगडा आहेच. पहिल्या स्तराला सोडून नवीन धोरणाकडे जाणे तितकेसे सोपे नाही. भारताच्या एकूण विकासाचे धोरण पाहता आपल्याला विकास आणि निर्यात वाढ यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ज्या देशांसोबत आपले व्यापार नव्हते किंवा अत्यंत कमी होते (Non-Alignment) ते आता अनेक देशांसोबत बहु विविध करार करायचे आहे (Multi-Alignment). त्यासाठी रचना तयार करावी लागेल. यासाठी अधिक उत्साहवर्धक नियोजन अधिक सहभागिता व अधिक रचनात्मक धोरण आखणे अपेक्षित असेल. आपल्याला ही चालून आलेली संधी आहे काय? अशा बाजूने विचार केल्यास लक्षात येते की, रचनात्मक बदल होणे अधिक उपयुक्त ठरेल. जर आपल्या पद्धतीने विचार केला तर विश्व व्यापार व्यवस्थेमध्ये आपले स्थान मागे पडायला नको. एक विस्तारीत धोरण या वेळेस आवश्यक आहे. इतर देशांच्या तुलनेत आपली दिशा आणि आपल्या स्वसंशोधन व स्वसंसाधनाचा विवेकपूर्ण उपयोग फायद्याचा ठरु शकतो. BRICS देशांच्या विदेशी व्यापार धोरणांचा विचार केल्यास असे देश स्वतःच्या विकासाच्या बाजूने अनेक निर्णय घेतात. आपल्याला देखील राष्ट्रीय हित अधिक व आंतरराष्ट्रीय हित पुढील भागात ठेवावे लागणार आहे. आपली दीर्घकालीन समृध्दी आणि प्रभाव प्रस्थापित करणे तेवढेच आवश्यक असेल. त्यासोबत येणारी जागतिक अस्थिरता इतर देशांचे आपआपल्या विकासासाठी केलेले प्रयत्न व आपली प्रासंगिकता महत्त्वाची ठरणार आहे.

अस सर्व ठरत असताना आपले सर्वात मोठे राजकीय आव्हान म्हणजे पाकिस्तान सोबत संबंध. याचा थेट परिणाम वस्तूच्या आयाती-निर्याती सोबत असतोच. तसेच पाकिस्तानचे इतर देशांसोबत असलेले संबंध म्हणून त्याचा चांगला किंवा वाईट परिणाम आपल्या व्यापारावर पडतो, असे आपण काही वर्षापासून पाहतो आहेच. सीमाक्षेत्रावर चालत असणाऱ्या आतंकवादाचे समापन व्हावे असे वाटत असले तरी व्यापारावर होणारे परिणाम निश्चित दिसून येतात. हा मुद्दा जगाच्या पातळीवर देखील भरपूर चर्चिला जात आहे. काश्मिरचा मुद्दा ठामपणे मांडणे हा देखील एक आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग आहे. आपल्या अंतर्गत घडामोर्डीना लक्षात घेऊन आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या इतिहासात जमा झालेले अनेक दाखले आपल्या व्यापाराच्या दिशेला सकारात्मक किंवा नकारात्मक करण्यास कारणीभूत ठरले आहेत. आपण त्यातून व्यापाराची दिशा आपल्या बाजूने वळविणे महत्त्वाचे ठरेल.

विदेशी नीतीचा जर आपण ७० वर्षाचा आढावा घेतला तर आपल्याला संमिश्र चित्र दिसते. राष्ट्रीय विकास व्हावा असे प्रत्येक राजकीय व सामाजिक स्थळांचे ब्रीदवाक्य असते. फरक असा आहे की आपण स्वातंत्रपूर्व आंतरराष्ट्रीय वित्त व संघटनांचे सदस्य केल्या गेलो आणि काही बाबींवर आपल्याला अवलंबून राहवे लागले. तर चीन सारख्या देशामध्ये त्यांनी कोणत्याही आंतरराष्ट्रीय सदस्यत्वाशिवाय अनेक वर्ष काम केले आणि स्वतःचे विकासाचे प्रारूप वेळेत तयार केले. भारताने देखील

स्वतःचे प्रामाणिक अवलोकन करून तयार केलेली रचना दीर्घकालीन फायद्याची ठरु शकेल. आपल्याला विशिष्ट समयात एक टोकाची भूमिका घेणे कुठेतरी महत्त्वाचे वाटते. एखाद्या जोखिमेला सामोरे जाताना भविष्यकालीन आढावा घेऊन पुढे जावे लागणार आहे. आपल्या सीमेवरील प्रश्न, वेगवेगळ्या क्षेत्रीय संघटना आणि आपणास प्राप्त संधीचा योग्य वापर ही आव्हाने पेलत आपण व्यापार विचारांची दिशा निश्चित करु शकतो. त्याला अंमलात आणताना देखील कार्यपध्दतीचा सक्षम उपयोग अपेक्षित आहे. तरी जागतिक स्तराच्या राजकीय उलाढालीचा सातत्याने आढावा घ्यावा लागणार आहे. आपल्या इतिहासाला लक्षात घेऊन पुढील निर्णयांसाठी सज्ज व्हावे लागते. अगदी नवीन विचार नको. एकमत तयार करुन पुढे जाण्याची आवश्यकता आहे.

दि.१२/११/२०१९ रोजी नीती अयोगाचे माजी उपाध्यक्षांचे म्हणणे असे आहे की, भारत आरसेपच्या सध्या बाहेर आहे. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येणार नाहीत. आता भारतात बहुराष्ट्रीय कंपन्याची गरज आहे. त्यामुळे आत्ता आरसेपात प्रवेश न करणे इतर १५ देशांसाठी देखील आपल्या देशांतील उत्पादनाला वाव न मिळणे किंवा त्या वस्तुंना हुकणे असे असेल. आपल्या देशाला पुढे नेताना यावर सकारात्मक विचार व्हावा असे श्री. पंगारिया यांना सुद्धा वाटते. नीती आयोगातून अधिक सकारात्मक निर्णय व्हावे असे त्यांना वाटते.

चीन, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया सारख्या देशांनी आता जसे भारत पाऊल उचलतो आहे तसे २०-२५ वर्षापूर्वी उचलले तेव्हा अशा प्रकारचा करार अंमलात नव्हता. भारत आता प्रगती करतो आहे तर त्याला अडकविण्यासाठी आधी पुढे आलेले देश आपली स्पर्धा कमी व्हावी म्हणून हा प्रयोग करत आहेत अशी शंका व्यक्त केली जात आहे.

**संदर्भ :**


1) Wikipedia 2019, Regional Comprehensive Economate Partnership (media Statement)
2) Ganguly Sumit (2016) : http://encrypted-tbn1.gstatic.com Indian's Foreign Policy Retrospect &Prospect.
3) Yadav Deepak (2017) : Indian Foreign POolicy in the 21st Century, Kaveri books. ISBN No. 9386463016
4) m.economictimes.com : India decides to opt out of RCEP, says key concerne not addressed
5) www.bloomberg.com : What's the RCEP and what happened to the TPP?


◆◆◆

# अभिजीत बॅनर्जी आणि एस्थर डफ्लो यांच्याPoor Economics (Rethinking Poverty and the ways to end it) या ग्रंथातील विचार

**रामदास माहोरे**
प्राध्यापक आणि माजी विभागप्रमुख,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनात दि. २ फेब्र. २०२० रोजी डॉ. रामदास माहोरे यांनी दिलेल्या आर्थिक ग्रंथातील विचार विश्‍व या मालीकेतील व्याख्यानाचा सारांश)**

पुअर इकॉनॉमिक्स (Poor Economics) हा ग्रंथ १० प्रकरणात विभागलेला आहे. या ग्रंथातील प्रकरणांची शीर्षके शब्दशः अर्थाची नसून ती रूपात्मक आहेत. ते दोघे विकासाचे अर्थशास्त्रज्ञ त्यांच्या मातोश्रीमुळे बनले. ते त्यांच्या वडिलांकडून युक्तिवादाचे महत्व शिकले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असे स्पष्ट केले की अभिजीत बॅनर्जी यांच्या घराजवळ गरीबांची वस्ती होती. त्यांना वयाच्या ६ व्या वर्षापासूनच गरीबीची जाणीव होती. गरीबांच्या अर्थशास्त्रासाठी गरीबीचे अर्थशास्त्र चुकीचे वाटते. कारण गरीबांजवळ फार कमी संपत्ती असते. आर्थिक अस्तित्वासाठी त्यांच्याजवळ काहीच नसते. दुर्दैवाने अशा गैरसमजामुळे वैश्विक दारिद्र्य निर्मूलनाचा लढा कमजोर बनतो. गरीबांनी त्यांच्या प्रश्नांना योग्य प्रतिसाद दिल्यामुळे या पुस्तकाची निर्मिती झाली. त्यांच्या लिखाणाचा केंद्रबिंदू जगातील अति गरीब लोक होता. २००५ मध्ये जागतिक लोकसंख्येच्या १३ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती.

या पुस्तकावरून आपणास गरीबांचे आर्थिक जीवन समजून घेता येते. गरीबांना कोठे आणि कोणत्या कारणांसाठी मदतीची गरज असते? ते कोणत्या वस्तू खरेदी करतात? मुलांच्या शिक्षणासाठी काय करतात? स्वतःच्या, मुलांच्या आणि पालकांच्या आरोग्यासाठी काय करतात? त्यांना किती मुले असावीत असे वाटते? बाजार व्यवस्था आणि संस्था त्यांच्यासाठी कसे कार्य करतात? सरकार त्यांच्यासाठी काय करते? इत्यादी गरीबांच्या कौटुंबिक जीवनाचे आवश्यक पैलू आहेत.

या पुस्तकावरून गरीबांचे जीवन आणि त्यांच्या आवडीनिवडी तसेच त्या आधारावर जागतिक दारिद्र्याचे कसे निर्मूलन करावे हे समजते. आपणास अनेक प्रश्न समजून घेण्यास मदत होते. गरीबांची मुले अनेक वर्षे शाळेत जाऊनही त्यांना काहीच समजत नाही. त्यांना आरोग्य विम्याची आवश्यकता का नसते? अल्प अनुदान त्यांच्यासाठी कसे लाभदायक ठरू शकते. यावरून असे स्पष्ट होते की आशा ही ज्वलंत आणि ज्ञान महत्त्वपूर्ण असते. आव्हाने मोठी असली तरी आपण प्रयत्न करीत राहिले पाहिजे. यश जरी फार दूर वाटत असले तरी ते तितके दूर नसते.

प्रकरण एक 'पुन्हा पुन्हा विचार करा' आहे. या प्रकरणात असे स्पष्ट करण्यात आले की जगात दरवर्षी ९० लाख मुलांचा ५ व्या वाढदिवसापूर्वीच मृत्यू होतो. सब सहारन आफ्रिकेत ३० पैकी एका अर्भकाचा जन्म होतांना मृत्यू होतो.

विकसित देशात ५६०० पैकी एका अर्भकाचा जन्माच्यावेळी मृत्यू होतो. सब सहारन आफ्रिकेतील २५ देशात सरासरी आयुर्मान ५० वर्षे होते. भारतात ५ कोटी शालेय विद्यार्थ्यांना साधे पुस्तक सुद्धा वाचता येत नाही.

दारिद्र्या विरुद्धचा लढा फार मोठा आहे. सर्वप्रथम ही समस्या समजून घेतली पाहिजे. या समस्येचे विविध पैलू क्रमाक्रमाने सोडविले पाहिजेत. दारिद्र्याचे अंतिम कारण कोणते? लोकशाही गरीबांसाठी चांगली आहे काय? विदेशी मदत महत्वाची ठरते काय? खुली बाजारव्यवस्था उपयुक्त ठरते काय? जेफ्री साच संयुक्त राष्ट्राचे सल्लागार यांनी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. गरीब देश गरीब आहेत कारण ते विविध समस्यांनी ग्रासलेले आहेत. जास्त गुंतवणुकीशिवाय या देशातील समस्या सोडविता येणार नाहीत. हे देश गरीबीच्या सापळ्यात अडकलेले असल्यामुळे ते गुंतवणूक करू शकत नाही. लोकशाही किंवा खुली बाजार व्यवस्था त्यांच्यासाठी काही करू शकत नाही. त्यांच्या मते विदेशी मदत हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे या देशांच्या उत्पन्नात वाढ होईल, गुंतवणूक वाढेल आणि फायद्याचे चक्र अव्याहत सुरू होईल. द एन्ड ऑफ पॉव्हर्टी या पुस्तकात त्यांनी २००५ मध्ये म्हटले होते की जर श्रीमंत राष्ट्रांनी दरवर्षी १९५ बिलियन डॉलरची मदत २००५ ते २०२५ पर्यंत केली तर जागतिक दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन होऊ शकेल.

जेफ्री साच यांची उत्तरे चुकीची आहेत असे काहींना वाटते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम ईस्टरली यांच्यामते विदेशी मदत फायद्यापेक्षा जास्त हानीकारक आहे. त्यामुळे लोक आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. मोठ्या संकटकाळात विदेशी मदतीचा उपयोग होतो. मदत ही चांगली की वाईट याचे विवेचन पुस्तकात केले नाही. परंतु एका विशिष्ट वेळी मदत चांगली की वाईट हे पुस्तकावरून समजू शकते. अमर्त्य सेन यांनी म्हटले होते की दारिद्र्यामुळे बुद्धिमत्तेची अपरिमित हानी होते. आफ्रिकेतील गरीब आणि हुशार मुलगी काही वर्षे शिक्षण घेवू शकेल परंतु पोषणाअभावी ती जागतिक पातळीची खेळाडू होऊ शकत नाही किंवा पैशाअभावी चांगला व्यवसाय सुरू करू शकत नाही.

जेफ्री साच यांच्या मते मदतीमुळे गरीबांच्या जीवनमानात सुधारणा होऊ शकते. खेड्यातील गरीबांना मोफत खते, शालेय भोजन, मोफत औषधे, शाळेत संगणकाच्या सोयी उपलब्ध झाल्या तर जीवन निर्वाह शेतीचे रूपांतर आत्मनिर्भर व्यापारी कार्यात होऊ शकेल. केनेडी नावाच्या एका शेतकऱ्याला मोफत खते मिळाल्यामुळे त्याच्या शेतीची उत्पादकता २० पट वाढल्यामुळे त्याची दारिद्र्याच्या सापळ्यातून मुक्तता झाली असे त्यांनी म्हटले होते.

२००३ मध्ये लेखक यांनी अब्दुल लतिफ जामिल दारिद्र्य कृती प्रयोगशाळेची स्थापना केली. त्यांना दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यात चांगले यश मिळाले. २०१० पर्यंत त्यांच्या संशोधकांनी ४० देशात २४० प्रयोग यशस्वी केले. या पुस्तकाचा संदेश दारिद्र्याच्या सापळ्याच्या पलीकडे पोहोचतो. विचारसरणी, अज्ञान आणि निष्क्रियता यावरून आपणास ध्येये का अपयशी ठरतात याचे विवेचन करता येते. त्यांच्यामते दारिद्र्य निर्मूलनासाठी पायरी-पायरीने पुढे जाण्याचा दृष्टिकोन अधिक प्रभावी मार्ग आहे.

दुसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'एक अब्ज भुकेलेले लोक' असे आहे. दारिद्र्य हा शब्द उपासमार या अर्थाने उपयोगात आणल्या जातो. जून २००९ मध्ये अन्न आणि कृषी संघटनेने म्हटले होते की जगात एक अब्ज लोक उपासमारीने ग्रासलेले आहेत. संयुक्त राष्ट्राच्या सहस्त्रकातील विकास उद्दिष्टात दारिद्र्य आणि उपासमार कमी करण्यावर भर देण्यात आला होता. ज्याला पुरेसे अन्न मिळत नाही त्या व्यक्तीला गरीब म्हटले जाते. भारतातील राज्यांमध्ये स्वस्त धान्य दुकानातून कमी किमतीला गरीबांना धान्य दिले जाते. सार्वजनिक वितरण प्रणाली मधील धान्याची मोठ्या प्रमाणावर नासधूस होते. त्यांनी इंडोनेशियातील बमडूंग प्रांतातील पाक सोहलीन या व्यक्तीचे उदाहरण देऊन गरीबीचीचे स्पष्टीकरण केले आहे. गरीबीमुळे आवश्यक प्रमाणात कॅलरीज उपलब्ध होत नाहीत. त्यांनी १८ देशातील आकडेवारीद्वारे विवेचन केले आहे. ग्रामीण भागातील लोकांचा अन्नधान्यावरील खर्च ३६ ते ७९ टक्के तर शहरी भागात तो ५३ ते ७४ टक्के आढळून आला. भारतातील अन्नधान्यावरील खर्चाच्या प्रमाणात घट झाल्याचे आढळून आले. उत्पन्न वाढीबरोबर अधिक दर्जेदार वस्तूंच्या उपभोगावर भर दिला जातो.

१९९६ च्या जागतिक अन्न करारानुसार अन्न आणि कृषी संघटनेने (FAO) असा अंदाज व्यक्त केला होता की प्रत्येक व्यक्तीला २७०० कॅलरीज अन्न प्रदान करण्याची त्या वर्षी शेतीची उत्पादन क्षमता होती. गरीबांना पुरेसे अन्न न मिळण्याचे कारण अन्नधान्याची कमतरता नसून वितरणातील विषमता आहे. भारतात १९८३ मध्ये पुरेसे अन्न मिळत नाही अशी लोकसंख्या १७ टक्के होती. शारीरिक कष्टाच्या कामात घट झाल्यामुळे कॅलरीजच्या आवश्यकतेत घट झाली. अमर्त्य सेन यांच्या मते अलीकडील काळात दुष्काळ अन्नधान्याच्या कमतरतेमुळे निर्माण झालेले नसून ते अन्नधान्याच्या अयोग्य वितरणामुळे निर्माण झाले. भारतात २००४ – २००५ मध्ये कुपोषणाचे प्रमाण पुरुषांमध्ये ३३ टक्के तर महिलांमध्ये ३६ टक्के होते.

बालपणातील कुपोषणाचा प्रौढावस्थेतील क्षमतेवर प्रत्यक्ष परिणाम होतो. त्याचा शैक्षणिक संपादन आणि आर्थिक स्थितीशी संबंध असतो. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी १९६६-६७ मध्ये तांदुळाच्या किंमती वाढल्यामुळे तांदुळाच्या उपभोगात घट करून भाजीपाल्याच्या उपयोगात वाढ करावी असे म्हटले होते. मुख्यमंत्र्यांचे मत लोकांना न पटल्यामुळे यांनी मुख्यमंत्र्यांच्या विरोधात आंदोलन केले होते. परंतु त्यांचे मत आरोग्याच्या दृष्टीने योग्य होते. हे लोकांना पटल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले होते.

अलीकडील काळात लोकांच्या आवडीनिवडीत बदल झाल्यामुळे अन्नावरील खर्चाचे प्रमाण कमी झाले. दूरदर्शन, मोबाईल सारख्या वस्तूंच्या मागणीत वाढ झाली. मुले आणि गरोदर मातांच्या पोषणावरील गुंतवणुकीपासून मिळणाऱ्या सामाजिक परताव्याच्या दरात बरीच वाढ झाली.

तिसऱ्या प्रकरणाचे शीर्षक 'चांगल्या (जागतिक) आरोग्यासाठी कमी उंचीवर लटकलेली फळे' असे आहे. कमी उंचीवर लटकलेली फळे म्हणजे ज्यामुळे मृत्यू दरात घट होईल. या फळात डायरिया कमी करण्यासाठी क्लोरीनचा पाण्यामध्ये वापर, ओरल रीहायड्रेशन मिश्रण, लसीकरण, जंतुनाशक औषधांचा उपयोग, गरोदर मातांना टिटॅनस इंजेक्शन, रातांधळेपणा विरुद्ध 'ए' जीवनसत्त्वाचा

उपयोग, लोह गोळ्या इत्यादींचा समावेश होतो. आरोग्य क्षेत्र फार महत्त्वाचे असून त्याबाबत बरेच नैराश्य आहे. अनेक देशात शासकीय आरोग्य कर्मचारी योग्य प्रमाणात सेवा प्रदान करीत नसल्यामुळे त्यांना दोषी मानले जाते. २००५ मध्ये त्यांनी उदयपूर शहरातील शासकीय परिचारिकांच्या गटाशी चर्चा केली होती. परिचारिकांनी असे निदर्शनास आणून दिले होते की महिला आरोग्य केंद्रातून घरी गेल्यानंतर परत येत नाहीत.

युनिसेफच्या मते भारतात दरवर्षी १५ लाख बालकांचा डायरियाने मृत्यू होतो. त्यांना जर उकळत्या पाण्यातील साखर व मिठाचे मिश्रण दिले तर मृत्यूच्या प्रमाणात घट होते. त्यांनी इंडोनेशियातील एका खेड्यात राहणाऱ्या इबू इम्टाट या महिलेचे उदाहरण देऊन आरोग्याच्या सापळ्याचे विवेचन केले आहे. जेफ्री साच यांनी 'द एन्ड ऑफ पॉव्हर्टी' या पुस्तकात असे म्हटले की गरीब देशातील रोगांच्या निर्मूलनासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. जी कमी उंचीवर लटकलेले फळे असतात त्यांचा योग्य उपयोग केला जात नाही.

केनियामध्ये मलेरियामुळे उत्पन्नात होणारी घट ५० टक्के होती. जर मलेरिया निर्मूलनावर प्रति व्यक्ती १४ डॉलर खर्च केला तर उत्पन्नात २९५ डॉलरची वाढ होऊ शकेल असे जेफ्री साच यांचे मत होते. एका अभ्यासानुसार नळाद्वारे पिण्याचे पाणी आणि सांडपाण्याच्या सोयीमुळे १९०० ते १९४६ या काळात बालमृत्यू दर ७५ टक्के आणि एकूण मृत्यू दरात ५० टक्के घट झाली होती. ओरीसातील ग्राम विकास संस्थेच्या प्रयत्नामुळे डायरिया मध्ये ५० टक्के आणि मलेरिया मध्ये ३३ टक्के घट झाली होती. केनियामध्ये (TAMTAM) Together -against Malaria या स्वयंसेवी संस्थेने मच्छरदाणीचा मोफत पुरवठा केल्यामुळे मलेरियाच्या प्रमाणात घट झाली होती. डॉक्टर म्हणून सेवा देणारे ३४ टक्के बंगाली डॉक्टर्स दिल्लीच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये कार्यरत होते. मॅट्रिक पर्यंत शिक्षण घेणारे डॉक्टर्स आढळून आले होते. एका सर्वेक्षणानुसार लोक प्रतिजैविकांचा जास्त उपयोग करीत होते. २००२-०३ च्या जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार आरोग्य कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण अनेक देशात ३५ ते ४० टक्के आढळून आले. उदयपूरच्या सेवा मंदिर संस्थेने लसीकरणासाठी दोन पौंड डाळ मोफत दिल्यामुळे लसीकरणात सात पट वाढ झाली होती. त्यामुळे परिचारिकेच्या सेवांचा पूर्ण उपयोग झाला होता.

प्रकरण ४ चे शीर्षक 'वर्गातील सर्वात हुशार' असे आहे. कर्नाटक मधील नागानादगी गावात ते २००९ मध्ये शांतारमा नावाच्या विधवेला भेटले होते. ४० वर्षे वयाच्या महिलेला आर्थिक स्थितीमुळे आपल्या सहा मुलांना शिक्षण देता आले नव्हते. तिच्या मुलांच्या शिक्षणाबाबत तिचा आशावादी दृष्टिकोन चुकीचा ठरला. संयुक्त राष्ट्राच्या सहस्त्रकातील उद्दिष्टांमध्ये आठवे ध्येय म्हणजे २०१५ पर्यंत सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण देणे तसेच सर्व स्तरावरील शिक्षणातील विषमता दूर करणे होते. २००२ आणि २००३ मध्ये जागतिक बँकेने बांगलादेश, इक्वेडोर, भारत, इंडोनेशिया, पेरू आणि युगांडा या सहा देशातील शाळांमधील शिक्षकांच्या अनुपस्थितीचे सर्वेक्षण केले होते. या देशातील शिक्षकांची अनुपस्थिती जास्त होती. केनियामधील सर्वेक्षणानुसार पाचव्या वर्गातील २७ टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजीतील साधा परिच्छेद वाचता

येत नव्हता. पाकिस्तानमधील तिसऱ्या वर्गातील ८० टक्के मुलांना पहिल्या वर्गाच्या पुस्तकातील परिच्छेद वाचता येत नव्हता.

जर सार्वजनिक शाळा दर्जेदार शिक्षण देवू शकत नसतील तर खाजगी शाळांची संख्या वाढेल. शिक्षणावरील गुंतवणुकीपासून जास्त फायदे मिळत असतील तर शिक्षणावरील गुंतवणुकीत वाढ होईल. शिक्षणावरील गुंतवणूक पालकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. श्रीमंतांची मुले हुशार नसली तरी ते शिक्षणावर जास्त गुंतवणूक करतात. गरीबांची मुले पैशाअभावी शिक्षणापासून वंचित राहतात. २००८ च्या शिक्षणाची वार्षिक स्थिती अहवालानुसार (ASAR) भारतात सार्वजनिक शाळेतील ५ व्या वर्गातील ४७ टक्के विद्यार्थी दुसऱ्या वर्गाचे पुस्तक वाचू शकत नव्हते. हेच प्रमाण खाजगी शाळेत ३२ टक्के होते. 'प्रथम' या संस्थेमार्फत 'बालसखी' कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती घडून आली. शैक्षणिक वर्षात वाढ झाली तर उत्पन्नात वाढ होते. हरीत क्रांतीचा शिक्षित शेतकऱ्यांना जास्त फायदा झाला.

जे विद्यार्थी शिक्षणात मागे पडतात त्यांच्याकडे शिक्षक लक्ष देत नाहीत. त्यामुळे त्यांचे पालकही दुर्लक्ष करतात. अलीकडे चांगले शिक्षक दुर्मिळ होत आहेत त्या ऐवजी माहिती तंत्रज्ञान अधिक श्रेष्ठ मानले जात आहे. ते अधिक स्वस्त बनत आहे. 'प्रथम' संस्थेच्या कार्यक्रमात विद्यार्थी आपल्या क्षमतेनुसार अभ्यास करू शकतो. शालेय शिक्षणाची प्रत्येक विद्यार्थ्यांला संधी मिळाली पाहिजे. शाळेत विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे.

प्रकरण ५ चे शीर्षक 'पाक सुदार्नोचे मोठे कुटुंब' आहे. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीचे कनिष्ठ चिरंजीव संजय गांधी यांनी आणीबाणीच्या काळात सक्तीच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेवर भर दिला होता. त्यांच्यामते लोकसंख्या नियंत्रण हा भारताच्या विकासात्मक नियोजनाचा आवश्यक भाग होता. कुटुंब नियोजनाशिवाय भारताचा औद्योगिक, आर्थिक आणि कृषी विकास होऊ शकत नाही. १९७६ च्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरणात कुटुंब नियोजनाला चालना देण्यासाठी वित्तीय प्रलोभनांचा अवलंब करण्यात आला होता. कुटुंब नियोजनाच्या सक्तीमुळे १९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांचा पराभव झाला होता त्याचे हे एक कारण होते. जेफ्री साच यांनी कॉमन वेल्थ (Common Wealth) या पुस्तकात असे म्हटले होते की वाढत्या लोकसंख्येमुळे कर्बाम्लवायूचे उत्सर्जन वाढते त्यामुळे वैश्विक तापमानात वाढ होते.

गरीबांची प्रजननाचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांच्या जीवनमानाचा दर्जा निकृष्ट असतो. नोबेल पारितोषिक विजेते ग्रे बेकर यांनी याबाबतीत गुणात्मकता आणि संख्यात्मकता यामध्ये प्रत्यायन संबंध आढळतो असे म्हटले होते. जेफ्री साच यांनी कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या उपयोगावर भर दिला होता. अनेक कुटुंबात मुले आपले आर्थिक भविष्य आहे असे मानण्यात आले. पाक सुदार्नो याला दारिद्र्यामुळे शेवटी नैराश्यात जीवन जगावे लागले. त्याला खऱ्या अर्थाने जास्त अपत्ये नको होती. त्याला असे वाटत होते की भविष्यात ९ पैकी एखादे अपत्य त्याची काळजी घेऊ शकेल.

अमेरिकेत वयस्क व्यक्तींना मुले आणि नातवंडे यांच्यासोबत राहावेसे वाटते. त्यांना दुसरा

पर्याय स्वतंत्रपणे राहण्याचा असतो. त्यांना सामाजिक सुरक्षितता आणि आरोग्य सेवा उपलब्ध असतात. त्यामुळे ते सन्मानाने जगू शकतात. त्यांना जास्त अपत्याची आवश्यकता नसते.

प्रकरण ६ चे शीर्षक 'नुकसान भरपाई निधीची तरतूद असणारे व्यवस्थापक' आहे. गरीबांच्या जीवनाचे प्रमुख सत्य म्हणजे जोखीम. त्यांना नियमित रोजगाराची शाश्वती नसते. त्यांनी इंडोनेशियातील सिकादास गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या गरीब महिलेची वाताहत स्पष्ट केली. गरीबांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. कोणत्याही नुकसानभरपाई निधीची तरतूद करणारा व्यवस्थापक नुकसानाची १०० टक्के तरतूद करू शकत नाही.

नैसर्गिक संकटाचा शेतकऱ्यांवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे जास्त प्रमाणात प्राणहानी आणि वित्तहानी होते. भारतातील शेतमजुरांना वेतनाची शाश्वती नसते. अमेरिकेतील शेतमजुरांना वाईट हंगामात कमी मजुरी मिळत नाही कारण तेथील शेतकऱ्यांना सामाजिक विमा आणि अर्थसहाय्याच्या सोयी उपलब्ध असतात. श्रीमंत देशात शेतकऱ्यांसाठी पिक विमा आणि पशु विम्याच्या सोयी असतात तर विकसनशील देशात या सोयींचा अभाव जाणवतो. २००८ च्या वैश्विक आर्थिक संकटाची अनेकांना झळ सहन करावी लागली. इंडोनेशियात कुटुंबातील एखादी व्यक्ती आजारी पडली तर त्याच्या उपभोगात २० टक्के घट होते. सरकारने गरीबांना विम्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. धाना देशात शेतकऱ्यांच्या विमा रकमेवर सरकारने सबसिडी दिल्यामुळे गरीबांच्या उत्पन्नात वाढ झाली. सार्वजनिक निधीचा उपयोग केला तर सामाजिक कल्याणात वाढ होऊ शकेल.

प्रकरण ७ चे शीर्षक 'काबूल मधील लोक आणि भारतातील यूनुच : गरीबांना कर्ज देणे साधे अर्थशास्त्र नाही' असे आहे. विकसनशील राष्ट्रांतील शहरांमध्ये रस्त्याच्या बाजूला अनेक फळे आणि भाजीपाला विक्रेते दिसून येतात. त्यांचे हातठेले दैनंदिन भाडयाने घेतलेले असतात. व्यवसायासाठी या विक्रेत्यांना कर्ज घ्यावे लागते. जास्त व्याजदराच्या समस्येतून त्यांची मुक्तता करण्यासाठी सूक्ष्म वित्ताची निर्मिती झाली, त्यामुळे कर्ज पुरवठ्यात वाढ झाली होती.

आंध्रप्रदेशात 'स्पंदन' नावाची फार मोठी सूक्ष्म वित्त संघटना स्थापन झाली होती. या संस्थेने १३ वर्षात ४२ लाख कर्जदारांना ४२०० कोटी रुपयाचे कर्ज दिले होते. महंमद युनूस यांच्या सूक्ष्म वित्ताप्रमाणे या संस्थेचे कार्य होते. भारतात बँकांनी लहान पेढ्या, कृषी आणि सहकार क्षेत्राला अग्रक्रमाने कर्ज दिल्यामुळे दारिद्रयाच्या प्रमाणात मोठी घट झाली होती. नंतरच्या काळात आर्थिक गरजाऐवजी राजकीय प्राधान्याने कर्ज देण्यात आले. भारतात १९९१ नंतर ग्रामीण भागात बँकेच्या शाखांमध्ये घट झाली.

सावकारी कर्जाचा व्याजदर जास्त असला तरी कर्जाची परतफेड केली जाते. १९६० आणि १९७० च्या दशकात कलकत्त्यामध्ये अनेक सावकार काबूलीवाले होते. ते काबूल मधील असून उंच आणि धिप्पाड शरीरयष्टीचे होते. बंगाली विद्यार्थ्यांच्या पुस्तकात त्यांचे वर्णन करण्यात आले होते. ते मनाने चांगले होते. परंतु कुणी कर्जफेडीत त्यांची फसवणूक केली तर ते त्यांना ठार मारत होते.

सूक्ष्म वित्ताचे गरीबी निर्मूलनात महत्त्वाचे योगदान आहे. भारतात कर्ज वसुली न्यायाधिकरणाची

स्थापना झाल्यानंतर बँक कर्ज वसुलीत वाढ झाली. मोठ्या पेढ्यांच्या कर्जात वाढ झाली तर लहान पेढ्यांच्या कर्ज पुरवठ्यात घट झाली. बँकांच्या अधिकाऱ्यांना असे वाटले की मोठ्या पेढ्यांना कर्ज पुरवठा करणे अधिक फायदेशीर आहे. सूक्ष्म वित्ताने मोठ्या प्रमाणात गरीबांना कर्जपुरवठा केला. विकसनशील राष्ट्रात मध्यम उद्योजकांना कर्जपुरवठा करणे मोठे आव्हान आहे.

प्रकरण ८ चे शीर्षक 'विटा विटांनी बचत करा' असे असून त्याचा अर्थ थोडी-थोडी बचत करून उद्दिष्टपूर्ती करा असा आहे. विकसनशील देशातील उपनगरात अनेक घरे अपूर्ण स्थितीत आढळतात. पैशाअभावी बांधकाम पूर्ण करता येत नाही. अभिजीत बॅनर्जी यांच्या आजोबांनी सुद्धा उत्पन्नातील वाढीबरोबर जास्त खोल्यांचे हळूहळू बांधकाम केले होते. गरीबांना वर्तमान आणि भविष्याचा विचार करून बचत करावी लागते. त्यांच्या सर्वेक्षणातील १८ देशांच्या आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की ७ टक्के ग्रामीण कुटुंबाची आणि ८ टक्के शहरी कुटुंबाची बचत खाते होती.

मायकेल क्रेमर, जोनाथन रॉबिन्सन आणि एस्टर डफ्लो यांनी केनियामध्ये केलेल्या सर्वेक्षणावरून असे स्पष्ट होते की शेतकऱ्यांना मोफत खते दिली तर त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. शेतकऱ्यांनी खताचा जास्त वापर करावा म्हणून त्यांनी आफ्रिकेत बचत आणि खते या संबंधीचा प्रेरणात्मक कार्यक्रम सुरू केला होता. जेव्हा शेतकऱ्यां जवळ पैसा असतो तेव्हा त्यांनी कुपन्स विकले. या कूपन्सद्वारे शेतकऱ्यांनी पेरणीच्या वेळेस बाजार किंमतीला खतांची खरेदी केली. त्यामुळे खताचा उपयोग करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत ५० टक्के वाढ झाली. त्यांनी हैदराबाद येथील गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या महिलेचे उदाहरण दिले. तिला ' स्पंदन' संस्थेकडून कर्ज मिळाल्यामुळे तिला सूक्ष्म वित्ताचा फायदा झाला.

'स्पंदन' या सूक्ष्म वित्त संस्थेच्या संस्थापक पद्मजा यांनी गरीबांना असे सांगितले होते की, चहा, नाश्ता, सिगारेट / दारू तसेच सामाजिक कार्यावरील खर्चात कपात करून बचत केली तर सूक्ष्म वित्त संस्थेकडून कर्ज घेता येईल. आणि या बचतीद्वारे कर्जाची परतफेड करता येईल. गरीब कुटुंबांना भविष्यकालीन ध्येये पूर्ण करता येतील. मुलांना चांगले शिक्षण देता येईल. त्यांना चांगली नोकरी मिळेल. सामाजिक सुरक्षितता प्राप्त होईल, तसेच गरीबांना आपल्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग सुकर होईल.

प्रकरण ९ चे शीर्षक 'नाराज उद्योजक' आहे. एका उद्योजकाने आपल्या अमेरिकेत एमबीए झालेल्या पुतण्याला चांगला उद्योजक कसा असतो हे चार महिलांच्या कार्यावरून समजावून सांगितले. त्या महिला सकाळी समुद्र चौपाटीवरून ओली रेती पोत्यामध्ये आणून ती रस्त्यावर टाकत असत. नंतर त्यावरून वाहने गेल्यावर ती रेती ९ ते १० चे सुमारास त्या गोळा करून वाळलेली रेती लहान प्लास्टिक पॅकेटमध्ये भरून स्थानिक वस्त्यांमध्ये त्या विकत असत. या रेतीचा भांडी घासण्यासाठी उपयोग केला जात असे. गरीब जन्मताच खरे उद्योजक असतात. त्यांना योग्य संधी मिळाली तर त्यांची गरीबीतून सुटका होऊ शकते असे जॉन हॅच या मोठ्या सूक्ष्म वित्त संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने म्हटले होते.

महंमद युनूस जगप्रसिद्ध ग्रामीण बँकेचे संस्थापक यांचे देखील असेच मत होते. मनोऱ्याच्या

खालच्या स्तरावर असलेल्या गरीबांना चांगले जीवन जगण्यासाठी 'सूक्ष्म वित्त' म्हणजे कमी उंचीवर लटकलेले फळ वाटते. गरीब लोक स्वतःच्या कष्टाने आपली दारिद्र्यातून सुटका करू शकतात. गावात वस्तू विकणाऱ्याची दुकाने जास्त असतात. दुकानदार ग्राहकांच्या शोधात असतात. गरीबांच्या दुकानात पुरेसा माल नसतो. त्यामुळे त्यांना काहीच नफा मिळत नाही. त्यांची बचत शक्ती कमी असल्यामुळे ते व्यवसायात प्रगती करू शकत नाहीत. गुजरातमध्ये एका खेड्यात उद्योगाची स्थापना झाल्यामुळे रोजगारात वाढ झाली. कमी कुशल श्रमिकांना जास्त वेतनाची नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांचा शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च वाढला. स्थायी नोकरीमुळे त्यांचा जीवन विषयक दृष्टिकोन बदलला.

उच्च वेतन दरामुळे श्रमिकांना वित्तीय साधनांची प्राप्ती होते. मानसिक आरोग्य लाभते. ते मुलांच्या शिक्षणावर जास्त खर्च करू शकतात. त्यांचा आशावाद वाढतो. बचत वाढते. त्यांना सहज कर्ज उपलब्ध होऊ शकते. ते व्यवसाय सुरू करून इतरांना रोजगार देवू शकतात. त्यांची दारिद्र्यातून मुक्तता होते.

प्रकरण १० धोरणे आणि राजकारणासंबंधी आहे. चांगल्या उद्देशाने चांगला विचार करून तयार करण्यात आलेल्या धोरणांची योग्य अंमलबजावणी झाली नाही तर ती धोरणे प्रभावी ठरत नाहीत. उद्देश आणि अंमलबजावणी यातील दरी फार रुंद आहे. विदेशी मदतीचा विकसनशील गरीब राष्ट्रांना काहीच उपयोग होत नाही. युगांडा सरकारने इमारतीची देखभाल, पुस्तकांची खरेदी आणि इतर कार्यक्रमासाठी प्रति विद्यार्थी अनुदान देण्याचे ठरविले होते. सर्वेक्षणावरून असे दिसून आले होते की शाळांना १३ टक्के अनुदान मिळाले होते. ५० टक्के शाळांना काहीच अनुदान मिळाले नव्हते. याचा अर्थ जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला होता.

जेफ्री साच यांच्या मते भ्रष्टाचार दारिद्र्याचा परिणाम तसेच दारिद्र्य भ्रष्टाचाराचा परिणाम होय. भ्रष्टाचार कमी करण्यासाठी वित्त मंत्रालयाने वर्तमानपत्रात दर महिन्याला जिल्हा प्रशासनाला किती अनुदान दिले याची माहिती प्रसिद्ध केली. सर्वेक्षणावरून असे आढळले की शाळांना ८० टक्के अनुदान प्राप्त झाले होते. भ्रष्टाचार आणि सेवेत अप्रामाणिकपणा यामुळे अकार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढते. जर शिक्षक आणि परिचारिका प्रामाणिकपणे कार्य करीत नसतील तर शिक्षण आणि आरोग्य धोरणांची योग्य अंमलबजावणी होणार नाही. जर ट्रक ड्रायव्हर लाच घेऊन ट्रक मध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करीत असेल तर रस्तेबांधणीवरील कोट्यवधी रुपये वाया जातील. रस्ते ट्रकच्या चाकाखाली नाहीसे होतील.

आर्थिक संस्था आर्थिक प्रेरणांना आकार देतात. आर्थिक प्रेरणांमुळे लोक शिक्षित होतात. ते बचत, गुंतवणूक, नवप्रवर्तन आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करतात. राजकीय संस्था राजकारण्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने नागरिकांची क्षमता निर्धारित करतात. चांगल्या आर्थिक संस्थांमुळे समाजाची प्रगती होते तर वाईट संस्थांचे वाईट परिणाम घडून येतात. पॉल रोमर यांनी प्रदेशाचा विकास करण्यासाठी करार पद्धतीची शिफारस केली होती. विकसनशील देशांचा विकास करण्याची जबाबदारी दुसऱ्या राष्ट्रांना दिली तर विकासाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. परंतु हे त्या प्रदेशांना

स्वीकार्य होणार नाही.

२००४ चा जागतिक विकास अहवाल सामाजिक सेवांच्या प्रदानासंबंधी आहे. सामाजिक सहभाग आणि विकेंद्रीकरणामुळे सेवांची पोहोच वाढते. ग्रामपंचायतीमध्ये पुरुष किंवा महिला सरपंचाचा विकासाच्या अग्रक्रमावर परिणाम घडून येतो. राजस्थानमध्ये असे आढळून आले की महिला सरपंचाचा भर पिण्याच्या पाण्यावर तर पुरुष सरपंचाचा भर रस्तेबांधणीवर होता.

जातीच्या राजकारणात गुणवत्तेचा बळी दिला जातो. चांगला हेतू चांगल्या राजकारणासाठी आवश्यक असतो. चांगल्या धोरणांमुळे निम्न अपेक्षांचे दुष्ट चक्र तोडता येते. पाश्चिमात्य अभ्यासक आणि धोरणकर्ते विकसनशील राष्ट्रातील राजकीय संस्थांबाबत निराशावादी आहेत. वाईट राजकीय संस्थांमुळे गरीब देशातील लोक गरीबीत राहतात. भ्रष्टाचार कमी करून कर्मचाऱ्यांना जबाबदारीची जाणीव झाली तर तात्काळ सुधारणा होऊन विकासाला चालना मिळू शकेल.

अशा रीतीने डॉ. अभिजीत बॅनर्जी आणि एस्टर डफ्लो यांनी आपल्या ग्रंथात दारिद्र्य आणि दारिद्र्या निर्मूलनाच्या विविध उदाहरणांद्वारे अनुभवाधिष्ठित विवेचन केले आहे.

◆◆◆

---

## श्रद्धांजली

कोविड–१९ च्या काळखंडात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे डॉ. विजय साठे (नागपूर), डॉ. ठिकरे (मारेगाव), प्रा. आडे (राळेगाव) आणि प्रा. फुलझेले (यवतमाळ) यांचे दु:खद निधन झाले. परिषदेचे जे ३४ वे वार्षिक अधिवेशन मारेगाव येथे भरले होते त्यावेळी स्थानिक सचिव म्हणून डॉ. ठिकरे यांनी अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याचे आयोजन केल्याचे अनेकांच्या स्मरण असेल, तसेच राळेगाव येथे भरलेल्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनात प्रा. आडे यांनी आयोजनकर्त्या महाविद्यालयास सहकार्य केले होते.

या चारही प्राध्यापकांच्या दु:खद निधनामुळे झालेल्या दु:खात परिषदेचे सर्व सभासद सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !

# आभासी चलन प्रणालीची सद्य:स्थिती

**विजय रमाकांतराव रोटे**
सहयोगी प्राध्यापक
बा.बु.कला,ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय,
दिग्रस, जि.यवतमाळ

**प्रस्तावना :**

माहिती व दळणवळण तंत्रज्ञानामुळे अनेक क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. त्यामध्ये सर्वात महत्वाचा व अमूलाग्र बदल हा अधिकोषण व वित्तीय क्षेत्रामध्ये झालेला दिसून येतो. अर्थशास्त्रामध्ये चलन निर्मीती व वितरणामध्ये केंद्रीय अधिकोषाचा एकाधिकार मानला जातो. त्यामुळे केंद्रिय बँक ही चलनाच्या संख्येवर नियत्रंण ठेवते व त्याआधारे अर्थव्यवस्थेमधील अस्थिरता नियंत्रीत करण्याचा प्रयत्न आपल्या मौद्रिक धोरणामधून करत असते. माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या या युगात केंद्रिय अधिकोषाच्या चलनाची निर्मीती व वितरण या एकाधिकारी कार्यालाच आव्हान देण्याची कृती सुर आहे. आज वास्तविक अर्थव्यवस्थेत वास्तविक चलन तर संगणन निर्मित आभासी जगामध्ये आभासी चलनाची निर्मिती व वितरण केंद्रीय व विकेंद्रित या दोन्ही स्तरावर सुरू आहे. नाविण्यपूर्ण कल्पनांचा आधार घेवून नवीन आभासी चलन तयार केले जाते. अतिशय अवघड गणितीय बेरीज सोडविल्याचे बक्षिस म्हणून बीट कॉइन चे छोटे रूप शितोरी त्या व्यक्तीच्या आभासी खात्यामध्ये जमा केल्या जात असे. त्याच प्रमाणे इंटरनेट वर चालणाऱ्या अनेक ऑनलाईन खेळाचा अवघड स्तर पूर्ण केल्यास त्याचे बक्षिस म्हणून अनेक आभासी चलन अस्तित्वात आले आहेत. अनेक आभासी चलन हे आभासी चलनाच्या विनिमय केंद्राव्दारे निर्माण केले जातात. आज सर्वात लोकप्रिय व विश्वसनीय आभासी चलनाचा आधार हा ब्लॉक चैन वर आधारीत स्मार्ट कराराची निर्मिती हा आहे.

या लेखाव्दारे संगणीय अभासी चलन पध्दतीच्या संदर्भात निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांचा विचार करण्यात आला आहे. ज्यामध्ये आभासी चलनाचे निर्मीती व व्यवस्थापन कशा प्रकारे होते? आभासी चलनाचे फायदे व नुकसान कोणते आहेत? आभासी चलनाच्या वापरामध्ये सुरक्षितता आहे का?आभासी चलनाचा प्रभाव वास्तविक अर्थव्यवस्थेवर पडत आहे. जगातील अनेक देशानी त्यामुळेच आभासी चलनास संपूर्णपणे निर्बंध लावलेले आहेत. भारतामध्ये आभासी चलनाच्या निर्मिती व वितरणावर सध्या कोणतेही निर्बंध नाहीत. परंतु सरकारव्दारा आभासी चलनाला नियमित करण्यासाठी कायदा तयार करण्यात येणार आहे असे वाटते.

**आभासी चलनाची संख्या, एकूण चलन पुरवठा व बाजार भांडवल स्थिती :**

**आभासी चलनाची संख्या**

| वर्ष | चलनाची एकूण संख्या | वर्ष | चलनाची एकूण संख्या |
|---|---|---|---|
| 2013 | 66 | 2017 | 1335 |
| 2014 | 506 | 2018 | 1658 |
| 2015 | 562 | 2019 | 2817 |
| 2016 | 644 | 2020 | 4501 |

२०१३ मध्ये ६६ आभासी चलने अस्तीत्वात होती ते वाढत जाऊन ऑक्टोंबर २०२१ मध्ये ६८२६ एवढी झाली व या सर्व चलनाचे एकूण बाजार भांडवल २.६७ ट्रिलीयन डॉलर झाले आहे. या सर्व आभासी चलनामध्ये विश्वसनियता व व्यवहारसंख्या या आधारावर महत्वाचे २० अभासी चलनामध्ये प्रत्यक्ष मोठया प्रमाणावर विनिमय व्यवहार चालतो. एकूण बाजार भांडवलाच्या ९० टक्के बाजार भांडवल फक्त २० आभासी चलनाचे आहे.

**आभासी चलनाचा पुरवठा व बाजार भांडवल:**

महत्वाच्या १० अभासी चलनाची जागतिक क्रमवारीनुसार बाजार भांडवल व पुरवठा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अभासी चलन | चलनाची किंमत | बाजार भांडवल | जागतिक क्रमवारी | एकूण पुरवठा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बीट कॉईन | 38,63,000 रू | 66,87.000कोटी रू | 1 | २ कोटी BTC |
| 2. | ईथेरिअम | 3,20,000 रू | 34,62,929 कोटी रू | 2 | १२ कोटी ETT |
| 3. | बायनान्स | 42,350 रू | 6,67,000कोटी रू | 3 | १२ कोटी BNB |
| 4. | तिथर | 75 रू | 7,83,000 कोटी रू | 4 | ७८३ कोटी UFDT |
| 5. | सोलान | 14,325 रू | 4,19,000 कोटी रू | 5 | ३१ कोटी SDL |
| 6. | कार्डोनो | 99.90रू | 3,25,897 कोटी रू | 6 | ३४१७ कोटी KDA |
| 7. | यु.एस.डी. कॉईन | 75 रू | 42,0000 कोटी रू | 7 | ४२१०० कोटी USDC |
| 8 | एक्स.आर.पी | 70 रू | 39,6800 कोटी रू | 8 | ३९०० कोटी XRP |
| 9 | लुना | 6,690 रू | 2,29,200 कोटी रू | 09 | ३७ कोटी TERBA |
| 10 | अवानान्स | 9,386 रू | 2,18,000 कोटी रू | 10 | २४ कोटी AVAX |

जागतिक क्रमवारीमध्ये बीट कॉईन हे प्रथम क्रमाकांवर आहे व सर्वात महाग आहे. बीट कॉईनचा पुरवठा हा २१ दशलक्ष बी.टी.सी. पर्यंतच होणार आहे. त्यानंतर बीट कॉईनचे खणण प्रक्रिया बंद करण्यात येणार आहे. ब्लॉक चेन तंत्रज्ञान जाळयावर आधारीत ईथर हे चलनही खुप लोकप्रिय व मौल्यवान आहे. ईथेरिअम जाळे आज खुप पसरत असल्यामुळे २०२१ मध्ये ईथेरीअम ०२ हे नविन जाळे प्रचलीत होणार आहे. त्यामुळे ईथरचे खणन कार्य ही खुप अवघड व महाग होणार आहे.

**३. आभासी चलन निर्मीतीचा आधार व बाजार व्यवस्था :**

वास्तविक अर्थव्यवस्था ही अनेक कार्यावर अवलंबून असते. या कार्याच्या आधारावरच आपण

अर्थव्यवस्थीमध्ये अनेक क्षेत्र निर्माण केले आहेत. वास्तविक अर्थव्यवस्थेत हे सर्व आर्थिक कार्य व्यवस्थित चालण्यासाठी सरकार मान्य पैसा महत्वाची भूमिका बजावतो. वास्तविक अर्थव्यवस्थेमधील ही सर्व क्षेत्रे नाविन्यपूर्ण कार्ये प्रत्यक्षामध्ये करत असतात. अर्थव्यवस्थेमधील सर्वसामान्य जनता पैसा कमविण्यासाठी ही कार्य नाविण्यपूर्ण पध्दतीने करत असतात. वास्तविक अर्थव्यवस्थेमध्ये चालणारी कार्य व क्षेत्रे ही आभासी अर्थव्यवस्थेतही प्रभावी आहेत या कार्योचा आधार घेउन आभासी चलनाची निर्मिती करण्यात आली आहे. फक्त वास्तविक अर्थव्यवस्थेत सरकारमान्य पैसाव्दारा ही सर्व कार्य पूर्ण होतात तर अभासी अर्थव्यवस्थेत चालणारी ही सर्व कार्य वेगवेगळया कार्याच्या आधारवरच वेगवेगळी निर्माण करण्यात आली आहेत. आभासी अर्थव्यवस्थेमध्ये सध्या १४५ कार्यावर आधारीत १४५ क्षेत्र आहेत व प्रत्येक क्षेत्रासाठी १ पेक्षा जास्त अभासी चलन आहेत. आभासी अर्थव्यवस्थेमध्ये पैसा पासून पैसा, पैसा पासून वस्तू व सेवा, वस्तू व सेंवा पासून परत पैसा ही तीनही प्रकारची विनिमय समीकरणे लागू होतात. आभासी अर्थव्यवस्थेत कार्यावर आधारीत महत्वाची क्षेत्र पुढील प्रमाणे आहेत.

१ रोजगार निर्माण २. विशिष्ट घटना ३. प्रमाणिक गुणदान प्रक्रिया ४. ओळख प्रक्रिया ५. सामाजिक पैसा ६. दळणवळण व सामाजिक माध्यमे ७. निजता ८. संगीत ९. उर्जा व इंधन १०. आरोग्य ११. जूगार १२. आदरातिथ्य १३ अद्यावत करार १४. स्थावर मालमत्ता १५. विपणन १६. ठेव व कर्ज १७. ई.-कॉमर्स १८. संशोधन १९. वाहतूक २० विकेंद्रित वित २१. विकेंद्रित विनिमय केंद्र २२. खेळ २३. मिमस् २४. उत्तम घटक निर्माण २५. किरकोळ व्यापार २६. विमा २७. माध्यमे २८. मेटावर्स प्रक्रिया २९. वायदा व्यवहार ३०. करमणूक ३१. विविध परिसंस्था ३२. आभासी जग ३३. पर्यटन

संगणकीय जाळयामध्ये चालणारे विविध कार्य व त्यामधून निर्माण होणारे अभासी चलनाची दोन भागाध्ये विभागणी केली जाते.

१. केंद्रीकृत आभासी चलन निर्माण प्रक्रिया

२. विकेंद्रित आभासी चलन निर्माण प्रक्रिया.

केंद्रिकृत आभासी चलन निर्माण प्रक्रिया ही विशिट व्यक्ती, गटाव्दारे निर्माण केली जाते. अशा व्यक्ती व गटांचे या चलन निर्माण प्रक्रियेवर पूर्णपणे नियंत्रण असते. या व्यक्ती व गटांकडे संबंधीत चलनाच्या केंद्रीय भांडाराची भूमिका असते. चलनाची संख्या कमी जास्त करण्याची त्यांची पूर्ण क्षमता असते. केंद्रिय बँक ज्याप्रमाणे चलनाच्या मूल्यहस्तांतरणावर नियंत्रण ठेवून असते त्याचप्रमाणे संबंधीत गट अभासी चलनाच्या मूल्यहस्तांतरणावर नियंत्रण ठेवून असतात.

विकेंद्रित चलन निर्माण प्रक्रिया ही स्वयंपूर्ण असते. कोणत्या व्यक्ती किंवा गटाचे यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण असत नाही. विशेषत: ब्लॉक चेन जाळे वापरून अशा प्रकारच्या चलनाची निर्मीती केली जाते. अशा चलनाच्या निर्मीती प्रक्रियेला अभासी चलन खणन प्रक्रिया म्हटल्या जाते. विकेंद्रित चलनाची निर्मीती ही सार्वजनिक स्तरावर होत असते त्यामूळे या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता असते. आभासी चलन निर्माण प्रक्रियेमध्ये खणन कार्य करणाऱ्या लोकांचा सहभाग हा स्पर्धात्मक असतो जेवढा जास्त सहभाग असतो तेवढीच ब्लॉक चेनची प्रक्रिया जटील बनते व

आभासी चलनाची निर्मीती महाग होते.

**आभासी चलनाची निर्मीती व प्राप्ती :**

विविध ऑनलाईन चालणाऱ्या कार्यामधून अभासी चलनाची प्राप्ती करता येते तसेच ऑनलाईन स्तरावर चालणाऱ्या विशिष्ठ पध्दतीव्दारे अभासी चलनाची निर्मिती होते असते. यातील काही प्रमूख पध्दती खालील प्रमाणे सांगता येतील.

**१.केंद्रिकृत आभासी चलन प्राप्ती यंत्रणा :**

केंद्रिकृत आभासी प्रणाली मध्ये चलन प्राप्ती प्रामुख्याने दोन प्रकारे करता येते.

**अ) प्रलोभन व विक्री आधारीत आभासी टोकन प्राप्ती.**

इंटरनेट वर अनेक प्रकारचे इलेक्ट्रॉनिक्स सामाजिक खेळ चालतात, अशा प्रकारचे खेळ निर्माते, पुरवठादारांचा हेतू अधिकाधिक तरूणांनी हया खेळामध्ये सहभाग घ्यावा हा असतो. या खेळात विशिष्ट अभासी टोकण देवून सहभाग घेता येतो. तरूणांना या खेळाकडे आकर्षिक करण्यासाठी त्या तरूणांना टोकन प्रदान केली जातात त्यासाठी त्यांना जाहिरात व्हिडीओ बघावा लागतो, सामाजिक जाळयातील विशिष्ट सर्वे मध्ये सहभाग घ्यावा लागतो. तसेच खेळातील अवघड स्तर पूर्ण करावा लागतो. हे विशिष्ट टोकन त्यांच्या खात्यात जमा केले जाते. या आधारे ते पुढील खेळ पूर्ण करू शकतात. याशिवाय अनेक सामाजिक खेळ पुरवठादार हे आपल्या खेळासाठी आवश्यक असणारी टोकन विक्री वास्तविक चलन घेवून करत असतात. या सर्व प्रक्रियेमधून आभासी चलनाची निर्मिती होते. प्रलोभन पध्दतीव्दारे व टोकन विक्रीव्दारे २०२१ पर्यत ३१५ आभासी चलन निर्माण झाली आहेत व त्यांचा विनिमय हा बायनान्स या प्रसिध्द आभासी चलन विनिमय केंद्रावर होत आहे.

**ब) प्रामाणिक गूणदान पध्दती आधारीत टोकण प्राप्ती.**

या पध्दतीमध्ये ग्राहकांना, खेळाडूंना प्रमाणिक गुणदानाच्या आधारे आभासी चलनाचे टोकन दिल्या जाते. अशा प्रकारचे टोकण पुढे खरेदीसाठी व पुढील खेळासाठी वापरले जाते. सौदी विमान सेवा कंपनी आपल्या ग्राहकांसाठी अशा प्रकारचे टोकन प्रदान करते. एअर माईल नावाचे हे टोकन ग्राहकांना त्याच्या प्रमाणिक गुणदानाच्या आधारे दिल्या जातात व ग्राहकांकडून पूढील विमान सेवा वापरण्यासाठी या टोकनाचा वापर केल्या जातो. डोजी कॉईन हे आभासी चलन अशा प्रकारच्या गूणदानाच्या आधारे तयार केले आहे. ट्विटर व रिडीट या संकेतस्थळावर उत्तम दर्जाच्या माहितीसाठी बक्षिस गुणदान केल्या जाते त्या बक्षिस गूणदानाच्या आधारे डोजी कॉईन तयार करण्यात आले आहे. बायनान्स विनिमय केंद्रावर याची खरेदी विक्री होत आहे. सध्या डोजी कॉईनची किंमत १४ रूपये आहे. सध्या बाजारामध्ये १३हजार कोटी डोजी कॉईन प्रचलनात आहेत.

**२.विकेंद्रित चलन निर्माण प्रक्रिया.**

ब्लॉक चेन जाळे आधारीत विकेंद्रित चलन निर्माण प्रक्रियेत प्रामुख्याने दोन महत्वाच्या आभासी चलनाचा समावेश होतो.

**बीट कॉईन :** आभासी चलनामध्ये सर्वात लोकप्रिय व मौल्यवान चलन हे बीट कॉईन आहे. २००९ मधे श्री.शितोषी नाकामोटो या व्यक्तीने ५० बीट कॉईन आभासी चलनाच्या प्रवाहात आणले. २०१० मध्ये १ बीट कॉईनचे मूल्य ५ डॉलर होते तर, डिसेंबर २०२१ मध्ये १ बीट कॉईनेच मूल्य हे

४८.००० अमेरिकन डॉलर एवढे प्रचंड झाले आहे.

आंतरराट्रीय पातळीवर चलनाचे हस्तांतरण मुक्त, स्वस्त व वेगवान असावे या हेतूने बीट कॉईनची निर्मीती करण्यात आली. या चलनाचा पूरवठा मर्यादीत असल्यामुळे तसेच, बीट कॉईन निर्मिती प्रक्रिया ही जटील असल्यामुळे पुरवठा मर्यादीत आहे.

**बीट कॉईन प्रक्रिया :**

वास्तविक चलन हे केंद्रिय बँकेव्दारा निर्माण केले जाते व अर्थव्यवस्थेत त्याचा पूरवठा होतो. परंतु बीट कॉईन हे ब्लॉक चेन या संगणीय जाळे वापरत असताना विशिट प्रक्रियेव्दारे निर्माण होते. त्या प्रक्रियेला बीट कॉईन खणन प्रक्रिया म्हटल्या जाते. संगणीय जाळे वापरणाऱ्या व्यक्ती कडून संगणकाव्दारे जेव्हा अतिशय अवघड गणितीय बेरीज सोडविल्या जाते त्याबद्‌ल अशा व्यक्तीला बीटकॉईनचे सुक्ष्म रूप शितोषी मोबदला रूपात प्राप्त होते.

संगणीय जाळे वापरणाऱ्या अनेक व्यक्तीनी अशा प्रकारचे अवघड गणितीय प्रश्न सोडविण्याची विशिष्ट प्रणाली तयार केली. त्या प्रणालीस बीट कॉईन खणन असे म्हटल्या गेले आहे. बीट कॉईनची निर्मिती कमी व्हावी यासाठी गणितीय प्रक्रिया ही सातत्याने अवघड होत आहे. २१ दशलक्ष बीट कॉईनचा एकूण पुरवठा झाल्यानंतर बीट कॉईन खणन प्रक्रिया ही बंद होणार आहे. बीट कॉईन आज सर्वात सुरक्षित संपत्ती समजली जाते कारण कोणताही व्यक्ती खोटे बीट कॉईन तयार करू शकत नाही व त्याचा वापर करू शकत नाही कारण, बीट कॉईन चे सर्व व्यवहार ऑनलाईन स्तरावर होतात व त्याचे स्वरूप हे सार्वजनिक स्वरूपाचे असते. थोडक्यात प्रत्येक बीट कॉईन निर्मिती,वापर व हस्तांतरणाची नोंद ही सार्वजनिक स्तरावर होत असते त्यामूळे प्रत्येक व्यवहारातील प्रत्येक घटकाला याची पूर्ण माहिती असते. त्यामुळे बीट कॉईनचा विनिमय करणाऱ्या लोकांमध्ये त्याबाबत विश्वास निर्माण झालेला असतो.

इथर हे आभासी चलन ही इथेरिअम ब्लॉक चेन जाळे वर आधारीत विकेंद्रित चलन आहे. कोणत्याही मध्यस्थाशिवाय इथर या चलनाची देवाण घेवाण ही जगात कोठेही होत आहे. श्री.विटालीक ब्रटेन यांनी २०१५ मध्ये इथेरिअम ब्लॉक चेन प्रणाली सुरू केली. बीट कॉईन पेक्षा ही इथेरिअम ब्लॉक चेन प्रणाली सोपी आहे. इथेरिअम ब्लॉक चेनच्या साहयाने इथर चे खणन कार्य कमी खर्चीक आहे. त्यामुळे इथेरिअमची लोकप्रियता व मुल्य सतत वाढत आहे.

**आभासी चलनाची भारतातील स्थिती :**

भारतात २०१३ मध्ये सर्वप्रथम वरळी मुंबई येथील कोलोनिअल या पिझ्झा हॉटेल मध्ये बीट कॉईन स्विकारण्यास सुरूवात झाली. आभासी चलनाच्या विनिमयासाठी भारतात अनेक विनिमय केंद्र निर्माण झाली. त्यामध्ये Btex India, Unocoin, Zebpay, Koinx, Bitcoin India ही महत्वाची केंद्र आहेत. याशिवाय अनेक ओ.टी.सी. ॲपव्दारे अभासी चलनाची खरेदी विक्री होत आहे. २०१६ च्या विमुद्रिकरण निर्णयामुळे भारतात अभासी चलनाला मोठया प्रमाणात चालना मिळाली परंतु, असे असूनही २०२१ मध्ये एकूण जागतीक आभासी चलन बाजारातील एकूण बाजार भांडवलामध्ये भारतीयांचा वाटा फक्त ३ प्रतिशत आहे. हे प्रमाण कमी असण्याची अनेक कारणे आहेत. ज्यामध्ये

१. भारतात मुक्त आंतरराट्रीय भांडवल प्रवाहावर अनेक बंधने आहेत. २. आभासी चलन खणन प्रक्रिया स्थापन करण्यामध्येही खुप अडचणी आहेत. ३. भारतात आभासी चलन विनिमय केंद्राचे काम हे कार्यक्षमपणे होत नाही कारण अनेक कायदेशीर अडचणी, तसेच के.वाय.सी. संदर्भातील अडथळे आहेत.४. आर.बी.आय. व्दारा ही सर्व बँकाना आभासी चलनासंदर्भात इशारा रूपी सूचना देण्यात आल्या आहेत त्यामुळे कोणती बँक ही अभासी चलनामध्ये आपल्या ग्राहकांनी पैसा गुंतवू नये याची काळजी घेते. ग्राहकांना सातत्याने अभासी चलनातील गुतंवणूक ही धोकादायक आहे हे सांगण्यात येते.

**भारतातील आभासी चलनाची खरेदी विक्री:**

भारतात अनेक कायदेशीर अडचणी असूनही आभासी चलनाची खरेदी विक्री होत आहे.

आभासी चलन विनिमय केंद्र –

युनिकॉन हे आभासी चलन विनिमय केंद्र २०१३ मध्ये बीट कॉईन च्या विनिमयासाठी स्थापन करण्यात आले. अमेरिकेतील काही विशिष्ट गुंतवणूकदार गटाकडून या केंद्राची स्थापना करण्यात आली. सुरूवातीला भारतीय बँकांच्या माध्यमातून वास्तविक चलनाचे हस्तांतरण केल्या जात होते परंतु या केंद्रावर के.वाय.सी चे नियम शिथील असल्यामुळे भारतीय बँकेव्दारा होणारे पैसा हस्तांतरण कमी झाले आहे.

वझिर एक्स या विनिमय केंद्राची स्थापना २०१८ मध्ये करण्यात आली हे भारतातील सर्वात विश्वसनीय आभासी चलन विनिमय केंद्र आहे. अधिकोषण क्षेत्राला लागू होणारे सर्व के.वाय.सी. नियमांची काटेकोर अमलबजाणी या विनिमय केंद्रावर खाते तयार करण्यासाठी करावी लागते. भारतीय रूपयाच्या माध्यमातूनही या ठिकाणी शोधन व आहरण केल्या जात आहे.

याशिवाय आंतरराट्रीय स्तरावर कार्य करणारे बायनान्स या प्रसिध्द् विनिमय केंद्राव्दारे ही भारतात आभासी चलनाची खरेदी विक्री करता येते. कॉईन स्वीच कुबेर सारख्या मोबाईल ॲप व्दारेही आभासी चलनाची खरेदी विक्री भारतात चालू आहे. या सर्व विनिमय केंद्रावर खाते तयार करण्यासाठी सध्या के.वाय.सी. साठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते.

चंगनिस या संकेतस्थळावरूनही बीट कॉईनची खरेदी विक्री करता येते. या शिवाय देशातील सर्व मोठया शहरांमध्ये व्यक्तीगत स्तरावर अनेक स्थानिक व्यापारी बीट कॉईनचा विनिमय भारतीय रूपायांमध्ये करून देतात व त्यासाठी १० टक्के पर्यत कमिशन घेतल्या जाते.

भारतात अभासी चलनाचे अनेक विनिमय केंद्रे आहेत परंतु अजूनही वस्तू व सेवांची खरेदी विक्रीसाठी अभासी चलनाचा वापर फार कमी आहे. २०१७ मध्ये बुक माय शो या संकेतस्थळाव्दारे बीट कॉईन चा स्विकार सीनेमाची तिकट विक्री साठी सुरू केला.

**आभासी चलन व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या समस्या :**

आभासी चलनाची निर्मीती,वापर व संग्रह याबाबत अनेक समस्या आहेत व त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव वास्तविक अर्थव्यवस्थेवर पडत आहे. आभासी चलनाचे व्यवहार करणाऱ्या अनेक विनिमय केंद्रामध्ये वित्तीय सुरक्षेचा अभाव असल्यामुळे अनेक गुंतवणूकदारांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच वेगवेगळया नाविण्यपूर्ण कल्पनांचा

आधार घेवून आभासी चलनाचा प्रकल्प तयार केला जातो. त्यामध्ये सामान्य जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी प्रारभिंक नाणे प्रस्ताव आय.ओ.सी. आणले जातात. भांडवल जमा करण्यासाठी आणल्या गेलेल्या प्रारंभीक नाणे प्रस्तावातील काहीच प्रकल्प यशस्वी होतात. ९९ टक्के प्रकल्प हे अपयशी होतात. त्यामधील लोकांनी केलली गुंतवणूक वाया जाते व लोकांचे प्रचंड नुकसान होते. कोणतीही नियामक व्यवस्था नसल्यामुळे असे नाणे प्रस्तावावर कोणाचेही नियंत्रण नसते.

कोणत्याही प्रकारचे नियंत्रण व नियमन नसल्यामुळे पारंपारीक विश्वास हाच आभासी चलनाचा आधार आहे. अभासी चलनाच्या संदर्भातील महत्वाच्या समस्या खालील प्रमाणे सांगता येतील.

**१. सुरक्षा :** आभासी चलन निर्मितीच्या व वापराच्या पध्दतीमध्ये अनेक दोष आहेत. माहितीची असमानता या मुख्य दोषामुळे सुरक्षेसंदर्भात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. संगणन आधारीत माहिती जाळयामध्ये अनेक हॅकर्स शिरकाव करण्याचा प्रयत्न सातत्याने करत असतात. त्यातूनच आभासी चलनाची चोरी होते किंवा फसवे आभासी चलन निर्माण केले जाते. उदा: इथेरिअम या ब्लॉक चेनवर कार्य करण्यासाठी इथर चलन निर्माण झाले. या इथेरिअम कार्य प्रणाली मधे शिरकाव करून मोठया प्रमाणात इथर चलन निर्माण करण्यात आले. या नवीन निर्माण झालेल्या चलनाला नंतर इथेरिअम क्लॉसीक असे नाव देण्यात आले व या चलनाचा विनिमय ही प्रसिध्द् बायनान्स विनिमय केंद्रावर होत आहे. इथेरिअम क्लॉसिक चलनाची निर्मिती आभासी चलन निर्माण व वापर यामधील सुरक्षेवर प्रश्न निर्माण करणारी घटना आहे.

**२.अनियंत्रीत चलन पुरवठा :** आभासी चलनाचा पुरवठा केंद्रीकृत व विकेंद्रीत दोन्ही प्रकारात होतो व त्या दोन्ही प्रकांरामध्ये अभासी चलनाची निर्मिती प्रचंड प्रमाणात होत आहे. बीट कॉईन, इथर व बायनान्स या सारख्या आभासी चलन निर्मितीचा आधार ब्लॉक चेन सारखी प्रणाली आहे त्यामुळे या चलनाची संख्या मर्यादीत आहे. ब्लॉक चेन वर आधारीत नसणाऱ्या अनेक आभासी चलनामुळे संपूर्ण आभासी चलन व्यवस्था संकटात सापडली आहे. अप्रमाणीत आभासी चलन निर्माते आपण निर्माण केलेल्या चलनाच्या आधारे वास्तविक अर्थव्यवस्थेत मागणी वाढवत आहेत.

**३.मौद्रिक व्यवस्थेवर परिणाम :** अनेक आभासी चलन व्यवस्था हया वास्तविक अर्थव्यवस्थेशी संलग्नीत आहेत. त्यामुळे वास्तविक अर्थव्यवस्थेतील मागणी व पुरवठाचे संतुलन बिघडू शकते. उदा : आभासी चलनाच्या साहयाने वास्तविक वस्तु व सेवांची खरेदी विक्री होत असेल तर वास्तविक अर्थव्यवस्थेतील वस्तु व सेवांची संख्या कमी पडून भाववाढ होणे अटळ आहे. तसेच विनिमय केंद्रावर आभासी चलनाचे रूपांतर वास्तविक चलनात करू दिल्या जाते त्याचा प्रभावही वास्तविक चलनाच्या मूल्यावर पडत आहे. मौद्रिक धोरणाची परिणामकारकता त्यामुळे कमी होणार आहे.

**४.आभासी सुवर्ण खणन प्रक्रियेतील धोका :**

ऑनलाईक स्तरावर चालणारे अनेक सामाजिक खेळ ज्यामध्ये World of Warcraft हया खेळामध्ये प्रत्यक स्तरावर अभासी चलन रूपी सुवर्ण गुण प्राप्त करता येतात व त्याचे रूपांतर वास्तविक चलनामध्ये करता येते. अशा प्रकारच्या

सुवर्ण शेती प्रक्रियेत प्रचंड अभासी चलन निर्माण होते ज्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. अशा प्रकारच्या प्रक्रियेतून अभासी चलन निर्माण होत असल्यामुळेही ऑनलाईन व्यवहारात फसवेगिरी वाढत आहे.

**५.आभासी चलन मूल्यातील अस्थिरता:**

आभासी चलन निर्मिती व वापरावर कोणाचेही नियंत्रण नसल्याकारणामुळे अभासी चलनाच्या मुल्यामधे सतत चढउतार दिसून येतात. एक दिवसातील हा चढउतार १० टक्के पेक्षा अधिक असतो. चलनाची खरेदी दाराची किंमत व विक्रेत्याची किंमत यामध्ये खुप मोठी तफावत आढळते. बीट कॉईन व इथर सारखे अग्रणी चलनाची दररोजची चढउतार ही १० टक्के पेक्षा अधिक असते. २०२१ मध्ये अनेक आभासी बीट कॉईन मध्ये झालेली किंमत वाढ ही हजाराच्या पटीमध्ये आहे. तसेच NFT (Non Fungible Token) प्रकल्पातील आभासी चलनाच्या मुल्यांमध्येही मागील काही महिन्यामध्ये १०० ते ५०० पट वाढ झाल्याचे दिसून येते.

**६. पैशाचे अवैध हस्तांतरण :** एका देशातून दुसऱ्या देशात चलनाचे हस्तांतरण केंद्रीय बँकेच्या सहमती शिवाय करणे बेकायदेशीर आहे. सरकारमान्य चलन विनिमय दर ही संकल्पना आभासी चलनाच्या निर्मिती व वापरामुळे कमकूवत बनली आहे. आज जगामध्ये कोठेही वास्तविक पैशाचे मूल्य हस्तांतरण अभासी चलनाच्या साहयाने करणे सहज शक्य आहे. कोणताही देश त्यावर नियंत्रण घालू शकत नाही. उदा: भारतीय नागरीक दुबई मध्ये अभासी चलनाव्दारे घर विकत घेवू शकतो तसेच दहशवादयांना निधीचे हस्तांतरणही अभासी चलनाव्दारे करता येते. थोडक्यात आज आभासी चलनावर चालणारी एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे.

**समारोप :**

आज जगातील सर्व केंद्रीय बँकेसमोर सर्वात जटील प्रश्न उभा आहे तो म्हणजे अभासी चलन निर्मिती व वापरावर कशा प्रकारे नियंत्रण घालावे. या प्रश्नांचे उत्तर आज तरी केंद्रीय बँकेकडे नाही. वित्तीय स्थिरता प्रस्थापित करणे हे प्रमुख कार्य आज धोक्यात आलेले आहे. भारतात अभासी चलनामधील गुंतवणूक कमी असली तरी भवियामध्ये त्यामध्ये वाढ होणार आहे. परिणामी अनेक गंभीर आर्थिक व सुरक्षेविषयक प्रश्न भारतात निर्माण होवू शकतात. अभासी चलनाला नियंत्रीत करण्यापेक्षा आभासी चलनातील काही चलनाला भारतात मान्यता देणे गरजेचे आहे. बीट कॉईन, इथर व तेथर हे आभासी चलन स्वंय निर्मित नियमनांचा आदर करणारे आहेत त्यामुळे या चलनांना मान्यता देणे गरजेचे आहे. भारतात सर्वाधिक व्यवहार या चलनांचा होतो. यांना मान्यता दिल्यानंतर त्या चलनाच्या साहयाने चालणाऱ्या व्यवहारांना नियमित करणे शक्य आहे. आज भारतात अनेक ओ.टी.सी. व्यवहार चालत आहेत. ज्यामध्ये फॉरेक्स बाजार, सुवर्ण खणन कार्ये, गुंतवणूकीच्या फसव्या योजनांचे ॲप सहज उपलब्ध आहेत. अशा ओ.टी.सी. व्यवहारांना वेळीच प्रतिबंधित करूनही अभासी चलनाच्या वापरास काही प्रमाणात प्रतिबंध घालता येतो. केंद्रिय बँकेन आभासी चलन निर्माण करावे हा एक उपाय सांगीतला जातो परंतू हा उपाय फारसा परिणाम कारक ठरणार नाही कारण अभासी चलनाची विकेद्रित स्वरूपाची व अविरत चालणारी खणन निर्माण प्रक्रिया ही या आभासी चलनाची

खरी शक्ती आहे. व सरकार कधीही सामान्य जनतेला सरकार मान्य अभासी चलनाचे खणन प्रक्रिया निर्माण करू देणार नाही, कारण त्यामुळे चलन निर्गमनाचा एकाधिकार केंद्रीय बँकेकडे राहणार नाही.

**संदर्भ :**


1. Bitcoin: A New Global Economy. (2015, August 4). Retrieved July 2016, from BitPay, Inc. Website: https://blog.bitpay.com/bitcoin-a-new-global-economy/
2. https://en.wikipedia.org/wiki/Cryptocurrency
3. https://economictimes.indiatimes.com/news/economy/policy/bitcoin-income-tax-department-in-tough-spot-as-investors-goes-all-tech/articleshow/62302684.cms
4. Nakamoto, S. 2008. Bitcoin: A Peer-to-Peer Electronic Cash System. bitcoin.org.https://bitcoin.org/bitcoin.pdf
5. https://rbi.org.in/scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=43574
6. Subramanian, R. and Chino, T. (2016). The state of cryptocurrencies: Their issues and policyinteractions. Journal of International Technology & Information Management, 24(3), p. 25-40
7. Deepankar Roy, A. S. (2016). Payment Systems in India: Opportunities and Challenges. Journal of Internet Banking and Commerce, 1-49
8. https://www.binance.com/en/markets
9. https://coinswitch.co/in
10. https://coinmarketcap.com/cryptocurrency-category/


◆◆◆

# अर्थशास्त्राचे २०२१ चे नोबेल पारितोषिक : श्रम अर्थशास्त्र व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणाला बहाल

**प्रशांत हरमकर**
सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
या.द.व.देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती

**प्रस्तावना :**

श्रम बाजारामधील अनुभवनिष्ठ योगदान व कार्यकारण संबंधाच्या विश्लेषणामध्ये संशोधकांनी विकसित केलेल्या कार्यपद्धतीच्या योगदानाकरिता २०२१ चे अर्थशास्त्राचे नोबेल स्मृति पारितोषिक ११ ऑक्टोबर २०२१ रोजी जाहिर करण्यात आले. अर्थशास्त्राचे यावर्षीचे पारितोषिक डेव्हीड कार्ड, जोशुआ एंग्रिस्ट आणि गाईडो इम्बेन्स या तीन अर्थशास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. रॉयल स्विडीश ॲकेडमी ऑफ सायन्स यांनी पारितोषिक जाहिर करतांना म्हटले की, समाजासाठी महत्त्वाच्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाची (Natural experiment) मदत झालेली आहे. श्रम बाजाराचे नवीन अंतरंग स्पष्ट केले आहे. नैसर्गिक प्रयोगाकडून कारण आणि परिणाम निष्कर्षासह स्पष्ट केल्या आहे.

**पारितोषिक विजेते व त्याचे योगदान :**

डेव्हीड कार्ड यांचा जन्म १९५६ ला कॅनडा मध्ये झाला आहे. १९८३ मध्ये त्यांनी प्रिन्सटन विद्यापीठ (अमेरिका) येथून पीएच्.डी. केली आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठ, बरकेली (अमेरिका) येथे अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. दूसरे पारितोषिक विजेते जोशुआ एंग्रिस्ट यांचा जन्म १९६० मध्ये कोलंबस ओहीयो (अमेरिका) येथे झाला आहे. १९८९ मध्ये पीएच्.डी. प्रिन्सटन विद्यापीठामध्ये केली आहे. सध्या एम.आय.टी. केंब्रिज मध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे. गुईडो इम्बेन्स यांचा जन्म इन्डोव्हेन, नेदरलँड येथे १९६३ मध्ये झाला आहे. पीएच्.डी. १९९१ मध्ये ब्राऊन विद्यापीठ (अमेरिका) येथे केली आहे. अर्थमितीचे प्रोफेसर म्हणून स्टेनफोर्ड विद्यापीठ (अमेरिका) येथे कार्यरत आहे.

यावर्षीच्या पारितोषिक विजेत्यांनी दाखवून दिले की, समाजाच्या मध्यवर्ती प्रश्नासाठी नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग केला जाऊ शकतो. किमान वेतन आणि स्थलांतरण श्रम बाजाराला प्रभावित करीत असतात. या संशोधनात्मक दृष्टिकोनाचा वापर करुन कारणे व परिणामासह निष्कर्ष प्रस्तुत केले आहे. त्यांच्या अनुभवनिष्ट संशोधनामुळे अर्थशास्त्रामध्ये क्रांतीकारक बदल घडून आल्याचे नोबेल समितीने म्हटले आहे.

जर आपण चांगल्या प्रकारचा निर्णय तयार करीत असू तर आपल्या निवडीचा परिणाम समजवून घेणे आवश्यक आहे. याचे उपयोजन वैयक्तिक आणि सार्वजनिक पातळीवर धोरणकर्ते करतात. तरुण वर्ग हा शैक्षणिक निवड करतो. त्याचा परिणाम त्यांच्या भविष्यातील वेतनावर होतो. आर्थिक सुधारणा घडवून आणण्याचा संबंध हा राज्यकर्त्याशी असतो. आर्थिक सुधारणा रोजगार आणि उत्पन्न

वितरणाला प्रभावित करीत असतात. अशा प्रकारे विस्तृत प्रश्नाचा शोध घेत असतांना कारण व परिणामाचे विश्लेषण केल्या जाते. पण प्रत्यक्षात असा कारण व परिणाम संबंध स्पष्ट करणे सोपे नाही. कारण काय घडणार आहे याची माहिती आपणाला नसते.

यादृच्छिक प्रयोगाचा (random experiment) वापर करुन कार्यकारण संबंध स्पष्ट केला जातो. नवीन औषधाच्या परिणामकारकतेचा शोध घेतला जातो.. पण अनेक सामाजिक वादप्रश्नाच्या शोध घेण्याकरिता यादृच्छिक प्रयोग पद्धती पुरेशी ठरत नाही. समाजातील अनेक वादप्रश्नाचे उत्तर शोधण्याकरिता नैसर्गिक प्रयोगाचा (Natural experiment) वापर केला आहे. संस्थाचे नियमन किंवा धोरणात्मक बदलाकरिता नैसर्गिक प्रयोगावर भर दिलेला आहे. डेव्हीड कार्ड यांनी श्रम अर्थशास्त्रातील मध्यवर्ती प्रश्नाचे विश्लेषण नैसर्गिक प्रयोगाद्वारे केले आहे. जसे किमान वेतन, स्थलांतरण आणि शिक्षणाचा काय परिणाम घडून आला. यामुळे पारंपरिक ज्ञानाला आव्हान आणि संशोधनामध्ये पुढाकार घेण्यात आला आहे.

**नैसर्गिक प्रयोग :**

नैसर्गिक प्रयोगाचा वापर विविध प्रकारे केला जातो. नैसर्गिक प्रयोगाचा वापर करुन निष्कर्षासह कार्यकारण संबंध स्पष्ट केला जातो. ही चौकट आमुलाग्र बदल घडवून आणणारी आहे. हा अनुभवनिष्ट संशोधनाकरिता संशोधकांचा दृष्टिकोण आहे. महत्त्वाचा प्रश्न समाज आणि तरुण वर्गाच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून आहे. जर दिर्घकाळ शिक्षण घेण्यामध्ये घातला तर त्या व्यक्तीला किती उत्पन्न मिळेल ? या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेत असतांना त्यांच्या समंकाकडे (data) पहावे लागते. उत्पन्नाचा संबंध हा शिक्षणाशी आहे. जर लोकांनी अधिक काळ शिक्षण घेण्याकरिता व्यतीत केला तर लोकांचे उच्चतम उत्पन्न राहील का? समजा एका व्यक्तीचा जन्म १९३० मध्ये अमेरिकेमध्ये झाला. जर त्याने शिक्षणामध्ये अधिकचे एक वर्ष व्यतीत केले तर त्याचे उत्पन्न ७ प्रतिशतने वाढलेले दिसून आले. १२ वर्ष शिक्षण घेणाऱ्या लोकांचे उत्पन्न ११ वर्ष शिक्षण घेणाऱ्यापेक्षा १२ प्रतिशतने जास्त होते. ११ वर्ष शिक्षण घेणाऱ्यापेक्षा १६ वर्ष शिक्षण घेणाऱ्याचे उत्पन्न जास्त होते. याचा अर्थ शिक्षणामध्ये अधिक कालावधी व्यतीत केल्यास उत्पन्न वाढते का? अनेक बाबतीत असे दिसून आले की जे लोक हुशार असतात ते काम करुन आपले अध्ययन सातत्याने सुरू ठेवतात. म्हणजे त्यांना जास्त उत्पन्न मिळत नाही. ज्यांना भविष्याकडून जास्त उत्पन्न प्राप्तीची अपेक्षा असते ते जास्त काळ शिक्षणामध्ये व्यतीत करतात.

नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग परिक्षणाकरिता केला जातो. शिवाय शिक्षण घेण्यातील ज्यादा वर्ष उत्पन्नाला प्रभावित करतात. जोशुओ एग्रिस्ट आणि एलन क्रुगर यांनी दर्शविले की, सामान्यपणे अमेरिकेमध्ये मुले शाळेमध्ये १६ किंवा १७ वर्ष असतात. जोपर्यंत ही मुले शाळेमध्ये आहे तोपर्यंत राज्यावर अवलंबून असतात. सर्व मुले विशिष्ट तारखेला जन्माला येऊन शाळा त्यांच्यासाठी समान तारखेला सुरू झालेली असते. जे मुले पहिले जन्माला येतात ते शाळेत पहिले जातात. जे पुढील वर्षामध्ये जन्माला येतील ते त्या पुढील वर्षामध्ये शाळेत जातील. एग्रिस्ट आणि क्रुगर यांनी तुलना केली की, काही मुले पहिल्या तिमाही मध्ये जन्माला येतात तर काही चवथ्या तिमाही मध्ये जन्माला येतात. त्यांना दिसून आले की चवथ्या तिमाही

मध्ये जन्माला आलेल्या मुलांपेक्षा पहिल्या तिमाहीत जन्माला आलेल्या मुलाचे उत्पन्न न्यूनतम असते पण शिक्षण कमी असेल तर उत्पन्न कमी असल्याचे दोघांच्याही बाबत दिसून येते.

एग्रिस्ट आणि क्रुगर यांनी नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग सक्षम मानला आहे. त्यांनी आधिक्याने शिक्षण व उच्चतम उत्पन्न यामधील संबंध प्रस्थापित केला आहे. शिक्षणातील ज्यादा वर्ष घालविण्याचा परिणाम उत्पन्न वाढण्यावर घडून येतो. यामुळे शिक्षण व उत्पन्न यामध्ये संघटन आहे. उच्च शिक्षण हे उच्च उत्पन्न प्राप्तीकरिता सबळ कार्यकारण संबंध प्रस्तुत करतो. म्हणजेच शिक्षणामध्ये ज्यादा वर्ष व्यतीत करण्याचा धनात्मक परिणाम उत्पन्नावर होत असल्याचे स्पष्ट केले आहे.

**श्रम बाजाराच्या समजूती :**

जेव्हा किमान वेतन असते तेव्हा न्यूनतम रोजगार असतो. कारण व्यवसायिकांसाठी वाढता वेतन खर्च असतो. अनेक अभ्यासामध्ये असे आढळून आले की, किमान वेतन आणि रोजगार यामध्ये ऋणात्मक सहसंबंध असतो. याचा वास्तविक अर्थ असा की, उच्चतम किमान वेतन हा उच्चतम बेरोजगारामध्ये पुढाकार घेतो. यामध्ये उलट कार्यकारण संबंध असतो हा वादप्रश्न आहे. श्रमिकाकरिता न्यूनतम वेतन दर असतील तर बेरोजगारी वाढेल. म्हणून किमान वेतन दर वाढण्याची मागणी होते.

किमान वेतन दर वाढण्याचा रोजगारावर कसा परिणाम होतो याचा शोध कार्ड आणि त्याचे सहकारी क्रुगर यांनी घेतला आहे. याकरिता नैसर्गिक प्रयोगाचा वापर त्यांनी केला आहे. १९९० च्या दशकामध्ये किमान प्रतिताशी वेतन दर न्युजर्सी मध्ये ४.२५ डॉलर वरून ५.०५ डॉलर पर्यंत वाढविले होते. याचे अध्ययन केले असता वेतन वाढीनंतर न्युजर्सी मध्ये काय घडले? तर या प्रश्नाचे खात्रीलायक उत्तर देता येत नाही. पुढे कार्ड म्हणतात की, शेजारील पेनसिलव्हिया राज्यामध्ये काय बदल झाले? या प्रश्नाचा वेध घेतला तर असे आढळून आले की, दोन्ही राज्यामध्ये भिन्नता आहे मात्र श्रम बाजार समांतर गुंतलेला आहे. अगदी सिमेजवळचा म्हणून न्युजर्सी आणि पेनसिलव्हेनिया या दोन राज्याचे रोजगार परिणामाच्या दृष्टीकोनातून अध्ययन केले आहे. श्रम बाजार समांतर असतांना सिमेच्या एका बाजूला (न्युजर्सी) किमान वेतन दरामध्ये वाढ केली तर सिमेच्या दुसऱ्या बाजूला (पेनसिलव्हेनिया) वेतनामध्ये वाढ होते का. यामध्ये आर्थिक घटक विश्वसनीय कारण म्हणून दिसत नाही. याचाच भाग म्हणून जेव्हा किमान वेतनदर वाढतात तेव्हा सिमेच्या दुसऱ्या बाजूला असणाऱ्या क्षेत्रातील रोजगार भिन्न प्रकारे प्रभावित होतो. रोजगाराच्या संख्येमध्ये बदल घडून येतो. किमान वेतन दर पेनसिलव्हियामध्ये वाढण्याचा परिणाम घडून येतो. याचे योग्य प्रकारे निर्वचन करता येत.

तीस वर्षाच्या कालखंडाचा विचार केला तर कार्डच्या नुसार किमान वेतन दर वाढण्याचे नकारात्मक परिणाम फार अल्प असतात. रोजगारावरील नकारात्मक परिणाम गैरहजर ठेवून विश्लेषण करता येते. किमान वेतन दर वाढले तर उत्पन्नाच्या वाढत्या व्ययाचे हस्तांतरण वस्तूच्या किंमतीकडे केल्या जाते. मागणीमध्ये कपात होणार नाही अशा पद्धतीने वस्तूच्या किंमतीत वाढ होते. स्थानिक श्रम बाजाराचा भर हा न्यूनतम वेतन दर बाळगण्यावरच असतो. जर किमान वेतन दर वाढले तर आधिक्याने लोकांना काम मिळाले असा त्याचा अर्थ होतो. रोजगार वाढण्यामध्ये पुढाकार घेतला

जातो. जो किमान वेतन दराला प्रभावित करतो. कार्डच्या संशोधनामुळे श्रम बाजाराच्या समजूतीमध्ये सुधारणा झाल्या आहे.

**शिक्षण आणि स्थलांतरण :**

स्थलांतरण श्रम बाजाराला प्रभावित करीत असते. कारण एखाद्या प्रदेशामध्ये स्थलांतरण घडून आले तर त्या प्रदेशामधील श्रम बाजार वृद्धींगत होत असतो. श्रम बाजारातील स्थलांतरणामुळे जे बदल घडून येतात त्यामधील कार्यकारण संबंध डेव्हीड कार्ड यांनी शोधून काढला आहे. याकरिता अमेरिकेतील घटनाचे अध्ययन कार्ड यांनी केले आहे. स्थलांतरण कसे श्रम बाजाराला प्रभावित करते याकरिता अमेरिकेमध्ये मे १९८० ते सप्टेंबर १९८० च्या दरम्यान १,२५,००० क्युबा मधील रहिवासी स्थलांतरित झाले. अनेकांनी मिआमीमध्ये जाण्याचे ठरविले. यामुळे मिआमी मधील श्रम पुरवठा ७ प्रतिशतने वाढला होता. मिआमी मधील श्रम बाजार मोठ्या प्रमाणात येणाऱ्या कामगारामुळे कशा प्रकारे प्रभावित झाला याचे परिक्षण करण्यात आले. याकरिता मिआमी मधील वेतन आणि रोजगार प्रवृत्तीची तुलना करण्यात आली. मिआमी मधील वेतन आणि रोजगाराचे अध्ययन चार पूरक शहराशी तुलना करून करण्यात आले.

या अध्ययनातून डेव्हिड कार्ड यांना दिसून आले की श्रम पुरवठ्यामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. यांचा मिआमी रहिवासी यावर नकारात्मक परिणाम घडून शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे. वेतन दर घटले नाही पण रोजगार देखील वाढला नाही असे इतर शहराशी तुलना केल्यावर दिसून आले आहे. या अनुभवनिष्ठ अध्ययनातून मूल्य निर्माण झाले आहे. स्थलांतरणाचा वास्तविक परिणाम काय घडून आला याकरिता अशा प्रकारचे अध्ययन महत्वाचे ठरते. त्याच बरोबर अशा अध्ययनाचा मागोवा घेताना असे दिसून आले की, अनेक गटांच्या उत्पन्नावर सकारात्मक परिणाम झालेला आहे. विशेषत: ज्याचा जन्म तेथे झाला त्यांचे उत्पन्न वाढले आहे. जे लोक स्थलांतरित होतात त्यांच्यावर नकारात्मक परिणाम दिसून येतो. यासंदर्भात आणखी स्पष्ट करता येते की, मूळ रहिवासी (स्थानिक लोक) यांना काम मिळणे बंद होते. कारण कामाकरिता चांगले भाषिक कौशल्य आवश्यक असते. तसेच स्थलांतरीता सोबत काम मिळविण्याची स्पर्धा स्थानिक लोक करू शकत नाही. कारण स्थलांतरित लोक कोणत्याही प्रकारचे काम करण्यास तयार असतात.

शाळेतील संसाधनाचा परिणाम विद्यार्थ्यांवर काय घडून येतो यासंदर्भात कार्ड याचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यावर श्रम बाजाराचे यश अवलंबून असते. कार्ड याच्या पूर्वी करण्यात आलेल्या संशोधनामध्ये शाळेतील वाढणारी संसाधने आणि शाळांची कामगिरी यामध्ये सहसंबंध असल्याचे दर्शविले आहे. तसेच श्रम बाजारामध्ये संधी दुर्बल असू शकतात. पूर्वी झालेल्या संशोधनामध्ये एक समस्या अशी होती की, क्षतिपूर्ती संसाधन आवंटनाच्या संभाव्यतेशी त्याचा संबंध दर्शविला नव्हता. उदा. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याकरिता धोरणकर्ते आधिक्याने गुंतवणूक करीत होते. मात्र विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता साध्य करण्याची पातळी न्यूनतम होती.

शाळेतील संसाधनाचा विद्यार्थ्यांवर काय परिणाम होतो घडून येतो त्याचे परीक्षण केले असता त्यावर भविष्यातील श्रम बाजाराचे यश अवलंबून असते. याकरिता डेव्हिड कार्ड आणि एलन क्रुगर यांनी अमेरिकेतील समान राज्याची तुलना

शिक्षणावरील परताव्याच्या संदर्भात केली आहे. मात्र ते वेगळ्या राज्यामध्ये वृद्धिंगत झाल्याचे दिसून आले. सध्या कॅलिफोर्नियामध्ये राहणारे लोकांचे उत्पन्न शिक्षण घेतल्यानंतर त्यांना रोजगाराच्या संधी दुसऱ्या राज्यांमध्ये मिळतात. त्यामुळे त्यांचे उत्पन्न अलवामा किंवा लोवा मध्ये वृद्धिंगत होत असल्याचे दिसून आले. शिक्षणाची समान पातळी असताना लोक कॅलिफोर्नियामध्ये गेले याची तुलना केली तर दिसून येईल की, शिक्षणावरील परतावा भिन्न असतो. कारण अलवामा आणि लोवामध्ये शिक्षण व्यवस्थेमध्ये भिन्न प्रकारची गुंतवणूक केली आहे. त्यामुळे परतावा भिन्न असण्याची संभाव्यता असते. कार्ड आणि क्रूगर यांनी शोधून काढले की, संसाधने ही महत्वाची असतात. त्या राज्यामधील शिक्षकांच्या घनतेवर (teacher density) शिक्षणाच्या परताव्याची वाढ अवलंबून असते. यामधून व्यक्तिगत पातळीवर उत्पन्न वृद्धिंगत होत असते. शिक्षणातील गुंतवणुकीवर विद्यार्थ्यांचे श्रम बाजारातील यश अवलंबून असते. मागास पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यामधून सबळ परिणाम घडून येतो.

पारितोषिक विजेत्यांनी १९९० दशकामध्ये महत्वाच्या प्रश्नांना संभाव्य उत्तरे शोधून काढली आहे नैसर्गिक प्रयोगामध्ये कारण आणि परिणामांचा उपयोग केला आहे. यामधून प्रोत्साहन आणि सामर्थ्य संशोधनाला प्राप्त झाले आहे. एग्रिस्ट आणि इवेन्स यांनी नैसर्गिक प्रयोग पद्धतीचे अंतरंग स्पष्ट केले आहे. तर कार्डने या दृष्टिकोणाचा वापर संशोधनामध्ये केला आहे. यामुळे महत्वपूर्ण प्रश्नांमध्ये कार्डला पुढाकार घेता आला आहे. यामुळे संशोधनाकरिता सुसंगत चौकट निर्माण झालेली आहे. यामधून मिळालेल्या परिणामांचे निर्वचन करता येते. पारितोषिक विजेत्यांच्या संशोधनामुळे सामाजिकशास्त्रे मधील अनुभवनिष्ट संशोधन क्रांतिकारक ठरले आहे. महत्वपूर्ण प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता संशोधकाची क्षमता सुधारली आहे.

**कार्यकारण संबंधाची नवचौकट :**

हस्तक्षेपाचा परिणाम सर्व वास्तविक परिदृश्यामध्ये दिसून येतो. जसे शिक्षण घेण्यामधील ज्यादा कालावधी हा उत्पन्नावर परिणाम करणारा असतो. नैसर्गिक प्रयोगाद्वारे व्यक्तिगत पातळीवर विविध प्रकारे प्रभावित केल्या जाते. जर शिक्षणामध्ये १६ वर्ष व्यतीत केले असेल तर याचा सबळ परिणाम घडून तो पुढील शिक्षणाकरिता विद्यापीठामध्ये प्रवेश घेईल. प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे अध्ययनामध्ये समांतर समस्या उद्भवतील कारण आपण एखाद्या व्यक्तीला हस्तक्षेपामध्ये सहभागी होण्यास बाध्य करु शकत नाही. याकडून सहभागामध्ये हस्तक्षेप असतो. प्रत्यक्षात उपगटाची निवड केल्या जाते. यामध्ये व्यक्तीचा संभाव्य सहभाग असतो. विश्वास आहे की हस्तक्षेपाकडून लाभ प्राप्त होतील. संशोधक ज्यामध्ये सहभागी झाले अशाच समंकाचे विश्लेषण केल्या जाते.

या संदर्भात एग्रिस्ट आणि इम्बेन्स यांनी अध्ययन केले आहे. त्यांनी प्रश्न निर्माण केला की, विशिष्ट हस्तक्षेपाच्या परिमाणामध्ये नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग कोणत्या प्रकारे केल्या जातो. जसे गणनात्मक अभ्यासक्रम आहे. याचा व्यक्तिगत पातळीवर फार परिणाम घडून येतो. यावर संपूर्णपणे नियंत्रण ठेवू शकत नाही. उदा. कोण सहभागी होणार, अनुमानाचा कोणता परिणाम होईल किंवा निर्वचन कशा प्रकारे केल्या जाईल इत्यादी.

नैसर्गिक प्रयोगाची आपण कल्पना करु शकतो. जसे यादृच्छिक विभागणी उपचार गट आणि नियंत्रित गटामध्ये करता येते. उपचार गटाला

कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याचा अधिकार दिलेला आहे. तसाच नियंत्रित गटाला दिला जात नाही. एग्रिस्ट आणि इम्बेन्स यांनी दर्शविले की, द्वि-अवस्था प्रक्रियेच्या उपयोजनाद्वारे कार्यक्रमाच्या संभाव्य अनुमानाचा परिणाम (साधनात्मक चल पद्धती) होतो. शोधाची पहिली अवस्था नैसर्गिक प्रयोगांना कशा प्रकारे प्रभावित करते. पहिली अवस्था संभाव्य सहभागी कार्यक्रमाद्वारे प्रभावित होते. दूसरी अवस्था संभाव्यतेशी संबंधित आहे. प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या परिणामाचे मूल्यांकन केल्या जाते. याकरिता काही गृहीतके दिलेली आहे. जसे नैसर्गिक प्रयोगाद्वारे प्रत्यक्षात कोण प्रभावित होतो याची माहिती नसते. कार्यक्रमाच्या प्रभावाद्वारे संशोधकाचे अनुमान प्रभावित होते. एक महत्त्वाचा निष्कर्ष असा कि कोणत्या लोकांवर परिणाम होणार आहे. केवळ त्यांच्या अनुमानाची संभाव्यता असते. वर्तवणूकीत बदल घडून येणे हा नैसर्गिक प्रयोगाचा परिणाम आहे. एग्रिस्ट आणि क्रुगर यांनी निष्कर्ष काढला की, शिक्षणातील ज्यादा वर्ष उत्पन्नाला प्रभावित करतात. त्यांच्या उत्पन्नाचा अंदाज नऊ प्रतिशत पर्यंत वाढण्याचा आहे. अशाच लोकांच्या उत्पन्नामध्ये वाढ घडून येते ज्यांनी प्रत्यक्षात शिक्षणासाठी शाळा निवडली व त्यांना जाण्याची संधी मिळाली. हा गट व्यक्तिगतरित्या समाविष्ट आहे हे निर्धारित करणे संभाव्य नाही. मात्र आकार निर्धारित करता येतो. या गटावरील परिणामाला स्थानिक सरासरी उपचार परिणाम (Local Average Treatment Effect) म्हणून संबोधले जाते.

एग्रिस्ट आणि गाईडो यांनी नैसर्गिक प्रयोगाबाबत काढलेले निष्कर्ष कारण आणि परिणाम संबंध दर्शविणारे आहे. त्यांचे विश्लेषण यादृच्छिक प्रयोगाशी संबंधित आहे. हस्तक्षेपामध्ये जे सहभागी आहे त्यावर संपूर्ण नियंत्रण आपण ठेवू शकत नाही. हा संदर्भ सर्व क्षेत्रीय प्रयोगांना लागू होतो. ही चौकट एग्रिस्ट आण इम्बेन्स यांनी विस्तृत प्रमाणात स्विकारली आहे या करिता संशोधकांनी निरीक्षणात्मक संमकाचा उपयोग केला आहे. आवश्यक गृहिताच्याद्वारे कार्यकारण संबंध स्पष्ट केला आहे. या चौकटीमध्ये पारदर्शकता वाढवली आहे. याचे श्रेय अनुभवनिष्ट संशोधनाला जाते.

**संशोधनात्मक पद्धतीद्वारे विश्लेषण :**

उपयोजित शास्त्रांचा (Applied Science) संबंध हा असमाविष्ट कार्यकारण संबंधांची असतो. अनेक क्षेत्रामध्ये यादृच्छिक नियंत्रण चाचणी (Randomized controlled trials - RCT) केल्या जाते. याचा संबंध सुवर्ण मानके (gold standard) प्राप्त करण्याशी आहे. RCT चा उपयोग व्यवस्थाबद्धरित्या कार्यकारण संबंध दर्शविण्यासाठी होतो. वैद्यकीय उपचाराच्या कार्यक्षम प्रवेशासाठी महत्त्वाचा मानला जातो. याचा परिणाम म्हणजे समाजामध्ये अत्यंत कल्याणात्मक लाभ मिळवण्यासाठी होतो. शिवाय वित्तीय, नैतिक, व्यवहारीक मर्यादा असलेल्या अनेक प्रश्नांवर भर दिलेला आहे. कोविड-१९ च्या प्रसारानंतर शाळा बंद होण्याचा विद्यार्थ्यांवर काय परिणाम घडून आला ? न्यून कौशल्य लोकांच्या स्थलांतरामुळे रोजगार आणि वेतनावर काय परिणाम घडून येतो ? आर्थिक विकासामुळे संस्था कशाप्रकारे प्रभावित होतात ? किमान वेतनामुळे रोजगार कसा प्रभावित होतो ? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याकरिता संशोधक निरीक्षणात्मक समंकाचा उपयोग करतात. यामधून मूलभूत ओळख पटविण्याच्या समस्या निर्माण होतात. कोणताही सहसंबंध हा अस्पष्ट असतो. किमान वेतन आणि बेरोजगार यामधील सहसंबंध पहावा लागतो. कारण किमान वेतन बेरोजगारीला

कारणीभूत असू शकते किंवा बेरोजगारी आणि न्यूनतम वेतन वृद्धी ही वेतन वितरणाच्या तळाला (bottom) असू शकते. यामधून किमान वेतन प्रस्तुत करण्यामध्ये पुढाकार घेतला जाऊ शकतो का? कारण इतर असंख्य घटक बेरोजगारी आणि किमान वेतनाला प्रभावित करीत असतात.

डेव्हिड कार्ड यांनी नैसर्गिक प्रयोगाचा उपयोग करून अनेक गाभा प्रश्नाचे (core question) विश्लेषण केले आहे. निसर्ग, संस्था किंवा धोरणात्मक बदलांच्याद्वारे योग्य प्रकारे प्रकट करून अध्ययन रचनेच्या एककाचे विश्लेषण केले आहे. याचा परिणाम स्थलांतरण, किमान वेतन आणि शैक्षणिक धोरणावर झालेला आहे. त्यामध्ये परंपरागत ज्ञानाचे आव्हान असले तरीसुद्धा प्रतिकृतीच्या आंतरकृती प्रक्रियेचा आरंभ बिंदू आहे. त्याच बरोबर अनुभवनिष्ट अध्ययन व सैद्धांतिक कार्य यामध्ये कार्डचे प्रमुख योगदान आहे. श्रम बाजार कसा हाताळला जातो व त्यापासून कसे लाभ मिळतात हे सखोलपणे कार्डने समजावून सांगितले आहे.

जोशुआ एग्रिस्ट आणि गुईडो इवेन्स यांचे अनुमानीत सरासरी उपचार पद्धतीच्या परिणामामध्ये आव्हाने आहे. विशेषतः यामध्ये वास्तव परिदृश्याचे विश्लेषण केलेले आहे. नैसर्गिक प्रयोगाद्वारे नेमून दिलेल्या कार्यासह संपूर्ण उपचार व निवडीव्दारे विविध प्रकारे व्यक्तिगत पातळी प्रभावित केल्या गेली आहे. एग्रिस्ट आणि इवेन्स यांनी दर्शविले की, संभाव्य अनुमानित योग्य स्पष्टीकरण उपचारात्मक पद्धतीच्या परिणामांचे केले आहे. याकरिता स्थानिक सरासरी उपचार पद्धती परिणाम (Local average treatment effect - LATE) आहे. यासाठी किमान अटींचा संच आहे. त्यामधून वाढून आलेला प्रमुख परिणाम म्हणजे साधनात्मक तफावतीची चौकट, अर्थशास्त्रातील सामान्यपणा, प्रासंगिक अनुमानाची अंतर्गत क्षमता-परिणाम चौकट आणि सांख्यिकीचा सामान्यपणा आहे. या चौकटी अंतर्गत प्रासंगिक रचनांमध्ये प्रमुख ओळख पटविणारे गृहितके आहे. या गृहीताचा शोध घेत असताना संवेदनशील उल्लंघनाच्या पारदर्शक मार्गांची तरतूद केली आहे.

**अर्थशास्त्र व अनुभवनिष्ट संशोधन पद्धती :**

कार्डने अध्ययन करून दर्शविले की, नैसर्गिक प्रयोगामध्ये शोषण करण्याची शक्ती आहे. यामधून प्रमुख कार्यक्षेत्रांमधील प्रासंगिक परिणाम स्पष्ट करून दाखविले आहे. अलीकडच्या संशोधनामध्ये अनुभवनिष्ठ संशोधनावर लक्ष केंद्रित करून त्याद्वारे निर्णायक भूमिका पार पाडल्या जात आहे. अनुभवनिष्ठ संशोधनामध्ये निरीक्षणात्मक संमकाचा उपयोग करून प्रतिरूप अनुभवनिष्ट तफावत (quasi experimental variation) ते प्रासंगिक परिणाम दर्शविले जात आहे. एग्रिस्ट आणि इवेन्स यांनी संशोधनाची चौकट विकसित केली आहे. याकरिता महत्त्वपूर्ण पर्याय दिलेले आहे. अनुभवनिष्ट प्रश्नांच्या बाबत संशोधकाचा दृष्टीकोन कसा असावा. नैसर्गिक प्रयोग किंवा यादृच्छिक प्रयोगामध्ये अपूर्ण अनुपालनाकरिता नेमून दिलेल्या उपचार पद्धती मध्ये समंकाचा उपयोग केला जातो. गाभा प्रश्नाबाबत LATE द्वारे निर्वचन केल्या जाते. अनुभवनिष्ट पद्धतीद्वारे काय शिकायला मिळाले व काय शिकायला मिळू शकणार नाही ते स्पष्ट होते. तिनही पारितोषिक विजेत्यांची महत्वपूर्ण भूमिका अर्थशास्त्रामध्ये रचनात्मक आधारित दृष्टिकोन स्थापित करण्यामध्ये आहे. हा दृष्टिकोन यादृच्छिक प्रयोगाचे अनुकरण करतो. याकडून प्रासंगिक प्रश्नांची उत्तरे शोधली जातात. त्याकरिता निरीक्षणात्मक समंकाचा उपयोग केला जातो. उपयोजित कार्याचे हस्तांतरण घडून

संशोधन कार्यामध्ये सुधारणा घडून आल्या आहे. परिणामत: प्रासंगिक प्रश्नांचे उत्तरे शोधण्याची क्षमता सुधारली आहे. यामुळेच आर्थिक आणि सामाजिक धोरणांमध्ये निरीक्षणात्मक संमकाच्या उपयोगाला महत्व प्राप्त झाले आहे.

डेव्हीड कार्ड आणि त्याच्या सहकाऱ्यांनी श्रम बाजारामध्ये नैसर्गिक प्रयोगाचा वापर करून अनेक गाभा प्रश्नांचे विश्लेषण केले आहे. गाभा प्रश्नाचे विश्लेषण करताना तटस्थता आणि पारदर्शकता आहे. प्रश्न संबोधतांना नावीन्य आहे. यामधला आधिक्याने विश्वासहार्य मार्ग आहे. हा मार्ग उत्तरे शोधण्यास वास्तववादी आणि सक्षम आहे. निष्कर्ष शोधण्यामध्ये नवीन सिद्धांत व अनुभवनिष्ट संशोधन कार्याची उद्दिष्टे समजवून घेण्याची यंत्रणा आहे.

एग्रिस्ट आणि इंवेन्स यांनी स्पष्ट केले आहे की, अटीच्या किमान संचातंर्गत प्रासंगिक उपचार पद्धतीच्या परिणामांचे संभाव्य स्पष्टीकरण केलेले आहे. यावरून अनुमान व्यक्त करणे शक्य होते. हस्तक्षेप हा व्यक्तिगत पातळीवर भिन्न प्रकारे प्रभावित करीत असतो. यामध्येच अपूर्ण अनुपालन केल्या जाते. प्रासंगिक परिणामांचे निर्वाचन करून त्याला स्थापित केल्या जाते. साधनात्मक तफावतीतून अंदाज व्यक्त केला जातो. यामधून परिणाम व्युत्पादित केले जातात. सांख्यिकीचा उपयोग करून सामान्य प्रसंगीक अनुमानासाठी क्षमता परिणाम चौकट ते साधनात्मक तफावतीची श्रृंखला तयार केली जाते. आधिक्याने पारदर्शक गृहितके ओळखण्यासाठी नैसर्गिक चौकट तयार केली जाते. संशोधकाच्या क्षमतेमध्ये सुधारणा केली जाते जेणेकरून प्रासंगिक परिणाम स्थापित केले जातात. अनुभवनिष्ट रचना आणि परिणामांचे निर्वचन करण्याकरिता संवेदनशीलपणे मूल्यांकन केल्या जाते.

पारितोषिक विजेत्यांनी एकत्रितपणे कार्य करून पुढाकार घेतला आहे. याकरिता रचना आधारित दृष्टिकोनाचा उपयोग केला आहे. यामुळे अत्यंत बदल घडून आलेले आहे. गेल्या तीस वर्षांमध्ये अनुभवनिष्ट संशोधन पद्धतीचे आचरण बदललेले आहे. रचनात्मक आधारित दृष्टीकोनाचा उपयोग प्रामुख्याने प्रतिरूप अनुभवनिष्ठ संशोधनामध्ये होतो. मात्र हिताच्या प्रासंगिक परिणामांमध्ये अनुभवनिष्ठ अंदाजामध्ये तफावती असतात. प्रतिरूप अनुभवनिष्ठ तफावती या अनेक अनुभवनिष्ठ तरतूदीकडून येऊ शकतात. यामध्ये निसर्ग, प्रशासकीय मर्यादा संस्थात्मक निर्बंध आणि धोरणात्मक बदलांचा समावेश आहे. रचनात्मक आधारित दृष्टीकोणाची वैशिष्ट्ये गृहीतांच्या उपयोगाबाबत स्पष्ट विधाने करतात. यामध्ये गृहीताची वैधता आणि प्रासंगिक परिणामाची ओळख पटविल्या जाते. अर्थशास्त्रामध्ये या दृष्टिकोनाचे वर्चस्व आहे. इतर सामाजिकशास्त्रामध्ये देखील याचा विस्तार घडवून आलेला आहे. परिणामतः संशोधकांची प्रासंगिक प्रश्नांची उत्तरे देण्याची क्षमता वाढलेली आहे. याला पर्याप्त स्वरूपात महत्व अर्थशास्त्र आणि सामाजिक धोरणामध्ये प्राप्त झाले आहे. याचा लाभ समाजाला प्राप्त झाला आहे.

**समारोप :**

पारितोषिक विजेत्यांनी नैसर्गिक प्रयोगाद्वारे कारण आणि परिणामाचा उपयोग करुन महत्त्वाच्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याची संभाव्यता प्रस्तुत केली आहे. नैसर्गिक प्रयोगाच्या कार्यपद्धतीचे अंतरंग स्पष्ट केले आहे. महत्त्वाच्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणे याकरिता कार्ड दृष्टिकोण महत्त्वाचा आहे. कार्यकारण संबंधाच्या चौकटीचा संबंध हा विचाराशी आहे. याद्वारे प्राप्त परिणामाचे निर्वचन केल्या जाते.

पारितोषिक विजेत्यांनी अनुभवनिष्ट संशोधनामुळे सामाजिकशास्त्रे मध्ये क्रांतीकारक बदल घडवून आणले आहे. महत्त्वाच्या प्रश्नाची उत्तरे शोधण्याकरिता संशोधनामध्ये सक्षमता निर्माण केली आहे.

**संदर्भ सूची :**


1) Angrist J.D. (1990) : LIfetime earning and the Vietnam era draft lottery : Evidence from social security administrative records, American Review of Economics.
2) Angrist J.D. (2004) : Treatment effect heterogenity in theory and practice, The Economic Journal.
3) Angrist J.D. and G.W. Imbens (1995) : Two state least squares estimation of average casual effect in model with variable treatment intensity, Journal of the American statistical association.
4) Angrist J.D. and G.W. Imbens (1996) : Identification of casual effects using instrumental variable, Journal of the American Statistical Association.
5) Card D. (1990) : The impact of the mariel boatlift on the miami labour market, Industrial and Labour relations Review.
6) Card D. (1992) : Do minimum wages reduce employment? : A case study of california 1987 - 1989, Industrial and labour relation review.
7) Card D. (1992) : Using regional variation in wages to measures the effect of the federal minimum wages, Industrial and labour relation review.
8) Card D. (1995) : Earning, schooling and ability revisited,Research in Labour Economics.
9) Card D. (1996) : The effect of unions on the structure of wages : A longitudinal analysis, Econometrica.
10) Card D. (2001) : Immigration inflow, native outflow and local labour market impact of higher immigration, Journal of labour economics.
11) Card D. (2001) : Estimating the return to schooling : Progress on some persistent econometric problems, Econometrica.
12) Card D. (2009) : Immigration and Inequality, American Economic Review.
13) Imbence G.W. (2010) : Better LATE then nothing : Some comment on Deaten, Heekman and Urzua, Journal of Economic Literature.
14) Imbence G.W. and J.D. Angrist (1994) : Identification of estimation of local average treatment effect, Economitrica.
15) Editorial (2021) : Nobel for sense on casuse and effect, The Economic Times, Oct. 12.
16) Editoiral (2021) : Nobel Good Card, The times of India, Oct. 12.
17) Duflo Aster and Banerjee Abhijeet (2021) : 3 Economist & Revolution, The Times of India, Oct. 15.


◆◆◆

# भारतातील दारिद्र्याचा यक्षप्रश्न : स्वरूप, मीमांसा आणि उपाययोजना

**धीरज कदम**
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**१. प्रस्तावना :**

सध्या भारतीय अर्थव्यवस्था आपल्या स्वातंत्र्योत्तर अमृत महोत्सवी वर्षात वाटचाल करत आहे. एखाद्या अर्थव्यवस्थेने विशिष्ट ध्येय आणि उद्दिष्टांच्या अनुषंगाने केलेल्या प्रगतीच्या मूल्यांकनासाठी ७५ वर्षाचा कालखंड निश्चितच पर्याप्त मानता येईल. त्यादृष्टीने, प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील दारिद्र्य निर्मूलन समस्येचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी दोन भागात करण्यात आली आहे. पहिल्या भागात दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करून, विविध अर्थतज्ज्ञ, अभ्यास गट आणि समित्यांद्वारे करण्यात आलेल्या भारतातील दारिद्र्य अनुमानाचा आढावा घेण्यात आला असून त्या आधारे भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाची मीमांसा करण्यात आली आहे. तर दुसऱ्या भागात भारतातील प्रमुख दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांचा चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे.

**२. दारिद्र्याची संकल्पना :**

सामान्यतः गरीबी किंवा दारिद्र्याचा संबंध व्यक्तिंच्या निम्न जीवनस्तराशी लावला जातो. जीवनस्तराला सापेक्ष आणि निरपेक्ष अशा दोन्ही स्वरूपात व्यक्त केल्या जाऊ शकते. सापेक्ष दारिद्र्याला उत्पन्नातील असमानतेच्या आधारे परिभाषित केल्या जाते. या संदर्भात विभिन्न वर्ग किंवा देशांचा निर्वाह स्तर वा प्रति व्यक्ती उत्पन्नांची तुलना करून दारिद्र्य जाणून घेतले जाते. ज्या वर्ग किंवा देशातील लोकांचा सरासरी जीवन स्तर वा प्रति व्यक्ती उत्पन्नाचा स्तर सापेक्षतः निम्न असतो ते उच्च जीवन स्तर वा प्रति व्यक्ती उत्पन्न असणाऱ्या लोकांच्या तुलनेत गरीब मानले जातात. निरपेक्ष दृष्टिकोनातून अशा लोकांना गरीब म्हटल्या जाते की, ज्यांच्या राहणीमानाचा स्तर इतका खाली असतो की, त्यांच्या जीवनाच्या किमान गरजासुद्धा पूर्ण होऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दात निरपेक्ष दृष्टीने दारिद्र्याचा संबंध अशा लोकांशी आहे, जे मानवी जीवनाच्या मूलभूत गरजा जसे – अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य साहाय्यता, शिक्षण इत्यादी पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून पर्याप्त वस्तू व सेवा जुळवण्यात असमर्थ असतात. निरपेक्ष दारिद्र्य किमान जीवनस्तर वा किमान उत्पन्न पातळीशी संबंधीत आहे. ज्याला दारिद्र्य रेषेद्वारे (Poverty line) व्यक्त केल्या जाते. तेंडुलकर समितीने नमुद केल्या प्रमाणे, ''दारिद्र्याची संकल्पना मूलभूत मानवी गरजा पूर्ण करू शकण्याचा असमर्थतेशी संबंधीत आहे. या मूलभूत मानवी गरजा आहेत– पर्याप्त पौष्टिक आहार प्राप्त करणे, परिधान करण्यासाठी उपयुक्त वस्त्र तसेच निवासाकरिता

योग्य स्थान असणे, परिहार्य (avoidable) आजारांपासून रक्षण करण्याची क्षमता, किमान स्तरापर्यंत शिक्षित असणे तसेच सामाजिक पारस्परिक क्रियेसाठी (social interaction) व अधिक क्रियांमध्ये सहभागी होण्यासाठी गतिशीलता असणे''. (Planning Commission, २००९) या कथनावरून हे स्पष्ट होते की, दारिद्र्याची संकल्पना बहुआयामी (Multidimentional) आहे. परंतु या बहुआयामी संकल्पनेला आधार मानून दारिद्र्य रेषेला एका किमान उत्पन्न स्तराच्या स्वरूपात परिभाषित करणे शक्य नाही, म्हणूनच दारिद्र्य रेषेची व्याख्या करताना तिला केवळ एका किमान भौतिक (material) उपभोग स्तराच्या स्वरूपात व्यक्त केल्या जाते, जो किमान जीवन स्तर प्राप्त करण्यासाठी वा मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती वा कुटुंबाला उपलब्ध व्हावयास हवा.

दारिद्र्य रेषेच्या सर्वच व्याख्यांमध्ये असा प्रयत्न केल्या जातो की, ती समाजाच्या सरासरी जीवन स्तराच्या निकट असावी, ज्यामुळे समाजामध्ये विद्यमान असमानतेला ती व्यक्त करते. भारतामध्ये दारिद्र्याची सामान्यतः स्वीकृत व्याख्या प्रमाण (standard) जीवन स्तराऐवजी किमान (minimum) जीवन-स्तरावर भर देते. ही मान्यता या तथ्याकडे निर्देश करते की, येणाऱ्या कितीतरी दशकांपर्यंत मूलभूत गरजांची किमान मात्रा उपलब्ध करून देणे देखील संभव नाही, त्यामुळे विकासाच्या या अवस्थेत उचीत (standard) किंवा चांगल्या जीवन स्तराची अपेक्षा ही केवळ रम्य कल्पना आहे, हा तर्क यामागे असल्याचा दिसून येतो.

**३. द्रारिद्र्याचे अनुमान :**

स्वातंत्र्योत्तर प्रारंभीच्या काळात विविध अर्थतज्ज्ञांनी केलेले भारतातील दारिद्र्याचे अनुमान भारतातील दारिद्र्य अनुमानाचा इतिहास लक्षात घेता, प्रथमतः दादाभाई नौरोजींनी १९०१ मध्ये निर्वाह आहार व्ययावर आधारित देशातील दारिद्र्याचा अंदाज काढला होता. १९३८ मध्ये, काँग्रेसने स्थापन केलेल्या राष्ट्रीय नियोजन समितीने व तदनंतर १९४४ मध्ये बॉम्बे योजनाकर्त्यांनी राहणीमानाच्या आधारावर दारिद्र्य अनुमान व्यक्त केले. स्वातंत्र्यापासूनच देशातील दारिद्र्याला अधोरेखित करून त्याचे समूळ उच्चाटन करणे हा राष्ट्रीय कार्यक्रमाचा भाग राहिलेला आहे.

भारतात स्वातंत्रोत्तर काळात विविध अभ्यासकांनी दारिद्र्यरेषा निश्चित करून दारिद्र्याचे अनुमान करण्याकरिता स्वतःची स्वतंत्र मापदंडे विकसित केली. या सर्वच अध्ययनाचा आधार २२५० उष्मांक (calories) प्राप्त करून देणाऱ्या अन्न-धान्यांचे मूल्य होते.

स्वातंत्र्योत्तर प्रारंभीच्या काळात दारिद्र्य अनुमानकर्त्यांपैकी, बी. एस. मिन्हास हे एकमेव असे अर्थतज्ज्ञ आहेत की, ज्यांनी १९५६-५७ आणि १९६७-६८ या कालावधी दरम्यान ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले असल्याचे म्हटले. याउलट, पी.डी. ओझा आणि प्रणव ब. वर्धन यांनी ग्रामीण दारिद्र्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचे अनुमानीत केले. दांडेकर आणि रथ यांनी १९६०-६१ ते १९६७-६८ या दरम्यान ग्रामीण व शहरी दोन्ही क्षेत्रात दारिद्र्य अनुपात स्थिर असल्याचे अनुमान केले. तथापि, गरीबांच्या निरपेक्ष संख्येत सापेक्षतः ग्रामीण क्षेत्रात अधिक वाढ झाल्याचे स्पष्ट केले. मॉन्टेकसिंह अहलुवालीयांच्या मते, १९५६-५७ ते १९७३-७४ या कालावधींदरम्यान ग्रामीण

दारिद्र्याच्या प्रमाणात कधी वाढीची तर, कधी घटीची प्रवृत्ती दिसून येते. त्यामागील कारणमीमांसा करताना त्यांनी असे नमुद केले की, सामान्यतः ग्रामीण गरीबीचे प्रमाण हे कृषिच्या दृष्टीने चांगल्या वर्षात कमी होते. तर कृषिच्या दृष्टिने वाईट वर्षांमध्ये वाढते.

भारतातील दारिद्र्याच्या संदर्भात विविध अभ्यासकांच्या दारिद्र्य अनुमानाच्या पद्धती व अनुमानामध्ये मतभेद असले तरी, काही बाबींवर सहमती दिसून येते. ते म्हणजे दारिद्र्य रेषेखालील लोकांची निरपेक्ष संख्या वाढली आहे. बहुसंख्य गरीब ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास असून त्यामध्ये प्रामुख्याने सीमांत व लघु शेतकरी आणि भूमिहीन शेतमजुर हे दोन वर्ग मुख्य आहेत. ग्रामीण भारतातील दुर्बल घटकांची मुख्य आर्थिक समस्या खुल्या बेरोजगारीची नसून अल्प उत्पादक रोजगाराची आहे. शहरी क्षेत्रातील दारिद्र्याची समस्या ही ग्रामीण दारिद्र्याच्या उत्प्रवाहाची (Outflow) आहे. अधिकतर शहरी गरीब हे स्वयं-रोजगार प्राप्त असून अर्थव्यवस्थेच्या असंगठीत निर्माणी व सेवा क्षेत्रात कार्यरत आहेत, शिवाय त्याच्याजवळील संसाधनांचा आधार अत्यंत अल्प आहे.

**४. नियोजन आयोगाच्या तज्ज्ञ गटाचे (१९९३) अनुमान :**

भारतात, राष्ट्रीय स्तरावर पहिली अधिकृत ग्रामीण आणि शहरी दारिद्र्यरेषा १९७९ मध्ये वाय. के. अलग समितीने सादर केली आणि प्रथमच अधिकृत दारिद्र्य गणना सुरू झाली. नंतर, भारतातील गरीबांची संख्या आणि प्रमाणाच्या अनुमानासाठी कार्यपद्धती व परिगणनेच्या विविध पैलूंवर विचार करण्याच्या दृष्टीने भारतीय नियोजन आयोगाने सप्टेंबर १९८९ मध्ये प्रा. डी. टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली एक 'तज्ज्ञ गट' (Task Fource on Minimum Needs and Effective Consumption Demand) नियुक्त केला. त्यांनी आपला अहवाल जुलै १९९३ मध्ये सादर केला. लकडावाला समितीने दारिद्र्य रेषेच्या निर्धारणासाठी जे निष्कर्ष सूचविले त्यानुसार दारिद्र्य रेषेच्या उपभोग संरचनेचा आधार प्रति व्यक्ती प्रति दिन २४०० कॅलरी उपभोग होता. आधार वर्षे म्हणून त्यांनी १९७३-७४ या वर्षाची निवड केली. किंमतीतील समायोजनासाठी सममुल्यकाची (deflator) निवड करताना ग्रामीण दारिद्र्य रेषेसाठी कृषि श्रमिकांचा उपभोक्ता निर्देशांकाचा (consumer price index for agricultural labourers) उपयोग व शहरी दारिद्र्य रेषेसाठी औद्योगिक श्रमिकांचा उपभोक्ता किंमत निर्देशांक (consumer price index for industrial workers) आणि गैर-शारीरिक कर्मचाऱ्यांचा उपभोक्ता किंमत निर्देशांक (consumer price index for non-manual employees) यांच्या सामान्य सरासरीचा उपयोग केला. तसेच प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र राज्यविशेष दारिद्र्य रेषेचे अनुमान करण्यासाठी शिफारस केली. योजना आयोगाने ११ मार्च १९९७ ला प्रधानमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली संपन्न बैठकीत लकडावाला समितीने सूचविलेली पद्धती स्वीकारण्यात आली.

लकडावाला समितीने १९७३-७४ ते १९८७-८८ या १४ वर्षाच्या कालावधीसाठी चार बिंदूंवर निर्धारित दारिद्र्य रेषेच्या आधारे गरीबांची संख्या आणि प्रमाणाचे अनुमान केले. -

**तक्ता क्रमांक-१**

**लकडावाला समितीच्या पद्धतीनुसार भारतातील दारिद्र्य**

| वर्ष | गरीबांची संख्या (कोटी मध्ये) | | | दारिद्र्याचे प्रमाण (%) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण |
| 1973-74 | 26.13 | 6.0 | 32.13 | 56.44 | 49.01 | 54.88 |
| 1977-78 | 26.43 | 6.46 | 32.89 | 53.07 | 45.24 | 51.32 |
| 1983 | 25.20 | 7.09 | 32.29 | 45.65 | 40.79 | 44.48 |
| 1987-88 | 23.19 | 7.52 | 30.70 | 39.09 | 38.20 | 38.86 |
| 1993-94 | 24.40 | 7.63 | 32.04 | 37.27 | 32.36 | 35.97 |
| 1999-2000 | 19.32 | 6.70 | 26.02 | 27.09 | 23.62 | 26.10 |
| | | | | MRP वर आधारित आकडे: 1999-2000च्या आकड्यांसोबत तुलनीय | | |
| 2004-05 | 17.03 | 6.32 | 23.85 | 21.8 | 21.7 | 21.8 |
| | | | | URP वर आधारित आकडे: 1993-1994च्या आकड्यांशी तुलनिय | | |
| 2004-05 | 22.09 | 8.08 | 30.17 | 28.3 | 25.7 | 27.5 |

(स्रोत: Planning Commission (2012), "Report of Expert Group to Review the Methodology for Estimatting of Poverty")

तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणे, तज्ज्ञ समितीने सूचविलेल्या पद्धतीनुसार दारिद्र्य अनुमान विचारात घेता, १९७३- ७४ ते १९८७-८८ या १४ वर्षाच्या काळात ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण ५६.४४ वरून ३९.०९ प्रतिशत पर्यंत व शहरी दारिद्र्याचे प्रमाण ४९.०१ वरून ३८.२ प्रतिशत पर्यंत घटले. तर एकूण दारिद्र्य प्रमाण ५४.९ वरून ३८.९ पर्यंत घटल्याचे दिसून येते. म्हणजेच या १४ वर्षाच्या काळात दारिद्र्य अनुपातातील घट लक्षणीय आहे. दारिद्र्य रेषेखालील निरपेक्ष लोकांची संख्या विचारात घेता, १९७३-७४ मधील ३२.१३ कोटी वरून घटून १९८७-८८ मध्ये ३०.७० कोटी झाली. यावरून दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या निरपेक्ष संख्येतील घट नगण्य आहे. मात्र घट फारशी नसली तरी प्रतिशत प्रमाणातील घटीबरोबर दरिद्री लोकांची निरपेक्ष संख्याही घटणे ही नोंद घेण्यासारखी बाब आहे. तज्ज्ञ समितीने सूचवलेल्या पद्धतीनुसार १९९३-९४ मध्ये देशात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ३६ प्रतिशत होते. तर २००४-०५ मध्ये ते २७.५ प्रतिशत पर्यंत घटल्याचे स्पष्ट होते.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने (NSSO) देशातील दारिद्र्य स्थितीच्या आकलनासाठी २००४-०५ मध्ये आपल्या ६१

व्या फेरीच्या पाहणी मध्ये दोन प्रकारच्या प्रश्नावलींचा वापर केला. त्या मध्ये एक ३० दिवसांच्या युनिफॉर्म रिकॉल पिरियड (URP) व दुसरी ३६५ दिवसांच्या संदर्भात मिक्स्ड रिकॉल पिरियड (MRP) वर आधारित उपभोग व्ययाची माहिती होती. URP प्रश्नावलीमध्ये लोकांची त्यांच्या उपभोग व्ययासंदर्भातील ३० दिवसाच्या स्मरण अवधी दरम्यानची माहिती समाविष्ट असते. दुसऱ्या शब्दात ही माहिती मागील फक्त एक महिन्याच्या उपभोग व्ययाच्या स्मरणावर आधारित असते, तर MRP प्रश्नावलीमध्ये मागील ३० दिवसांच्या स्मरण अवधीवर आधारित उपभोग व्ययाच्या माहिती सोबतच, आरोग्य, शिक्षण, कपडे, पादत्राणे व टिकाऊ वस्तु या अनियमितपणे खरेदी केल्या जाणाऱ्या मुख्य पाच बाबींवरील वार्षिक खर्च पण विचारात घेतला जातो. URP प्रश्नावलीतील उपभोग व्ययाच्या आकड्यावरून स्पष्ट होते की, सन १९९९-२००० पासून २००४-२००५ या कालावधी दरम्यान देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या २६.०२ कोटी वरून घटून २३.८५ कोटी झाली. या कालावधी दरम्यान दारिद्र्याचे प्रमाण २६.१ प्रतिशत वरून २१.८ प्रतिशतपर्यंत घटले. ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण २७.१ प्रतिशत वरून २१.८ प्रतिशतपर्यंत तर शहरी दारिद्र्याचे प्रमाण २३.६ प्रतिशत वरून २१.७ प्रतिशत पर्यंत घटल्याचे दिसून येते.

URP उपभोग व्ययावर आधारित NSSO द्वारा प्रकाशित दारिद्र्य अनुमानाचे २००४-०५ चे आकडे १९९३-९४ च्या आकड्यांशी तुलना योग्य आहेत. या आकड्यानुसार दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण १९९३-९४ मध्ये ३६ प्रतिशत होते, ते २००४-०५ मध्ये २७.५ प्रतिशत पर्यंत घटले. याच कालावधी दरम्यान ग्रामीण दारिद्र्य अनुपातातील घट ३७.३ प्रतिशत पासून २८.३ प्रतिशत पर्यंत तर शहरी दारिद्र्य अनुपात ३४.४ प्रतिशत वरून २५.७ प्रतिशत पर्यंत घटला आहे.

NSSO च्या URP आकड्यानुसार भारतातील विविध राज्यांपैकी सर्वाधिक गरीबांची संख्या उत्तर प्रदेशमध्ये (५.९० कोटी) होती, तर सर्वाधिक दारिद्र्याचे प्रमाण असणारे राज्य ओरिसा (४६.६ प्रतिशत) होते.

एकंदरीत, वेगवेगळ्या कार्यपद्धतीचा अवलंब करून परिगणित करण्यात आलेल्या दारिद्र्याच्या अनुमानात थोडीफार तफावत दिसत असली तरी १९७३-७४ पासून २००४-०५ पर्यंत दारिद्र्य अनुपाताची तुलनीय पद्धतीच्या साहाय्याने स्थिती लक्षात घेता, त्यामध्ये घटीची प्रवृत्ती दिसून येते. तथापि, सुधारपूर्व कालखंड आणि सुधारोत्तर कालखंडात दारिद्र्यातील घटीचा दर कसा होता हे पाहणे अधिक उद्बोधक ठरेल. कारण १९९१ पासून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये व्यापक प्रमाणात करण्यात आलेल्या आर्थिक सुधारामागील एक मुख्य उद्देश गतिमान वृद्धीदराच्या माध्यमातून दारिद्र्यात वेगाने घट घडवून आणने हा होता.

**५. सुधारपूर्व आणि सुधारोत्तर कालखंडात भारतातील दारिद्र्याच्या बदलाची तुलनात्मक प्रवृत्ती :**

सुधारपूर्व आणि सुधारणा कालखंडात दारिद्र्याच्या प्रवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करतांना येणारी मुख्य अडचण म्हणजे दारिद्र्याशी संबंधीत समान निकषावर आधारित माहितीचा अभाव ही आहे. लकडावाला समितीने १९७३-७४ ते १९८७-८८ या १४ वर्षांच्या कालावधीसाठी चार

बिंदूवर निर्धारित दारिद्र्यरेषेच्या आधारे गरीबांची संख्या आणि प्रमाणाचे अनुमान केले. यामध्ये उपभोग व्ययासंदर्भात ३० दिवसाच्या 'युनिफॉर्म रिकॉल पिरियड' (URP) वर आधारीत प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. १९९३-९४ वर्षासाठी सुद्धा URP वर आधारित आकडे उपलब्ध आहेत. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या (NSS) ५० व्या फेरीपर्यंत (१९९३-९४) उपभोग व्ययाशी संबंधीत URP प्रश्नावलीवर आधारित माहिती उपलब्ध होती. परंतु NSS च्या ५५ व्या फेरीमध्ये (१९९९-२०००) 'मिक्सड रिकॉल पिरिएड' (MRP) प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. त्यामुळे १९९९-२००० च्या संदर्भ वर्षासाठी अन्नधान्य व अन्नधान्येतर बाबींशी संबंधीत ३० दिवसाच्या स्मरण अवधीवर आधारित प्रश्नावलीला ७ व ३० दिवसाच्या अन्नधान्य व मादक द्रव्याशी संबंधीत प्रश्नावलीमध्ये बदलण्यात आले. तर कपडे, पादत्राणे, शिक्षण, आरोग्यावरील संस्थात्मक खर्च आणि टिकाऊ वस्तूंसाठी ३६५ दिवसांच्या स्मरण अवधीवर आधारित प्रश्न विचारण्यात आले. त्यामुळे MRP प्रश्नावलीवर आधारित दारिद्र्याचे अनुमान पूर्वीच्या URP प्रश्नावलीवर आधारित दारिद्र्य अनुमानाशी तुलनायोग्य नाहीत. सुदैवाने NSS च्या ६१ व्या फेरीमध्ये वर्ष २००४-०५ साठी URP व MRP या दोन्ही प्रश्नावलीवर आधारित दारिद्र्याचे अनुमान उपलब्ध आहेत. त्यामुळे त्याची तुलना १९९३-९४ च्या URP व १९९९-२००० च्या MRP वर आधारित दारिद्र्य अनुमानाशी करता येते. तथापी लकडावाला समिती पद्धतीवर आधारित दारिद्र्य अनुपाताची ही आकडेवारी २००४-०५ या कालावधीपर्यंतच उपलब्ध आहे. तदनंतर नियोजन आयोगाने तेंडुलकर समितीच्या शिफारसी (२००९) स्वीकारल्याने तेंडुलकर पद्धतीवर आधारित दारिद्र्याचे अद्यावत अनुमान १९९३-९४, २००४-०५, २००९-१० व २०११-१२ या कालावधीसाठीच उपलब्ध आहेत, परंतु ते त्यापूर्वीच्या कालावधीशी तुलनायोग्य नाहीत. याशिवाय, भारत सरकारने दारिद्र्याच्या मुद्यावर पुनर्विचार करण्यासाठी सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली मे २०१२ मध्ये एक तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. या समितीने आपला अहवाल जून २०१४ मध्ये शासनाला सादर केला. समितीद्वारा, २०११-१२ साठी निर्धारित दारिद्र्य रेषा ग्रामीण क्षेत्रासाठी प्रति व्यक्ती, प्रति दिन ३२ रु. आणि शहरी क्षेत्रासाठी प्रति व्यक्ती, प्रति दिन ४७ रु. निर्धारित करण्यात आली. आणि २००९-१० आणि २०११-१२ या वर्षासाठी आपले अनुमान सादर केले. तथापि, ते त्यापूर्वीच्या कुठल्याच कालावधीशी तुलनायोग्य नाहीत. त्यामुळे तेंडुलकर पद्धतीवर आधारित दारिद्र्य अनुमान स्वतंत्रपणे विचारात घेणे उपयुक्त ठरेल. तुलनायोग्य उपलब्ध माहितीच्या आधारे आणि धोरणात्मक बदलाच्या अनुषंगाने सुधारोत्तर काळाचे देखील १९९३-९४ ते २००४-०५ आणि २००४-०५ ते २०११-१२ असे दोन स्थूल टप्पे विचारात घेता येतील.

सुधारणापूर्व काळाच्या तुलनेत सुधारोत्तर कालखंडात दारिद्र्याच्या प्रवृत्तीमध्ये घटीचा दर अधिक आहे की कमी हा विवादास्पद मुद्दा आहे. त्यादृष्टीने दारिद्र्य रेषेखालील गरीब वर्गाशी संबंधीत प्रवृत्तीचे विश्लेषण पुढील तक्ता क्र. दोनच्या आधारे करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. २**

**भारतातील ग्रामीण व शहरी क्षेत्रातील दारिद्र्याचे प्रमाण व त्यातील बदलाचा दर**

(३० दिवसांच्या URP प्रश्नावलीवर आधारित पाहणी)

| | दारिद्र्य अनुपात (%) | | | दारिद्र्यात बदल (प्रतिषत बिंदू प्रतिवर्ष) | |
|---|---|---|---|---|---|
| | 1983 | 1993-94 | 2004-05 | 1983-94 | 1993-05 |
| ग्रामीण क्षेत्र | 45.76 | 37.26 | 29.18 | - 0.81 | - 0.73 |
| शहरी क्षेत्र | 42.27 | 32.56 | 26.02 | - 0.92 | - 0.59 |
| एकूण | 44.93 | 36.02 | 28.27 | - 0.85 | - 0.70 |

(स्रोत: Estimated from published data of NSS 43rd, 50th, and 61st round of consumer expenditure surveys)

सुधारपूर्व कालखंडात (१९८३ ते १९९३-९४) भारतीय स्तरावर एकूण (ग्रामीण व शहरी) दारिद्र्याच्या प्रमाणातील घट ८.९ प्रतिशत, तर सुधारोत्तर कालखंडात (१९९३-९४ ते २००४-०५) ती ७.९ प्रतिशत होती. दोन्ही कालखंडातील दारिद्र्य अनुपाताच्या प्रतिशत घटीला त्या कालखंडाच्या एकूण वर्षाने भाग दिल्यास दारिद्र्य अनुपातातील घटीचा वार्षिक प्रतिशत दर प्राप्त होतो. या पद्धतीनुसार १९८३ ते १९९३-९४ या १०.५ वर्षाच्या सुधारपूर्व कालखंडासाठी दारिद्र्य घटीचा प्रतिशत वार्षिक दर ०.८५ होता, तर १९९३-९४ ते २००४-०५ या सुधारोत्तर ११वर्षाच्या कालखंडासाठी तो ०.७० होता, म्हणजेच सुधारपूर्व कालखंडाच्या तुलनेत तो कमी असल्याचे स्पष्ट होते.

भारतीय स्तरावर ग्रामीण व शहरी क्षेत्राशी संबंधीत दारिद्र्य अनुपातातील बदलाच्या प्रवृत्तीचा विचार करता सुधारपूर्व काळाच्या तुलनेत (०.८१) सुधारोत्तर काळात दारिद्र्य घटीचा वार्षिक दर ग्रामीण क्षेत्रात थोडा कमी (०.७३) आहे. तर शहरी क्षेत्रासाठी सुधारणापूर्व काळाच्या तुलनेत (०.९२) सुधारोत्तर काळात खूपच कमी (०.५२) असल्याचा दिसून येतो.

सुधारपूर्व काळाच्या तुलनेत सुधारोत्तर काळात आर्थिक वृद्धीचा दर अधिक असून देखील दारिद्र्य घटीचा दर कमी असणे ही स्थिती सुधारोत्तर काळात (विशेषतः २००४-०५पर्यंत) आर्थिक वृद्धी ही समावेशी नसल्याचे वा गरीबांप्रती संवेदनाहीन असल्याचे दर्शक आहे.

**६. तेंडुलकर समिती पद्धतीनुसार सुधारोत्तर काळातील दारिद्र्य अनुपातातील बदलाची प्रवृत्ती**

दारिद्र्यासंबंधी अधिक विश्वसनीय अनुमान तयार करण्यासाठी योजना आयोगाने प्रा. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली २००८ मध्ये एका तज्ज्ञ समितीची स्थापना केली होती. या समितीने डिसेंबर २००९ ला आपला अहवाला शासनाला सादर केला. तेंडुलकर समितीने दारिद्र्य रेषेच्या निर्धारणात किंमत निर्देशांकाला अधिक वैज्ञानिक व उपयुक्त पद्धतीने उपयोगात आणले; तसेच शिक्षण व आरोग्यावर होणाऱ्या खाजगी खर्चाला समाविष्ट

करून उपभोग व्ययातील वस्तू व सेवांची मात्रा अधिक व्यापक केली (GOI, २००९). नियोजन आयोगाने तेंडुलकर समितीने अंगिकारलेल्या पद्धतीनुसार जानेवारी २०११ मध्ये, १९९३-९४ आणि २००४-०५ या वर्षासाठी, तसेच मार्च २०१२ आणि जुलै २०१३ मध्ये अनुक्रमे २००९-१० आणि २०११-१२ या वर्षासाठी जाहीर केलेल्या दारिद्र्य अनुपाताचे अनुमान पुढील तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता क्र. ३**

**तेंडुलकर पद्धतीनुसार भारतातील दारिद्र्याचे अनुमान व त्यातील बदलाचा दर**

| | दारिद्र्य अनुपात (%) | | | | दारिद्र्यात बदल (प्रतिशत बिंदू प्रतिवर्ष) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1993-94 | 2004-05 | 2009-10 | 2011-12 | 1993-94 ते 2004-05 | 2004-05 ते 2011-12 |
| ग्रामीण क्षेत्र | 50.1 | 41.8 | 33.8 | 25.7 | -0.75 | -2.32 |
| शहरी क्षेत्र | 31.8 | 25.7 | 20.9 | 13.7 | -0.55 | -1.69 |
| एकूण | 45.3 | 37.2 | 29.8 | 21.9 | -0.74 | -2.18 |

(स्रोत: Planning Commission (2012), "Report of Expert Group to Review the Methodology for Estimating of Poverty)

तेंडुलकर पद्धतीनुसार एकंदर भारतीय स्तरावर १९९३-९४ मध्ये दारिद्र्याचे प्रमाण ४५.३% होते, ते २००४-०५ मध्ये ३७.२% तर २०११-१२ मध्ये २१.९% पर्यंत घटल्याचे दिसते. ग्रामीण व शहरी असे विभाजन विचारात घेता, शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रामध्ये दारिद्र्याचे प्रमाण सातत्याने अधिक दिसून येते.

दारिद्र्यातील बदल किंवा दारिद्र्यातील घटीचा वार्षिक दर विचारात घेता सुधारोत्तर कालखंडाचे आपणास १९९३-९४ ते २००४-०५ आणि २००४-०५ ते २०११-१२ असे दोन ठळक भाग करता येईल, कारण १९९३-९४ ते २००४-०५ या कालखंडात दारिद्र्य घटीचा वार्षिक दर एकंदर भारतीय स्तरावर ०.७४ होता, तर ग्रामीण व शहरी क्षेत्रासाठी तो अनुक्रमे ०.७५ आणि ०.५५ होता. म्हणजे दारिद्र्यातील मंद घट हे या कालखंडाचे वैशिष्ट्य मानता येईल. याउलट २००४-०५ ते २०११-१२ या कालखंडादरम्यान दारिद्र्य घटीचा वर्षीक दर एकंदर भारतीय स्तरावर २.१८ तर ग्रामीण व शहरी क्षेत्रासाठी अनुक्रमे २.३२ व १.६९ होता. यावरून सुधारोत्तर पहिल्या कालखंडाच्या तुलनेत सुधारोत्तर दूसऱ्या कालखंडात (२००४-०५ ते २०११-१२) दारिद्र्यातील घटीचा वार्षिक दर लक्षणीय असल्याचा दिसून येतो. दारिद्र्यातील ही लक्षणीय घट स्वागतार्ह असली तरी ती शाश्वत स्वरूपाची वा रोजगार निर्मितीच्या व्यापक पायावर आधारित होती का? हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

विविध अध्ययनावरून भारत सध्या जगातील उच्च असमानता असणाऱ्या देशापैकी एक आहे. एवढेच नव्हे तर भारतातील असमानता ही सातत्याने वाढती प्रवृत्ती दर्शवित आहे. (Oxfam India, २०२१)

भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढत्या आर्थिक वृद्धीदराच्या संदर्भात या वाढत्या असमानतेमुळे वृद्धीच्या लाभ वितरणामध्ये देखील समस्या निर्माण होत आहेत.

थोडक्यात, सुधारपूर्व काळाच्या तुलनेत सुधारोत्तर कालखंडात आर्थिक वृद्धीचा दर अधिक असून देखील राष्ट्रीय तसेच विविध राज्य स्तरावर तुलनात्मकरित्या दारिद्र्य घटीचा दर कमी का होते, या संदर्भात एस. महेंद्र देव (२००७) यांनी दारिद्र्य अनुपातावरील वृद्धी अणि वितरणाच्या परिणामासंदर्भात केलेल्या विघटन विश्लेषणाचे (Decomposition -analysis) निष्कर्ष महत्वाचे आहेत. त्यानुसार अखिल भारतीय स्तरावर सुधारोत्तर काळात (१९९३-९४ ते २००४-०५) दारिद्र्यातील घटीच्या मंद दराला प्रतिकूल वितरण जबाबदार आहे. राज्य स्तरावर देखील १३ राज्यांसंदर्भात ग्रामीण दारिद्र्यातील मंद घटीकरीता विषमता घटकच जबाबदार आहे. याचा अर्थ दारिद्र्य घटीवरील वृद्धीचा प्रभाव प्रतिकूल वितरणामुळे निरस्त झाल्याचे दिसून आले. प्रतिकूल विषमतेचा प्रभाव हा केरळ, गुजरात, हिमाचल प्रदेश, ओरीसा आणि पश्चिम बंगालमध्ये अधिक होता (Dev, २००७). या विश्लेषणाच्या अनुषंगाने सुधारोत्तर दूसऱ्या कालखंडात दारिद्र्य घटीचा लक्षणीय दर विचारात घेता, तो वितरणात्मक सुधाराचा परिणाम असणे अभिप्रेत होते, तथापि वितरणाचा कल मात्र अधिकाधिक प्रतिकूलतेकडे जातांना दिसून येतो. परिणामतः ही दारिद्र्य घट तात्कालिक स्वरूपाची आहे की शाश्वत हे तपासण्यासाठी रोजगारीची स्थिती विचारात घेणे उद्बोधक ठरते.

उत्पादक स्वरूपाची रोजगार वाढ ही दारिद्र्य घटीच्या व्यूहनीतीतील अत्याधिक तर्कपूर्ण बिंदू आहे. तथापि एकंदरीतच भारताच्या आर्थिक नियोजनाच्या वाटचालीत धोरणात्मक स्तरावर आर्थिक वृद्धीला प्राधान्य तर रोजगार वाढीला गौण स्थान दिलेले दिसून येते. अर्थात त्यामागे आर्थिक वृद्धी साध्य झाली की, आपसूकच रोजगारीच्या संधी वाढतील हा (गैर) समज धोरणकर्त्यांमध्ये असलेला दिसून येतो. विशेषतः बाजार व्यवस्थेवर आधारित आर्थिक वृद्धीचा रोजगार विषयक पैलू हा अत्यंत कमकुवत असल्याचे अलिकडील आर्थिक विकासाच्या निष्पत्तीतून स्पष्ट झाले आहे. सुधारोत्तर काळातील रोजगार वाढीचा दर लक्षात घेता, या काळातील आर्थिक वृद्धी ही 'रोजगारविहिन वृद्धी' (Jobless Growth) होती असे म्हणता येईल.
रोजगारीच्या अनुषंगाने वृद्धी प्रक्रियेतील समावेशन तपासण्याचा एक महत्त्वाचा निर्देशक म्हणजे 'आर्थिक वृद्धीची रोजगार लवचिकता होय' (Papola, २०१२). रोजगार लवचिकता, आर्थिक वृद्धीतील १ प्रतिशत बदलाच्या अनुषंगाने रोजगारीत होणाऱ्या प्रतिशत बदलाचे मापन आहे, जे एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वृद्धी प्रक्रियेची रोजगार संधी निर्माण करण्याची क्षमता दर्शविते.

१९८३ ते १९९३-९४ या सुधारपूर्ण कालखंडात रोजगारीची वृद्धी लवचिकता ०.४२ होती. ती सुधारोत्तर कालखंडात (१९९३-९४ ते २०११-१२) केवळ ०.१८ म्हणजे निम्यापेक्षा देखील कमी असल्याचे दिसून येतो. याशिवाय सुधारोत्तर कालखंडात जी काही रोजगार वाढ झाली ती प्रामुख्याने अनौपचारिक क्षेत्रात आणि सीमांत श्रमिकांच्या स्वरूपात झालेली असल्याचे दिसून येते. (कदम, धीरज, २०१९).

त्यामुळे ही सर्व तथ्ये लक्षात घेता,

सुधारोत्तर दुसऱ्या टप्प्यात जी वेगवान दारिद्र्य घट दिसून येते, ती शाश्वत रोजगाराच्या व्यापक पायावर आधारित नसल्याचा निष्कर्ष प्राप्त होतो. विशेष म्हणजे, अलीकडे २०२०-२१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवर जे कोविड-१९ महामारीचे जागतिक संकट ओढवले, आणि त्या अनुषंगाने जो राष्ट्रीय लॉकडाऊन करावा लागला त्यामुळे देशात असंख्य कुटुंबे परत दारिद्र्याच्या खाईत लोटल्या गेली असल्याचे विविध सर्वेक्षणाद्वारे स्पष्ट झाले आहे. कोविड-१९ संकटाने प्रामुख्याने अनौपचारिक कामगारांच्या असुरक्षिततेला अधोरेखित केले आहे. सर्वप्रथम, लॉकडाऊनमुळे अनौपचारिक कामगारांच्या नोकऱ्या जाताच त्यांच्या कमाईत त्वरित घट झाली (अल दाहद व इतर., २०२०). एस्टुपिनान आणि शर्मा (२०२०, pp. १४-१७) यांनी पीरियडिक लेबर फोर्स सर्व्हेच्या डेटावर आधारित असा अंदाज दर्शविला की २०२० मध्ये संपूर्ण लॉकडाऊन कालावधीत अनौपचारिक कर्मचाऱ्यांचे सरासरी वेतन नुकसान २२.६२ टक्के होते, जे औपचारिक कर्मचाऱ्यांसाठी तुलनेने कमी ३.८३ टक्के होते. यासंदर्भात, अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, "Dalberg' आणि "action -id' या तीन वेगवेगळ्या संस्थांनी केलेल्या स्वतंत्र सर्वेक्षणांचे निष्कर्ष महत्वाचे आहेत. या पाहणीनुसार लॉकडाऊनमुळे जवळपास ६६ ते ७५ प्रतिशत श्रमिकांना आपला रोजगार गमवावा लागला होता, त्यापैकी बहुतांश श्रमिक हे अनौपचारिक शहरी क्षेत्रातील होते. अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी (२०२१) द्वारे बेंगळुरूमध्ये केलेल्या केस स्टडीमध्ये असे दिसून आले आहे की मुलाखत घेतलेल्या अनौपचारिक कर्मचाऱ्यापैकी फक्त ६ टक्के कर्मचारी समान किंवा जास्त वेतनासह त्यांच्या पूर्वीच्या नोकरीवर परतले होते आणि १५ टक्के डिसेंबर २०२० पर्यंत कोणत्याही प्रकारच्या कामावर परतले नव्हते. कोरोना महामारीच्या काळात असा अंदाज आहे की यावर्षी सुमारे १५०-१९९ दशलक्ष अतिरिक्त लोक दारिद्र्य रेषेच्या खाली जातील. याचा अर्थ गरिबीत १५-२० टक्क्यांनी वाढ होईल. ज्यामुळे देशातील निम्मी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आली असल्याचे अनुमान आहे.

**७. बहुआयामी दारिद्र्याची संकल्पना** (Multi-dimensional Poverty) -

कॅलरी किंवा उपभोग व्यय मानकावर आधारित दारिद्र्यरेषा निर्धारणासंदर्भात अलिकडे मोठ्या प्रमाणावर विवाद उत्पन्न होत आहे. विशेषतः गरिबांची संख्या कमी होत आहे, हे सिद्ध करण्यासाठी सरकार कशाप्रकारे दारिद्र्यरेषेमध्ये फेरबदल करू शकते या प्रकारची तथ्ये पुढे येत असल्याने अलिकडे विविध अर्थतज्ज्ञ दारिद्र्यरेषेच्या संपूर्ण संकल्पनेचाच त्याग करण्याचे सूचवत आहेत. शिवाय या दारिद्र्यरेषा गरीबीच्या विविध पैलूंना समाविष्ट करून घेऊ शकत नाही. उदा. या दारिद्र्यरेषांद्वारे उत्पन्नाची न्यूनता यासारखी एक मुख्य बाजू पुढे येत असली तरी त्याद्वारे मानवी जीवनातील अभावाचे केवळ एक आंशिक चित्रच समोर येते. कारण शिक्षण, आरोग्य यासारख्या पैलूंशी संबंधित बाबींचा अभाव उत्पन्न अभावाशी निश्चितपणे संबंधित असेलच असे नाही. त्यामुळे दारिद्र्याचा खरा अर्थ समजण्यासाठी या विविध प्रकारच्या अभावांवर लक्ष द्यावे लागले. वास्तवात गरीबी एक अशी स्थिती आहे, ज्यामध्ये समाधानकारक जीवन जगण्याच्या संधीचा अभाव असतो. हीच मानवी दारिद्र्याची संकल्पना मानता येईल. मानवी दारिद्र्य दूर होण्यासाठी लोकांना

समाधानकारक जीवनस्तर प्राप्त होणे गरजेचे आहे. त्यांना निवडीचे स्वातंत्र्य मिळायला हवे. त्यांच्या आत्मसन्मानाचे रक्षण होऊन प्रतिष्ठीत जीवन जगण्याची संधी मिळायला हवी.

संयुक्त राष्ट्रे विकास कार्यक्रमाने (UNDP) त्यांच्या १९९७ च्या 'मानव विकास अहवालात' प्रथमतः जागतीक बँकेच्या उत्पन्न दारिद्र्य मापाला पर्यायी स्वरूपात मानवी दारिद्र्याचे माप विकसित केले. त्यासाठी त्यांनी मानव दारिद्र्य निर्देशांक (HPI) तयार केला. यामध्ये मानवी जीवनाच्या तीन अनिवार्य अंगांमधील अपवंचनावर (Deprivation) लक्ष केंद्रीत केले ते म्हणजे दीर्घ आयुष्याचा अभाव, ज्ञानाचा अभाव आणि चांगल्या जीवन स्तराचा अभाव हे आहेत. Human Development Report (२००९) मध्ये १३५ देशांसाठी मानव दारिद्र्य निर्देशकांचे (HPI) आगणन करण्यात आले होते. त्यानुसार भारतातील मूल्य २८ प्रतिशत होते. जे मानव दारिद्र्याच्या व्यापकतेला व्यक्त करते. सापेक्षतः १३५ देशांमध्ये भारताचे स्थान ८८ व्या क्रमांकावर होते.

**७.१ बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (MPI) -**

मानव विकास अहवाल, (२०१०) मध्ये मानवी दारिद्र्य निर्देशांक (HPI) संकल्पनेचा त्याग करून त्याऐवजी बहुआयामी दारिद्र्य निर्देशकांची (MPI) संकल्पना स्वीकारण्यात आली. MPI ची गणना करण्यासाठी बहुआयामी दारिद्र्याने ग्रस्त लोकांच्या प्रमाणाला प्रत्येक बहुआयामी गरीब कुटुंबांच्या सरासरी अपवंचनाने, जे दारिद्र्याच्या गहनतेला (Intensity of Poverty) ला व्यक्त करते गुणले जाते. MPI मध्ये मानव विकास निर्देशांकाला HDI प्रतिबिंबीत करणारे तीन पैलू घेण्यात आले आहे. आरोग्य, शिक्षण व जीवनस्तर ज्यांना १० निर्देशकांमध्ये विभाजित केल्या गेले. प्रत्येक पैलूला समान भारांक देण्यात आला आहे.

**(१) शिक्षण पैलूचे दोन निर्देशके आहेत -**

(अ) कुटुंबातील एकाही सदस्याने पाच वर्षांपर्यंत शालेय शिक्षण प्राप्त केलेले नाही.

(ब) शालेय वयोगटातील (६ ते १४ वर्षे) किमान एक सदस्य (मुलगा/मुलगी) शाळेत नामांकित (Enrolled) नाही.

**(२) आरोग्य पैलूचे दोन निर्देशके आहेत -**

(अ) कुटुंबातील किमान एक सदस्य कुपोषित आहे.

(ब) एक किंवा एकापेक्षा अधिक बालकांचा मृत्यु झालेला आहे.

**(३) जीवनस्तर पैलूचे सहा निर्देशके आहेत-**

(अ) वीजेचा अभाव

(ब) स्वच्छ पेयजल उपलब्ध नाही

(क) उपयुक्त स्वच्छता सुविधेची व्यवस्था नाही

(ड) घरातील फरसबंदी मातीची (dirt floor) आहे.

(इ) अन्न शिजविण्यासाठी निकृष्ट /अपरिष्कृत (un-improved fuel) इंधनाचा वापर केला जातो.

(फ) कुटुंबाकडे कार किंवा मोटार चालीत वाहन नाही, तसेच पुढीलपैकी जास्तीत जास्त एक परिसंपत्ती आहे. सायकल, मोटरसायकल, रेडिओ, फ्रीज, टेलिफोन किंवा टेलिव्हिजन.

बहुआयामी दारिद्र्याने ग्रस्त लोक शोधण्यासाठी प्रत्येक कुटुंबासाठी वंचन गुण/संख्या (deprivation score) जोडून कौटुंबिक वंचन (household deprivation) 'C' प्राप्त केल्या जातो. गरीब व गरीब नसणारे यांच्यात भेद करण्यासाठी ३३.३ प्रतिशतचा विभाजक (cut off) घेतल्या जातो. जर 'C' हा ३३.३ प्रतिशत वा त्यापेक्षा अधिक

असेल तर ते कुटुंब बहुआयामी गरीब मानल्या जाते. ज्या कुटुंबाचा वंचन अंक (C) २० प्रतिशत ते ३३.३ प्रतिशतच्या दरम्यान असेल ते बहुआयामी गरीब बनण्याची शक्यता असणारे मानले जाते. ज्या कुटुंबांचा वंचन अंक ५० प्रतिशत वा त्यापेक्षा अधिक आहे, ते गंभीर स्वरूपात बहुआयामी गरीब मानले जातात.

यापूर्वी विचारात घेतल्याप्रमाणे MPI चे मूल्य हे दोन सूचकांच्या गुणांकाद्वारे प्राप्त होते.

(अ) शिरगणती प्रमाण (H) हे लोकसंख्येचे असे प्रमाण आहे जे बहुआयामी स्वरूपात गरीब आहेत.

$$H = q/n$$

q = बहुआयामी आधारावर गरीब लोक

n = एकूण लोकसंख्या

(ब) दारिद्र्याची गहनता (A) हे अशा गरिबी निर्देशांकाचे भारांकित प्रमाण आहे ज्यामध्ये गरीब लोकांना वंचनाचा सामना करावा लागतो. केवळ गरीब कुटुंबांसाठी वंचन अंकाचे सामग्रीकरण केल्या जाते व त्याला गरीबाच्या एकूण संख्येने भाग दिल्या जातो.

$$A = \Sigma C / q$$

या सूत्राने (C) गरीबांचा वंचन अंक प्राप्त होतो. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक खालील सूत्राद्वारे काढला जातो.

$$MPI = H$$

HDR (२०१४) नुसार, भारतातील ५५.३ प्रतिशत (म्हणजे ६३.२ कोटी) लोकसंख्या बहुआयामी दारिद्र्याने ग्रस्त आहे, शिवाय भारतात २७.८ प्रतिशत लोकसंख्या गंभीर दारिद्र्यामध्ये जीवन व्यतीत करीत आहे.

अलीकडेच सप्टेंबर, २०२१ मध्ये नीती आयोगाद्वारे India: National Multidimesional Poverty Index Baseline Report प्रकाशित करण्यात आला असून त्याअंतर्गत राष्ट्रीय तसेच वेगवेगळ्या राज्यांसाठी 'बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक' (MPI) परिगणित करण्यात आला आहे. त्याकरिता NFHS-4 ((२०१५-१६) चा आधार घेण्यात आला आहे. त्यानुसार भारतामध्ये एकूण बहुआयामी दारिद्र्य शिरगणती प्रमाण (Headcount Ratio- H) २५.०१% असून दारिद्र्याची गहनता ४७.१३% आहे. तर MPI चे मूल्य (H.) ०.११८ आहे. ग्रामीण क्षेत्राचा विचार करता H = ३२.७५% आणि A = ४७.३८% आहे तर MPI चे मूल्य ०.१५५ आहे. शहरी क्षेत्राकरिता H = ८.८१%, A = ४५.२५% आणि MPI चे मूल्य ०.०४ आहे. वेगवेगळ्या राज्यांचा विचार करता बिहारमध्ये बहुआयामी गरिबांची संख्या सर्वात जास्त (५१%)असून सर्वात कमी केरळ मध्ये (०.७१%) आहे (NITI Aayog, २०२१).

**८.भारतातील दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रमाचा मूल्यांकनात्मक आढावा :**

भारतात दारिद्र्यनिर्मूलनासाठी आखण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा उहापोह करून त्यातील प्रमुख कार्यक्रमांच्या प्रगतीचे मूल्यांकन येथे करावयाचे आहे. हे मूल्यांकन द्वितीय समंकांवर आधारलेले असून त्यासाठी विविध शासकीय अहवाल आणि अभ्यासकांनी केलेल्या अध्ययन व परीक्षणाचा आधार घेण्यात आला आहे.

अलिकडच्या काळात देशामध्ये ग्रामीण विकास व ग्रामीण रोजगार कार्यक्रमांच्या माध्यमातून दारिद्र्यावर प्रत्यक्ष प्रहार करण्याचे धोरण स्वीकारण्यात

आले आहे. वास्तवात पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये प्रथमतः दारिद्र्यनिर्मूलन हे आर्थिक नियोजनाचे एक मुख्य उद्दिष्ट म्हणून स्वीकारण्यात आले होते. तथापि १९७० च्या दशकात ग्रामीण गरीबांसाठी बरेच विशेष कार्यक्रम तयार करण्यात आले. त्यापैकी प्रमुख कार्यक्रम म्हणजे, लघु शेतकरी विकास एजेंसी, सीमांत शेतकरी व भूमीहीन शेतमजूर विकास एजेंसी, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, ग्रामीण रोजगाराचे कार्यक्रम तसेच कामाच्या मोबदल्यात धान्य कार्यक्रम इ. होते. अर्थात यापैकी कुठलाही कार्यक्रम संपूर्ण देशपातळीवर व्यापक स्तरावर कार्यरत नव्हता. शिवाय या कार्यक्रमांमध्ये दीर्घ कालावधीपर्यंत रोजगार उपलब्ध करून देण्याचे सामर्थ्य नव्हते. कारण ते दीर्घकालीन न्यूहनीतिचा भाग नव्हते. परिणामतः वास्तवात हे कार्यक्रम आर्थिक सहाय्यता वितरीत करण्याचे माध्यम बनून राहिले होते. त्यामुळे ग्रामीण दारिद्र्यावर प्रत्यक्ष प्रहार करणाऱ्या देशव्यापी कार्यक्रमांची आवश्यकता होती. या उद्देशाने 'समन्वित ग्रामीण विकास कार्यक्रम' (IRDP), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP), तसेच ग्रामीण भूमीहीन शेतमजूर रोजगार हमी कार्यक्रम (RLEGP) सुरू करण्यात आले. १९८९ मध्ये सरकारने आणखी एक व्यापक रोजगार कार्यक्रम 'जवाहर रोजगार योजना' नावाने सुरू केला.

समन्वित ग्रामीण विकास कार्यक्रमाला प्रथमतः १९७८-७९ मध्ये देशाच्या २३०० विकास विभागांमध्ये लागू केल्या गेले. सहाव्या योजनेत या कार्यक्रमाचा संपूर्ण देशात प्रचार करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश लघु व सीमांत शेतकऱ्यांना, भूमिहीन शेतमजुरांना तसेच ग्रामीण कारागिरांना ज्यांच्याकडे उत्पादक परिसंपत्तीचा व विशेष कौशल्याचा अभाव आहे; साहाय्यता प्रदान करणे हा होता. या कार्यक्रमांतर्गत लोकांना पुरविण्यात येणाऱ्या परिसंपत्तीमध्ये सिंचनाची साधने, बैल तसेच शेती उपयोगी उपकरणे बियाणे, खते, पशु तसेच कुटीर उद्द्योगांमध्ये हस्तशिल्पाची अवजारे व प्रशिक्षण समाविष्ट होते. यादृष्टीने समान्वित विकास कार्यक्रम हा एक स्वयंरोजगार कार्यक्रम होता ज्याद्वारे गरीबांना उत्पादक संपत्ती उपलब्ध करून देऊन त्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर येण्यास मदत मिळेल. योजना आयोगाचे कार्यक्रम मूल्यांकन संगठन, रिझर्व बँक, नाबार्ड इ. संस्थांनी या कार्यक्रमाच्या निष्पत्तीचे मूल्यांकन केले आहे. त्याच्या अध्ययनावरून असे दिसून येते की, या कार्यक्रमात समाविष्ट ५५ ते ९० प्रतिशत लोकांना अतिरिक्त उत्पन्न प्राप्त झाले होते. तथापि, लाभधारकांपैकी ४० प्रतिशत पेक्षा अधिक लोक दारिद्र्य रेषेच्या वर येऊ शकले नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की, दारिद्र्यनिर्मूलनाच्या दृष्टिने या कार्यक्रमाचे यश सीमित होते व त्यात अधिक सुधारणांची गरज होती.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम ऑक्टोबर, १९८० मध्ये सुरू करण्यात आला होता. याचा उद्देशसुद्धा अशा लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे होता, जे पूर्णतः मजुरीवर अवलंबून आहेत. आणि ज्यांच्याकडे शेतीच्या कमी उत्पादनाच्या काळात उत्पन्नाचे कोणतेही दुसरे साधन उपलब्ध नाही. याशिवाय ग्रामीण आधार संरचना मजबूत करून सामुदायिक परिसंपत्तीची निर्मिती करणे हा हेतूही होता. या कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्याच्या विहीरी, सामुदायिक सिंचन विहीरी, ग्राम तलाव, लघु सिंचन योजना, ग्रामीण रस्ते, शाळा, बालवाडी,

वन व पंचायत भवन निर्माण इ. कार्याचा समावेश होता. या कार्यक्रमांतर्गत लाभ प्राप्त करणाऱ्यांच्या संख्येबाबत माहिती उपलब्ध आहे. तथापि दारिद्र्यनिर्मूलनाच्या दृष्टीने या कार्यक्रमाने काय यश प्राप्त केले हे सांगणे अवघड आहे.

जवाहर रोजगार योजना १९८९-९० मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेत राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम व भूमिहीन शेतमजुर रोजगार हमी कार्यक्रम यांचा विलय करण्यात आला. ज्याद्वारे ग्रामीण बेरोजगार व अल्प रोजगार प्राप्त व्यक्तींना अशा निर्माण कार्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देणे ज्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात उत्पादक परिसंपत्तीची निर्मिती होऊ शकेल. दारिद्र्यनिर्मूलनाच्या दृष्टीने जवाहर रोजगार योजनेच्या देखील त्याच उणीवा होत्या, ज्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमाच्या होत्या. एप्रिल १९९९ मध्ये या याजनेचे पुनर्गठण करून त्याचे नामांतरण जवाहर ग्राम समृद्धी योजना असे करण्यात आले. सोबतच 'समान्वित ग्राम विकास कार्यक्रम (IRDP) व इतर कार्यक्रमांना एकत्रित करून सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू करण्यात आली, याचा उद्देशसुद्धा ग्रामीण गरीब वर्गांना साहाय्यता प्रदान करणे हाच होता. ग्रामीण गरीब वर्गांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी फेब्रुवारी २००६ मध्ये सर्वात व्यापक व महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू करण्यात आला, ज्याला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) नाव देण्यात आले. ग्रामीण क्षेत्रामध्ये या योजनेत समाविष्ट प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला एका वित्तीय वर्षात किमान १०० दिवस रोजगाराची हमी देण्यात आली आहे. पूर्वीच्या रोजगार कार्यक्रमांपेक्षा ही योजना कशी भिन्न आहे हे स्पष्ट करताना जीन ड्रेझे हे देखील असे नमुद करतात की, MGNREG- मुळे ग्रामीण क्षेत्रातील सामान्य नागरीकाला रोजगारीचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर प्रशासनाला उत्तरदायी बनवण्यात आले आहे. कारण रोजगार उपलब्ध करून दिल्या जात नसेल तर बेरोजगारी भत्ता द्यावा लागेल आणि स्थानीय अधिकाऱ्यांना त्याचे उत्तर द्यावे लागेल. तथापि सैद्धांतिक आणि क्रियात्मक अशा दोन्ही स्तरावर रोजगार हमी कायद्यावर टीकाकारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. रोजगार हमी कायद्यात दीर्घकालीन दृष्टीकोनाचा अभाव असल्याचा आक्षेप घेण्यात येतो. या संदर्भात इंदिरा हिरवे (२००४) यांनी उल्लेख केल्याप्रमाणे, ''हा कायदा दीर्घकालीन परिणामांचा उल्लेख करत नाही. तसेच हेही सांगत नाही की, कशाप्रकारे निर्मित परिसंपत्तीला मुख्य प्रवाहातील रोजगाराच्या विस्तारासाठी निर्देशित केल्या जाईल. शेवटी या योजनेची दीर्घकाळात गरज पडू नये यातच तिचे यश अंतर्भूत आहे. त्यामुळे ही बाब स्वीकारावी लागेल की, या कायद्याच्या परिणामास्तव अकुशल श्रमिकांची एक कायमस्वरूपी सेना तयार होऊ शकते जी राष्ट्रीय खजिन्यावर अवलंबून असेल...''

क्रियात्मक स्तरावर या योजनेची निष्पत्ती निराशाजनक असल्याचे विविध सर्वेक्षणातून समोर आले. व्यावसायिक कर्मचाऱ्यांचा अभाव, योग्य प्रकल्पाच्या आयोजनाचा अभाव, पारदर्शकता व सामाजिक अंकेक्षणाचा अभाव इ. दोषांमुळे या योजनेची निष्पत्ती वास्तवात निराशाजनक असल्याचे दिसून येते.

दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रमांच्या विश्लेषणा वरून स्पष्ट होते की, नियोजनकर्त्यांनी या कार्यक्रमाची

आखणी करतांना हे गृहीत धरले की, सर्व गरीब सारख्याच अवस्थेत आहेत. इंदिरा हिरवे (१९८५) यांच्या मते, ''गरीबांना दोन वर्गात विभाजित करणे गरजेचे होते. एका वर्गात असे गरीब असतील ज्यांच्याकडे कुठले तरी कौशल्य आहे (आणि त्यामुळे ते स्वयंरोजगार कार्यक्रमांसाठी उपयुक्त आहेत) तर दुसऱ्या वर्गात असे गरीब असतील ज्यांच्याकडे कोणतेही कौशल्य किंवा प्रशिक्षण नाही. (आणि त्यामुळे ते मजुरीवरच रोजगार कार्यक्रमांमध्ये कार्य करू शकतील). यापैकी प्रत्येक वर्गासाठी वेगवेगळे धोरण आखण्याची गरज आहे. या दृष्टीने स्वयंरोजगार व मजुरीवर रोजगार या कार्यक्रमांमध्ये योग्य समन्वय प्रस्थापित करणे व त्याद्वारे अशाप्रकारची उत्पादक परिसंपत्ती कायम करणे जी मुख्य प्रवाहातील स्वयंपोषित रोजगाराचा मार्ग प्रशस्त करेल, तर दुसऱ्या बाजुला गुणवत्तापूर्ण आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण सुविधांच्या सार्वत्रिकीकरणातून मानवी शक्तांचा विकास हीच दारिद्र्यनिर्मूलन व समावेशी विकासाची योग्य व्यूहनीति ठरू शकेल.

अकराव्या आणि बाराव्या पंचवार्षिक योजनांमध्ये गतिमान, शाश्वत आणि समावेशी वृद्धीच्या माध्यमातून दारिद्र्यावर प्रहार करण्याची व्यूहनीति स्वीकारण्यात आली. त्या दृष्टीने दारिद्र्यनिर्मूलन आणि समावेशी विकासासाठी वर्तमान काळात चालू असणारे मुख्य कार्यक्रम म्हणजे – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, सर्व शिक्षा अभियान, माध्यान्ह भोजन योजना, एकीकृत बाल-विकास योजना, राष्ट्रीय स्वास्थ मिशन व इंदिरा आवास योजना इ. आहेत.

सी.टी.कुरीयन (१९८६), यांनी भारतातील दारिद्र्यनिर्मूलन व्यूहनीतिवर टीका करतांना अत्यंत गाभाभूत टिप्पणी केली आहे. त्यांच्या मते, ''विद्यमान सामाजिक व आर्थिक संरचनेअंतर्गत कितीही राजकीय आणि प्रशासकीय प्रामाणिकतेने प्रयत्न केले तरी दारिद्र्यनिर्मूलनात यश मिळणार नाही. कारण विद्यमान संरचनात्मक व्यवस्थेमध्ये साधनांवर खाजगी मालकी आहे, त्याचे वितरण अत्यंत विषम आहे तसेच त्यांचा उपयोग अधिकाधिक साधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी केल्या जात आहे. अशा प्रकारच्या संरचनेमध्ये वृद्धी व वितरण क्रियांचे निर्धारण साधने व शक्तींच्या वितरणानेच होईल. बरेचदा संरचनात्मक घटकांचा प्रभाव इतका सखोल आणि सशक्त असेल की, अत्यंत सावधगिरीने तयार करण्यात आलेली व्यूहनीति व धोरणेसुद्धा न केवळ अपयशी ठरतील तर त्याचा प्रतिकूल प्रभाव सुद्धा पडेल. कुरीयन यांनी दिलेल्या तर्कानुसार, जोपर्यंत अर्थव्यवस्थेत मूलभूत संरचनात्मक परिवर्तन घडवून आणल्या जाणार नाही, तोपर्यंत दारिद्र्यनिर्मूलन कार्यक्रमांचे लाभ गरीबांपर्यंत पोहचणार नाहीत. त्यामुळे संरचनात्मक मूलभूत परिर्वतन वा उत्पादन संबंधातील बदलाशिवाय भारतासारख्या देशात गरीबांसाठी अधिक आशा करणे व्यर्थ आहे.

**९. दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना:**

भारतातील दारिद्र्याचे स्वरूप लक्षात घेता, एकूण गरीबांपैकी ८०% गरीब हे ग्रामीण भागात आहेत. त्यांची उपजीविका प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीच्या कामगिरीवर अवलंबून असते. पण मुळातच शेतीचा वृद्धिदर अतिशय मंद आहे. शिवाय, स्थानिक पातळीवर उपजीविकेच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाकरिता आपल्याला द्विपक्षीय धोरणाची गरज आहे.

एकाबाजूला शेतीचे आधुनिकीकरण करून

कृषी विकासाला गती प्रदान करावी लागेल, आणि दुसऱ्या बाजूला शेती क्षेत्रातून बाहेर पडू इच्छिणाऱ्यांसाठी उद्योग आणि सेवांमध्ये रोजगारीच्या पर्याप्त संधी निर्माण कराव्या लागतील. त्यासाठी उत्पादन आणि सेवा क्षेत्रांमधील वृद्धी रोजगार–केंद्रित असणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने भारतातील यशस्वी क्षेत्रे रोजगार सघन नाहीत. जसे, वेगाने वाढणारे उत्पादन क्षेत्र - ऑटो, ऑटो पार्ट्स, दुचाकी, अभियांत्रिकी वस्तू, रसायने आणि पेट्रोलियम शुद्धीकरण क्षेत्रे गुंतवणुकीच्या प्रति मात्रा कमी–कुशल कामगारांचा वापर करतात. सॉफ्टवेअर, फार्मास्युटिकल्स, दूरसंचार आणि वित्तीय सेवा यांसारखी इतर जलद वाढणारी क्षेत्रे अधिकतर कुशल कामगार वापरतात. कपडे, कापड, पादत्राणे, अन्न प्रक्रिया आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू यासारख्या क्षेत्रांमध्ये कमी आणि अर्ध–कुशल कामगार काम करतात ज्यामध्ये चीनने उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

मेक इन इंडियाच्या यशासाठी सर्व चांगल्या गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. याअंतर्गत - पायाभूत सुविधा (उदा. वीज, रस्ते आणि बंदरे), व्यापार सुलभतेसह व्यवसाय सुलभता सध्या करणे (Ease of Doing Business), एमएसएमई क्षेत्रासाठी क्रेडिट ऍक्सेस, कौशल्य विकास, कर निश्चितता. यावर भर देण्याची गरज आहे.

सामाजिक सुरक्षितता प्रदान करणारे कार्यक्रम अधिक प्रभावी बनवणे याअंतर्गत पोषण पैलूच्या अनुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ च्या अंलबजावणीतील दोष दूर करणे, त्यासाठी विविध व्यवहारांची आधार (-DH-R) प्रणालीवर आधारित पडताळणी, अनुदानित तृणधान्ये आणि रोख हस्तांतरण यांच्यातील निवडीचे स्वातंत्र्य, आहारात उत्तम संतुलन सध्या करणे इ. गरज आहे. मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रमासह अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुधारण्यासाठी राज्यविशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आहेत. २५% शाळांमध्ये किचन शेड नाहीत आणि उघड्यावर अन्न तयार करतात. हे चिंतेचे एक प्रमुख कारण आहे कारण याचा विद्यार्थ्यांच्या खाण्याच्या सुरक्षिततेवर परिणाम होतो.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREG) अंतर्गत उणीवा दूर करणे गरजेचे आहे. कामगारांना अकुशल रोजगार आणि कौशल्य निर्मिती यापैकी एक निवडण्याची परवानगी द्यावी; ज्यामुळे त्यांना कार्यक्रमातून बाहेर पडता येईल. त्याद्वारे टिकाऊ संपत्ती निर्माण व्हावी. पीक हंगामात शेतमजुरांची कमतरता भासते त्यामुळे त्या काळात मनरेगाच्या सुट्टीचा विचार करता येऊ शकतो.

सर्वांसाठी घरे (ग्रामीण) या योजनेची प्रगती एकंदरीत चांगली आहे. परंतु ती अनेक आयामांमध्ये सुधारली जाऊ शकते. लाभार्थ्यांची निवड करताना एक मोठे आव्हान आहे. त्याकरिता योग्य निकष व व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. ग्रामीण भागात '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी राज्यांना मोठ्या संसाधनांसह पुढे यावे लागेल.

रोख हस्तांतरणाच्या दृष्टिकोनातून जन धन योजना, आधार (--DH-R), मोबाइल (J-M²) ही त्रिसूत्री असुरक्षित घटकांपर्यंत सरकारची पोहोच वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

याशिवाय, प्रत्येक गावातील पाच गरीब कुटुंबांना लक्ष्य करून त्यांच्या निवडीसाठी सामाजिक–

आर्थिक जात जनगणना (SECC) आधारित BPL यादी वापरली जाऊ शकते. सर्व शासकीय कार्यक्रमांचे लाभ ग्रामपंचायतींपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे. त्यांना केवळ पुर्नहस्तांतरण योजनांचे लाभार्थी न बनवता, योग्य पोषण, शिक्षण आणि कौशल्य विकासनाच्या माध्यमातून ते दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदण्यास सक्षम बनतील याची खात्री करणे. असेच प्रयत्न शहरी भागात - एका नगरपालिकेत १०० कुटुंबे लक्षित करून करत येतील.

**१०.सारांश :**

एकंदरीत, स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारपूर्व आणि सुधारोत्तर काळातील दारिद्र्याची प्रवृत्ती विचारात घेता, सुधारोत्तर दुसऱ्या कालखंडात उत्पन्न दारिद्र्य घटीचा दर लक्षणीयरीत्या वाढलेला दिसतो. तथापि, ती दारिद्र्य घट रोजगार वाढीच्या व्यापक पायावर आधारित दिसत नाही. अलीकडे 'समावेशी विकास' किंवा 'सबका साथ, सबका विकास' अजेंडा पुढे करण्यात आला असला तरी समष्टी स्तरावर विकासाची प्रक्रिया मात्र रोजगाराभिमुख न ठेवता वृद्धीकेंद्रीतच ठेवण्याचा अट्टाहास दिसतो. वृद्धीकेंद्रित विकास प्रक्रियेमध्ये सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांमधील व्यावहारिक पातळीवरील प्राधान्याच्या द्वंद्वात आर्थिक वृद्धीला अधिक प्राधान्य दिले जाते. वितरणातील विषमतेकडे सोईस्करपणे केलेले दुर्लक्ष आणि रोजगार वाढीला दिलेले दुय्यम स्थान, हे दारिद्र्य घटीसाठी आखण्यात आलेल्या कार्यक्रमाशी विसंगत ठरतात. त्यामुळे शाश्वत दारिद्र्य घटीसाठी दारिद्र्यावर प्रत्यक्ष प्रहार करण्यासाठी आखलेले कार्यक्रम आणि एकंदर समष्टिस्तरीय धोरण यामध्ये सुसंगती निर्मण करण्याची गरज आहे.

**संदर्भ :**


1. l Dahdah, M., Ferry, M., Guµrin, I., Venkatasubramanian, G. (2020), The Covid-19 crisis in India: - nascent humanitarian tragedy.
2. Azim Premji University (2021), Impact of COVID-19 on livelihoods of informal sector workers and vulnerable groups in Bengaluru: - view from the ground.
3. Datta Sundharam (2014), Indian Economy, S. Chand Pub., P. 393.
4. Dev, Mahendra S. (2011), Inclusive Growth in Indian. Oxford India Paperback, New Delhi.
5. Dev, Mahendra. S. Ravi C. (2007), "Poverty and Inequality: -ll India and State, 1983-2005', Economic and Political Weekly, 10 Feb, 2007.
6. Estupinan, X., Sharma, M. (2020), Job and Wage Losses in Informal Sector due to the COVID-19 Lockdown Measures in India.
7. कदम, धीरज (२०१९). भारताच्या विकास प्रक्रियेतील समावेशनाचे वास्तव, अर्थसंवाद, एप्रिल- जून, २०१९, ISSN 0973-8452.
8. IHD (2010), Food Security -tlas of Rural Maharashtra, Insitute for Human Development, New Delhi.
9. Indira Hirway (1985), "Garibi Hatao: Can IRDP Do it? "Economic and Political Weekly, March 20, p. 562.
10. Indira Hirway (2004), Providing Employment Guarantee in India: some critical issues, "Economic and Political

Weekly, Nov. 27, p.5120.
11. Kurien, C.T. (1986), "Reconciling Growth and Social Justice: Strategies Versus Structure', in M. L. Dantwala, Ranjit Gupta and Keith, -sian Seminar on Rural Development - The Indian Experience; New Delhi, p.382.
12. NITI-Ayog (2021), National Multidimensional Poverty Index Baseline Report, Based on NFHS-4 (2015-16), Govt of India.
13. Oxfam India, (2021), Inequality Report 2021: India's Unequal Healthcare Story.
14. Pangariya, -. and More, V. (2013), Poverty by Social, Religious and Economic Groups in India and Its Largest States 1993-94 to 2011-12, Working Paper No.13-2, New York SIP- and ISERP, PP 6.
15. Papola, T.S., and Sahu, P.P. (2012), "Growth and Structure of Employment in India: Long Turm and Post-Reform Performance and the Emerging Challenge', Institute for Studies on Industrial Development, New Delhi.
16. Planning Commission (2009), Report of the expert group to review the methodology for Estimation of poverty, Govt. of India.
17. Planning Commission (2012), "Report of Expert Group to Review the Methodology for Estimating of Poverty', Government of India.
18. UNDP (2009). Human Development Report 2009: Overcoming barriers: Human mobility and development. New York.
19. UNDP (2010), Human Development Report 2010: The Real Wealth of Nations - Pathways to Human Development. New York.
20. UNDP (2014). Human Development Report 2014: Sustaining Human Progress - Reducing Vulnerabilities and Building Resilience. New York.

◆◆◆

# भारतीय शेतीचे बदलते स्वरूप
## (१९४७ ते २०२१)

**करमसिंग राजपूत**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वणी, जि. यवतमाळ

**प्रस्तावना :**

शेतीचा इतिहास फार जुना असून मनुष्य रानटी अवस्थेत असताना जंगलातील निरनिराळ्या प्राण्यांची शिकार करून त्यावर आपली उपजीविका चालवीत असे. शिकारी अवस्थेत तो टोळी करून राहायचा व सतत एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करायचा. मात्र मनुष्य जेव्हा एकाच ठिकाणी वसाहत करून राहू लागला तेव्हापासून तो शेती करू लागला. शेतीतून अन्नधान्य निर्माण होऊ शकत असल्याने ज्या-ज्या ठिकाणी अन्नधान्याची निर्मिती होऊ शकते अशा ठिकाणी मानवी वसाहती निर्माण होऊ लागल्या व त्यातूनच कृषी संस्कृतीचा जन्म झाला.

जगातील प्रमुख व्यवसायांपैकी कृषी व्यवसाय हा सर्वात जुना व्यवसाय आहे. अन्न, वस्त्र या मानवाच्या प्राथमिक गरजा शेतीच्या आधारेच भागविल्या जाऊ शकतात हे मानवाच्या लक्षात आल्यामुळे तो शेतीकडे विशेष लक्ष देऊ लागला. आधुनिक युगात औद्योगिकीकरणाचा व सेवा क्षेत्राचा विकास जगभर झाला असला तरी आजही कृषी व्यवसाय हा जगातील एक प्रमुख व्यवसाय म्हणून गणला जातो. आजही जगातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे दोन तृतीयांश (२/३) लोकसंख्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कृषीवर अवलंबून आहे. जगातील सर्वच लोकांची अन्नाची गरज कृषी व्यवसायातूनच भागविली जात असल्यामुळे शेतीचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. आजही भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू भारतातील कृषी क्षेत्राबाबत म्हणाले होते की,कृषी विकासाशिवाय औद्योगिक विकास होऊ शकत नाही. कृषी आणि उद्योग हे दोन्ही क्षेत्र एकमेकांपासून वेगळे केले जाऊ शकत नाही. कारण एका क्षेत्राच्या अभावी दुसऱ्या क्षेत्राची प्रगती होणार नाही. भारतीय जनता या सत्याला चांगले जाणते; म्हणूनच आर्थिक नियोजनाच्या प्रक्रियेत या दोन्ही क्षेत्रांना योग्य स्थान दिले गेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील सुमारे सात दशकांमध्ये आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्व कमी झालेले नाही. आजही उपजीविकेसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे देशातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६०% लोकसंख्या कृषी क्षेत्रावरच अवलंबून असल्याचे

दिसून येते. दुसरे म्हणजे औद्योगिक क्षेत्रातील कापड, साखर, चहा, कॉफी, खाद्यतेल, टायर, तंबाखू, विविध अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादी उद्योग कच्च्या मालासाठी कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहेत. याचा अर्थ कृषी क्षेत्राच्या विकासावरच औद्योगिक क्षेत्रातील वरील निरनिराळ्या उद्योगांचा विकास अवलंबून आहे. शिवाय कृषी आदाने (रासायनिक खते, कीटकनाशके, बी- बियाणे, तणनाशके, तुषार व ठिबक सिंचन संच, ट्रॅक्टर, कापणी यंत्र, मळणी यंत्र, पेरणी यंत्र, कीटकनाशक फवारणी यंत्र इत्यादी) निर्माण करणाऱ्या उद्योगांचा विकास सुद्धा कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहे. शेतकऱ्यांना अधिक उत्पादन होऊन त्यांचे उत्पन्न वाढल्यास त्यांची क्रयशक्ती वाढून अनेक औद्योगिक वस्तूंची मागणी वाढते. थोडक्यात भारतात कृषी क्षेत्राच्या विकासावरच औद्योगिक क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता जगात भारताचा सातवा क्रमांक लागतो. भारताचे एकूण क्षेत्रफळ ३२,८७,५९० चौ. कि. मी. असून २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १२१,०१,९३,४२२ एवढी होती. सध्या (३ डिसेंबर २०२१रोजी) ती १३९,९२,३५,४६४ एवढी असून लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. २०२० च्या जनगणनेनुसार चीनची एकूण लोकसंख्या १४०.२१ कोटी एवढी असून लोकसंख्येच्या बाबतीत जगात चीनचा पहिला क्रमांक लागतो. जागतिक लोकसंख्येच्या १८.४७% लोकसंख्या चीनची आहे तर जागतिक लोकसंख्येच्या सुमारे १७.७०% लोकसंख्या भारतात राहते. क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार करता जगात प्रथम क्रमांक रशिया (१,७०,७५,२०० चौ.कि.मी.), द्वितीय क्रमांक कॅनडा (९९,८४,६७०चौ.कि. मी.), तृतीय क्रमांक अमेरिका (९८,२६,६३८ चौ.कि.मी.), चौथा क्रमांक चीन (९५,९६,९६० चौ.कि.मी.), पाचवा क्रमांक ब्राझील (८५,११,९६५ चौ.कि.मी.) व सहावा क्रमांक ऑस्ट्रेलियाचा (७६,८६,८५० चौ.कि.मी.) लागतो. तर वर स्पष्ट केल्याप्रमाणे क्षेत्रफळाच्या बाबतीत जगात भारताचा सातवा क्रमांक लागतो. वरील सहा देशांमध्ये भारतापेक्षा एकूण क्षेत्रफळ जास्त दिसत असले तरी शेती योग्य जमिनीचे प्रमाण मात्र भारतात सर्वाधिक असल्याचे दिसून येते. शेतीयोग्य क्षेत्राच्या बाबतीत सुद्धा जगात अमेरिकेनंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील या सात देशांतील शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण अनुक्रमे रशिया- ११,९२,३०० चौ.कि.मी.(७.२८%), कॅनडा- ४,७४,६८१ चौ.कि.मी. (५.२२%), अमेरिका- १६,६९,३०२ चौ. कि.मी. (१८.२२%), चीन- १५,०४,३५० चौ.कि.मी. (१६.१३%), ब्राझील- ६,६१,२९९ चौ.कि.मी. (७.८२%), ऑस्ट्रेलिया- ४,७१,५५० चौ.कि.मी.(६.१९%) व भारत- १५,३५,०६३ चौ. कि.मी. (५१.६३%) असे आढळून येते.थोडक्यात एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण भारतात सर्वाधिक असल्यामुळे भारताची कृषिप्रधान देश म्हणून संपूर्ण जगात ओळख आहे.

**भारताच्या कृषी क्षेत्रातील बदलांचे टप्पे :**

स्वातंत्र्यानंतर भारताच्या कृषी क्षेत्रात प्रामुख्याने जे बदल झाले त्यांचे ढोबळमानाने खालील तीन टप्प्यांत वर्गीकरण करता येईल.

**१. स्वातंत्र्योत्तर हरितक्रांती पूर्वीचा काळ**

**(१९४७ ते १९६६):**

भारताला सन १९४७ मध्ये मोठ्या कष्टाने व दीर्घकालीन संघर्षानंतर ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे स्वातंत्र्य अखंड भारताला न मिळता भारत-पाकिस्तान अशा दोन देशांच्या स्वरूपात मिळाले. स्वातंत्र्याबरोबरच फाळणी होऊन भारतातून पाकिस्तान हा नवा देश निर्माण झाला व पाकिस्तानच्या वाट्याला मोठ्या प्रमाणावर सुपीक व बागायती जमीन गेली व भारताच्या वाट्याला मात्र सुपीक सिंचित भूमीचे प्रमाण कमी आले. म्हणजेच सिंचनाच्या समस्येसह भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र भारताच्या वाट्याला बागायती जमीन कमी व लोकसंख्या मात्र जास्त आल्यामुळे देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन १९५०-५१ पासून भारतात पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली. नियोजनाच्या मार्गाने आर्थिक विकास करताना कृषी क्षेत्राला अधिक महत्व देणे आवश्यक होते. एक तर वाढत्या लोकसंख्येला पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे, तसेच कृषी-आधारित वाढत्या उद्योगधंद्यांना पुरेसा कच्चामाल पुरविणे आवश्यक असल्याने शेती विकासाकडे लक्ष देणे काळाची गरज होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी संस्थात्मक सुधारणा व तांत्रिक सुधारणा असा दुहेरी कार्यक्रम सरकारतर्फे राबविण्यात आला. संस्थात्मक सुधारणांच्या अंतर्गत जमीनदार, जहागीरदार व इनामदार इत्यादी मध्यस्थ वर्गाचे उच्चाटन करून कुळांना संरक्षण देणे, त्यांना जमिनीची मालकी व ताबा मिळवून देणे, जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालणे, शेतीच्या लहान - लहान तुकड्यांचे एकत्रीकरण (चकबंदी) करणे इत्यादी बाबत कायदे करण्यात आले. त्याचा परिणाम काही प्रमाणात कृषी उत्पादन वाढण्यावर झाला. सन १९५१-६१ या पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतात सुमारे ३० लक्ष कुळांना जवळ जवळ २८ लक्ष हेक्टर जमिनीची मालकी मिळाली. 'कसेल त्याची जमीन' हे तत्व अमलात आल्याने उत्पादनवाढीस मदत झाली. दुसरीकडे भारतीय कृषी ची प्रति हेक्टरी उत्पादकता अत्यंत कमी असल्याने ती वाढविण्यासाठी तांत्रिक सुधारणा घडवून आणणे आवश्यक होते. देशातील धान्य टंचाई दूर करण्यासाठी 'अधिक धान्य पिकवा' मोहीम हाती घेण्यात आली. मात्र अन्नधान्याच्या टंचाईतून देशाची सुटका झाली नाही. त्यामुळे अन्नधान्य टंचाईच्या समस्येतून देशाची कायमस्वरूपी सुटका करण्यासाठी हरित क्रांतीचा पर्याय स्वीकारण्यात आला.

**२. हरितक्रांती ते नवीन आर्थिक धोरणापर्यंतचा काळ (१९६६ ते १९९०):** सन १९६५ व १९६६ अशी सलग दोन वर्षे भारतात आलेल्या अवर्षणामुळे (कोरडा दुष्काळ) अन्नधान्याच्या उत्पादनात कमालीची घट निर्माण होऊन अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती. देशाची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी सरकारने अमेरिकेसोबत पी. एल.४८० करार करून अमेरिकेतून मायलो ज्वारी आयात करण्यात आली. देशाची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी विदेशातून अन्नधान्याचे आयात करणे हा कायमस्वरूपी उपाय नसल्याने देशातील अन्नधान्य उत्पादनात वाढ करण्यासाठी राज्यकर्त्यांनी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात सुरुवातीला सधन शेतीचा जिल्हा कार्यक्रम काही निवडक जिल्ह्यांमधून सुरू करण्यात आला. सन

१९६६-६७ पासून देशात संकरित बियाणे, रासायनिक खते व कीटकनाशके या त्रिसूत्रीचा वापर करून अधिकाधिक धान्य पिकविण्यावर भर देण्यात आला. अधिक धान्य पिकविण्याच्या या तंत्रालाच हरितक्रांती असे संबोधण्यात आले. हरितक्रांतीच्या प्रक्रियेत अमेरिका खंडातील मेक्सिको देशात अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी विकसित केलेले अधिक उत्पादन देणारे गव्हाचे बियाणे (वाण) भारतात आणले गेले. तसेच फिलिपाईन्स देशातील इंटरनॅशनल टाइम्स रिसर्च संस्थेने विकसित केलेले अधिक उत्पादन देणारे तांदळाचे बियाणे (वाण) आयात करण्यात आले व जागतिक हरितक्रांतीचे जनक समजले जाणारे शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन कृषी शास्त्रज्ञ डॉ.नॉर्मनबोरलॉग यांच्या सहकार्याने भारत सरकारचे तत्कालीन कृषी सल्लागार डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांच्या अथक प्रयत्नाने भारतात हरितक्रांतीला सुरुवात झाली. डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांना भारतातील हरितक्रांतीचे जनक संबोधले जाते. हरितक्रांतीमुळे देशातील कृषी क्षेत्रात आमुलाग्र बदल होऊन कृषी उत्पादनात झपाट्याने वाढ झाली. सन १९५०-५१ मध्ये भारताची अन्नधान्य उत्पादन क्षमता वार्षिक सुमारे ५.५ कोटी टन एवढी होती. हरितक्रांतीमुळे देशाच्या अन्नधान्य उत्पादन क्षमतेत वाढ होऊन ती सन २०१९-२० या वर्षात सुमारे २९.२० कोटी टन एवढी झाल्याचे आढळून येते. थोडक्यात हरितक्रांतीमुळे अनेक शतकांपासून देशाला भेडसावणारा अन्नधान्य तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यात भारत सरकारला यश प्राप्त झाले.

भारतामध्ये हरितक्रांतीच्या प्रयोगाला यश मिळाले असले तरी आपल्या देशात कोरडवाहू जमिनीचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे आपणास हरितक्रांतीचा पूर्णपणे लाभ घेता आलेला नाही हे सत्यही नाकारता येत नाही. भारतातील जलसिंचनाचे क्षेत्र सन १९५० मध्ये १४० दशलक्ष हेक्टर म्हणजे निव्वळ लागवडीखालील क्षेत्रापैकी केवळ २२.६ दशलक्ष हेक्टर (१६.१४%) एवढेच होते. सन २०१४ मध्ये हे प्रमाण वाढून ६३ दशलक्ष हेक्टर (४५%) एवढे झाले. याचा अर्थ अजूनही देशात निव्वळ लागवड योग्य जमिनीपैकी सुमारे ५५% जमीन कोरडवाहू स्वरूपाची आहे. भारतातील जलसिंचनाखालील क्षेत्र सातत्याने वाढत असले तरी या वाढीचा वेग अतिशय मंद असल्याचे दिसून येते. भारतात हरितक्रांतीचा प्रयोग काही ठराविक राज्यांमध्येच (उदा. पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तरप्रदेश इत्यादी) व ठराविक पिकांच्याच (उदा. तांदूळ, गहू इत्यादी) बाबतीत अधिक यशस्वी झाल्याचे दिसून येते. जलसिंचनाच्या बाबतीत महाराष्ट्राची परिस्थिती तर खूपच नाजूक असून सध्या (सन २०२० नुसार) महाराष्ट्रातील केवळ १८% क्षेत्र सिंचनाखाली असून तब्बल ८२% क्षेत्र कोरडवाहू स्वरूपाचे असल्याने महाराष्ट्राला हरितक्रांतीचा विशेष फायदा घेता आला नाही.

थोडक्यात भारतात हरितक्रांती अंतर्गत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे भरघोस उत्पादन घेऊन देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनविले. परंतु बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या बाबतीत शेतकरी परावलंबी झाला. हरितक्रांतीचे महागडे तंत्रज्ञान वापरून शेतकऱ्यांनी शेतमालाच्या उत्पादनात भरमसाठ वाढ घडवून आणली मात्र त्यांच्या शेतमालाला वाजवी किंमत न मिळाल्यामुळे व त्यांचा

शेतमाल उत्पादन खर्च वाढत गेल्याने ते आर्थिक संकटात सापडले. असे असले तरी सन १९९० पर्यंत विदेशी शेतमालासाठी देशाची बाजारपेठ खुली नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांवरील आर्थिक संकटाची तीव्रता आजच्या तुलनेत कमी होती.

**३. नवीन आर्थिक धोरणानंतरचा काळ (१९९१ ते २०२१):** भारतात सन १९९१ पासून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर राबविण्यास सुरुवात झाली. उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG-Liberalization, Privatization and Globalization) या तीनही संकल्पनांना एकत्रितपणे आर्थिक सुधारणा संबोधण्यात येते. या आर्थिक सुधारणांचा प्रभाव देशातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्रावर होऊन या तीनही क्षेत्रांचे स्वरूप झपाट्याने बदलले. जागतिकीकरणानंतर भारतीय शेती ही श्रमाधारित न राहता भांडवल आधारित बनली. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीचे झपाट्याने व्यापारीकरण झाले. शेतीतून अल्पकाळात प्रचंड उत्पादन व त्यातून प्रचंड नफा मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. या काळात मुक्त आयात-निर्यात व प्रचंड जाहिरातबाजीमुळे लोकांच्या आवडी- निवडीत व जीवनशैलीत प्रचंड बदल झाला. शेतमालाच्या बाबतीत लोकांच्या मागणीची रचना बदलत असून त्यानुसार शेतमाल उत्पादनाची रचनाही बदलत आहे. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून आज बाजारपेठांची संपूर्ण रचना बदलली असून पुरवठा प्रधान शेतीऐवजी मागणी प्रधान शेती उदयास येत आहे. जागतिकीकरणानंतर संकरित बियाणांपेक्षाही अधिक उत्पादन देणाऱ्या जैवतंत्रज्ञानयुक्त महागड्या बियाणांचा वापर (उदा. कापसाचे बी. टी. वाण) भारतीय शेतीत वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांना आज कोणत्याही शेतमालाच्या बियाण्यांसाठी कंपनी निर्मित बियाणांवरच अवलंबून रहावे लागते. जागतिकीकरणानंतर बियाणांबाबत शेतकऱ्यांचे स्वावलंबन संपुष्टात आले असून तो याबाबतीत परावलंबी झाला आहे. या काळात शेतीसाठी उपयोगात आणली जाणारी बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, कृषी अवजारे इत्यादींच्या किंमती भरमसाठ वाढल्याने शेतकऱ्यांचा शेतमालाचा उत्पादन खर्च भरमसाठ वाढला. परंतु त्या तुलनेत शेतमालाच्या किंमती न वाढल्याने शेतकरी दिवसेंदिवस आर्थिक संकटात सापडून आत्महत्या करू लागला.

जागतिकीकरणानंतर आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत विदेशी शेतमालाच्या आयातीवरील निर्बंध समाप्त केल्यामुळे येथील शेतकऱ्यांना विदेशी स्वस्त शेतमालाशी स्पर्धा करावी लागत आहे. जागतिकीकरणानंतर भारत सरकारने कृषी अनुदाने कमी केल्याने कृषी आदानांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. जागतिकीकरणामुळे कृषिमालाच्या मागणी-पुरवठ्यात चढ-उतार वाढत असल्याने या चढ-उतारांचा येथील कृषी क्षेत्राला सामना करावा लागत आहे. जागतिकीकरणाच्या काळात शेतमालाचे उत्पादन, उत्पादकता, शेतमालाचे पॅकिंग, शेतमालाची प्रक्रिया इत्यादी बाबतीत भारतीय शेतकरी खूपच मागे असल्यामुळे त्यांना जागतिक स्पर्धेत आपला माल टिकेल की नाही अशी चिंता सतावत आहे.

**भारतीय कृषी क्षेत्राची सद्य:स्थिती :**

केवळ अन्नधान्याचे उत्पादन वाढले म्हणजे शेतीचा विकास झाला असे म्हणणे योग्य ठरणार

नाही. आज भारतीय कृषी क्षेत्राला अनेक अनिश्चिततांना सामोरे जावे लागत आहे. आजही भारतातील सुमारे ६०% शेती क्षेत्र हे कोरडवाहू स्वरूपाचे आहे. हे संपूर्ण क्षेत्र लहरी अशा मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. अशा कोरडवाहू शेतीतून वर्षातून केवळ एकच पीक घेतल्या जाते व त्या पिकाचीहीशास्वती नसल्याने संपूर्ण कृषी क्षेत्र अनिश्चित बनले आहे.

**भारतीय शेती समोरील आव्हाने व उपाय :**

**१. वाढता उत्पादन खर्च :**

आज बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, कृषी अवजारे इत्यादींच्या किंमती तसेच मजुरीवरील खर्चही भरमसाठ वाढल्याने शेतमालाच्या एकूण उत्पादन खर्चात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे अशा वाढत्या उत्पादन खर्चापायी शेतकरी मेटाकुटीस आला आहे. एकीकडे शेतमालाचा उत्पादन खर्च प्रचंड प्रमाणावर वाढला परंतु त्या तुलनेत शेतमालाला बाजार भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यासाठी शासनाने देशातील कृषी विद्यापीठांमार्फत तसेच शेती संशोधन संस्थांमार्फत उत्कृष्ट दर्जाची बियाणे, रासायनिक खते व कीटक नाशके शोधावी आणि विविध संस्थातर्फे ती शासनाने उपलब्ध करून द्यावी. मोदी सरकारने नुकतीच (१९ नोव्हेंबर २०२१ रोजी) शून्य खर्च आधारीत (Zero Budget) शेतीची संकल्पना मांडली आहे. ही संकल्पना जरी पूर्णत्वास आणता आली नाही तरी किमान खर्च आधारीत (Minimum Budget) शेतीचा प्रयोग सरकारने राबवावा. शासनाने रास्त दराने शेती आदाने शेतकऱ्यांना पुरविल्यास व मनरेगा (MGNREG--Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee -ct-2005) योजनेतून शेतकऱ्यांना शेतीची कामे करण्यासाठी मजूर पुरविल्यास शेती आदानांवरील व मजुरीवरील खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होऊ शकते. असे केल्यास कमी खर्चाच्या शेतीचा प्रयोग शासनाला राबविता येणे शक्य आहे.

**२. वाढता कर्जबाजारीपणा:**

अजूनही भारतीय शेतकऱ्याच्या संदर्भात आपण 'भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो, कर्जातच मरतो आणि आपल्या वारसावर कर्ज सोडून जातो' ही म्हण ऐकतो व अनुभवतोही. याचे कारण शेतकऱ्यांसाठी अजूनही रास्त दराने व पर्याप्त प्रमाणात शेती कर्जाची व्यवस्था सरकार करू शकलेले नाही. देशातील एकूण शेती कर्जापैकी सुमारे ५७% कर्जपुरवठा सहकारी संस्थांमार्फत होत असून सुमारे ४३% कर्जपुरवठा खाजगी सावकारांमार्फत होत असल्याचे दिसून येते. दुसरे म्हणजे आपल्या देशात सुमारे ८०% शेतकरी अल्पभूधारक शेतकरी असून या अल्पभूधारक शेतकऱ्यांपैकी केवळ २२.६% अल्पभूधारक शेतकऱ्यांनाच सरकारी संस्थामार्फत कर्जपुरवठा केला जात असून तब्बल ७७.४% अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जासाठी खाजगी सावकारावरच अवलंबून राहावे लागते (पहा दै. लोकसत्ता दि. २२/०८/२००८ डॉ. बुधाजीराव मुळीक यांचा 'शेतकरी कर्जात का बुडतो ?' हा लेख) सावकारी कर्जावरील व्याजाचा दर वार्षिक सुमारे ६०% ते ९६% इतका प्रचंड असल्यामुळे असे कर्ज परतफेड करताना अल्पभूधारक शेतकरी मेटाकुटीस येतो. त्यासाठी शासनाने देशातील सर्व शेतकऱ्यांना सरकारी यंत्रणेमार्फतच पर्याप्त व रास्त दराने (वार्षिक २% ते

३% दराने) कर्ज पुरवठा करावा जेणेकरून त्यांची कर्जबाजारीपणातून सुटका होईल.

**३. सिंचनाची समस्या :**

भारत सध्या (२०२१-२२) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. याचा अर्थ आपणास स्वातंत्र्य मिळून आज ७४ वर्षे पूर्ण होऊन आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. तरी अजूनही आपल्या देशात सिंचनाचा प्रश्न गंभीर आहे. आजही संपूर्ण देशात सरासरी सिंचनाची व्यवस्था केवळ ४०% एवढी असून सुमारे ६०% शेती कोरडवाहू स्वरूपाची आहे. त्यातही प्रादेशिक स्तराचा विचार करता बहुतांश राज्यांमध्ये सिंचनाचे प्रमाण केवळ १५ ते २०% एवढे अल्प असून सुमारे ८० ते ८५% शेतीचे क्षेत्र कोरडवाहू स्वरूपाचे आहे. संकरित बियाणे तसेच जैवतंत्रज्ञानयुक्त बियाणांची उत्पादकता कोरडवाहू शेतीत अत्यंत कमी दिसून येते. त्यामुळे भारत प्रत्येक शेतमालाच्या बाबतीत दर हेक्टरी उत्पादकतेत जगात खूप मागे आहे. त्यासाठी शासनाने विनाविलंब देशात सिंचनाच्या सोयींत वाढ करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने २०१४ ते २०१९ या काळात राबविलेली जलयुक्त शिवार योजना पारदर्शीपणे संपूर्ण भारतात राबविल्यास व पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब साठवून त्या पाण्याचा नियोजितपणे वापर केल्यास सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास निश्चितपणे मदत होईल.

**४. नैसर्गिक आपत्ती:**

अलीकडे हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तींच्या संख्येत वाढ झालेली आहे. अवेळी पाऊस पडणे, वादळ येणे, गारपीट होणे, अनावृष्टी, अतिवृष्टी इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी मेटाकुटीस येतो. मान्सूनचा पाऊस वेळेवर पडत नसल्यामुळे शेतकऱ्यांना दुबार- तिबार पेरणी करावी लागते. परिणामी उत्पादन खर्चात अनावश्यक वाढ होते. तसेच बरेचवेळा शेतमाल काढते वेळी अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने पर्याप्त निधीचा 'आपत्ती व्यवस्थापन कोष' तयार करून त्यातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी. त्याचप्रमाणे हवामान खात्याच्या वेधशाळेत अत्याधुनिक तंत्राचा वापर करून शेतकऱ्यांना हवामान विषयक अचूक माहिती देण्याची व्यवस्था करावी जेणेकरून संभाव्य नुकसानीपासून काही प्रमाणात का असेना शेतकऱ्यांचे संरक्षण करता येईल.

**५. अल्प उत्पादकता :**

अल्प उत्पादकताही भारतीय शेतीची एक ज्वलंत समस्या आहे. एकीकडे भारतीय शेतीची अल्प उत्पादकता आणि दुसरीकडे शेतमालाला मिळणारा कमी भाव अशा दुहेरी संकटात भारतीय शेतकरी सापडल्याचे निदर्शनास येते. इतर देशांच्या तुलनेत अजूनही भारतात शेतीची उत्पादकता बरीच कमी असल्याचे खालील सारणी क्र.१ वरून दिसून येते.

### सारणी क्र.१
### भारतातील प्रमुख पिकांच्या उत्पादकतेची जगातील इतर देशांशी तुलना
### (सन २०१०-११)

(उत्पादकता: प्रति हेक्टर क्विंटल मध्ये)

| क्र. | पिकाचे नाव | भारतातील उत्पादकता | जगातील सर्वाधिक उत्पादकता असणारा देश | | उत्पादकतेतील फरक |
|---|---|---|---|---|---|
| | | | देश | उत्पादकता | (५-३) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | तांदूळ | ३२.६ | इजिप्त | ९४.२ | ६१.६ |
| २ | गहू | २८.४ | ब्रिटन | ७६.७ | ४८.३ |
| ३ | मका | १९.६ | कॅनडा | ९७.४ | ७७.८ |
| ४ | ऊस | ७०१ | पेरू | १२५४ | ५५३ |
| ५ | भुईमूग | १४.९ | यु.एस.ए. | ४१.४ | ३६.५ |
| ६ | केळी | ३५.९ | इंडोनेशिया | ५९.३ | २३.४ |
| ७ | पपई | ३९.६ | इंडोनेशिया | ८५.८ | ४६.२ |
| ८ | द्राक्षे | ११.१ | यु.एस.ए. | १६.३ | ५.२ |
| ९ | आंबा | ७.१ | ब्राझील | १५.८ | ८.७ |
| १० | संत्रा | १०.० | इंडोनेशिया | ३५.० | २५.० |
| ११ | फळे | ११.७ | स्पेन | २२.४ | १०.७ |
| १२ | कांदा | १४.२ | तुर्की | ३०.० | १५.८ |
| १३ | बटाटा | २२.७ | यु.एस.ए. | ४४.३ | २१.६ |
| १४ | टोमॅटो | १९.५ | यु.एस.ए. | ८१.० | ६१.५ |
| १५ | भाजीपाला | १७.३ | स्पेन | ३७.२ | १९.९ |

(*टीप: फळांची उत्पादकता मेट्रिक टन मध्ये
स्त्रोत: खुरुद बी. एस.आणि शिंदे एच.पी. (ऑगस्ट २०१३) 'इंडियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट रिव्ह्यू' , स्पेशल इश्यु, सोसायटी ऑफ ट्रेनिंग अँड रिसर्च मॅनेजमेंट, औरंगाबाद (महाराष्ट्र), पृष्ठ क्र. ३१८)

वरील सारणी क्र.१ वरून निदर्शनास येते की, सारणीत दर्शविलेल्या सर्वच शेतमालाच्या उत्पादकतेबाबत जगातील प्रमुख देशांच्या तुलनेत भारत बराच मागे आहे. सारणीत दर्शविलेल्या सर्वच शेतमालाच्या उत्पादन वाढीसाठी देशात अजून बराच वाव आहे. भारतात हरितक्रांती नंतर व जैवतंत्रज्ञानावर आधारित बियाणांच्या वापरानंतरही भारतीय शेतीची उत्पादकता वाढविण्याचे आव्हान कायम असल्याचे आपणास दिसून येते. त्यासाठी वरील सारणीत दर्शविलेल्या निरनिराळ्या पिकांच्या बाबतीत उच्च उत्पादकता असणाऱ्या देशांतील पीक वाढीचे तंत्र अभ्यासून ते आपण आत्मसात केले तर निश्चितपणे भारतीय शेतीची सुद्धा उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

**६. शेतकरी आत्महत्या :**

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या शेतकरी आत्महत्या ही भारतीय कृषी क्षेत्रातील एक अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणानंतर म्हणजे साधारणपणे १९९१ पासून भारतीय शेती व शेतकरी मोठ्या प्रमाणावर अडचणीत येऊन त्यांच्यावरील संकट अधिकाधिक तीव्र होऊ लागले. याचा अर्थ जागतिकीकरणानंतरच भारतीय शेती व शेतकरी मोठ्या प्रमाणावर संकटात येऊन देशात शेतकरी आत्महत्या होऊ लागल्या. सन १९९५ ते२०२० या जागतिकीनंतरच्या २५ वर्षांच्या काळात संपूर्ण देशात सुमारे ३,५०,००० एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी आत्महत्या झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (NCRB - National Crime Record Bureau) अहवालावरून दिसून येते. एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी आत्महत्या होणे हे खरोखरच वेदनादायी आहे. शासनाने शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून रोखण्यासाठी कृषी विकासाच्या व शेतकरी हिताच्या विविध योजना विनाविलंब राबविणे आवश्यक आहे. जसे- उत्कृष्ट दर्जाची बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, कृषी अवजारे इत्यादी रास्त किंमतीने शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, सिंचन सोयींत वाढ करणे, कृषी तसेच कृषिपूरक व्यवसायांना अनुदान देणे, रास्त दराने व पर्याप्त प्रमाणात कर्जपुरवठा करणे, शेतमालाच्या हमी भावात योग्य प्रमाणात वाढ करून शेतकऱ्यांचा सर्वच शेतमाल हमीभावाने खरेदीची व्यवस्था निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरीत प्राधान्य देणे इत्यादी.वरील उपाय योजल्यास देशातील शेतकरी आत्महत्या निश्चितपणे थांबतील असा विश्वास वाटतो.

**समारोप :**

भारताच्या कृषी क्षेत्रात वरील प्रमाणे स्पष्ट केल्याप्रमाणे अनेक समस्या निर्माण झाल्याने येथील शेती क्षेत्र संकटात सापडले आहे. या संकटातून शेती व शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी स्वातंत्र्यानंतरच्या सुमारे ७५ वर्षांत सत्तेवर आलेल्या निरनिराळ्या सरकारांनी आपापल्या परीने विविध उपाययोजना केल्या. परंतु अद्यापही भारतीय शेती व शेतकऱ्यांसमोर विविध समस्या आ वासून उभ्या आहेत. वर्तमानकालीन ( सन २०१४ नंतर सत्तेवर आलेल्या) केंद्रातील मोदी सरकारने भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या विविध समस्या दूर करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात पर्यायाने त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी खालील प्रमाणे तीन कृषी कायदे पारित केले होते.

१. शेतकरी उत्पादने, व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) अधिनियम २०२०

२. शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमत हमी आणि कृषी सेवा करार अधिनियम २०२० व

३. अत्यावश्यक वस्तू (संशोधन/दुरुस्ती) अधिनियम २०२०

वरील तीन कृषी कायद्यासंबंधी दि. ५ जून २०२० रोजी केंद्र सरकारने वटहुकूम काढले. तसेच दि.१४ सप्टेंबर २०२० रोजी ही तीनही विधेयके प्रथम लोकसभेत मांडून ते बहुमताच्या जोरावर दि. १७ सप्टेंबर२०२० रोजी मंजूर करून घेतले. त्यानंतर दि. १९-२० सप्टेंबर २०२० रोजी ही तीनही विधेयके राज्यसभेत कोणतीही विधायक चर्चा न करता गोंधळाच्या वातावरणात घाईघाईत मंजूर करून घेण्यात आली. दि.२७ सप्टेंबर २०२० रोजी या तीनही विधेयकांवर भारताच्या महामहीम राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन त्यांचे कायद्यात रूपांतर

झाले. त्यांची अंमलबजावणी मात्र पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच वटहुकूम काढल्याच्या तारखेपासून (दि.५ जून २०२०) करण्याचे सरकारने घोषित केले.

या तीनही कृषी कायद्यांचा विरोध करण्यासाठी दि.२६ नोव्हेंबर २०२० पासून दिल्लीच्या सिंघू, गाझीपूर व टिकरी सीमांवर पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशातील बहुसंख्य शेतकऱ्यांसह देशातील इतर राज्यांतील शेतकरीसुद्धा आंदोलनाला बसले. हे तीनही कृषी कायदे शेतकऱ्यांच्या हिताचे आहेत असे केंद्र सरकारने शेतकऱ्यांना वारंवार सांगितले. परंतु त्या कायद्यांचा सखोल अभ्यास केल्यानंतर हे तीनही कृषी कायदे शेतकऱ्यांच्या हिताचे नसून केवळ कार्पोरेट कंपन्यांच्या व मोठ्या व्यापाऱ्यांच्याच हिताचे आहेत असे ठाम मत या कायद्यासंबंधी देशातील शेतकऱ्यांचे झाल्यामुळे त्यांनी देशभर या तीनही कृषी कायद्यांचा विरोध केला. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसोबत या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी तब्बल ११ बैठका घेतल्या. परंतु तोडगा निघू शकला नाही. तसेच कोरोना महासाथीच्या काळातही शेतकऱ्यांनी हे आंदोलन चालू ठेवले. शासनाने हे आंदोलन गांभीर्याने न घेतल्यामुळे आंदोलनादरम्यान देशातील सुमारे ७०० आंदोलक शेतकऱ्यांना आंदोलनस्थळी आपला जीव गमवावा लागला. शेवटी हतबल होऊन दि. १९ नोव्हेंबर २०२१ रोजी म्हणजेच आंदोलन सुरू झाल्यापासून तब्बल एक वर्षानंतर अचानकपणे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी दूरदर्शनवरून देशवासीयांना संबोधित करताना हे तीनही वादग्रस्त कृषी कायदे मागे घेत असल्याचे जाहीर केले. तसेच हे कायदे रद्द करण्यासंबंधीची संसदीय प्रक्रिया २०२१ मधील नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात पूर्ण करण्याचेही जाहीर केले. त्यानुसार सरकारने दि.१डिसेंबर २०२१ रोजी हे तीनही वादग्रस्त कृषी कायदे परत घेण्यासंबंधीचे विधेयक प्रथम लोकसभेत व नंतर राज्यसभेत ठेवले व ते कोणत्याही चर्चेविना मंजूर करण्यात आले.

कृषी क्षेत्रात सुधारणा होणे हे आवश्यकच आहे. परंतु कृषी सुधारणा करीत असताना ज्यांच्यासाठी त्या करायच्या त्या शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे ही बाब या आंदोलनातून स्पष्ट झाली. यानंतर कोणत्याही सरकारने कृषी सुधारणा हाती घेताना त्या घाईघाईने राबविण्याचा निर्णय न घेता सांगोपांग चर्चा करून तसेच कृषी हा राज्यांचा विषय असल्यामुळे सर्वच घटक राज्यांना व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच करावयास हव्यात. तरच कृषी सुधारणा अस्तित्वात येऊन भारतीय शेती व शेतकऱ्यांचे कल्याण होईल.

**संदर्भसूची :**


१. ब्रह्मे सुलभा: शेतकरी जात्यात, शंकर ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय पुणे,प्रथम आ.दि.१० एप्रिल २००८

२. डॉ. काटे तारक: 'भारतीय शेती: हरवलेली वाट आणि शाश्वत पद्धतीची गरज' हा लेख website _http/mr.vikaspedia.in

३. डॉ. मुळीक बुधाजीराव :'शेतकरी कर्जात का बुडतो ?' हा लेख, दै. लोकसत्ता दि. २२/०२/२००८

४. वानखडे चंद्रकांत : एका साध्या सत्यासाठी, परिसर प्रकाशन आंबेजोगाई, दुसरी आवृत्ती दि.९ ऑग. २००८

5. Farmers Produce, Trade and Commerce (Promotion and Facilitation) Act 2020

6. Farmers (Empowerment and Protection) Agreement of Price -ssurance and Farm Services Act 2020

7. Essential Commodities (Amendment) Act 2020.


◆◆◆

# कोरोना काळानंतर अर्थव्यवस्था गतीमान

**वर्षा गंगणे**
अर्थशास्त्र विभाग
मनोहरभाई पटेल कला-वाणिज्य-विज्ञान महाविद्यालय
देवरी, जिल्हा गोंदिया.

कोविड-१९ विषाणू आणि त्याचा वाढता वेग यामुळे भारतात देखील लॉकडाऊन लावण्यात आले. कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसऱ्या लाटेत जीवितहानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली. अर्थव्यवस्थेची चाके थांबली आणि जनसामान्यांपर्यंत याची झळ पोहचली. अनेकांच्या हातचे काम गेले. कित्येकांना अन्न मिळेनासे झाले. अर्थव्यवस्था नैराश्याचे गर्तेत जाण्याची सर्वच लक्षणे दिसू लागली होती. जी.डी.पी. दर उणे टक्क्यांपर्यंत घसरला होता. कोरोनाची लाट ओसरताच टप्प्याटप्प्याने पुन्हा सगळे आर्थिक व्यवहार करण्यात भारत सरकारला यश आले. या संकटावर जनतेने देखील मोठ्या धैर्याने मात केली. त्यामुळे दुसऱ्या लाटेतील हानीतून अर्थव्यवस्था सुखरूपपणे बाहेर आली.

कोविड-१९ मुळे डबघाईस आलेली अर्थव्यवस्था आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ तिमाहीत ३% ते ७.४% असलेला जीडीपी दर ८.४% पर्यंत वाढला आहे. यापूर्वी जून २०२१ मध्ये भारताचा जीडीपी दर २.१% इतका होता. २०२१-२२ मध्ये स्थिर किंमतीवर जीडीपी ३५.७३ लाख कोटी रू. होता. जून ते सप्टेंबर या तिमाहीत अर्थव्यवस्था सर्वाधिक वेगाने गतीमान झाली आहे. उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रात झपाट्याने वाढ झाल्यामुळे आर्थिक कार्यांना वेग आला आणि एका मोठ्या आर्थिक संकटातून देश बाहेर पडला. हळूहळू देशातील सर्वच आर्थिक क्षेत्र खुली करण्यात आली. पुन्हा एकदा कामावर येण्यासाठी मजूरांचे स्थलांतर करण्यात आले. कोरोनामुळे अनेक कामगार कामाअभावी आपला मूळ गावी परतले होते. यावर उपाय म्हणून कामगारांच्या गावांलगत कामाच्या संधी निर्माण करून देण्याचे अनेक प्रस्ताव समोर आले. पण त्यावर अल्पकाळात अंमल करणे कठीन होते. शिवाय कोविड-१९ वर नियंत्रण मिळविण्यात देशाला यश मिळाले होते. त्यामुळे गावांमधून शहरांकडे उद्योगांत कामगारांना परत बोलावण्यात आले. याचे मूळ कारण म्हणजे परत गेलेले कुशल कामगार शहरी भागात उपलब्ध नव्हते. तसेच ग्रामीण श्रमिकांइतके काम शहरी भागातील श्रमिक किंवा कामगार करू शकत नाहीत याची जाणिव उद्योजकांना होती. परिणामी कोरोना काळानंतर श्रमिकांचे उद्योग वापसीचे मोठे स्थलांतर घडवून आणले गेले. अर्थव्यवस्था चालती ठेवण्याचे सर्व प्रयत्न करण्यात आल्यामुळे कोरोनाकाळात घसरलेली अर्थव्यवस्था पुन्हा रूळावर आली. याचे उदाहरण म्हणजे जीडीपी कोविडपूर्व स्तरांपर्यंत आला व त्याने ८.४% चा टप्पा गाठला. आठ पायाभूत क्षेत्रात ७.५% नी वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तिमाहीच्या तुलनेस

मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवाडीनुसार ७% ने वाढ झाली आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेत आठ पायाभूत सुविधा क्षेत्रांचे उत्पादन ऑक्टोबरमध्ये ७.५% ने वाढले आहे जे मागील वर्षी याच काळात (तीमाहीत) ०.५% ने कमी झाले होते. कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि वीज या आठ पायाभूत क्षेत्रांचे उत्पादन ऑक्टोबर २०२० मध्ये ०.५% ने घसरले आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांक IIP मध्ये समाविट केलेल्या वस्तूंच्या वजनाच्या ४०.२७% आठ प्रमुख उद्योगांचा समावेश आहे.

कोविड-१९ महामारीमुळे देशात अनेकांच्या हातचे काम गेले. उद्योग, कारखाने बंद पडले. कामगारांसमोर काय करावे? कसे जगावे? हे प्रश्न उभे राहिले. अनेकांच्या मनात नैराश्याने घर केले. काहींनी आत्महत्या केल्या. या विनाशकारी महामारीच्या परिणामांच्या पाशातून अर्थव्यवस्था झपाट्याने मुक्त होत आहे. २२ पैकी १९ निर्देशांकामध्ये तेजी आली आहे.

अधिकृत सुत्रांच्या माहितीनुसार जानेवारी २०२० मध्ये कोविड-१९ च्या पहिल्या प्रकरणापासून आर्थिक पुनरुज्जीवनाचे मूल्यांकन करण्यासाठी वीज वापर वस्तूंची निर्यात ई-वे बिले उच्च वारंवारीता निर्देशांक HFI लक्षात घेतले जात आहेत. २२ पैकी १९ उच्च वारंवारिता निर्देशांक पूर्णपणे पूर्वीच्या स्तरावर पतरले आहेत. सप्टेंबर-ऑक्टोंबर-नोव्हेंबर २०२१ मध्ये निर्देशांकाची पातळी २०१९ च्या समान महिन्यांच्या तुलनेत जास्त होती. एकूण १९ निर्देशांकात १००% पेक्षा जास्त सुधारणा झाली आहे. यात ई-वे बिल, वस्तू निर्यात निर्यात, कोळसा उत्पादन आणि रेल्वे मालवाहतूक इत्यादीचा समावेश आहे. यावरून हे स्पट होते की केवळ पुनरुज्जीवन पूर्ण झाले नाही तर आर्थिक वाढ कोविडपूर्व पातळीपेक्षा वेगाने होत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीतील जीडीपी वाढीच्या अंदाजामधून याची पुढेही पुष्टी झाली आहे. दुसऱ्या तिमाहीत (जुलै-सप्टेंबर) २०२१ मधे आर्थिक विकास दर ८.४% असल्याने २०१९-२० च्या दुसऱ्या तिमाहीच्या तुलनेत उत्पादन पातळी अधिक आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये एकूण कलेक्शन १०८.२ कोटी रू. होते. जे २०१९ च्या त्याच महिन्यात कोविडपूर्ण पातळीपेक्षा १५% जास्त आहे. यूपीआय (युनीफाइड पेमेंट इंटरफेस व्हॉल्यूम) जवळ जवळ चार महिने वाढून ४२१.० कोटी रु. झाला. ऑक्टोबर महिन्यात मालाची आयात ५५.१४ अब्ज डॉलर्स होती. ती २०१९ च्या ऑक्टोबर महिन्याच्या तुलनेत ४६% अधिक आहे. याच काळात ई-वे बीले दुपटीने वाढून ७.४ कोटी झाली. सप्टेंबर महिन्यात कोळशाचे उत्पादन १३१% ने वाढून ११.४१ कोटी टन झाले. तर रेल्वे मालवाहतूक १२५% ने वाढली. याशिवाय खतविक्री, वीज वापर, ट्रॅक्टर विक्री, सिमेंट उत्पादन, इंधन वापर, बंदर आणि हवाई मालवाहतूक आयआयपी (औद्योगिक उत्पादन निर्देशांक) आणि प्रमुख उद्योगांची कामगीरी यांनी कोविडपूर्व उत्पादनाची पातळी ओलांडली आहे. अधिकृत सुत्रांच्या माहितीनुसार केवळ लोखंडाचा वापर, देशांतर्गत वाहनांची विक्री आणि हवाई प्रवास वाहतूक अजून कोविडपूर्वीच्या पातळीपर्यंत पोहचलेली नाही. देशांतर्गत वाहनांची विक्री ८६% आणि हवाई प्रवासी वाहतूक ६६% होती.

दुसऱ्या लाटेनंतर अर्थव्यवस्था सावरत असतांनाच आता दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या ओमायक्रॉन या जलदगतीने पसरणाऱ्या विषाणूने

भय निर्माण केले आहे. संपूर्ण जगाला पुन्हा एकदा अर्थव्यवस्था विस्कळीत होण्याची भीती वाटू लागली आहे. भारतातील लसींची निर्मिती व वाढते लसीकरण तसेच इतर देशांच्या तुलनेस कोविड-१९ वर मिळविलेला विजय यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत एकप्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. लोक संकटांचा सामना करायला तयार आहेत. शासन प्रशासन आपापल्या गावकऱ्यांसह सज्ज आहे. ओमायक्रॉनचा प्रतिकार करण्याचे बळ मनामनात तयार होत आहे त्यामुळे जागतिक पातळीवर तेजी परतली आहे. या तेजीमुळे बाजार सावरला आहे. अर्थव्यवस्थेस येत्या, पुढच्या काळात धोका नाही हे लक्षात येताच गुंतवणूकदारांनी पुन्हा खरेदीकडे मोर्चा वळवला आहे. रेपोडेट पूर्ववत ठेवण्याच्या घोषणा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केल्यामुळे तेजीत आणखी भर पडत आहे. परिणामी डिसेंबर २०२१ च्या दुसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीलाच मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ८८६.५१ अंकांनी वाढून ५७.६३३ वर तसेच राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीच्या २६४.४५ अंकांची वाढ नोंदवत १७,१७६.७० अंकापर्यंत मजल मारली आहे. सेन्सेक्स निफ्टीच्या उसळीमुळे गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत वाढ झाली आहे.

मुंबई शेअरबाजारातील आकडेवारीनुसार एका दिवसात गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत ३,४५,७१९.५५ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. कंपन्यांचे बाजारमुल्य २,६०,१८,४९४.२१ कोटी रुपये इतके झाले आहे. टाटा स्टीलचे समभाग सर्वाधिक ३.६३% ने वाढले आहे. त्याचबरोबर ऑक्सिस बँक, कोटक बँक, भारतीय स्टेट बँक, टायटन आणि बजाज फायनान्सच्या शेअर्सने देखील वाढ नोंदवली आहे. मुंबई शेअरबाजारात एका दिवसात ३३,६६१.२८ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री झाली होती.

एकट्या महाराष्ट्राचा विचार करता उद्योग क्षेत्रात ५ हजार ५१ कोटी गुंतवणूक वाढली आहे. दोन वर्षात १.८८ लाख कोटीची गुंतवणूक झाली असून ९६ सामंजस्य करार झाले आहेत. मॅग्नेटिक महाराष्ट्र या उपक्रमाअंतर्गत एकूण १.८८ लाख गुंतवणूक आकर्षित करून ३ लाख ३९ हजारांपेक्षा अधिक नोकऱ्या उपलब्ध करून देण्यात राज्य यशस्वी झाले आहे.

उद्योगमंत्री सुभाष देसाईंच्या शब्दात ''राज्यात धोरणात्मक गुंतवणुकीद्वारे रोजगाराच्या संधींना बळकटी देण्याच्या आमचा प्रयत्नांना यश मिळत असून त्यात सातत्य ठेवण्याचा उद्योग विभागाचा मानस आहे.'' ही जमेची बाजू होय.

**सारांश :**

कोरोना काळानंतर केंद्रसरकारने आर्थिक धोरण आणि विकासाला गती देण्यासाठी झपाट्याने घेतलेले निर्णय धोरणात्मक ठरत आहेत. कोरोना संकटावर मात करीत प्रतिकूल परिस्थितीतही अर्थव्यवस्था पुन्हा मूळ पदावर येत आहे. याचे संकेत मिळत आहेत. संबंधित आकडेवारी अशी:

* केंद्र सरकारने २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी देशाच्या जीडीपीची आकडेवारी जाहीर केली असून जुलै-सप्टेंबर या तिमाहीत देशाचा जीडीपी-७.४% वरून ८.४% पर्यंत वाढला आहे.
* देशाच्या कृषीक्षेत्राचा विकास दर ३% वरून ४.५% वर पोहचला आहे.
* उत्पादन क्षेत्रातील वाढ १.५% वरून ५.८ पर्यंत वाढली आहे.
* बांधकाम क्षेत्रातील वाढ ७.२% वरून वाढून ७.५% झाली आहे.

※ एप्रिल-ऑक्टोबर २०२१ दरम्यान वित्तीय तूट पूर्ण वर्षाच्या उद्दिटाच्या ३६.३% होती. १०.५३ कोटी रु. तर एकूण खर्च १८.२७ लाख कोटी रु. झाला. सरकारने चालू वर्षात वित्तीय तूट ६.८% राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता.

※ ज्ञान आणि कचऱ्याचे संपतत्तीत रूपांतर करण्याचे आवाहन केंद्रिय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. आरोग्य अथवा विकासाच्या क्षेत्रात मिशन म्हणून काम करण्याची आवश्यकता आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हे शक्य आहे.

※ भारतीयांच्या हाती जीडीपीपेक्षा जास्त मूल्यांकनाच्या कंपन्याची सुत्र आली आहेत. त्याचे मूल्य ५ ट्रिलीयनपेक्षा अधिक आहे. ही सकारात्मक बाब होय. यात पराग अग्रवाल, सुंदर पिच्चाई, सत्या नाडेला, शंतनू नारायण, अरविंद कृष्ण इ. चा समावेश आहे.

※ अमेरिकेतील मोठ्या कंपन्यांमधे कित्येक भारतीय वंशाच्या व्यक्ती मोठ्या पदांवर कार्यरत आहेत.

※ ब्लूमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार तंत्रज्ञान क्षेत्राव्यतिरिक्त इतर मोठ्या कंपन्यांमधील भारतीय वंशाचा व्यक्ती मोठ्या प्रमाणावर काम करीत आहेत. यावरून इतर देशांत भारतीयांचेच अधिकारक्षेत्र वाढत असल्याचे स्पट होते.

**निष्कर्ष :**

※ कोरोना महामारीनंतरच्या काळात अर्थचक्र वेगाने फिरू लागले आहे.

※ अनेक विदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास तयार आहेत.

※ जीडीपीचा दर पूर्वीच्या तुलनेत वाढत आहे.

※ भारत विश्वगुरू होण्याच्या वाटेवर अग्रेसर आहे.

※ रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत व पुढेही होतील.

※ ''मेक इन इंडिया'', ''एक भारत श्रेष्ठ भारत'', ''स्मार्ट इंडिया'' यासारखे उपक्रम यशस्वी झाल्याचे निदर्शनास येत आहे.

※ कोरोना विाणूवर मात करण्यात भारताला यश प्राप्त झाले आहे.

※ विदेशी गुंतवणूक व भारतीयांचे विदेशातील अधिकारक्षेत्र या दोहोंत वाढ होत आहे.

**शिफारसी :**

※ भारतीयांचे मानसीक स्वास्थ जपण्याची गरज आहे.

※ओमायक्रॉनचा प्रतिकार करण्यास लसीकरण्याचा वेग वाढवावा.

※ रोजगारसंधी सर्वच क्षेत्रात उपलब्ध करून दिल्या जाव्यात.

**संदर्भसूची :**

१) विविध वृत्तपत्रे आणि संशोधन पत्रिका.
(लोकसत्ता, पुण्यनगरी, EPW इ.)

◆◆◆

ISSN 2320-0197

# भारतातील विमा क्षेत्राचा विकास आणि आव्हाने

**विठ्ठल घिनमिने**
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र
श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर
तालुका-हिंगणघाट, जि. वर्धा

**प्रस्तावना:**

भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे आपण साजरे करित असतांना भारतातील शेती, उद्योग, सेवा, बँकींग अशा अनेक क्षेत्राचा भारताच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागलेला आहे. या क्षेत्रासोबतच भारतीय विमा क्षेत्र सुध्दा महत्वाचे आहे. भारतामध्ये विम्याचा इतिहास जुना आहे. विम्याचा उल्लेख मनुस्मृती, धर्मशास्त्र आणि यांसारख्या प्राचीन ग्रंथातील लेखनात आढळतो. या लिखाणामध्ये विम्याचा उल्लेख संसाधनाचे एकत्रीकरण या रूपात केला गेला आहे. त्याचे पुनर्वितरण संकटसमयी उदा. आग, पूर, साथीचे रोग आणि दुष्काळाच्या वेळी करता येऊ शकेल किंवा जेव्हा एखादी विपत्ती यायची तेव्हा या संसाधनाचा वापर तेथील समुदाय किंवा पिडीत लोकांच्या मदतीसाठी केला जात होता. आजच्या विम्यासाठी दूरदृष्टीने केलेला विचार हाच आहे. भारताच्या प्राचीन इतिहासात समुद्री व्यापारासाठी कर्ज दिले जात आहे. कालांतराने भारतात विम्याचा विकास विशेष करून ब्रिटनचे अनुकरण करून झालेला आहे.

भारतात पहिली विमा कंपनी १८१८ मध्ये ओरिएंटल लाईफ इन्शुरन्स कंपनी कलकत्ता येथे स्थापन झाली. त्याचप्रमाणे बॉम्बे येथे लाइफ इन्शुरन्स कंपनी १८२३ मध्ये, मद्रास येथे मद्रास इनसेन्टिव्ह इन्शुरन्स कंपनी १९२९ मध्ये सुरू झाली. सुरवातीच्या काळात भारतीयांना ब्रिटीश रहिवाशाच्या तुलनेत अत्यंत उच्च प्रीमियम द्यावा लागत असे परंतु बॉम्बे लाईफ इन्शुरन्स कंपनीने कोणताही अतिरिक्त प्रीमियम्स न आकारता विमा उतरवायला सुरूवात केली.

सन १९१२ मध्ये भारतीय जीवन विमा कंपनी कायदा पास करण्यात आला. हा कायदा संचरित विमा आणि अधिनियमातर्फे प्रमाणित केल्या जाणाऱ्या प्रीमियम्स आणि कंपनीच्या मूल्यांकनासाठी अनिवार्य केला आहे. सन १९३८ पर्यत भारतात सुमारे १७६ विमा कंपन्या होत्या आणि त्या व्यवसायाची एकूण किंमत सुमारे ३०० करोड रू इतकी होती. सन १९५० पासून विमा कंपन्याची राष्ट्रीयकरण करण्याची मागणी चालू होती. १९५६ मध्ये जीवन विमा निगम कायदा पास झाला आणि १ सप्टेंबर १९५६ रोजी भारतीय आयुर्विमा निगम (LIC of India) सर्व भारतीयांना आच्छादित करण्याच्या हेतूने स्थापन करण्यात आली.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये भारतातील आयुर्विमा महामंडळे, त्यांचा झालेला विकास आणि विमा क्षेत्रापुढील आव्हाने यांचा विचार करण्यात

आलेला आहे.

**※ भारतातील आयुर्विमा महामंडळे :**

**१) भारतीय आयुर्विमा महामंडळ:** (Life Insurance Corporation of India)

भारतात आयुर्विमा क्षेत्राचे शासनाद्वारे सन १९५६मध्ये राष्ट्रीयकरण केले गेले आणि देशात सक्रिय २४५ स्वदेशी आणि विदेशी आयुर्विमा कंपन्यां अधिग्रहित करून एक सरकारी कंपनी 'भारतीय आयुर्विमा महामंडळ'(Life Insurance Corporation of India) याची स्थापना केली गेली, जी LIC च्या नावाने ओळखली जाते. त्याचबरोबर या क्षेत्रात खासगी कंपन्या उघडण्यावरही बंदी आणली गेली. भारत शासन आपल्या विमा कंपनीला एक गुंतवणूक संस्था समजते आणि हा आर्थिक क्षेत्रातील भांडवलशाही बाजारपेठेचा एक भाग असून या महामंडळाच्या राष्ट्रीयकरणाचे मुख्यपणे दोन ध्येये होती. पहिले-चांगल्या सामाजिक सुरक्षिततेसाठी आयुर्विम्याच्या संदेशाचा प्रचार-प्रसार. दुसरे-लोकांची बचत निधी राष्ट्र निर्माणामध्ये लावणे. भारताच्या नियोजित विकासात भारतीय आयुर्विमा महामंडळ देशातील सर्वात मोठा गुंतवणुकदार बनला आहे. हा सरकारी प्रतिभूतींची (Government Securities) खरेदी करतो. त्यामुळे शासनाद्वारे आपले योजनात्मक खर्च पूर्ण केले जात आहे. ही प्रक्रिया आजही कायम आहे.

**२) सामान्य विमा महामंडळ:** (General Insurance Corporation, GIC)

१९७१ मध्ये शासनाने अशा खासगी क्षेत्राच्या कंपन्यांचे राष्ट्रीयकरण केले ज्या सामान्य विम्याच्या क्षेत्रात सक्रिय होत्या. यांना एकत्र करून एक सरकारी विमा कंपनी सामान्य विमा महामंडळाची स्थापना केली गेली. सामान्य विमा महामंडळांनी १ जानेवारी, १९७३ पासून आपल्या ताब्यातील चार कंपन्यांसोबत काम करायला सुरूवात केली.

१) नॅशनल इंश्ययोरेंस कंपनी लि.

२) न्यू इंडिया इंश्योरेंस कंपनी लि.

३) ओरियंटल फायर अॅन्ड इंश्योरेंस कंपनी लि.

४) युनायटेड इंडिया इंश्योरेंस कंपनी लि.

सुधारणेच्या या काळात या क्षेत्रात दोन बदल दिसून आले.

१) नोव्हेंबर २००० मध्ये जीआयसीला भारतीय पुनर्विमाकर्त्याच्या रूपात नोंदवले गेले. याचे नवीन नाव GIC आहे.

२) मार्च २००० मध्ये चारही सार्वजनिक क्षेत्रातील सामान्य विमा कंपन्यांचा ताबा काढून घेण्यात आला. आता त्या चारही कंपन्या थेट स्वरूपात भारत सरकारच्या मालकीत आहेत.

**३) ए.आय.सी.आय.एल.:** (AICIL)

शासनाद्वारे डिसेंबर २००२ मध्ये विम्याला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात नवीन उपक्रमाची स्थापना केली गेली. अॅग्रीकल्चर इंश्योरेंस कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड; (AICIL) नावाच्या या उपक्रमाने एप्रिल २००३ पासून काम करायला सुरूवात केली. शेतकऱ्यांना मदतीसाठी स्थापित या कंपनीचा हेतू टिकाऊ विमाशास्त्रीय व्यवस्थेचा विकास करणे आहे.

याप्रकारे वर्ष १९९९ मध्ये सुरू केलेल्या राष्ट्रीय कृषी विमा योजनेचे (NAIS) संचालन AICIL द्वारे केले जाऊ लागले. या विम्या योजनेला आता जानेवारी २०१६ मध्ये सुरू केलेल्या नवीन योजना पंतप्रधान पीक विमा योजनेत सामील करून घेतले जात आहे. ही नवीन कृषी योजना (AICIL)

द्वारे चालविली जात आहे.

AICIL सार्वजनिक क्षेत्रातील विम्या कंपन्यांचे आणि विकास वीज संस्थांचा (DFIs) एक संयुक्त उपक्रम आहे. यात GIC च्या मालकीचे शेअर ३५ टक्के, NABARD चे ३० टक्के आणि चारही सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांच्या मालकीचे शेअर ८.७५ टक्के आहेत.

**४) पुनर्विमा:** Reinsurance

विमा एक खूपच जोखीम असलेला व्यवसाय आहे. विमा कंपन्या एकीकडे विमा पॉलिसीद्वारे ग्राहकांना जोखिमेसाठी सुरक्षितता देतात, तर दुसरीकडे त्या स्वत: खूप मोठी आर्थिक जोखिम उचलतात. हीच वास्तविकता कळल्यावर 'पुनर्विमा' व्यवसाय उदयास आले. पुनर्विमा कंपनी खरतर विमा कंपन्यांना त्यांच्या आर्थिक जोखिमेचा विमा करण्याची संधी देते.

पुनर्विम्याच्या गैरहजेरीत कोणत्याही देशात विमा क्षेत्राचा योग्य विकास शक्य नाही. वर्षे १९९९ जेव्हा भारत शासनाने विमा क्षेत्रात खासगी क्षेत्राला प्रवेश करण्याची परवनगी दिली तेव्हा शासनाद्वारे स्वत:च पुनर्विम्याच्या क्षेत्रात पाऊले उचलताना सार्वजनिक क्षेत्र पुनर्विमा कंपनीची स्थापना करण्यात आली. आज ही जगातील अग्रगण्य पुनर्विमा कंपन्यांपैकी एक आहे. याचे नियमन पण विमा नियामक आणि विकास प्राधिकण द्वारेच केले जाते.

भारतात पुनर्विम्याचा शिरकाव खूप कमी आहे. याचे एक खूप मोठे कारण आहे. या व्यवसायात स्पर्धा नसते. या क्षेत्राचा विकास आणि विस्तारासाठी २०१५ च्या शेवटी विदेशी कंपन्यांच्या प्रवेशासाठी उघडण्याचे जाहीर केले. मार्च २०१६ मध्ये IRDA द्वारे चार विदेशी पुनर्विमा कंपन्यांना भारतात काम करण्याची परवानगी दिली आहे.

**५) ठेव विमा आणि क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन:** (DEPOSITE INSURANCE AND CREDIT GAURANTEE CORPORATION- DICGC)

ठेव विमा आणि क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन स्थापना ठेव विमा महामंडळ आणि क्रेडिट गॅरंटी महामंडळ यांचे १९७८ मध्ये विलीनीकरण करण्यात आले. ठेव विम्याची सुरूवात ठेवीदारांची सुरक्षितता, आर्थिक स्थिरता व बँक व्यवस्थेत विश्वास कायम ठेवण्यासाठी आणि ठेवीची रक्कम मिळविण्याच्या हेतूने केली गेली होती. दुसरीकडे क्रेडिट गॅरंटी महामंडळाची स्थापना हे सुनिश्चित करण्यासाठी केली गेली होती की दुर्लक्षित क्षेत्रांच्या कर्जाच्या गरजा पूर्ण केल्या जाऊ शकतील. बँकांना त्या ग्राहकांना कर्ज देण्यासाठी तयार करायचे होते, जे कर्ज मिळविण्यात सक्षम नव्हते. विलीनीकरणानंतर डीआयसीजी क्रेडिट गॅरंटीकडे लक्ष देऊ लागला. त्याच्यामागे हे कारण होते की बहुतांश बँका राष्ट्रीयिकृत होत्या. आर्थिक क्षेत्रातील सुधारणेच्या १९९०च्या दशकात सुधारणेनंतर क्रेडिट गॅरंटीला हळूहळू 'फेज आऊट' केले जाऊ लागले आणि महामंडळाचे लक्ष ठेव विम्याच्या मुख्य कामावर केंद्रित झाले, जेणेकरून गडबडी थांबवून प्रणालीबध्द जोखिमी कमी करून आर्थिक स्थिरता सुनिश्चित करता येऊ शकेल.

**६) निर्यात क्रेडिट गॅरंटी महामंडळ:** (EXPORT CREDIT GUARANTEE CORPORATION- ECGC)

भारतीय कंपन्यांच्याा परदेशी प्रकल्पांना आयात करणाऱ्या देशांना अनेक राजकीय आणि

व्यावसायिक जोखिमांना सामोरे जावे लागते. अशा संस्थांना योग्य विमा संरक्षण देण्यासाठी शासनाने ईसीजीसीची स्थापना वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत मध्यम तसेच दीर्घकालीन निर्यातींसाठी केली आहे.परंतु ईसीजीसीच्या आपल्याच मर्यादेमुळे दीर्घकालीन परतफेड कालावधीसारख्या गोष्टींत शुध्द वाणिज्यक जोखिमांचा समावेश करणे अवघड होऊन बसते. अशा बाबतीत कराराचे मोठे मूल्य, आयात करणाऱ्या देशात कठीण अर्थिक व राजकिय परिस्थितींसोबत ही वस्तुस्थिती पण सामील आहे की अशा प्रकल्पांसाठी सर्वसामान्यपणे पुनर्विमा संरक्षण उपलब्ध नसेल तर अनेक वेळा असे प्रकल्प आयातदार देशांसोबत भारताचे आर्थिक आणि राजकीय संबंधामुळेही आवश्यक वाटतात. याचा अर्थ हा झाला की क्रेडिट विमा संरक्षणाच्या अनुपस्थितीत अशा प्रकल्पांना चालविण्यात भारतीय निर्यातकांची क्षमता आणि योग्यता प्रभावित होते. हे लक्षात घेतले पाहिजे की अनेक विकसित अर्थव्यवस्थामध्ये सरकारी पातळीवर असे प्रकल्प संरक्षित आणि विमा केलेले असतात.

**※ विमा क्षेत्रापुढील आव्हाने :**

वर्तमान काळात भारतातील विमा क्षेत्रापुढे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. विमा क्षेत्राच्या सुरूवातीच्या काळात, विमा उद्योगात सहभागीची संख्या वर्ष २००० मध्ये सात विमा कंपन्यात ज्यात भारतीय आयुर्विमा महामंडळासहीत चार सरकारी –क्षेत्रातिल सामान्य विमा कंपन्या, एक विशेष विमा कंपनी आणि सामान्य विमा महामंडळ राष्ट्रीय पुनर्विमा कंपनीच्या रूपात सामील आहेत. त्या वाढून ३० सप्टेंबर,२०१२ ला ५२ विमा कंपन्या झाल्या आहेत, ज्या जीवन, गैर–जीवन आणि पुनर्विमा विभागात विमा कंपन्या जसे क्रेडिट गॅरंटी महामंडळ आणि कृषी विमा कंपनी सामील असून काम करीत आहेत. चार साधारण विमा कंपन्या जसे–स्टाल हेल्थ अँन्ड अलाइंस इंश्योरेस कंपनी, अपोलो मुनिच हेल्थ इंश्योरेस कंपनी आणि रेलीगेयर हेल्टा इंश्योरेस कंपनी या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्याच्या रूपात काम करतात. २३ विमा कंपन्यांमधून ज्यांनी आपले काम जीवन विमा संदर्भातील क्षेत्रात सुरू केले आहे, २१ परदेशी भागीदारासोबत संयुक्त उपक्रमात सहभागी आहेत.

विमा क्षेत्रात राज्याची मक्तेदारी संपल्यानंतर विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने या क्षेत्राच्या विकास आणि प्रचारात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. तरीही या क्षेत्राला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे आणि स्थिती योग्यप्रमाणे नियंत्रित केल्यानंतरच हे म्हटले जाऊ शकेल की विमा क्षेत्र विमा कंपन्या आणि उतरविणाऱ्यांच्या हितांचे रक्षण करीत आहे. या क्षेत्राच्या तज्ज्ञांचे म्हणणे आहे की भारतीय विमा क्षेत्र आज खालील मुख्य आव्हानांना तोंड देत आहे.

**१) ग्रामिण भागात प्रचार कमी:**

विविध अंदाजानूसार विमा योग्य भारतीय लोकसंख्येतून फक्त २० टक्क्यांचेच आयुर्विमा काढले गेले आहेत. भारताची जागतिक आयुर्विम्यामध्ये भागेदारी फक्त ०.६६ टक्के आहे. त्याचबरोबर विमा सध्या फक्त १२.५३ टक्के लोकांपर्यत पोहोचला (२०२०) आहे. लोकांमध्ये विम्याचा संदेश पसरायला हवा, विशेषत: ग्रामिण क्षेत्रांत. त्याचबरोबर सामाजिक सुरक्षितता योजनांचा प्रचार

गरीब वर्गापर्यंत व्हायला हवा ज्यांची प्रीमियम देण्याची क्षमता खुप कमी आहे.

**२) आरोग्य विम्याच्या व्याप्तीत वाढ करणे:**

आरोग्य विमा देशात मानव विकासाच्या स्थितीत सुधारणा करणारा सर्वात महत्वपुर्ण घटक बनू शकतो, याला एका कृतीयोजनेच्या रूपात लागू करायला हवे. असा अंदाज आहे की भारतातील जवळपास १५ टक्के लोकसंख्या आरोग्याच्या बाबतीत आगाउ रक्कम भरते आणि यात कर्मचारी राज्य योजना, सीजीएचएस, सशस्त्र दल, केंदीय पोलिस संघटना, रेल्वे, नियोक्ता स्वयं - अनुदानिक योजना क्षेत्रातील उपक्रम आणि आरोग्य विमा अंतर्गत पेंशन इत्यादीचा लाभ घेतलेले कर्मचारी आणि लाभार्थी सामील आहेत. सध्या भारताचे 'आउट ऑफ पॉकेट खर्च' म्हणजे (भारतीयांचा आरोग्यावर होणारे खाजगी खर्च) फार जास्त आहे (७० टक्के) या स्थितीत आरोग्य विम्याचा विस्तार एक चांगले पाऊल मानले जाते आहे.

आर्थिक पाहणी २०१५-१६ याच्याप्रमाणे देशात सरकारी आरोग्य विमा योजनेची व्याप्ती खुप कमी आहे. त्याची पोहोच ग्रामिण क्षेत्रांमध्ये ३.१ टक्के आणि शहरी क्षेत्रांमध्ये फक्त १२ टक्के आहे.

**३) सामान्य विम्याचा विस्तार करणे आवश्यक:**

खासगी क्षेत्रासाठी उदयास येणाऱ्या इतर बाजारपेठेच्या तुलनेत साधारण विमा उद्योगाची वाढ समाधानकारक राहिली आहे आणि जी.डी.पी. वाढ च्या दोन-तीन पट आहे. जरी अर्थव्यवस्था मजबूत वाढीच्या मार्गावर चालली आहे आणि विविध उद्योगासाठी पुढील चार-पाच वर्षामध्ये भांडवली खर्च ९,००,००० कोटी रूपयांच्या पार जाण्याचा अंदाज आहे, सामान्य विम्याच्या विस्ताराचीही खूप शक्यता आहे. वाणिज्यिक आणि खासगी पातळीवर सामान्य विमा व्यवसाय सकारात्मक वृत्ती दाखवत आहे. भारताची ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण क्षेत्रात राहाते आणि संघटित आर्थिक सेवेसोबत सामान्य विमा कंपन्यांचाही या क्षेत्रात विस्तार होत आहे.

**४) सुक्ष्म विम्याचा विकास करणे :**

लोकानां जीवनात अशा आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते, ज्याचा वाईट परिणाम संपूर्ण कुंटुबावर पडतो, हे गरीब लोकाबाबत नेहमीचेच आहे. हेच कारण आहे की तज्ज्ञ सूक्ष्म विम्याचा सल्ला देत आलेत. ही एक नवीन संकल्पना आहे. मायक्रो फायनन्सच्या लाभार्थ्यांना सूक्ष्म विमा दिला जातो ज्यात वित्तीय राशीला संरक्षण देउन ग्राहकांसोबत सूक्ष्म वित्त संस्थांच्या जोखीमांना कमी केले जाते.

सूक्ष्म विम्याची संकल्पना खासगी विमा कंपनी, अबीबा लाइफ इश्योरेंस, सूक्ष्म वित्त संस्थेच्या सहयोगाने व्दारे विकसित करण्यात आली, ज्यात कॅनरा बँक, पंजाब अॅन्ड सिंध बँक, आरडीबी, तसेच २३ सहकारी समिती इत्यादी सोबत सूक्ष्म वित्ताला प्रोत्साहन देण्यासाठी युती केली गेली आहे. सूक्ष्म विमा सूक्ष्म वित्ताच्या क्षेत्रात मागील दशकांच्या संशोधनाचा परिणाम आहे आणि श्रीलंका, फिलीपींस इत्यादी देशांमध्ये याचा पुरेसा विकास झाला आहे. इथे एनजीओ आणि लोक संघटना स्वत:ला सूक्ष्म विमा कंपन्यांच्या रूपात नावनोंदणी करू शकते. जरी ते स्वत:च जोखीम स्वीकारतात, त्यांना स्विसरी किंवा म्युनिखरी सारख्या मोठया आंतराष्ट्रीय कंपन्यासोबत पुनर्विम्याची परवानगी मिळते. हेच प्रारूप भारतासाठी सुचविले जाते परंतु

यासाठी सध्या असलेल्या कायद्यांत बदल करण्याची गरज पडेल.

**५) मजबुत सामाजिक सुरक्षा:**

अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे की विमा उद्योगामुळे विमा उतरविणाऱ्यासोबत विमा कंपनी, पुनर्विमा कंपनी यांनाही फायदा मिळायला पाहिजे. विम्याच्या सामाजिक हेतूच्या तुलनेत कॉरपारेट हिताकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ही स्थिती भारतासाठी चांगली नसेल जिथे मजबूत सामाजिक सुरक्षिततेची गरज आहे.

**६) विमा कंपनीचे खाजगीकरण :**

भारतात काम करत असलेल्या जवळपास सर्व खासगी विमा कंपन्या ही मागणी करत आहेत की शासनाच्या मालकीत असलेल्या विमा कंपन्याचे खासगीकरण केले पाहीजे. त्यांचे म्हणणे तर्कशुद्ध आहे की सरकारी कंपन्याच्या तुलनेत त्यांच्याजवळ जास्त आकर्षक विमा योजना आहे, तरीही ग्राहक त्यांच्याकडे वळत नाहीत. यामुळे खासगी कंपन्यांना नुकसान होत आहे, कारण त्यांच्या व्यवसायात वाढ होत नाही आणि ओवरहेड खर्च पण वाढत आहे.

**गोषवारा :**

स्वातंत्र्योनंतरच्या काळात भारताच्या आर्थिक व सामाजिक आणि वैयक्तिक सुरक्षीतेच्या दुष्टीने विमाक्षेत्र महत्वपुर्ण आहे. याशिवाय सरकारला आर्थिक विकासासाठी भांडवलनिर्मीती करताना विमा क्षेत्राने महत्वपुर्ण भूमिका पार पाडली आहेत. देशातील रोजगारनिर्मीतीमध्ये विमा क्षेत्राचा वाटा उत्तरोत्तर वाढत असल्याचे दिसून येते परंतु अजूनही या क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. विम्याचा लाभ फक्त भारतातील २० टक्के लोकसंख्येने घेतला आहे. यात शहरी भागात विम्याचा प्रसार झाल्याचे दिसून येते तर ग्रामीण क्षेत्रापासून विमा क्षेत्र अजूनही बरेच दूर आहे. विम्याची संकल्पना विमा काय असतो हे सुध्दा भारतातील ग्रामीण आणि अतिदुर्गम भागात माहीत नाही. याशिवाय विमा कंपन्याची दाव्याची तडजोड करणे अवघड असून ती दीर्घकाळातील प्रक्रिया आहेत. त्यामुळे बहुसंख्य लोक या क्षेत्रात गुंतवणूक करण्यात तयार नसतात. भारत सरकारने वर्तमान काळात विमाक्षेत्रात अनेक बाबतीत संशोधित कायदे पारीत केलेले आहे. याचा सकारात्मक परिणाम या क्षेत्रावर झालेला दिसून येतो. या विमा क्षेत्राच्या माध्यमातून सरकारने पंतप्रधान सुरक्षितता विमा योजना आणि पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना या सारख्या नवीन विमा योजना लोकांच्या हितासाठी सुरू केलेल्या आहेत.

**संदर्भ सुची :**


१) सिंह रमेश (२०१९) – भारतीय अर्थव्यवस्था MCGraw Hill Education Private Ltd

२) श्रीरंगम श्रीराम (२०२१)– भारतीय अर्थव्यवस्था सिध्दात, नीतियां एवं विकास .

३) झामरे जी. एन.(२०१८) भारतीय अर्थव्यवस्था पिंपळापूरे प्रकाशन महाल, नागपूर.


◆◆◆

# भारताच्या विदेशी व्यापाराच्या रचनेत झालेले बदल

**सिद्धार्थ हरिदास मेश्राम**
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
सेठ केसरीमल पोरवाल कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
कामठी, जि.नागपूर

**१. प्रास्ताविक:**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गेल्या ७५ वर्षात देशाने अनेक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे विविध अंगानी मूल्यांकन करता येईल. त्यादृष्टीने प्रस्तुत शोध निबंधात भारताच्या विदेशी व्यापाराच्या प्रगतीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारत अन्नधान्य, औषधे, कापड, वाहने आणि इलेक्ट्रिकल वस्तूची आयात करीत असे, तर निर्यातीच्या बाजूने विचार केल्यास भारतातून कापूस, ताग आणि चहा इत्यादी वस्तूंचीच निर्यात केली जात असे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात प्रामुख्याने पेट्रोल आणि संबंधित उत्पादने, अत्याधुनिक यंत्रसामुग्री, रसायने, खते, पोलाद इत्यादी वस्तूची आयात करण्यास सुरुवात केली आहे. देशात नियोजनाच्या मार्गाने आर्थिक विकास करण्याची जी प्रक्रिया सुरू झाली त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये विविध प्रकारचे बदल घडून आले. भारतात झालेल्या हरित क्रांतीमुळे अन्नधान्य व काही उपभोग्य वस्तूच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला आहे. अलीकडील काळात तर भारत बऱ्याच उपभोग्य वस्तूंची निर्यात सुद्धा करीत आहे हे आर्थिक विकासाचे द्योतक आहे.

**उद्दिष्टे:**

१. भारताच्या विदेशी व्यापाराच्या आयात व निर्यात रचनेतील बदल अभ्यासणे.

२. देशाच्या विदेशी व्यापारातील रचनेच्या बदलाची कारणे तपासणे.

३. भारताच्या आयात व निर्यात रचनेतील अपेक्षित बदलांची कारणमिमांसा करणे.

**२. भारताच्या विदेशी व्यापाराची रचना :**

एखाद्या देशात कोणत्या प्रकारच्या वस्तूंची आयात केली जाते आणि त्या देशातून कोणत्या प्रकारच्या वस्तूंची निर्यात केली जाते या संबंधीच्या विवरणाला विदेशी व्यापाराची रचना असे म्हणतात. देशाची आयात-निर्यात रचना ही तो देश कोणत्या वस्तू बाबत विदेशावर अवलंबून आहे व त्यामध्ये कालमानानुसार कसा बदल झाला आहे याची माहिती देण्यास महत्त्वपूर्ण ठरते. त्याचबरोबर कोणत्या वस्तूचे उत्पादन तो कार्यक्षमरीत्या करू शकतो व आंतरराष्ट्रीय बाजारात विकू शकतो याची माहिती निर्यातीची रचना अभ्यासल्यास समजते. आर्थिक प्रगतीचा परिणाम म्हणून देशाच्या एकूण निर्यातीत मूल्यवर्धित वस्तूचे प्रमाण वाढते आणि प्राथमिक वस्तूचे प्रमाण घटते. तसेच आयाती बाबतही रचनात्मक बदल घडून येतात. महत्त्वाच्या वस्तू उत्पादनात तो देश

स्वयंपूर्ण होतो व अशा वस्तूचे आयातीतील महत्त्व घटते. याबाबतची भारताची आयात निर्यात संरचना व त्यातील बदलांची नोंद पुढीलप्रमाणे घेण्यात आली आहे. प्रथमत: आपण निर्यात रचनेतील बदल अभ्यासू.

**तक्ता क्र. १**

**भारताच्या निर्यात व्यापाराच्या रचनेतील बदल**

(रू.करोडमध्ये)

| अ.क्र | निर्यात वस्तूचे वर्गीकरण | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 | 2010-11 | 2020-21 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | कृषी वस्तू व संबधित वस्तू | 284 ( 44.2) | 487 (31.7) | 2057 (30.7) | 6317 (19.4) | 28542 (14.2) | 111393 (9.8) | 134748 (14.3) |
| 1.1 | कॉफी | 07 (1.09) | 25 (1.63) | 214 (3.9) | 252 (0.77) | 1185 (0.59) | 3010 (0.26) | 2762 (0.29) |
| 1.2 | चहा | 124 (19.31) | 148 ( 9.64) | 426 (6.35) | 1070 (3.29) | 1976 (0.98) | 3354 (0.29) | 2671 (0.28) |
| 1.3 | मसाले | 17 (2.65) | 39 (2.54) | 11 (0.16) | 239 (0.73) | 1691 (0.80) | 8043 (0.71) | 14313 ( 0.52) |
| 1.4 | तंबाखू | 16 (2.49) | 33 ( 2.15) | 141 (2.10) | 263 (0.81) | 871 (0.43) | 3985 (0.35) | 1981 (0.21) |
| 1.5 | साखर | 30 (4.67) | 29 (1.89) | 40 (0.60) | 38 (0.12) | 511 (0.25) | 5633 (0.50) | 10514 (1.12) |
| 1.6 | तांदूळ (बासमती) | --- | 05 (0.33) | 224 (3.34) | 462 (1.42) | 2943 (1.46 | 11586 (1.02) | 30609 (3.26) |
| 1.7 | कापूस | 12 (1.87) | 14 (0.91) | 165 (2.46) | 846 (2.60) | 224 (0.11) | 13160 (1.16) | 3479 (0.37) |
| 1.8 | मासे | 05 (0.78) | 31 (2.02) | 217 (3.23) | 960 (2.95) | 6367 (3.16) | 11917 (1.05) | 20314 (2.16) |
| 2. | खनिज वस्तू (धातु) (कोळसा व्यतिरिक्त) | 52 (8.1) | 164 (10.7) | 414 (6.7) | 1497 (4.6) | 4139 (2.0) | 39098 (3.4) | 29233 (4.2) |
| 3. | कारखानी वस्तू (उत्पादित वस्तू) | 291 (45.3) | 772 (50.3) | 3747 (55.8) | 23736 (72.9) | 160723 (79.8) | 13160 (1.2) | 660890 (70.3) |
| 3.1 | तयार कपडे | 01 (0.6) | 29 (1.9) | 550 (8.2) | 4012 (12.32) | 25478 (12.65) | 52861 (4.65) | 35768 (3.81) |
| 3.2 | ज्यूट वस्तू | 135 (12.03) | 190 (12.38) | 330 (0.49) | 298 (0.92) | 932 (0.46) | 2092 (0.18) | 1021 (0.11) |
| 3.3 | हस्तोद्योग वस्तू | 11 (1.71) | 73 (4.8) | 952 (14.9) | 6167 (18.94) | 5097 (2.53) | 5877 (0.52) | 9086 (0.97) |
| 3.4 | मौल्यवान दागिने | 01 (0.6) | 45 (2.93) | 618 (9.21) | 5249 (16.12) | 33734 (16.75) | 184420 (16.22) | 64895 (6.90) |
| 3.5 | अभियांत्रिकी वस्तू | 22 (3.43) | 198 (12.9) | 827 (12.32) | 3872 (11.89) | 31870 (15.83) | 226805 (19.95) | 245310 (26.10) |
| 4. | खनिज इंधने व वंगण तेल | 07 (1.2) | 13 (0.8) | 28 (0.4) | 948 (2.9) | 8822 (4.4) | 192639 (17.0) | 94153 (10.0) |
| 5. | इतर वस्तू | 06 (1.1) | 99 (6.5) | 465 (6.9) | 55 (0.1) | -- | 780674 (68.7) | 20900 (2.2) |
| | एकूण | 642 (100) | 1535 (100) | 6711 (100) | 32553 (100) | 201356 (100) | 1136964 (100) | 939924 (100) |

**स्त्रोत:** आर्थिक समीक्षा २०२०-२१ (खंड-२) भारत सरकार, पृष्ठ क्र. ९४ ते १०५

**टिप :** १. कंसातील आकडे एकूण निर्यातीच्या मूल्याचे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

२. निर्यात वस्तूचे वर्गीकरण पाच भागात केले आहे.

तक्ता क्र.१ मध्ये भारताच्या निर्यात वस्तूच्या रचनेत अनेक सकारात्मक बदल दिसून येतात ते खालीलप्रमाणे-

१. कृषीमा ल व त्यासंबधित वस्तूच्या निर्यातीचे प्रमाण १९६०-६१ मध्ये एकूण निर्यातीच्या ४४.२ प्रतिशत होते. ते प्रमाण घटून १९८०-८१ मध्ये ३०.७ प्रतिशत झाले. २०००-०१ मध्ये ते प्रमाण पुन्हा घटून १४.२ प्रतिशत झाले. अशीच अवस्था २०२०-२१ मध्ये म्हणजेच हे प्रमाण १४.३ प्रतिशत आहे. निर्यातीमध्ये कृषी व त्यासंबधित वस्तूच्या बाबतीत सतत घट होत असल्याचे दिसून येते.

* शेती क्षेत्रातील विविध वस्तूंच्या निर्यातीचं प्रतिशत लक्षात घेतांना प्रतिशत प्रमाण शेती क्षेत्रातील एकूण निर्यातीशी मोजले आहे.

* विशेषतः एकूण निर्यातीमध्ये बासमती तांदुळाच्या निर्यातीचे प्रमाण १९९०-९१ मध्ये १.४२ प्रतिशत होते. तर ते २०२०-२१ मध्ये वाढून ३.२६ प्रतिशत एवढे झाले.

* शेतीक्षेत्रातील निर्यातीत समाविष्ट असणा-या वस्तूचे महत्व देखील वाढलेले दिसते. १९६०-६१ मध्ये चहाचा कृषीक्षेत्र निर्यातीत ४४ प्रतिशत इतका वाटा होता. तो वाटा घटून २०२०-२१ मध्ये केवळ ०.२८ प्रतिशत झाला. २०१०-११ मध्ये हे प्रमाण ३ प्रतिशत पर्यंत घटले. एकूण निर्यातीत अर्थात चहाच्या निरपेक्ष निर्यातील मात्र वाढ होत आहे.

* एकूण वस्तूच्या निर्यातीत मासे यांचे प्रमाण १९६०-६१ मध्ये १.७६ प्रतिशत होते. ते प्रमाण वाढून २०००-०१ मध्ये २२ प्रतिशत झाले. २०१०-११ मध्ये १०.७ प्रतिशत तर २०२०-२१ मध्ये १५ प्रतिशत पर्यंत मासे निर्यातीत वाढ झाल्याचे दिसून येते.

२. खनिज वस्तू (धातु) निर्यातीचा वाटा १९६०-६१ मध्ये एकूण निर्यातीच्या ८.१ प्रतिशत होता. २०००-०१ तो वाटा घटून २ प्रतिशत झाला.तर याचे प्रमाण २०२०-२१ मध्ये ४.२ प्रतिशत पर्यंत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अशा खनिजाच्या व कच्च्या लोखंडाच्या देशांतर्गत उपयोगात सातत्याने वाढ होत आहे.या खनिजाचा समावेशही प्राथमिक क्षेत्रात होतो. त्याचा निर्यातीमधील वाटा घटणे ही आर्थिक विकासाशी सुसंगत अशी बाब आहे.

३. कारखानी वस्तूच्या (उत्पादित वस्तू) निर्यातीत वाढ होणे ही आर्थिक प्रगतीची बाब मानली जाते. एकूण निर्यातीत या वस्तूचे प्रमाण १९६०-६१ मध्ये ४५.३ प्रतिशत होते. २०००-०१ मध्ये तो वाढून ७९.८ प्रतिशत झाले. परंतु २०१०-११ मध्ये एकदम घटून १.२ प्रतिशत झाला याचे कारण म्हणजे जगात असलेली २००८ पासूनची मंदी सदृश्य स्थिती होय. यानंतर २०२०-२१ मध्ये ही निर्यात वाढून ७०.३ प्रतिशत एवढी आहे. ही उत्पादित वस्तूची निर्यातीतील वाढ लक्षणीय असल्याचे दिसून येते.कारखानी वस्तूच्या यादीत ज्या वस्तूंनी प्रामुख्याने आघाडी मारली आहे. त्यामध्ये खालील वस्तू समाविष्ट आहेत.

* १९७०-७१ मध्ये एकूण निर्यातीत तयार कपड्याचे प्रमाण फक्त १.९ प्रतिशत होते. १९९०-९१ ते प्रमाण वाढून १२.३२ प्रतिशत तर २०००-०१ मध्ये १२.६५ प्रतिशत झाले. त्यानंतर ह्या प्रमाणात सतत घट होऊन ते प्रमाण २०१०-११ मध्ये ४.६५ प्रतिशत तर २०२०-२१ मध्ये ३.८५ प्रतिशत पर्यंत झाल्याचे दिसून येते.

* हस्तोद्योगातील वस्तूचे एकूण निर्यातीतील प्रमाण

१९६०-६१ मध्ये ११.४ प्रतिशत होते. १९८०-८१ मध्ये हे प्रमाण वाढून १४.९ प्रतिशत झाले. ही वाढ तशीच राहून १९९०-९१ मध्ये याचे प्रमाण १८.९४ प्रतिशत पर्यंत वाढले.त्यानंतर मात्र हे प्रमाण २०२०-२१ मध्ये ०.९७ प्रतिशत पर्यंत घटल्याचे दिसून येते.

* मौल्यवान दागिने व जडजवाहीर यांचे १९७०-७१ मध्ये एकूण निर्यातीतील प्रमाण केवळ २.९३ प्रतिशत होते.त्यानंतर ते प्रमाण वाढून १९८०-८१ मध्ये ९.२१ प्रतिशत तर २०००-०१ मध्ये १६.८ प्रतिशत झाले. २०२०-२१ मध्ये हे प्रमाण ११.४५ प्रतिशत असल्याचे दिसून येते.या क्षेत्रात प्रामुख्याने सर्वाधिक वाढ झाल्याचे दिसून येते.

* अभियांत्रिकी वस्तूंचे १९९०-९१ मध्ये एकूण निर्यातीतील प्रमाण २.९१ प्रतिशत होते. ते वाढून २०१०-११ मध्ये १६.७४ प्रतिशत झाले. तर २०२०-२१ मध्ये हे प्रमाण ६.९० प्रतिशत असल्याचे दिसून येते.

४. भारताच्या एकूण निर्यातीत खनिज तेल व वंगण तेल निर्यातीचे प्रमाण १९७०-७१ मध्ये ०.८ प्रतिशत होते. २०१०-११ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन १७ प्रतिशत पर्यंत झाल्याचे दिसते.तर २०२०-२१ मध्ये हे प्रमाण १० प्रतिशत असल्याचे दिसते.

५. एकूण निर्यातीमध्ये इतर वस्तूच्या प्रतिशत प्रमाणात बरेच चढउतार असल्याचे दिसून येते.

**भारताच्या निर्यात व्यापाराच्या रचनेतील बदलाची करणे:**

१. अन्नधान्य व कृषीवर आधारित वस्तूचे एकूण निर्यातीत प्रतिशत प्रमाण घटत असलेले दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात झालेल्या हरित क्रांतीमुळे फक्त काही वस्तूच्या (उदा.गहू आणि तांदूळ) बाबतीतच ती सफल ठरली. इतर शेतीआधारित वस्तूच्या बाबतीत पाहिजे तेवढे यश संपादन केले नाही. सोबतच देशातील वाढती लोकसंख्या हे सुद्धा एक कारण होय. वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याची गरज भासू लागल्याने १९६०-६१ पासून ते २०२०-२१ पर्यंत अशा वस्तूंच्या निर्यातीत सातत्याने घट घडून येत असल्याचे दिसून येते. कृषी संबंधित निर्यातीत समाविष्ट असणा-या वस्तूचे तुलनात्मकदृष्ट्या महत्त्व देखील बदललेले दिसते. एकूण प्राथमिक क्षेत्राचा निर्यातीतील हिस्सा घटणे, नव्या वस्तू समाविष्ट होणे या स्वागतार्ह बाबी निर्यात रचनेत दिसुन येतात.

२. प्रतिस्थापन वस्तूचा प्रतिकूल परिणाम : एकूण निर्यातीमध्ये ज्यूटचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे देशाच्या फाळणीत गेलेला ज्यूट निर्मितीचा भौगोलिक प्रदेश व ज्यूटच्या ऐवजी वापरल्या जाणाऱ्या प्रतिस्थापन वस्तू होय.(उदा.पॉलीथीन)

३. भारताच्या निर्यातीत परंपरागत वस्तू सोबतच अपरंपरागत वस्तूंची सुद्धा निर्यात वाढली आहे. यामध्ये विजेची उपकरणे, इंजीनियरिंग वस्तू, घड्याळी, पंखे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू इत्यादी वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसून येते. तसेच निर्यातीत विविधता व व्यापकता दिसत असून यामध्ये विविध वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. ही निर्यातीत होणारी वाढ आर्थिक विकासाच्या दृष्टीने आवश्यक व इष्ट आहे.

४. खनिजे व कच्च्या लोखंडाची देशांतर्गत उपयोगात वाढ होत आहे हा विकासात्मक परिणाम असल्याचे दिसते. कच्चे लोखंड व इतर खनिजाचे उत्पादन

१९६० –६१ पासून ते २०२०– २१ या कालावधीत ५२ कोटी रुपयावरून ते २९२३३ कोटी रुपयापर्यंत वाढल्याचे दिसते.परंतु ही रुपयातील वाढ जरी दिसत असली तरी या वस्तूच्या देशांतर्गत वाढत्या उपयोगामुळे एकूण निर्यातीतील प्रतिशत प्रमाण सातत्याने घटत असल्याचे दिसून येते.

५. औद्योगिकरणावर भर : दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून भारताने जलद औद्योगिकरणावर भर दिला.त्यामुळेच देश विविध कारखानदारी वस्तूच्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात प्रगत झाला. एवढेच नव्हे तर अशा अनेक वस्तू अधिकाधिक प्रमाणात निर्यात करू लागला आहे. ही निर्यात फक्त विकसनशील देशाकडेच नव्हे तर विकसित देशाकडेही होऊ लागली आहे.

६. १९६६ च्या भारतीय रुपयाच्या अवमुल्यना नंतर भारताच्या निर्यात व्यापारात वाढ होत गेल्याचे दिसून देते.परंतु देशाच्या आयात व्यापाराचे एकूण मूल्य भरून काढण्याइतके निर्यात मूल्य कधी वाढू शकले नसल्याचे आढळून येते. त्यामुळेच भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापार संतुलन तुटीचे असल्याचे दिसते.

भारताच्या निर्यात वस्तूचा रचनेत होणाऱ्या बदल्यात देशातील वाढते उत्पादन औद्योगिक प्रगतीची दिशा व गती, औद्योगिक प्रगतीचा आकृतिबंध, देशाच्या लोकसंख्येत व रचनेत होणारे बदल, लोकांच्या राहणीमानातील बदल इत्यादी सर्व घटकाचे प्रतिबिंब दिसून येते.

यानंतर आयात रचनेत होणा–या बदलाचे स्पष्टीकरण खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**तक्ता क्र. २**

**भारताच्या आयात व्यापाराच्या रचनेतील बदल** (रू.करोडमध्ये)

| अ.क्र. | आयात वस्तूचे वर्गीकरण | 1960-61 | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 2000-01 | 2010-11 | 2019-20 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | उपभोग्य वस्तू व अन्नधान्ये | 214 (20) | 242 (14.8) | 380 (3.0 ) | -- | -- | -- | -- |
| 1.1 | खाद्यतेल | 04 (0.4) | 23 (1.4) | 677 (5.4) | 326 (0.8) | 6093 (2.7) | 29860 (1.8) | 35739 (3.19) |
| 2. | कच्चामाल व कारखानी वस्तू | 527 ( 47.0) | 889 (54.4) | 9760 ( 77.8 ) | -- | -- | -- | -- |
| 2.1 | खते | 13 (1.16) | 86 (5.26) | 818 (6.52) | 1766 (4.09) | 3034 (1.33) | 31533 (1.9) | 29320 (2.61) |
| 2.2 | पेट्रोलियम | 69 (6.15) | 136 (8.32) | 5264 (41.95) | 10816 (25.04) | 71497 (31.32) | 482282 (28.65) | 239352 (21.41) |
| 2.3 | मौल्यवान वस्तू | 1 (0.1) | 25 (1.53) | 417 (3.32) | 3738 (8.65) | 22101 (9.68) | 157596 (9.36) | 38776 (3.46) |
| 3. | भांडवली वस्तू | 356 (31.7) | 404 (24.7) | 1910 (15.2) | 10466 (24.2) | 25281 (11.0) | 231712 (13.8) | 138657 ( 12.4) |
| 4. | इतर वस्तू | 25 (2.2) | 99 (6.0) | 499 (3.8) | -- | -- | -- | -- |
| | एकूण | 1122 (100) | 1634 (100) | 12549 (100) | 43198 (100) | 228307 (100) | 1683467 (100) | 1120946 (100) |

**स्त्रोत:** आर्थिक समीक्षा २०२०–२१–खंड –२ भारत सरकार, पृष्ठ क्र. ९४ ते १०५

तक्ता क्र.२ मध्ये भारताच्या आयात वस्तूच्या रचनेत झालेले बदल खालीलप्रमाणे –

१. अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला आहे. अन्नधान्याच्या अंतर्गत उत्पादन वाढीमुळे ह्या

आयातीचे प्रमाण घटले आहे. अन्नधान्य व इतर खाद्यपदार्थ यांचे एकूण आयातीमध्ये असणारे प्रमाण १९६०-६१ मध्ये २० प्रतिशत होते. ते प्रमाण १९८०-८१ मध्ये ३ प्रतिशत पर्यंत घटले. त्यानंतर अन्नधान्याची आयात फार थोड्या प्रमाणावर केली जाते.

* खाद्यतेलाची आयात एकूण उपभोग्य वस्तू व अन्न धान्याच्या आयातीच्या १९६०-६१ मध्ये ०.४ प्रतिशत होती. हे प्रमाण १९८०-८१ मध्ये २ प्रतिशत पर्यंत वाढले. त्यानंतर २०००-०१ मध्ये हे प्रमाण २.६७ प्रतिशत तर २०१९-२० मध्ये ३.१८ प्रतिशत पर्यंत वाढल्याचे दिसून येते. खाद्यतेलाची आयात अलीकडील काळात वाढली आहे. याचे कारण अंतर्गत किमती ह्या आंतरराष्ट्रीय किमतीपेक्षा अधिक आहेत.

२. कच्चा माल व कारखानी वस्तू यांचे १९६०-६१ मध्ये एकूण आयातीमधील प्रमाण ४७ प्रतिशत होते. ते प्रमाण १९८०-८१ मध्ये ७८ प्रतिशत पर्यंत वाढलेले आहे. म्हणजेच भारताच्या एकूण आयातीत औद्योगिक कच्च्या मालाची आयात जवळजवळ अर्धा हिस्सा म्हणजे ५० प्रतिशतच्या आसपास आहे.त्यामुळे ही आयात देशांतर्गत उत्पादन वाढीसाठी व निर्यातीसाठी आवश्यक आहे.

३. पेट्रोलिअम पदार्थाची आयात ही कच्चा माल वकारखानी वस्तूंच्या एकूण आयात रचनेत सर्वात महत्वाची आहे. इंधन तेलावरील आयातीचे खर्च प्रमाण १९६०-६१ मध्ये ६ प्रतिशत होते. ते प्रमाण वाढून १९७०-७१ मध्ये ८.३ प्रतिशत तर १९८०-८१ मध्ये ४२ प्रतिशत पर्यंत झाले. त्यानंतर हे प्रमाण घटून २०००-०१ मध्ये ३१ प्रतिशत झाले. पुढील दशकात म्हणजेच २०१०-११ मध्ये हे प्रमाण घटून २८.६४ प्रतिशत तर २०१९-२० मध्ये २१.४१ प्रतिशत पर्यंत खाली आले. ही घट अंतर्गत तेल उत्पादन वाढीच्या प्रयत्नास काही प्रमाणात यश आले. म्हणूनच तेलजन्य वस्तूची आयात घटण्यास मदत झाली.

४. रासायनिक खताची आयात १९६०-६१ मध्ये १ प्रतिशत होती. हरीत क्रांतीसाठी रासायनिक खताची आयात वाढविण्यात आली.परिणामी एकूण कच्च्या मालाच्या आयातीत खताचे प्रमाण १९७०-७१ मध्ये ५.३ प्रतिशत होते. त्यानंतर ते प्रमाण वाढून १९८०-८१ मध्ये ६.५ प्रतिशत झाले. ह्यानंतर अंतर्गत उत्पादन वाढीचा परिणाम म्हणून हे प्रमाण २०००-०१ मध्ये १.३ प्रतिशत पर्यंत घटून, २०१०-११ मध्ये हे प्रमाण १.८७ प्रतिशत झाले. २०१९-२० मध्ये हे प्रमाण २.६ प्रतिशत एवढे आहे.

५. आयातीमध्ये महत्वाचा बदल दर्शविणारा आणखी एक घटक म्हणजे मौल्यवान मोती व खडे यांची वाढती आयात होय. आयातीमध्ये यांचे प्रमाण १९६०-६१ मध्ये फक्त ०.१ प्रतिशत होते. ते प्रमाण १९७०-७१ मध्ये १.५ प्रतिशत तर १९८०-८१ मध्ये वाढून ३.३ प्रतिशत एवढे झाले. त्यानंतर १९९०-९१ मध्ये हे प्रमाण वाढून ६ प्रतिशत तर २०००-०१ मध्ये ९.७ प्रतिशत झाले. २०१०-११ मध्ये ते प्रमाण ९.४ प्रतिशतच्या जवळपास होते. कोरोना महामारीच्या काळात म्हणजेच २०१९-२० मध्ये हे प्रमाण एकदम घसरून ३.५ प्रतिशत होते. विशेषतः मौल्यवान खडे व मोती ही आयात मुख्यत्वे निर्यातीसाठी होत असते.

६. भांडवली वस्तूच्या आयातीमध्ये यंत्रसामुग्री व सुटे भाग, वाहतूक साधने यांचा समावेश होतो.

औद्योगिक विकासासाठी यांची आवश्यकता असते. देशांतर्गत उत्पादन वाढीबरोबर यांच्या आयातीचे प्रमाण घटले आहे. १९६०-६१ मध्ये एकूण आयातीमध्ये भांडवली वस्तूच्या आयातीचे प्रमाण ३१.७ प्रतिशत होते. ते घटून १९८०-८१ मध्ये १५ प्रतिशत पर्यंत आले. त्यानंतर हे प्रमाण २०००-०१ मध्ये ११ प्रतिशत पर्यंत घटले आहे. २०१०-११ मध्ये हे प्रमाण १३.८ प्रतिशत तर २०१९-२० मध्ये १२.४ प्रतिशत झाले आहे.

भारतीय आयातीची रचना विकासात्मक बदल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील बदलांचे प्रतिबिंब दर्शविते. अन्नधान्य, रासायनिक खते तसेच भांडवली वस्तूची आयात प्रारंभी जास्त होती. परंतु अंतर्गत उत्पादन वाढीबरोबर याचा आयाती मधील हिस्सा मात्रा व किंमत घटलेला आहे. इंधन तेलाची आयात मोठ्या प्रमाणात वाढली, याचे कारण तेलाचे आंतरराष्ट्रीय राजकारण होय. ओपेक देशांनी तेलाच्या किमती भरमसाठ वाढविल्याने आयात वाढली. भारताचे अंतर्गत तेल उत्पादन वाढीचे प्रयत्न सुरूच आहेत व त्याला काही प्रमाणात यश मिळाले आहे. मौल्यवान खडे व मोती यांची आयात वाढ ही निर्यातीसाठी असल्याने हा बदल चिंतेचा नाही तर स्वागतार्ह आहे.

**भारताच्या आयात व्यापाराच्या रचनेतील बदलाची करणे:**

१. ओपेक राष्ट्रांनी तेलाच्या किमती १९७३ मध्ये २.७ डॉलर प्रती बॅरेल वरून वाढवून १९७६ मध्ये ११ डॉलर प्रती बॅरेल केल्या. यानंतर १९८० मध्ये ही किंमत ३५ डॉलर प्रती बॅरेल अशी वाढली.२००५ मध्ये तर ५० डॉलर प्रती बॅरेल आणि २०१९-२० मध्ये ६९ डॉलर प्रती बॅरेल किमंती वाढल्या. याचाच परिणाम म्हणून या वस्तूवरील आपले आयात बिल (आयात खर्च) मोठ्या प्रमाणात वाढले.

२. भारतात झालेल्या हरित क्रांतीमुळे शेतमालाच्या व विशेषतः अन्नधान्याच्या उत्पादनात खूप मोठी वाढ घडून आली.त्यामध्ये गहू व तांदूळ उत्पादनात भरीव अशी प्रगती झाली.म्हणूनच या क्षेत्राचा आयातीमधील वाटा हळूहळू कमी होऊन तो अगदी नगण्य झाला आहे.

३. औद्योगिकरणासाठी यंत्रसामुग्रीची आयात आवश्यक असते.पंचवार्षिक योजनाच्या काळात यंत्रसामुग्रीची आयात उत्तरोत्तर वाढत गेली आहे. १९६०-६१ ते २०१९-२० पर्यंत ही आयात एकूण आयातीच्या अनुक्रमे ४५.३ प्रतिशत वरून ७०.३ प्रतिशत पर्यंत वाढली आहे. यंत्रसामुग्रीची वाढती आयात जलद औद्योगिकरण दर्शवित असली तरी त्याचबरोबर देशी तंत्रज्ञानाच्या विकासातील अपयश व आयात धोरण देखील दर्शविते.

४. भारतात धातूमध्ये मुख्यतः लोखंड व पोलादाची आयात केली जाते. त्याचबरोबर काही निर्लोह धातूची देखील आयात केली जाते. धातूच्या विशेषतः लोखंड आणि पोलादाच्या आयातीमधील वाढ हे दर्शविते की, भारताद्वारे लोखंड आणि पोलादाच्या कारखान्यातील उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर केला जात नाही.

५. आयात उदारीकरणाच्या धोरणामुळे कच्च्या मालाच्या आयातीत वेगाने वाढ झाली आहे. भारतात पेट्रोलियम पदार्थांची आयात सतत वाढत आहे. सोबतच निर्यातीसाठी उपयुक्त आभूषण तयार करण्यासाठी मौल्यवान जडजवाहीर यांची आयात मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते.

**भारताच्या आयात निर्यात रचनेत अपेक्षित बदल :**

१. भारताच्या एकूण आयातीमध्ये अजूनही अन्नधान्य व त्यासाठी लागणारे उत्पादन ह्या वस्तूची आयात २०१०-११ मध्ये ५४५ करोड रू.(०.०३ प्रतिशत) तर २०१९-२० मध्ये ती वाढून ७५६ करोड रू.म्हणजेच एकूण आयातीच्या ०.०७ प्रतिशत एवढी आहे. ती आयात घटून शून्य प्रतिशत होईल हे अपेक्षित होते.

हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे, असे असले तरी अजूनही लोकांचा उपभोग पूर्ण करून देश निर्यातयोग्य आधिक्य प्राप्त करू शकला नाही. तसेच अन्नधान्याचा राखीव साठा सुध्दा सुरक्षित पातळीवर उपलब्ध झाला नाही.याचे महत्वाचे कारण म्हणजे विकसित देशाच्या तुलनेत भारतातील कृषीची उत्पादन व उत्पादनक्षमता कमी असून ती वाढविण्याची गरज आहे. सोबतच अतिरिक्त वाढती लोकसंख्या नियंत्रित करून आणि योग्य आर्थिक नियोजनाचा समन्वय साधणे अपेक्षित आहे.

२. गेल्या १०-१२ वर्षात मत्स्य व्यवसायाने निर्यात क्षेत्रात केलेली प्रगती प्रशंसनीय आहे. परंतु ह्या वाढीचे प्रमाण जास्त अपेक्षित होते.

भारतासाठी मत्स्य उत्पादनाचे क्षेत्र चांगलेच स्पर्धाक्षम आहे.संबधित उत्पादकांनी व निर्यात करणा-या कंपन्यांनी त्यादृष्टीने (उदा. बाजारपेठ शोधणे,पॅकिंग व प्रक्रिया करणे, अर्थप्रबंधन आणि निर्यातीचे व्यवस्थापन इ.) कौशल्य किंवा योग्य व्यूहरचना आखली असती तर जागतिक निर्यातीत भारताची टक्केवारी वाढून निर्यात मूल्यात वाढ झाल्याचे दिसून आले असते.

३. कापड व वस्त्रोद्योगाचा निर्यातीत महत्वाचा वाटा आहे. एकूण कापड उत्पादनापैकी २० प्रतिशत उत्पादन कृत्रिम धाग्यापासून तयार होते, ५ प्रतिशत कापड उनी कापड तर ४ प्रतिशत सिल्क असून उर्वरित ७१ प्रतिशत कापड हे कापसाच्या सुतापासून तयार होते. भारतातून जी वस्त्राची निर्यात होते त्याला कापसाच्या धाग्यापासून केलेल्या वस्त्राच्या निर्याती पासूनची प्राप्ती ही वस्त्राच्या एकूण प्राप्तीच्या ७० प्रतिशत आहे. कृत्रिम धाग्यापासून कापडाच्या द्वारे निर्माण झालेल्या निर्यातीची प्राप्ती २६ प्रतिशत आहे.त्यामुळे कापसापासून तयार झालेले सुती कपडे व सबंधित वस्त्रे याकडे निर्यातीच्या दृष्टीने विशेष लक्ष देणे अपेक्षित होते.परंतु २०२०-२१ मध्ये हा वाटा एकूण निर्यातीच्या ३.८१ प्रतिशत असून ही बाब चिंतनीय आहे.

भारत हा कापड व वस्त्रोद्योगाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय पातळीवर किती प्रमाणात स्पर्धाळू बनू शकतो यावरून भारताची निर्यात क्षमता ठरेल.प्रामुख्याने स्पर्धात्मक निर्यात क्षमता ही उत्पादन मात्रेच्या दरमात्रा व्ययाशी संबधित राहील.हा व्यय जेवढा कमी राहील तेवढी भारताची या उद्योगातील निर्यात क्षमता वाढेल. त्यासाठी वस्त्रोद्योगात मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणे, कमी व्याजदरावर भांडवलाचा पुरवठा, उत्पादन क्षमतेचा महत्तम वापर, सतत वीज पुरवठा व उद्योगांना लागणारा कच्चामाल कमी किमतीवर उपलब्ध करून देणे ह्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

४. भारताच्या आयातीमध्ये कच्चामाल व कारखानी वस्तू (उत्पादित वस्तू) चे प्रतिशत प्रमाण हे यापासून निर्मित वस्तूंच्या निर्यातीच्या प्रमाणापेक्षा १९७०-७१ मध्ये ४.१ प्रतिशत तर १९८०-८१ मध्ये २२

प्रतिशत नी जास्त आहे. ह्या आयाती निर्यातीपेक्षा कमी होणे अपेक्षित होते.

निर्यातीसाठी कराव्या लागणाऱ्या आयात वस्तूच्या उत्पादन क्षमतेचा पूर्ण वापर केला जात नाही असेच यावरून स्पष्ट होते. त्यामुळे भारताद्वारे उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील उत्पादन क्षमता पूर्णपणे वापरण्यात यावी तरच या वस्तूची आयात कमी होऊन निर्यात मूल्य वाढेल.

थोडक्यात, योजना काळात भारताच्या विदेशी व्यापाराच्या आयात-निर्यात रचनेत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर बदल झालेला दिसून येतो. योजना काळात भारताने आपल्या निर्यातीचे विविधकरण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे आणि परंपरागत वस्तुच्या निर्मितीबरोबरच अपरंपरागत वस्तुंची निर्मिती वाढविल्यामुळे विदेशी व्यापाराच्या रचनेत बदल झालेला आहे. आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर निर्यात प्रोत्साहनाचा कार्यक्रम अधिक तीव्र करण्यात आला आहे. त्यामुळे देखील निर्यातीची रचना बदलली आहे. शिवाय १९८० च्या दशकापासून जो आयात उदारीकरणावर भर दिला गेल्यामुळे आयातीची रचना देखील बदलली आहे. तसेच विदेशी व्यापार धोरणांमध्ये आयात प्रतिस्थापन व आयात नियंत्रण यासारख्या कार्यक्रमांचा अंतर्भाव करून भारतीय वस्तूसाठी बाजारपेठाचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला आहे.

**संदर्भ सूची :**

१. खुराना, अशोक (२०११) भारतीय अर्थव्यवस्था, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्रायव्हेट लिमिटेड, नई दिल्ली - ११०००२,

२. सोळुंके, आर. एस., आणि ककडे व्ही .बी. (२००३) भारतीय अर्थव्यवस्था, श्रीविद्या प्रकाशन, २५० क / १६ शनिवार पेठ पुणे- ३०.

३. दत्त रूद्र एवं सुंदरम के.पी.एम.(२००५), भारतीय अर्थव्यवस्था, एस.चंद एंड कंपनी ली.,रामनगर, नई दिल्ली - ११००५५.

४. Economic Survey of India -2020-21, Valume-2.

५. देशपांडे विनायक श्रीधर आणि श्रीधर आत्माराम देशपांडे (२०१०), भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., गिरगाव, मुंबई- ४४०००४.

६. मिश्र एस.के.एवं पुरी वी.के.(२००९), भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा. लि., गिरगाव, मुंबई- ४४०००४.

७. जहागिरदार दि.व्य.(२००५),आर्थिक जगत,खंड -२ , सेंटर फोर इकॉनोमिक अंड सोशल स्टडीज, अमरावती- ४४४६०२
.

◆◆◆

# शेतमजुराची स्थिती – काल आणि आजचे वास्तव

**प्रतिभा काळमेघ**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिवशक्ती महाविद्यालय,
बाभुळगांव, जि. यवतमाळ.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्था मुख्यत: कृषी क्षेत्रावर आधारित आहे. भारतीय जनतेच्या उदरनिर्वाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी होय. भारतात एकूण लागवडीखालील क्षेत्रफळ १४२ दशलक्ष हेक्टर आहे. एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ६५ टक्के आहे. या लोकसंख्येमध्ये शेतमजुरांचे प्रमाण लक्षणीय आहे. तेव्हा शेतीच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करतांना शेतमजूर या महत्वपूर्ण घटकाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. कारण शेतीच्या उत्पादनामध्ये शेतमजुरांचा सहभाग महत्वाचा मानला जातो.

इंग्रजपूर्व काळात समाजाची आर्थिक रचना बघता खेडेगाव हा राष्ट्राचा स्वतंत्र व स्वयंपूर्ण घटक आहे या तत्वावर आधारित होती. इंग्रजाच्या राजवटीत नागरी भागांचे महत्व वाढविणारी रचना अस्तित्वात आली व ही रचना आजही चालूच आहे. इंग्रजपूर्व काळात शेती हा गावचा मुख्य व्यवसाय किंबहुना ग्रामीण जीवनाचे केंद्र होते. शेतीचे उत्पादन हे गावाचे पोषण आणि राज्यकर्त्यांना द्यावा लागणारा शेतसारा यापुरतेच मर्यादित होते. शेतसाऱ्याचे प्रमाण इंग्रज राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार बदलत असे व त्याचा परिणाम गावाच्या आर्थिक स्थितीवर व ग्रामीण जीवनमान, राहणीमान यावर होई. शेती ही जुन्या परंपरागत पद्धतीने केली जात असे. शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदरनिर्वाहाचे साधन एवढाच होता. शेतीच्या मालकीतील विषमता वरीच होती. भूमिहीन शेतमजुरांचा वर्ग त्याही काळी अस्तित्वात होता.

गावकामगार हे जमीन महसूल, संरक्षण, न्याय या बाबी पहात असत. शेतीसाठी आणि नित्य प्रपंचासाठी लागणाऱ्या वस्तू व सेवा निर्माण करणारे व्यावसायिक वंशपरंपरागत चालत आलेले व्यवसाय पुढे चालू ठेवीत. त्यांना बलूतेदार व अलूतेदार म्हणत. शेतीच्या नित्याच्या गरजा भागविणाऱ्यांना बलूतेदार म्हटले जाई तर त्यांच्या नैमित्तिक गरजा भागविणाऱ्यांना अलूतेदार म्हटले जाई. बलूतेदारांना अधिक मोबदला मिळे. खेडेगावात साधारणपणे लोहार, सुतार, महार, मांग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, गुरव, मूलानी व कोळी असे बारा बलूतेदार असत. बारा अलूतेदारात तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवंत, डवऱ्या, ठाकूर, घडशी, तराळ, सोनार व चौगला हे येत. वर्षभर जरूर तेव्हा गावकऱ्यांचे व वर्षाअखेरीस सुगीच्या वेळी त्यांना धान्य व इतर मालाच्या रूपाने

बलूते व अलूते घालावयाचे असा रिवाज असे. शेती उत्पादन कामात जमीन तयार करण्यापासून तर पिक हाती येईपर्यंत जी विविध कामे केली जातात त्यात शेतमजुरांचा महत्वपूर्ण सहभाग असतो. जेव्हा शेतीचे भौगांलिक क्षेत्रफळ जास्त असेल आणि शेतकरी किंवा त्याच्या कुटूंबाकडून संपूर्ण शेतीमध्ये वेगवेगळी कामे एकटया शेतकऱ्याकडून किंवा त्या कुटूंबाकडून करणे शक्य नसेल अशावेळी शेतीमध्ये काम करण्यासाठी ज्या व्यक्तीची मदत घेतली जाते त्या व्यक्तीला शेतमजूर असे म्हणतात.

**शेतमजुराची व्याख्या :**

१) इतरांच्या शेतजमीनीमध्ये कृषिविषयक कामे रोजंदारी तत्वावर करण्यासाठी जाणारा मजूर म्हणजे शेतमजूर होय.

२) राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते, 'ज्या लोकांना शेतीवर काम करण्याच्या मोबदल्यात मजुरी दिली जाते त्यांना शेतमजूर असे म्हणतात.

३) ज्या व्यक्ती शेतीमध्ये वर्षभर मजुरीने काम करण्यासाठी तयार असतात आणि प्राप्त होणाऱ्या मजुरीद्वारे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात, काम नसल्यामुळे वेळप्रसंगी बेरोजगार रहावे लागते अशा व्यक्तीला शेतमजूर असे म्हणतात.

**शेतमजुरांचे प्रकार :**

भारतातील शेतमजूराजवळ असणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रफळावरून तसेच शेतमजुरांच्या काम करण्याच्या पद्धतीवरून शेतमजुरांचे काही प्रकार पडतात.

१) भूमिहीन शेतमजूर : प्रत्येक देशात शेतमजूरांचा एक स्वतंत्र वर्ग असतो त्यामुळे शेतजमिनीवर मालकी नसलेल्या आणि उपजिविकेसाठी इतरांच्या जमिनीवर काम करणाऱ्या मजुरांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.

२) भूमिधारी शेतमजूर : ज्या शेतमजूरांजवळ स्वत:च्या मालकीची जमीन असते अशा शेतमजुरांना भूमिधारी शेतमजुर असे म्हणतात. भुमिधारी शेतमजुराजवळ शेतजमीन असली तरी अनेकदा ही जमीन साधनांच्या अभावामुळे लागवडी खाली आणली जात नाही. शेतमजुराजवळ असलेली जमीन अगदी लहान क्षेत्रफळाची असल्यामुळे अशा मजुरांना इतरांच्या शेतीवर काम करावे लागते.

३) जोडलेला शेतमजूर : जे शेतमजूर शेतमालकाकडे महिना किंवा वर्षाचा करार करून त्याच्या शेतीव्यवसायात काम करतात त्याला जोडलेला शेतमजूर असे म्हणतात.

४) रोजंदारी शेतमजूर : दैनंदिन मजूरीचा करार करून त्यांना शेतजमिनीवर काम करण्यासाठी ठेवले जाते त्यांना रोजंदारी शेतमजूर असे म्हणतात.

५) लिंगभेदानुसार मजूर : शेती व्यवसायात काम करणाऱ्या शेतमजुरांना लिंगभेदानुसार वर्गीकृत केले जाते. आपल्या मालकीच्या जमिनीवर अंगमेहनतीचे काम करून घेण्यासाठी शेतमालक पुरूष मजुरांना कामावर ठेवतात तसेच कमी मेहनतीची कामे करण्यासाठी स्त्री मजुरांना कमी मोबदला देवून कामावर ठेवले जाते.

**शेतमजूराची वैशिष्टये :**

शेतमजूराची साधारणपणे पुढील वैशिटये दिसून येतात.

१) शेतमजूर हे शेतीवर मजूर म्हणून काम करतात.

२) शेतावर मजूर म्हणून काम करताना शेतमजुरांना निश्चित दराने मजुरी प्राप्त होते.

३) शेतमजुरांना प्राप्त होणारी मजुरी ही शेतमजुर व त्याच्या कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी उपयुक्त असते.

४) शेतमजूरांना वर्षभर शेतात काम उपलब्ध होईल असे सांगता येत नाही. शेतीचा हंगाम संपल्यानंतर त्यांना बेरोजगार राहावे लागते.

५) शेतमजुरांना प्राप्त होणारा मजूरी दर कामाच्या तुलनेत कमी असतो.

६)साधारणपणे शेतमजूर निरक्षर,अल्पसाक्षर दिसून येतात.

७)शेतमजूर असंघटीत स्वरूपात आढळून येतात.

८) शेतमजुरांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्याचा सामाजिक दर्जा, राहणीमान व जीवनविषयक दर्जा हा निम्न प्रतीचा आढळून येतो.

विनोबा भावे यांनी राबविलेल्या भूदान चळवळीतील बरीचशी शेतजमीन शासन दरबारी जमा आहे. अशा जमीनीचे शेतमजूरांना कसेल त्याची जमीन या तत्वावर वाटप करण्यात यावे. तसेच महात्मा गांधीच्या स्वप्नातील लघू व कुटीर उद्योग हे शेतमालावर प्रक्रिया उद्योग करण्यासाठी अग्रक्रमाने राबविल्यास शेतमजूरांची आर्थिक स्थिती जी स्वातंत्र्याच्या वेळी होती ती स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात फार सुधारल्याचे आढळून येत नाही या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**भारतातील शेतमजुरांची संख्या :**

प्रत्येक देशात शेतमजुरांचा एक स्वतंत्र वर्ग अस्तित्वात असतो. शेतमजुराच्या वर्गाचा आकार देशाची लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा दर, शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचा भार, शेतीची स्थिती, शेतीमध्ये करण्यात येणाऱ्या वीज व यंत्राचा वापर, ग्रामीण भागात जनतेला उपलब्ध असलेल्या सोयी, नागरीकरणाची प्रक्रिया अशा अनेक बाबींवर अवलंबून असतो. भारतात साधारणपणे १९५१ ते २०११ दरम्यान शेतमजुरांची संख्यात्मक स्थिती कशी होती हे पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

**तक्ता क्र. १**

**लोकसंख्या व शेतमजुरांची संख्यात्मक स्थिती (दशलक्षमध्ये)**

| वर्ष | एकूण संख्या | ग्रमीण लोकसंख्या | एकूण कार्यक्षम लोकसंख्या (ग्रामीण) | शेतमजूरांची संख्या | शेत लागवड करणाऱ्यांची संख्या | शेती व शेतमजुरी करणारी लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1951 | 361.1 | 298.6 | 139.5 | 27.3 (28.1) | 69.9 (71.9) | 97.2 (69.7) |
| 1961 | 439.2 | 360.3 | 188.7 | 31.5 (24.0) | 99.6 (76) | 131.1 (69.5) |
| 1971 | 548.1 | 439.0 | 180.4 | 47.5 (37.8) | 78.2 (62.2) | 125.7 (69.7) |
| 1981 | 683.3 | 525.6 | 244.6 | 55.5 (37.5) | 92.5 (62.5) | 148.0 (60.5) |
| 1991 | 843.3 | 630.6 | 314.1 | 74.6 (40.3) | 110.7 (59.7) | 185.3(59.07) |
| 2001 | 1027.0 | 742.6 | 402.2 | 106.8 (45. 6) | 127.3 (54.4) | 234.1(58.2) |
| 2011 | 1210.2 | 833.7 | 481.9 | 144.3(54.9) | 118.8(45.1) | 263.1(54.6) |

Source - Registrar General of India

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन १९५१ मध्ये भारतातील लोकसंख्या ३६१.१ दशलक्ष होती त्यामध्ये वाढ होत जावून १९८१ मध्ये ६४३.३ दशलक्ष झाली तर सन २०११ मध्ये

१२१०.२ दशलक्ष एवढी झाली आहे. तसेच सन १९५१ मध्ये शेतमजुरांची संख्या २७.३ दशलक्ष एवढी होती त्यामध्ये वाढ होवून १९८१ मध्ये ५८.५ दशलक्ष एवढी झाली तर त्यामध्ये झपाटयाने वाढ होवून सन २०११ मध्ये ही संख्या १६७.८ दशलक्ष एवढी झाली आहे. यावरून असे दिसून येते की, देशाची लोकसंख्या वाढत असताना भारतातील शेतमजुरांची संख्या देखील वाढत आहे.

भारतातील शेतमजुरांची आर्थिक स्थिती दयनीय आहे. शेतमजूर असंघटीत असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी असते त्यामुळे त्यांना अल्प मजुरीदरावर काम करावे लागते. पहिल्या शेतमजूर चौकशीच्या अहवालानुसार १९५०-५१ मध्ये पुरूषाला १ रूपया ९ पैसे, स्त्रियांना ६८ पैसे व मूलांना ७० पैसे या दराने मजुरी होती. दुसऱ्या शेतमजूर चौकशी समितीच्या अहवालानुसार १९५६-५७ मध्ये पुरूषांना ९६ पैसे, स्त्रियांना ५९ पैसे, मुलांना ५३ पैसे होती. यावरून शेत मजुरांना मिळणारा मोबदला हा अल्प असल्याचे स्पष्ट होते. सन १९८७ मध्ये श्रम मंत्रालयाने यामध्ये वाढ करून मजुरीचा दर १५ रूपये एवढा केला. डिसेंबर १९९८ मध्ये शेतमजुरीचा दर ४० रूपये प्रतिदिन एवढा निश्चित केला तसेच २०१०-११ मध्ये शेतमजुराचा दर १५० रू. एवढा केला होता. शेतमजूर हा कोणत्याही प्रकारचा असो त्याचे प्रमुख वैशिटये म्हणजे अत्यल्प, बेभरवशाचे तसेच चढउताराचे उत्पन्न, समाजातील खालच्या स्तरावरील जीवन, सातत्याने होणारी पिळवणूक, मागासलेले राहणीमान, सार्वत्रिक बेरोजगारी, कर्जबाजारीपणा इत्यादी.

स्वातंत्र्यानंतर शासनाने पहिल्या दहा वर्षात शेतमजूर पाहणी समित्या नेमल्या. या दोन्ही समित्यांना देशातील शेतमजूरांची परिस्थिती अतिशय नाजूक व हलाखीची असल्याचे आढळले. देशातील एकूण ग्रामीण कुटूंबापैकी २५ टक्के कुटूंबे शेतमजूरांची होती. त्यापैकी फक्त १५ टक्के मजूर नैमित्यिक स्वरूपाचे काम करीत. म्हणजेच संख्येने इतक्या मोठया असलेल्या शेतमजुरांना कामाची शाश्वती नव्हती. निम्म्या मजुरांकडे स्वत:ची काहीच जमीन नव्हती तर उरलेल्या निम्म्या मजुरांकडे जमिनीचे अगदी लहान व विखुरलेले तुकडे होते. ती शेती कसताही येत नसे व त्यावर गुजराणही होत नसे.

भारतात महिला व कामगार २०१६ च्या अहवालात दर्शविल्या प्रमाणे स्त्री-पुरूष यांच्या वेतनातील तफावत जगात सर्वात जास्त म्हणजे २६ टक्के आहे. आशिया खंडातील सरासरीपेक्षा निश्चितच जास्त आहे. आशिया खंडात हे प्रमाण २३ टक्के आहे. विकसित अर्थव्यवस्थांमध्ये सरासरी वेतन तफावतीचे प्रमाण १५ टक्के आहे. पुढील तक्त्यात अलीकडील काही वर्षात स्त्री-पुरूष मजूरी दरात झालेला बदल दर्शविला आहे.

**तक्ता क्र.२**

**वार्षिक सरासरी दैनंदिन मजूरी दर (रूपयात)**

| वर्ष | शेतमजूरी दर | |
|---|---|---|
| | पुरूष | स्त्री |
| 2006 – 07 | 82 | 62 |
| 2007 – 08 | 91 | 70 |
| 2008 – 09 | 108 | 82 |
| 2009 – 10 | 124 | 95 |
| 2010 – 11 | 149 | 115 |
| 2011 – 12 | 183 | 134 |
| 2012 – 13 | 214 | 159 |
| 2013 – 14 | 229 | 178 |
| 2014 – 15 | 268 | 200 |
| 2015 – 16 | 281 | 218 |

(Source – Directoral of Economics & Statistics)

**हरितक्रांती आणि शेतमजूरी :**

१९६० च्या दशकात म्हणजे १९६५–६६ मध्ये अन्नधान्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी व अन्नधान्याचे उत्पादन वेगाने वाढविण्यासाठी हरितक्रांती झाली. हरितक्रांतीमुळे मोठया प्रमाणात सुधारित बियाणे, आधुनिक उपकरणे, रासायनिक खतांचा वापर, सिंचनाच्या सोयी, पीक संरक्षण, जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचा वापर, बहुपीक पद्धती, नवनवीन यंत्रसंचाचा शेतीमध्ये उपयोग, कोरडवाहू क्षेत्राचा विकास इत्यादींमुळे कृषिक्षेत्रात महत्वापूर्ण प्रगती झाली आहे. शेतीच्या आदानात गुणात्मक वाढ होऊन शेती उत्पादन वाढले. हरितक्रांतीनंतर देश अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण झाला. परंतु हरितक्रांतीचे फायदे हे मोठया शेतकऱ्यांना झाले कारण हरितक्रांती भांडवलप्रधान होती. रासायनिक खते, सुधारित बियाणे, किटकनाशके, यंत्रसंच यासाठी माठया प्रमाणावर पैशाची गरज होती. हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली असली तरी त्याचा फायदा लहान शेतकरी व शेत मजुरांना झाला नाही. लहान शेतकऱ्यांची धारणक्षमता कमी होती. त्याच्याजवळ भांडवलाची कमतरता होती. त्यामुळे हरितक्रांती मधील बदल तो स्वीकारू शकला नाही. तसेच लहान शेतकरी त्यांच्या कुटूंबियांच्या सहाय्याने शेतीतील काम करीत असल्याने त्याला बाहेरील शेतमजुरांना काम देण्याची गरज नव्हती आणि मोठया शेतकऱ्यानी हरितक्रांतीचा स्विकार केल्याने श्रमप्रधान असलेली शेती भांडवलप्रधान झाल्याने शेतीमधील श्रमशक्तीचा वापर कमी झाला. शेतीत झालेल्या भांडवलशाही विकासामुळे केवळ रोजगारच कमी झाला नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मजुरीचे दरही कमी झाले. आजही मोठया संख्येने शेतमजुरांमध्ये निरक्षरता व अल्पसाक्षरता आहे. तसेच तो संघटित नाही. असंघटित कामगारांचा सर्वात मोठा भाग ग्रामीण भागात राहतो आणि शेती व शेतीवर आधारित उद्योग आणि संबधित उद्योग तसेच ग्रामीण भागात

सार्वजनिक कामे आणि मनरेगा यासारख्या योजनांमध्ये काम करतो. शारिरीक श्रम करणाऱ्या श्रमिकांसाठी संपूर्ण देशात एकसारखा कामगार कायदा नाही. जरी किमान वेतन कायदा, काम करण्याचे तास आणि सामाजिक सुरक्षिततेवरील काही कायदे कागदावर उपस्थित असले तरी त्याचे पालन कले जात नाही. सर्व प्रकारच्या सामाजिक सुरक्षेची खात्री करण्यासाठी कामकाजाचे निश्चित तास, घरे इत्यादी सुविधा शेतमजुरांची नोंदणी आणि सर्व प्रकारच्या ग्रामीण मजुरांची नोंदणी, किमान वेतन, पीएफ, कृषी कामगारासाठी सामाजिक सुरक्षा योजना इत्यादी कृषी कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी २००१ मध्ये सुरू करण्यात येणार होती पण ती केवळ कागदावर बनली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार देशात एकूण २६.३ कोटी लोक शेतीमध्ये गुंतले आहेत त्यापैकी ११.८ कोटी शेतकरी होते आणि १४.४ कोटी शेतमजूर होते. गेल्या १० वर्षात शेतमजुरीचे दर तेच राहीले जे २००० ते २०१० च्या दरम्यान होते तर असे गृहित धरता येते की, शेतमजुरांची संख्या १४.४ कोटी वरून लक्षणीय वाढली असती तर शेतकऱ्यांची संख्या कमी झाली असती. परंतू ग्रामीण भागामध्ये सर्वाधिक लोकसंख्या असूनही शेतमजूरांची दुर्दशा आणि वाईट स्थिती यावर फारशी चर्चा होत नाही.

**शेतमजुर आत्महत्या :**

गेल्या दोन दशकात भारतात ३.५० लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यामध्ये गरीब आणि अल्प उत्पन्न धारक शेतकऱ्यांची संख्या ही मोठी होती. शेतमजुरांच्या आत्महत्येची आकडेवारी २०१३ पर्यंत उपलब्ध नव्हती पण २०१४ पासून शेतमजूरांच्या आत्महत्येची आकडेवारी बघितली तर खूप धक्कादायक आकडेवारी आपल्याला दिसते. सन २०१४ मध्ये ६७५०, सन २०१५ मध्ये ४५९५, सन २०१६ मध्ये ५०१९, सन २०१९ मध्ये ४३२४ शेतमजुरांनी आत्महत्या केली. शेतमजुरांच्या आत्महत्येची आकडेवारी पाहता असे लक्षात येते की, जी राज्ये शेतीमध्ये प्रगत आहेत तिथेच शेतमजुरांच्या सर्वाधिक आत्महत्या होत आहे जिथे शेती अधिक विकसित झाली आहे आणि श्रीमंत शेतकरी भांडवल प्रधान शेतीकडे वळले आहे. अशा आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक आणि पंजाब यासारख्या विकसनशिल शेती करणाऱ्या राज्यातील बहुतेक शेतमजुर तथाकथित हरित क्रांतीच्या काळात बेकार झाल्याचे दिसते. या राज्यांमध्ये शेतमजुरांची सामाजिक आर्थिक दुर्दशा आहे.

**शेतमजुरांची आर्थिक सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना :**

शेतमजुरांची आर्थिक सामाजिक स्थिती सुधारून त्यांना मानाचे जीवन जगता यावे यासाठी अनेक सूचना केल्या जातात. त्यापैकी काही सूचनांवर भारतात अंमलबजावणी झालेली आढळते. यामधील सर्वात महत्वाची सूचना म्हणजे भूदासपद्धती, वेठबिगारी नष्ट करणे. शेतीकडे दुर्लक्ष करण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणामुळे शेतमजुरांच्या परिस्थितीत स्वातंत्र्यपूर्व काळात फारशी सुधारणा अपेक्षित नव्हती. तथापि भारतीय राज्यघटनेने या जुलमी पद्धती त्याज्य ठरविल्या आहेत. शेतावर काम करणाऱ्या शेतमजुराची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. यासोबतच पुढील काही उपाय महत्वाचे आहेत.

**१) कुटिर उद्योगांचा विकास :** ग्रामीण भागात हंगाम संपल्यानंतर तसेच शेतीला पूरक उद्योग म्हणून कुटीर उद्योगांचा विकास झाल्यास शेतमजुरांना गावातच पूर्णवेळ रोजगार प्राप्त होईल.

**२) आर्थिक मदत :**

ग्रामीण भागात शेतमजुरांना वर्षभर रोजगार मिळावा या उद्देशाने रस्ते बांधणे, तलाव खोदणे, तलावाची दुरूस्ती, सामाजिक वनीकरणाची कामे, रोजगार हमीची कामे प्राप्त करून देणे आवश्यक आहे.

**३) शेतमजुरांचा जीवन विमा :**

शेतमजुरांच्या कुटूंबावर संकट आल्यास शेतमजुराच्या कुटूंबाची वाताहत होते ही वाताहत होऊ नये म्हणून शेतमजुरांच्या जीवन विमा काढण्यात यावा.

**४) किमान मजूरी कायदा :**

केंद्रसरकारने १९४८ मध्ये किमान मजूरी कायदा मंजूर केला या काद्यातील तरतुदीनूसार शेतमजुरांना मजुरी दिली जावी.

**५) औद्योगिक विकास :**

देशात शेतमजुरांचे जीवनमान, राहणीमान सुधारावे ह्या उद्देशाने देशात शेतीवर आधारित उद्योगांचा विकास ग्रामीण भागात झाल्यास शेती हंगाम संपल्यानंतर उद्योगांमध्ये शेतमजूरांना काम मिळेल व हंगामी बेकारी, अर्धबेकारी, छुपी बेकारी कमी होईल.

**६) तांत्रिक शिक्षण :**

शेतमजुराचे काम हे कष्टाचे काम आहे त्यांच्यामध्ये तांत्रिक कौशल्याचा अभाव दिसून येतो. शेतमजूरांना तांत्रिक शिक्षण दिल्यास त्यांच्यात विविध कौशल्ये निर्माण होतील व त्यांच्या मजूरीदरात वाढ होवून जीवनमान उंचावेल.

**७) शेतमजूर संघटना :**

शेतमजुरांचे हितसंबंध हे जमीन मालकाच्या विरोधात आहेत असे जमीनमालकाला वाटते त्यामुळे मजुरीचे दर कमीत-कमी ठेवून शेतमजुरांकडून जास्तीत-जास्त काम करून घेतले जाते. शेतमजूरांची संख्या जास्त असूनही औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या मजूरांच्या तुलनेत असंघटितपणा दिसून येतो. असंघटितपणामुळे त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी शेतमजूरांची संघटना स्थापन होण आवश्यक आहे.

**८) शेतीमध्ये सुधारणा :**

शेतीमध्ये वेगवेगळया प्रकारच्या सुधारणा घडवून आणल्यास आणि पिकपद्धतीत बदल करून पिकांची संख्या वाढविल्यास म्हणजेच एकापेक्षा जास्त पिके घेतल्यास शेतमजुरांना वर्षभर रोजगार उपलब्ध होईल.

**९) सुट्टयांची सोय :**

औद्योगिक क्षेत्रात आणि सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार आणि नोकरांना साप्ताहिक सुटी असते शेतमजूरांच्या संदर्भात सुट्टयांची सोय आढळून येत नाही. जे शेतमजूर सालाने किंवा महिन्याने काम करतात त्यांच्यासाठी पगारी सुट्टयांची व्यवस्था करण्यात यावी.

**१०) शेतमजुरांच्या सहकारी संस्था :**

सहकार ही आर्थिकदृष्टया दुर्बल व्यक्तींची संस्था असल्याने परस्परांना मदत करण्यासाठी स्थापन करण्याचे तत्व प्रत्यक्षात आचरणात आणून शेतमजुरांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल व पर्यायाने शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. शेतमजुरांनी स्थापन केलेल्या

संस्थांना सरकारने सरकारी कामाचे वाटप केले तर शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

**समारोप :**

शेतमजुरांच्या समस्येची खरी सोडवणूक शेतीतील सुधारणा, कृषी उद्योगांचा प्रसार, शेतीची लाभप्रदता वाढविणे, शेतीत गुंतवणुक वाढवणे यामुळे होणार आहे. तेव्हा शेतमजूरांना शेतीतच रोजगार मिळेल व रोजगारासाठी त्यांना स्थलांतर करावे लागणार नाही. कोरडवाहू शेतीची उत्पादकता सुधारणे, जलसिंचनाच्या सोयी वाढविणे, ग्रामीण घरबांधणी कार्यक्रम राबविणे अशा कार्यक्रमांनी दिर्घकाळात का होईना शेतमजूरांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ सूची –**

१) देसाई भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.

२) देशमुख प्रभाकर, श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर.

३) Govt. of India, Comp. Report of the National Commission on Rural Labour New Delhi 1991

४) कानेटकर मेघा, भारतीय अर्थव्यवस्थ श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर.

५) कायंदे पाटील गंगाधर, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य प्रकाशन, नाशिक.

६)https://vishwakosh.marathi.gov.in

◆◆◆

# भारतातील युवकांसमोरील बेरोजगारीची समस्या

**समित माहोरे**
सहायक प्राध्यापक,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

कोरोना विषाणूच्या महामारीमुळे भारतासोबतच संपूर्ण जगाला आर्थिक आणि सामाजिक नुकसान सोसावे लागत आहे. जागतिक स्तरावरील विकासाचे विविध निर्देशांक आणि आर्थिक घडामोडींवरून ऋणात्मक किंवा नकारात्मक असलेला वृद्धी दर सहज दिसून येते. या महामारीमुळे विकसित राष्ट्रांना तर झळ बसलेली आहेच. पण, सर्वात जास्त नुकसान निम्न व मध्यम उत्पन्न असणाऱ्या विकसनशील देशांना होत असलेले दिसून येते. भारतामध्येही सकल घरेलू उत्पादन (जीडीपी) ऋणात्मक वाढीच्या दिशेने होत आहे. भारतीय अर्थव्यवस्था महामारीच्या परिणामांपासून सावरण्याचे प्रयत्न करीत असली तरी आपण अजूनही कोविडपूर्व स्थितीवर पोहोचलो नाही. देशात विविध क्षेत्रांचा वृद्धी दर कमी असून बेरोजगारीमध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. दारिद्रयनिर्मूलनासाठी सुरु करण्यात आलेल्या विविध योजनांमुळे कमी झालेले दारिद्र्याचे प्रमाण पुन्हा वाढतांना दिसून येत आहे. या महामारीचे सर्वात जास्त वाईट परिणाम तरुणांवर (१५-२९ वर्षे) होताना दिसून येत आहेत. अतिशय बेरोजगारी, शिक्षणातील अडथळ्यांसोबतच अयशस्वी शिक्षण व्यवस्था अशा तिहेरी आव्हानाचा सामना आजच्या तरुणाईला करावा लागत आहे.

भारत हा जगातील अधिक लोकसंख्या असणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश असून पहिल्या क्रमांकावर येण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. भारतातील एकूण रोजगारापैकी ९० टक्के रोजगाराला कोणतीही प्रभावी सामाजिक सुरक्षा नाही. भारतामध्ये बेरोजगारीचा दर हा जास्त असून २०१६ ते २०१९ या कोरोनापूर्वकाळात त्यामध्ये वाढ होऊन तो ६ टक्के पेक्षाही जास्त असलेला दिसून येतो. २०१९ मध्ये भारतामध्ये एकूण श्रमशक्ती पैकी जवळपास ३० टक्के म्हणजेच ४९० मिलियन लोकसंख्या ही तीस वर्षांपेक्षा कमी वयाची होती. त्याचबरोबर २००० ते २०१६ या काळात भारताचा वृद्धि दर हा जास्त (७ टक्के) राहिलेला आहे आणि त्यानंतर तो कमी होत गेला.

**युवक विकास निर्देशांक :**

युवक विकास निर्देशांक हा जागतिक स्तरावर विकास प्रक्रियेचा एक अभिन्न आणि आवश्यक भाग मानल्या जातो. युवक विकास निर्देशांकाचे योगदान पुढील तीन बाबींकरिता महत्वपूर्ण मानले जाते. प्रथम, अर्थव्यवस्थेमध्ये युवकांची संख्या महत्वपूर्ण असल्यामुळे कोणतेही धोरण ठरवितांना त्यांना असाधारण महत्व देणे आवश्यक आहे.

धोरणकर्त्यांद्वारे त्यांचा लोकसंख्येतील आकार लक्षात घेता विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, मानव विकास निर्देशांकाच्या आधारावर भौगोलिक क्षेत्र आणि इतर वर्गीकरण करणे शक्य होईल. आणि तिसरे म्हणजे, एका विशिष्ट क्षेत्रातील युवा विकासासाठी उपयुक्त असलेल्या कार्यक्रमांना पुरस्कृत केले जाईल.

युवक विकास निर्देशांक हा मानव विकास निर्देशांकाच्या मदतीने काढला जातो. युवकांच्या विशेष हक्क आणि सशक्तीकरणासाठी हा निर्देशांक संयुक्तिक मानल्या जातो. युवक विकास निर्देशांकाचे पाच महत्वपूर्ण आयाम आहेत: आरोग्य, शिक्षण, रोजगार, सुविधा आणि सहभाग आणि प्रत्येक आयामामध्ये विविध निर्देशके आहेत. युवक विकास निर्देशांक हा प्रामुख्याने देशात युवकांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा मोजण्यासाठी तयार केला जातो. भारतासह काही देशांचा युवक विकास निर्देशांक पुढील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १**

**निवडक देशांमधील युवक विकास निर्देशांक**

| अनु. क्र. | देश | युवक विकास निर्देशांकाचे मूल्य | क्रमांक | देशाचे वर्गीकरण |
|---|---|---|---|---|
| १ | सिंगापूर | ०. ८७५ | ०१ | अति उच्च युवक विकास |
| २ | जर्मनी | ०.८३१ | १५ | अति उच्च युवक विकास |
| ३ | जपान | ०.८१६ | २३ | अति उच्च युवक विकास |
| ४ | इंग्लंड | ०.७९३ | ४० | अति उच्च युवक विकास |
| ५ | श्रीलंका | ०.७४७ | ६१ | उच्च युवक विकास |
| ६ | चीन | ०.७४५ | ६२ | उच्च युवक विकास |
| ७ | अमेरिका | ०.७३७ | ६५ | उच्च युवक विकास |
| ८ | नेपाळ | ०.६८९ | ९४ | मध्यम युवक विकास |
| ९ | भारत | ०.६२६ | १२२ | मध्यम युवक विकास |
| १० | बांगलादेश | ०.६१६ | १२६ | मध्यम युवक विकास |

(स्रोत: जागतिक युवक विकास निर्देशांक २०२१

**रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणामध्ये नसलेले (NEET) युवक :**

मागील दशकात कमी होत जाणारा रोजगारीचा दर युवकांच्या दृष्टीने विशेष लक्ष वेधून घेणारा मुद्दा आहे. मागील दशकामध्ये श्रमशक्ती मध्ये युवकांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मंदीमुळे किंवा कमी होत जाणाऱ्या वृद्धी दरामुळे युवकांना रोजगार मिळण्याची शक्यता आणखीच कमी होत चालली आहे. ज्यांना नोकरी मिळत नाही ते बेरोजगार होते आणि श्रम बाजारातून बाहेर पडतात. म्हणूनच जे युवक शिक्षण व्यवस्थेत नाहीत,

किंवा नोकरीच्या शोधाचा अयशस्वी प्रयत्न करीत आहेत किंवा ते इतके निराश झालेले आहेत की रोजगार शोधत नाहीत अशा कार्यकारी वयाच्या युवकांचे परीक्षण करणे अधिक गरजेचे आहे. त्यामुळेच इतर निर्देशांकांपेक्षा रोजगार आणि शिक्षण किंवा प्रशिक्षण यामध्ये नसलेले युवक (Youth Not in Employment, Education and Training, NEET) हा निर्देशांक अधिक योग्य आहे. बेरोजगारीचा दर, कार्यकारी दारिद्र्याचा दर, श्रम शक्ती सहभागिता दर यासारख्ये निर्देशांक युवक आणि संपूर्ण लोकसंख्येकरिता काढले जातात. एनइइटी सारखा संयुक्त निर्देशांक तयार करणे शक्य आहे कारण कार्यकरी वय असलेली लोकसंख्या श्रम शक्तीच्या आत आणि बाहेर अशा दोन्ही ठिकाणी अस्तित्वात असल्याने आणि या दोन्ही आर्थिक प्रक्रियेत युवकांचा समावेश केला जात नाही. एनइइटी (NEET) या निर्देशांकामधे अशा सर्वच युवकांचा समावेश केला जातो जे कोणतेच काम करीत नाहीत किंवा कामाच्या शोधात नाहीत आणि कोणत्याच प्रकारचे शिक्षण वा प्रशिक्षण घेत नाहीत.

एनइइटी (NEET) हा निर्देशांक विकसित देशांमध्ये नियमितपणे काढला जातो आणि आता तो विकसनशील देशांकरिताही तयार केला जात आहे. या निर्देशांकाची दोन्ही विकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये प्रासंगिकता असली तरी त्याच्या संरचनेमध्ये आणि उपयोजनामध्ये फरक आहे. एका विशिष्ट मोठ्या विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होणारे बेरोजगार आणि श्रम शक्तीच्या बाहेरील निष्क्रिय युवक हे विकसित अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळे आहेत. भारतामध्ये नीट (NEET) हा निर्देशांक विकसित करताना पुढील तीन घटकांचा विचार होणे महत्वाचे आहे.

१) श्रमशक्ती सहभागितेमध्ये लिंग अंतर (Gap)- आपल्या देशामध्ये श्रम शक्ती सहभागितेसह अनेक निर्देशांकामध्ये लिंगाधारित अंतर जास्त दिसून येते. विकसित देशांशी तुलना करता हे अंतर खूप जास्त आहे.

२) नीट (NEET) च्या निर्देशांकावर परिणाम करणारा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे आपल्या देशामध्ये असलेली कमकुवत सामाजिक विमा व्यवस्था होय. विकसित देशांशी तुलना करता भारतामध्ये सामाजिक सुरक्षा किंवा विमा व्यवस्था कमकुवत आहे. परिणामी हे देशातील बेरोजगार वर्गावर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकते. सामाजिक सुरक्षा नसल्यामुळे जीवन जगण्यासाठी व्यक्ती मिळेल ते काम कमी मजुरीवर करण्यास तयार होतो.

३) तिसरा आणि महत्त्वाचा घटक म्हणजे आपल्या देशांमध्ये असलेली कमकुवत शिक्षण प्रणाली. शिक्षणाचा स्तर वाढत असला तरीही आज आपल्या देशामध्ये नोकरी शोधण्याच्या अयशस्वी प्रयत्नानंतर शिक्षणामध्ये पुन्हा प्रवेश घेणे कठीण आहे. याचा परिणाम नीट (NEET) च्या निर्देशांकामध्ये होताना दिसून येतो. एकदा शिक्षणामध्ये खंड पडल्यानंतर युवक वर्ग पूर्ण शिक्षणाकरिता किंवा प्रशिक्षणाकरिता परत येत नाही. ही बाब भारतासारख्या विकसनशील देशामध्ये अधिक कठीण होऊन जाते.

**भारतात नीट ची स्थिती :**

नीट दर हा वय समूहाच्या आकाराला नीटच्या संख्येने भागून काढल्या जातो. यामध्ये बेरोजगारीचा दर समाविष्ट असल्यामुळे कार्यरत लोकसंख्येचा समावेश केला जात नाही. भारतामध्ये

मागील दोन दशकाच्या नीटच्या संख्येचा विचार केला तर २००० मध्ये १५-२९ वयोगटातील समूहाकरिता नीटचा दर ३३.५ टक्के होता आणि २०१९ मध्ये तो ३४.२ टक्क्यांपर्यंत वाढला. याच कालावधीमध्ये १५-२४ या वयोगटाकरिता हा दर कमी झाला तर १५-२९ या वयोगटाकरिता वाढलेला दिसून येतो. आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की महिला आणि पुरुषांच्या नीटच्या दरामध्ये फारच तफावत आहे. नीट मधील महिलांचा वाटा हा ८६ टक्के पेक्षा जास्त आहे. हा दर पुरुषांपेक्षा कितीतरी जास्त असल्याचे दिसून येते. महिला आणि पुरुषांकरिता हा दर जरी जास्त असला तरीही मागील दोन दशकात महिलांच्या नीट दरामध्ये सीमांत घट झाली असून पुरुषांकरिता या दरामध्ये मोठयाप्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.

**भारतामध्ये युवकांची लोकसंख्या आणि श्रम शक्ती मध्ये सहभाग :**

**भारत हा युवकांचा देश आहे –**

भारतात एकूण लोकसंख्येमध्ये युवकांचे प्रमाण जरी कमी होत असले तरी जागतिक स्तरावर ते अजूनही सर्वात जास्त आहे. वर्तमान काळात भारत हा अजूनही युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. सद्यस्थितीत भारतात १५-२४ किंवा १५-२९ या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण एकूण लोकसंख्या मध्ये सर्वात जास्त आहे. युवकांच्या लोकसंख्येचे प्रमाण १५-२९ या वयोगटाकरिता २००० मध्ये ४१.१ टक्क्यावरून २०१९ मध्ये ३७.५ टक्क्यांच्या दरम्यान असून याच कालावधीमध्ये १५-२४ या वयोगटाकरिता ते २८.५ टक्क्यांवरून २५.७ टक्के झाले आहे. साधारणतः जागतिक स्तरावर अनेक विकसित अर्थव्यवस्थांमध्ये वृद्धांचे प्रमाण जास्त आणि युवकांच्या समूहाचे प्रमाण कमी आहे. भारतामध्ये युवकांच्या कोणत्याही समूहाचा विचार केला तर त्यांची लोकसंख्या ही जास्त आहे. अर्थव्यवस्थेमध्ये एकूण लोकसंख्येत युवकांच्या आकारमानाचा विचार करता युवकांसंबंधित धोरणांना विशिष्ट धोरणाचा दर्जा दिला पाहिजे. भारतामध्ये १५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या लोकसंख्येचे मध्ये लिंग वितरण आणि प्रवृत्तीही समान असलेली दिसून येते. त्याचबरोबर युवकांच्या गटांमध्ये पुरुषांची संख्या काही प्रमाणात जास्त आहे आणि हे भारताच्या लोकसंख्या संरचनेचे एक वैशिष्ट्य आहे.


**श्रमशक्तीमध्ये युवकांचे प्रमाण :**

कोणत्याही देशाची जास्तीत जास्त लोकसंख्या ही कार्यकारी लोकसंख्या असेल तर त्याचा सकारात्मक परिणाम देशाच्या विकासातून दिसून येतो. भारतामध्ये जास्तीत जास्त लोकसंख्या युवक वर्गात मोडत असली तरी त्यांचे कार्यकारी लोकसंख्येमध्ये असलेले प्रमाण कमी असून ते आणखी कमी होत असल्याचे दिसून येत आहे. उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसून येते की युवक लोकसंख्येचा एकूण लोकसंख्येतून कमी होत जाणारा दर हा एकूण कार्यकारी लोकसंख्येतून कमी होणारा कार्यकारी युवकांच्या दरापेक्षा जास्त आहे. श्रमशक्ती मध्ये या लोकसंख्येचे कमी होणारे प्रमाण याची अनेक कारणे असू शकतात. यामध्ये महत्त्वपूर्ण म्हणजे शाळा सोडणारे तसेच अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणामध्ये या ना त्या कारणाने अडकलेले असतात. त्यामुळे त्यांना बाजारात प्रवेश करण्यास अधिक विलंब होतो. हे युवकांच्या निष्क्रियतेत वाढ होण्याचे एक प्रमुख कारण असू शकते. युवकांच्या समूहाच्या दोन्ही लिंगामध्ये श्रमशक्ती सहभागीतेचा दर कमी

होत असलेला दिसून येतो.

**आलेख क्र. १**

**श्रमशक्तीमध्ये युवकांचा सहभाग आणि बेरोजगारीचा दर**




एकूण लोकसंख्येचा विचार करता भारतामध्ये सर्वच वयोगटांमध्ये श्रमशक्ती सहभागीतेचा दर कमी होत असलेला दिसून येतो. एकूण लोकसंख्येचा विविध स्तरावर विचार करता १५ पेक्षा जास्त वय असणारी लोकसंख्या, १५-२९ या वयोगटातील लोकसंख्या, १५ पेक्षा जास्त वय असणारे पुरुष लोकसंख्या किंवा १५-२९ या वयोगटातील पुरुषांची संख्या या विविध स्तरावर श्रमशक्ती सहभागीतेचा दर कमी होत असलेला दिसून येतो. उच्च बेरोजगारीचा दर म्हणजे सर्व ज्ञात असलेले श्रम बाजाराचे माप आहे आणि याचा प्रसारमाध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. बेरोजगारीचा दर हा उपयोगात आणल्या गेलेल्या श्रमाचे मापन करण्याचे श्रबाजाराचे एक महत्त्वपूर्ण माप आहे. यावरून जे लोक काम करू इच्छितात, परंतु ते धोरणकर्ते तसे करीत नाहीत किंवा करू शकत नाहीत यांच्याकरीता रोजगार निर्माण करण्यांत असलेली अर्थव्यवस्थेची अक्षमता दिसून येते. यामध्ये जे रोजगाराकरिता उपलब्ध आहेत आणि सक्रियतेने कामाची मागणी करीत आहेत यांचाही समावेश केला जातो.

भारतामध्ये बेरोजगारीचा दर झपाट्याने वाढत आहे. बेरोजगारीचा दर वाढण्यामागे सामाजिक आणि भौतिक वृद्धीशी संबंधित अनेक कारणांचा समावेश केला जातो. योग्यतेप्रमाणे काम न मिळणे, किंवा एक विशिष्ट कामाकरिता आवश्यक प्रशिक्षण आणि कौशल्य नसणे, आवश्यक अट सहज (विविध सरकारी योजनांमार्फत) पूर्ण होत नसल्याने युवकांना

नोकरी उपलब्ध होत नाही. एकूण लोकसंख्येमध्ये युवकांचे प्रमाण जरी कमी होत असले तरी ते महत्वपूर्ण आहे. २०१९ मध्ये, देशातील एकूण बेरोजगारी मध्ये ८३.३ टक्के बेरोजगार हे १५ ते २९ या वयोगटातील होते. १५ ते २४ वयोगटातील बेरोजगारीचे प्रमाण ५७.९ टक्के होते. याचा अर्थ असा की ३७.५ कार्यकारीत लोकसंख्येपैकी ८३.३ टक्के लोकसंख्या ही बेरोजगार होती.

पूर्वीच्या वित्तीय आणि आर्थिक संकटाने भारताची स्थिती डगमगलेली असताना यामध्ये, नोटबंदी, जी एस टी यांची भर पडली. याचा परिणाम असा झाला आहे की आज युवक आर्थिकदृष्ट्या खूप कमकुवत झाला आणि अनेक आर्थिक आव्हानांमुळे तरुणांमधील नैराश्य, सरकारवरील अविश्वास, बेरोजगारी यामध्ये वाढ झाली. याला कोविड-१९ च्या महामारीचा देखील अपवाद नाही. कोविड-१९ मुळे युवकांबरोबरच संपूर्ण देशच फार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे.

**कोविड-१९ आणि शिक्षण :**

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार महामारीमुळे युवकांमधील असमानता वाढली असून यामुळे संपूर्ण युवापिढीची उत्पादक क्षमता कमी होण्याची जोखीम वाढली आहे. कोविड-१९ च्या संकटामुळे युवकांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणावर विनाशकारी प्रभाव पडत आहेत. अंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या एका अध्ययनावरून असे स्पष्ट झाले की जगभरात शाळा, विद्यापीठे आणि प्रशिक्षण केंद्र बंद झाल्यामुळे ७० टक्क्यांपेक्षा जास्त शिक्षण घेत असलेले युवक किंवा शिक्षणाशी संबंधित क्षेत्रात काम करीत असलेले युवक प्रभावित झाले आहेत. युवक आणि कोविड-१९ : शिक्षण, अधिकार आणि मानवी कल्याणावर प्रभाव या अहवालानुसार ६५ टक्के युवकांनी असे नमूद केले आहे कि महामारीमुळे ओढवलेल्या लॉकडाउनमुळे वर्ग खोलीत चालणाऱ्या शिक्षणाची जागा ऑनलाइन आणि दूर शिक्षणाने घेतली. परंतु आपल्या देशात ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी आणि देण्यासाठी आवश्यक यंत्रणा प्रभावी नसल्यामुळे विध्यार्थ्यांना कमी ज्ञान मिळाले किंवा त्यांनी कमी अभ्यास केला. अध्ययन आणि प्रशिक्षण सुरू ठेवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना पूर्ण यश येणार नाही तर अर्ध्या लोकांना असे वाटते की त्यांच्या शिक्षणामध्ये आणखी उशीर होईल आणि नऊ टक्के युवकांना ते नापास होतील असे वाटते.

**श्रम शक्तीचा घटता दर :**

श्रमशक्तीमध्ये युवकांचे घटत जाणारे प्रमाण हे शिक्षणाशी संबंधित आहे. भारतातील युवक वर्ग मोठ्या प्रमाणात शिक्षण आणि त्या संबंधित कार्यामध्ये गुंतलेला आहे. मागील वीस वर्षाचा विचार करता, शिक्षणामध्ये युवकांचे नामांकन वाढलेले आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचेही प्रमाण वाढले असून अशिक्षित आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या वर्गामध्ये मोठ्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. म्हणजेच शिक्षणाचा व प्रशिक्षणाचा कालावधी वाढल्यामुळे श्रमशक्तीमध्ये युवकांचे प्रमाण कमी झाले आहे.

दुसऱ्या बाजूने देशातील श्रमशक्ती सहभागितेचा दर ही घटत आहे. सध्या सर्वच स्तरावर श्रमशक्तीचा सहभागिता दर कमी असल्याचे दिसून येते. विशेषता पुरुषांमध्ये मागील काही दशकांत सहभागितेचा दर कमी होत असल्याचे आढळून येते. १५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या गटांमध्ये महिलांकरिता सहभागिता दर पुरुषांपेक्षा अर्धाच

असल्याचे दिसून येते. ही सामान्य स्थिती असून अशीच काहीशी स्थिती युवकांमध्ये दिसून येते. युवक समूहातील पुरुषांमध्ये सहभागितेचा दर घटत असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. महिलांकरिता हा दर अतिशय कमी असून त्यामध्ये सतत घट होत आहे. रोजगार आणि बेरोजगार या दोन्ही स्तरावर महिलांचा सहभाग कमी-कमी होत आहे.

महिलांच्या सहभागिता दरामध्ये होणारी घट म्हणजे महिला ह्या पुरुषांच्या तुलनेत शिक्षणामध्ये जास्त गुंतलेल्या आहेत असा होत नाही. महिलांचा कमी सहभाग म्हणजेच श्रमशक्तीमध्ये महिलांचे कमी योगदान असा होतो. महिलांच्या कमी सहभागाचे प्रमुख कारण सामाजिक आहे. समाजामध्ये त्यांच्यावर अधिक बंधने आहेत, सुरक्षेच्या कारणामुळे त्या सहभागी होत नाहीत त्यामुळे अनेक सामाजिक व्यवहारांमध्ये त्यांचा समावेश मर्यादित असतो.

मागील दोन दशकांच्या आकडेवारीचा विचार करता पुरुषांकरिता श्रम सहभागीतेचा दर २०१२ मध्ये ८३.३ टक्के होता तोच २०१९ पर्यंत ७६.६ टक्क्यांपर्यंत कमी झाला. युवा-पुरुष या गटाकरिता श्रमशक्ती सहभागीतेच्या दराचा विचार करता २००० मध्ये तो ७४.३ टक्के होता तर २०१९ पर्यंत ६१% वर येऊन पोहोचला. याच कालावधीकरिता युवक महिलांच्या सहभागीतेच्या दराचा विचार केला तर तो वीस वर्षांमध्ये ३८ टक्क्यांवरून २४ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. दुसऱ्या बाजूने युवती महिलांकरिता सहभागितेचा दर ३३.५ टक्क्यांवरून १६.४ टक्क्यांपर्यंत कमी झालेला दिसून येतो. म्हणजेच महिलांकरिता दोन्ही वयोगटाच्या समूहांमध्ये अर्ध्यापेक्षा जास्त घट झालेली दिसून येते.

एकूण बेरोजगारी मध्ये युवकांचे प्रमाण अधिक बेरोजगारांच्या सामाजिक आणि भौतिक स्थितीशिवाय, युवकांनी बेरोजगारीमुळे चुकीचे कौशल्य प्राप्त केले आहे, कार्याचा मर्यादित अनुभव, नोकऱ्या बदलण्याची उच्च प्रवृत्ती महत्वाची बाब म्हणजे तरुणांसाठी नोकऱ्या उपलब्ध नसणे यासारख्या अनेक कारणांमुळे युवक समूहामध्ये युवकांच्या बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. अलीकडील एकूण लोकसंख्येमध्ये युवकांचे प्रमाण जरी कमी होण्यास सुरवात झाली असली तरी एकूण लोकसंख्येमध्ये युवकांचे प्रमाण हे महत्वपूर्ण आहे.

औपचारिक व्यावसायिक शिक्षणाची कमतरता, माध्यमिक स्तरावर गळतीचा दर, अपर्याप्त कौशल्य प्रशिक्षण क्षमता, कौशल्याबद्दल नकारात्मक दृष्टीकोन, आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्येही उद्योगासाठी आवश्यक कौशल्यांचा अभाव हे भारतातील श्रमशक्तीच्या कौशल्याचा स्तर निम्न असण्याचे प्रमुख कारण आहे.


खरं तर, बऱ्याच वर्षांपासून, भारत सरकारने नवीन नोकऱ्यांची निर्मिती करण्याकरिता आणि त्या नोकऱ्या करण्यासाठी युवकांना सक्षम बनविण्याकरिता अनेक योजना सुरू केल्या आहेत. यापैकी अलीकडेच सुरु करण्यात आलेली योजना म्हणजे कौशल्य भारत मिशन ही योजना आहे, जी २०२२ पर्यंत विविध सरकारी उपक्रमांद्वारे ४०० दशलक्ष लोकांना प्रशिक्षण देणार आहे. परंतु ह्या सर्वच योजना पूर्णपणे यशस्वी होतातच असे नाही.

१५ पेक्षा जास्त वय असणाऱ्या सरासरी लोकसंख्येमध्ये बेरोजगार हे अधिक शिक्षित आहेत. भारतामध्ये शिक्षणाचे सरासरी वय वाढलेले आहे. शिक्षण पूर्ण करून युवक वर्गाचा बराचसा कालावधी

नोकरी शोधण्यामध्ये निघून जातो. त्यामुळे १५ + लोकसंख्येमध्ये शिक्षित बेरोजगारांचे प्रमाण जास्त आहे. युवकांचे वर्चस्व असलेल्या बेरोजगारांचे हे एक सामान्य वैशिष्ट्य आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे या युवक वर्गाला (श्रीमंत आणि मध्यम वर्गीय) उच्च शिक्षण हे परवडण्यासारखे असून ते आवडीच्या नोकरीकरिता वाट पाहू शकतात. याठिकाणी स्त्रियांचा उल्लेख करणे अधिक योग्य ठरेल. कारण आपल्या देशात शिक्षणामध्ये स्त्रियांचे नामांकन पुरुषांपेक्षा जास्त आहे परंतु नोकरीमध्ये त्यांचा सहभाग कमी असल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांचा वाटा मोठा आहे.

**आलेख क्र. २**

**वय-गटा नुसार भारतातील बेरोजगारीचे प्रमाण**




भारतामध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे हे नाकारता येत नाही. देशामध्ये ज्या प्रमाणात युवकांची संख्या वाढते, कमीत कमी त्याच प्रमाणात रोजगार निर्मिती होणे अपेक्षित असते. अन्यथा बेरोजगारीत वाढ होत जाते. बेरोजगारीचे संदर्भात सेंटर फोर मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी या संस्थेने नुकताच एक अहवाल प्रकाशित केला आहे. या अहवालावरून असे दिसून येते की कोरोना महामारीमुळे ओढवलेल्या लॉकडाऊनमुळे मागील काही महिन्यात देशांत बेरोजगारांची संख्या ३.१८ करोड पर्यंत वाढली असून त्यामध्ये ९५ टक्के संख्या ही २९ वर्षा खालील युवकांची आहे. लॉकडाऊनपूर्वी ही संख्या कमी होती. यामध्ये आणखी महत्त्वाची बाब म्हणजे ३.०३ करोड युवक हे कामाच्या

शोधात असून १.२४ करोड युवक काम शोधून हतबल झाले आहेत. पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या युवकांवर बेरोजगारीमुळे अधिक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

कोविडच्या तिसऱ्या लाटेनंतर अर्थव्यवस्था काहीशी पूर्वपदावर येताना दिसून येत आहे. परंतु रोजगाराच्या बाबतीत युवकांसमोरील समस्या कायम आहेत. देशामध्ये महामारीच्या काळात उत्पन्नातील असमानता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी उद्यमशील तरुणांना उद्योगनिर्मिती करीता पुरेसे भांडवल आणि प्रेरणा मिळत नाही आहे.

**निष्कर्ष :**

भारत हा तरुणांचा देश असून शहरामध्ये तरुणांचे प्रमाण जास्त आहे. मागील काही दशकांमध्ये भारतामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे याचा अर्थ असा होतो की युवकांचे श्रमशक्ती तील प्रमाण त्यांच्या लोकसंख्येतील प्रमाणापेक्षा कमी आहे. भारत हा अधिक श्रमशक्ती असलेला विकसनशील देश आहे. भारतामध्ये श्रमशक्ती मध्ये महिलांच्या सहभागितेचा कमी दर हे एक मोठे आव्हान असून त्याचा परिणाम आर्थिक वृद्धी आणि विकासावर दिसून येतो .

भारतीय अर्थव्यवस्था ही नीटच्या दोन भागांमध्ये विभागली गेली आहे. यामध्ये पहिल्या भागात उच्चशिक्षित श्रीमंत आणि पुरुष यांचा समावेश असुन ज्यांची संख्या फारच कमी आहे म्हणजे ते अल्पसंख्यांक आहे असे म्हणता येईल. दुसऱ्या गटांमध्ये उरलेल्या सर्वच लोकसंख्येचा समावेश केला जातो, यामध्ये कमी शिकलेले गरीब आणि महिलांचा समावेश होतो. त्यामुळे धोरणकर्त्यांनी युवकांचा मोठ्या प्रमाणात श्रम शक्तीमध्ये समावेश कसा करता येईल याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याकरिता नीट च्या तीन घटकांना विशेष महत्त्व दिले गेले पाहिजे जेणेकरून बेरोजगारी सारख्या मोठ्या समस्येचे निवारण करण्यास मदत होईल.

भारतातील तरुणांवर महामारीचा होणारा वाईट परिणाम कमी करण्याकरिता सरकार कडून विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहेत. सरकारने विद्यमान आर्थिक संकटांपासून युवकांना वाचविण्याबरोबरच लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या दीर्घकालीन समस्येला नियंत्रित करणे अधिक गरजेचे आहे.

**संदर्भ :**


1. ILO (2021), Research Brief- Young Persons not in Employment and Education in India: 2000-19, International Labour Organization, Geneva, Switzerland.
2. CMIE (2021), Unemployment in India: - Statistical Profile, May--ugust, Centre for Monitoring Indian Economy, Mumbai.
3. Basu, Deepankar (2018), -An approach to the Problem of Employment in India, Centre for Sustainable Employment, - Azim Premji University.
4. GOI,(2022), Economic Survey 2021-22, Ministry of Finance, Govt. of India.
5. Lone, B.- (2018), Youth Unemployment in India: -Analysis. International Journal of Research in Social Sciences, Vol. 8 Issue 3, March.
6. Commonwealth Secretariat (2021), Global Youth Development Report 2020, Commonwealth Secretariat, London.


◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे आर्थिक अध्ययन

**लेखक : गजानन गंगा भारती**

(प्रकाशक : कॉम्प्युटर नेटवर्क, ३३, आई. टी. आई.कॉलनी, अमरावती किंमत ३५०/-, पृष्ठसंख्या २४०,
प्रकाशन वर्ष १५ ऑगस्ट, २०२०)

**कुमुदिनी जोगी,** सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, जगदंब महाविद्यालय ,अचलपूर

ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे आर्थिक अध्ययन हा डॉ.गजानन गंगा भारती यांचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. डॉ. भारती यांनी आचार्य पदवी करीता सादर केलेल्या प्रबंधामधे अनुरूप बदल करून आपले महत्वपूर्ण संशोधन वाचकांसाठी पुस्तकरूपाने उपलब्ध करून दिले.याबद्दल मी सर्वप्रथम त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करते. पुस्तकामधे एकूण सात प्रकरणांसह शेवटी संदर्भसूची दिलेली आहे. पुस्तकाची मुखपृष्ठ रचना ही पुस्तकाच्या शीर्षकाला समर्पक असून आतील आशयाच्या गांभीर्याची कल्पना देणारी आहे.पुस्तकाच्या मलपृष्ठावर लेखकाचा संक्षिप्त परिचय दिलेला आहे. पुस्तकाला गुरूवर्य डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांची प्रस्तावना लाभलेली आहे. मानवी जीवनावर थेट परिणाम करणाऱ्या गंभीर समस्यांची उकल करून त्यावर उपाय शोधण्याकरिता आपल्या संशोधक विद्यार्थ्याला उद्युक्त करण्याचा भाव प्रस्तावनेतून प्रतीत होतो. विषेषत: ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासन आणि जनता यांच्या भागीदारीचा उहापोह करण्याच्या हेतूने सदर संशोधन विषयाची निवड केल्याची भावना आपल्या मनोगतातून लेखकाने उदघृत केली आहे.

पुस्तकाच्या पहील्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना करतांना भारतात १९५५ ते १९९० या ३५ वर्षाच्या काळात पाण्याची दरडोई उपलब्धता ५३ प्रतीशतने कमी झालेली असून २०२५ पर्यंत ता ७२ प्रतीशतने कमी होईल असे अनुमान व्यक्त केले आहे. १९९१ पासून शिथीलीकरणाच्या नव्या युगात पिण्याच्या पाण्याकडे किंमत आकारलेली वस्तू किंवा वापरकर्त्याने पैसे मोजून विकत घ्यावी अशी वस्तू म्हणून पाहीले जाऊ लागले आहे. गुणवत्तापुर्ण पिण्याचे पाणी मिळणे काळाची गरज मानली आहे.तसेच संशोधन विषयाचे स्वरूप व महत्व, गृहीत तत्वे, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन पध्दती तथ्य संकलनाबाबत विवेचन सदर प्रकरणात केलेले आहे.

दुसऱ्या प्रकरणामधे जीवनासाठी अत्यावश्यक असणाऱ्या पाण्याकरिता महाराष्ट्रातील महीलांना अजूनही मोठा संघर्ष करावा लागतो ही बाब केवळ कमी पाण्याची नसते, तर कमी असते ती न्यायाची असे विषद करतांनाच आता ठोस, कठोर व कायम स्वरूपी उपाय करण्याची गरज लेखकांनी प्रतीपादीत केली आहे. पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणामधे अमरावती जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,प्राप्ती आणि खर्चाचा विचार केला आहे. जिल्ह्याचा ७५ प्रतीशत भूभाग

पाणी झिरपण्यास कठीण अशा डेक्कन बेसॉल्ट खडकाने व्यापलेला असून २५ प्रतीशत भाग गाळाच्या जमिनीने व्यापलेला आहे. तसेच विविध कारणांच्या एकत्रित परिणामाने जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ऑक्टोबर ते जून या कालावधीत पिण्याच्या पाण्याची टंचाई असते अशाप्रकारचे अभ्यासपुर्ण विवेचन व्दितिय समंकांच्या आधारे लेखकांनी केलेले आहे.

नमुना खेड्यातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या चवथ्या प्रकरणात अमरावती जिल्ह्यातील एकूण २१ खेड्यांतील प्रत्यक्ष वैयक्तीक पातळीवर व्यष्टी व समष्टी पध्दतीने प्राथमिक समंक संकलित करून त्याची मीमांसा केली आहे. नमुना खेड्यांतील सरासरी ७९.८६ प्रतिशत खेड्यांना स्वतंत्र नळ योजनेव्दारे पाणी पुरवठा केला जातो मात्र पुरवठ्यात अनियमितता असल्याचे निदर्शनास येते.७ तालुक्यातील नळ असणाऱ्या कुटुंबांचे सरासरी प्रमाण ३६.१४ प्रतिशत आहे तर नळापासून वंचीत असणाऱ्या कुटुंबांचे सरासरी प्रमाण ६३.८६ प्रतिशत आहे.याचाच अर्थ जवळपास ६४ प्रतिशत कुटुंब पिण्याच्या पाण्याच्या शाश्वत व सुरक्षित स्त्रोतांपासून वंचीत आहेत ही बाब ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येची गंभीरता स्पष्ट करते.तसेच नळाव्दारे होणारा पाणी पुरवठा ऑक्टोबर ते जुलै महीन्यांमधे ४ ते ५ दिवस आड होतो त्यातही ग्रामीण भागात पाणी साठवणूकीची साधने फारच कमी उपलब्ध असल्याने ग्रामीण जीवनात उत्पन्नापेक्षा पाण्याला महत्व प्राप्त होते.

शासकीय जलधोरण या सहाव्या प्रकरणामधे लेखकाने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासन आणि जनता यांच्यातील भागीदारीतील शासनाच्या बाजूचा विचार केल्याचे दिसून येते. पिण्याच्या पाणी विषयक धोरणाची व समिक्षांची प्रकीया केवळ शासन वा शासकीय अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत ठेवून चालणार नाही, तर त्यात अत्यंत सघन आणि अर्थपूर्ण असा लोकसहभाग असणे गरजेचे आहे. तसेच जलधोरणाच्या समीक्षा आणि फेर आखणीत जलस्त्रोतावरच्या सामुदायिक हक्कांना अधोरेखित करणे आणि जुन्या जलधोरणातील पाणी वापराचा त्रुटीयुक्त प्राधान्यक्रम बदलणे या दोन बाबी सर्वात महत्वाच्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे जलधोरण देशपातळीवरील इतर राज्यांच्या तुलनेत सरस आहे ह्या विचाराचे प्रतिपादन करतांना ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्ये संदर्भातील भविष्यातील चित्र सकारात्मक असेल असा लेखकाचा दृष्टीकोन इथे प्रतीत होतो जो त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो. पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्या संदर्भातील समस्या आणि उपायांचा उहापोह केलेला आहे. शासकीय व प्रशासकीय, नैसर्गिक घटकांकडून उद्‌भवणाऱ्या आणि मानवनिर्मित अशा तीन पातळ्यांवर समस्या आणि उपायांची मांडणी केलेली आहे.तसेच शेवटी गृहीत तत्वांची पडताळणी केलेली आहे. संदर्भांकीत संशोधन समस्येकरिता जी गृहीततत्वे लेखकाने घेतली होती ती सर्वच अध्ययनाअंती सिध्द झाल्याचे पडताळणीतून दिसून येते. जीवनासाठी अत्यावश्यक असणाऱ्या पाण्याकरिता महाराष्ट्रातील महिलांना अजूनही मोठा संर्घष करावा लागतो ही बाब केवळ कमी पाण्याची नसते तर कमी असते ती सामाजिक न्यायाची. ग्रामीण भागात पाणी साठवणूकीची साधने फारच कमी उपलब्ध असल्याने ग्रामीण जीवनात

उत्पन्नापेक्षा पाण्याला महत्व प्राप्त होते.यासारख्या विधानांमधून रूढ विचारांच्या पलीकडचा विचार करण्याची लेखकाची शैली विदित होते. ही बाब नक्कीच वाखाण्यायोग्य आहे. पुस्तकाच्या शेवटी संदर्भ सूची दिलेली आहे जी लेखकाच्या संशोधन विषया संदर्भातील अध्ययनाची व्याप्ती व खोली प्रदर्शित करते.

सदर पुस्तक पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याच्या बाबतीत अध्ययनकर्त्यांना अत्यंत उपयुक्त आहेच तसेच पाणी हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याने हे पुस्तक सामान्य वाचकालाही उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा आहे. याकरीता लेखकाचे पुनश्च मन:पूर्वक अभिनंदन करते आणि असेच दर्जेदार लेखन त्यांच्याकडून भविष्यात व्हावे याकरीता शुभेच्छा देते.

◆◆◆

## भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि अमरावती येथे संपन्न झालेल्या ....
## विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत

(२०१९ - २०)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४४ वे वार्षिक अधिवेशन दि १ व २ फेब्रुवारी २०२० (शनिवार व रविवार) रोजी भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती येथे संपन्न झाले. उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्ष मा. डॉ. रमेश बिजवे हे होते. ४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षा मा.डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, पुण्यश्रोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ह्या होत्या. उद्‌घाटक मा.डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक भारतीय महाविद्यालय, मोर्शीचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे यांनी केला, परिषदेचे प्रास्ताविक व माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी दिली. अधिवेशनाचे रितसर उद्घाटन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. या कार्यक्रमात 'अर्थमीमांसा' शोध पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच, 'अर्थभारती' या ४४ व्या वार्षिक अधिवेशन विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. 'लोकसंख्या शास्त्र' लेखक डॉ. करमसिंग राजपूत व 'सूक्ष्म अर्थशास्त्राचे सिद्धांत' लेखक डॉ. ज्योती पांडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन देखील करण्यात आले. ४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी 'विदेशी नीती : भारतीय आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध' या विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण दिले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रमेश बिजवे यांनी मार्गदर्शनपर भाषण दिले. या कार्यक्रमाला संस्थेचे सरचिटणीस श्री. यदुराज मेटकर, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. राजेन्द्र भांडवलकर, उपाध्यक्ष डॉ. राजेश बुरंगे, कार्याध्यक्ष डॉ. निवत्ती पिस्तुलकर, परिषदेचे दोन्ही सचिव डॉ. राजेश चव्हाण व डॉ. विठ्ठल घिनमिने, स्थानिक कार्यवाह डॉ, लाजवंती टेंभुर्णे उपस्थित होते. तसेच परिषदेचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉ. चिंचमलातपुरे यांनी केले व शेवटी पसायदान होऊन उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न झाला .

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या चर्चासत्रात 'जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश' या विषयावरील संशोधन निबंधांचे वाचन करण्यात आले व त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली. ह्या चर्चासत्राच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या तर सत्राध्यक्ष डॉ. दिपक श्रृंगारे, सूत्र संचालक डॉ. धिरज कदम, वृत्त संकलन प्रा. रविन्द्र शेंडे यांनी केले. या विषयावर एकूण नऊ शोधनिबंध वाचण्यात आलेत व या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. ढवळी सर यांनी केले

चहापानानंतर दुसऱ्या सत्रात 'वर्तमान काळात भारतातील रोजगारीचे बदलते स्वरूप ' या विषयावर चर्चासत्र झाले या सत्रात सत्राध्यक्ष डॉ. जे.व्ही.गायकवाड होते. वृत्त लेखक डॉ.समीत माहोरे

व सूत्रसंचालन डॉ. संजय कोठारी यांनी केले. या विषयावर एकूण नऊ संशोधन पेपर वाचन करण्यात आले व इतर सदस्यांनी चर्चेत सहभाग नोंदविला. आभार प्रदर्शन डॉ. पंकज तायडे यांनी केले.

अधिवेशनाच्या निमित्याने घेण्यात येणारे 'डॉ.नाणेकर पिंपरकर स्मृती व्याख्यानमालेचे' वक्ते प्राचार्य डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांनी 'आदिवासी साहित्य, संस्कृती व समाज' या विषयावर सखोल अभ्यासपूर्ण व्याख्यान दिलेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. प्रास्ताविक व परिचय डॉ.राजेश चव्हाण यांनी केला तर, सूत्रसंचालन डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले.

पहिल्या दिवशी संध्याकाळी ६.०० वाजता विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची ४४ वी वार्षिक सर्व साधारण सभा डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आमसभेच्या सुरुवातीला दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरु झाले . मागील सभेचे इतिवृत्र वाचून कायम केले. मागील आर्थिक वर्षाच्या परिषदेचा व अर्थमीमांसेचा हिशेब सादर करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली .

पुढील ४५ व्या वार्षिक अधिवेनाकरिता -

१) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रादेशिक गटाचा उदय

२) भारतातील हवामान बदल, परिणाम व उपाय

३) विदर्भातील राष्ट्रीय पेयजल योजना (जिल्हानिहाय)

हे तीन विषय निश्चित करण्यात आलेत

४५ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता अध्यक्ष म्हणून डॉ. विनोद गांवडे व उपाध्यक्ष म्हणून डॉ. प्राची देशपांडे यांची निवड करण्यात आली .

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रामध्ये 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' ह्या उपक्रमाचे आठवे पुष्प डॉ. आर. वाय. माहोरे यांनी 'अभिजीत बॅनर्जी व एस्टर डफ्लो यांचे आर्थिक विचार' या ग्रंथावर अभ्यासपूर्ण भाषण दिले. या सत्राच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी प्रास्ताविक केले व सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. उषा पाटील यांनी केले.

दुसऱ्या दिवशी, दुसऱ्या सत्रात 'विदर्भातील जिल्हा नियोजन व विकास मंडळ कार्याचा आढावा' ( जिल्हा निहाय ) या विषयावरील सत्राच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. सत्राध्यक्ष डॉ. राजू श्रीरामे, सूत्र संचालन डॉ. दिलीप गुर्जर व वृत्त संकलन डॉ. लांजेवार यांनी केले तसेच २०२०-२१ चे अंदाजपत्रक या विषयावर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी आपले विचार व्यक्त केले आणि हे अंदाजपत्रक कशा प्रकारे दिशादर्शक आहे ह्याची माहिती दिली यानंतर अध्यक्षीय भाषणानंतर हे सत्र संपन्न झाले.

अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस ह्या होत्या. प्रमुख उपस्थितीत श्री. सुखदेवराव राऊत, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे, संस्थेचे पदाधिकारी, परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर नव नियुक्त अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे, उपाध्यक्षा डॉ. प्राची देशपांडे परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ अंजली कुलकर्णी, डॉ.आर. वाय. माहोरे , डॉ. दि.व्यं.जहागिरदार, डॉ. मुक्ता जहागिरदार, डॉ. वनिता चोरे, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संतोष कुटे, परिषदेचे सचिव डॉ. राजेश चव्हाण व डॉ. विठ्ठल घिनमिने, स्थानिक कार्यवाहक डॉ. लाजवंती टेंभूर्णे व सर्व सदस्य उपस्थितीत होते. या

कार्यक्रमात पीएच्. डी. प्राप्त व विशेष प्राविण्यप्राप्त करणाऱ्या सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .

अधिवेशनात सादर झालेल्या उत्कृष्ट शोधनिबंधास परिषदे तर्फे डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ.दि.व्यं.जहागिरदार प्रोत्साहन पर रोख पारितोषिक डॉ. दिपाली पडोळे व प्रा. माधुरी लेले यांना विभागून देण्यात आले. तर स्व. मोतीरामजी हनवंते स्मृती पारितोषिक विभागून डॉ.विठ्ठल घिनमिने व डॉ. सिद्धार्थ मेश्राम यांना देण्यात आले. अर्थमीमांसा जुलै-डिसें २०१९, जाने.-जुलै २०२० चे अंकातील कै. श्री. आ. देशंपाडे उत्कृष्ठ लेख पुरस्कार विभागून डॉ. समीत माहोरे व डॉ. राजश्री रायभोग यांना देण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष डॉ. विनोद गावंडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला . यावेळी परिषदेच्या सदस्यांनी दोन दिवसीय अधिवेशनाचे उत्तम आयोजन झाल्या बाबत समाधान व्यक्त केले. परिषदेचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पत्रकार व संचालक मंडळ तसेच ज्यांचे सहकार्य अधिवेशनासाठी लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. त्यानंतर परिषदेच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर केले

**राजेश चव्हाण** **विठ्ठल घिनमिने**
सचिव
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

---

## अर्थशास्त्र प्रबोधन मंडळ, यवतमाळ
## अर्थशास्त्र विषयाच्या राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन

अर्थशास्त्र प्रबोधन मंडळ यवतमाळ व बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळचे संयुक्त विद्यमाने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन दि. १ डिसेंबर २०१९ रोजी बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ येथे करण्यात आले. मा. श्री विनायकराव दाते (अध्यक्ष, वाणिज्य महाविद्यालय ट्रस्ट, यवतमाळ) याचे अध्यक्षते खाली मा. डॉ. मृणालीनी फडणवीस (कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर) यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले तसेच नुकतेच स्थापन करण्यात आलेले अर्थशास्त्र प्रबोधन मंडळ यवतमाळ यांच्या कार्यकारीणीचे उद्घाटन करण्यात आले. यात प्रा. डॉ. रामदास बापुराव भांडवलकर-अध्यक्ष, प्रा. डॉ. निवृत्ती आत्माराम पिस्तुलकर-उपाध्यक्ष, प्रा. डॉ. संजय बाबुराव राचलवार-सचिव, प्रा. डॉ. दिपक भाष्करराव कुटे-कोषाध्यक्ष तर प्रा.डॉ.सौ. प्रतिभा संजय काळमेघ, प्रा. डॉ. कमरसिंग रामसिंग राजपुत, प्रा. डॉ. नागोराव कोंडबाजी सोरे, प्रा. शैलेंद्र दविदास तेलंग, प्रा. अजय विलासराव तगलपल्लेवार, प्रा. डॉ. आनंद पांडुरंग वडोळे आणि प्रा. गजानन अश्रुजी रहाटे यांना सदस्य हे पद देण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने अर्थशास्त्र विषयाच्या राज्य स्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाचे बीजभाषक म्हणून जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांचे ''मंदी निवारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील उपाय'' या विषयावर व्याखान झाले. तसेच विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व माजी अध्यक्षांचा सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्य यथोचित सत्कार अर्थशास्त्र प्रबोधन मंडळाच्या वतीने करण्यात आला. या प्रसंगी नामवंत अर्थतज्ञ डॉ. दि. व्यं. जहागिरदार व प्रभारी प्राचार्य डॉ. माणिक मेहरे हे प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. माणिक ठिकरे लिखित 'कृषी अर्थशास्त्र' या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी या परिसंवादात विचार मांडताना अर्थव्यवस्थेतील बहुसंख्य ग्राहक असलेल्या ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात वाढ होणाऱ्या विकासात्मक योजनांवर खर्च केला जात नाही तोपर्यंत अर्थव्यवस्थेला अपेक्षित ऊर्जितावस्था निर्माण होऊन मंदी सदृश्य परिस्थिती दूर होऊ शकणार नाही असे मत व्यक्त केले. तर कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनीही या विषयावर आपले विचार मांडताना ग्रामीण

अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे हा या समस्येवरील उपाय आहे असे मत व्यक्त केले. डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा वैभवशाली इतिहास मांडला. या परिषदेचे १० वे वार्षिक अधिवेशन याच महाविद्यालयात घेण्यात आले आणि सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम आयोजित करण्याचा बहुमान ही मिळाल्याबद्दल व्यवस्थापक मंडळाचे व अर्थशास्त्र प्रबोधन मंडळाचे कौतुक करून प्रबोधन मंडळाच्या कार्याला शुभेच्या दिल्या. अध्यक्षीय भाषणातून विनायक दाते यांनी अर्थव्यवस्थेची वास्तववादी स्थिती मंदी सदृश्य खरोखरच आहे काय असे मत व्यक्त करून या राज्यस्तरीय परिसंवादातून वर्तमान स्थितीचे आकलन होण्याचा दृष्टीने विचारात घेतलेले विषय निश्चितच मार्गदर्शक ठरणार आहेत असा आशावाद व्यक्त केला.

तत्पूर्वी मा. कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांना महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेटच्या वतीने लेफ्टनंट प्रा. प्रशांत बागडे यांचे नेतृत्वात गार्ड ऑफ ऑनर देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र भांडवलकर, तर मनोगत विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. निवृत्ती पिस्तुलकर यांनी केले. सूत्र संचलन डॉ. प्रतिभा काळमेघ व आभार प्रदर्शन प्रा विनोद तलांडे यांनी केले.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात ''नोबेल पारितोषीक प्राप्त अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार'' या विषयावर मा. डॉ. आर. वाय. माहोरे (अध्यक्ष, अर्थशास्त्र मराठी परिषद) यांच्या अध्यक्षतेखाली वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे सदस्य तथा सिनेट सदस्य प्रा. विवेक देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत मा. डॉ. दि. व्यं. जहागिरदार (नामवंत अर्थतज्ञ तथा संचालक, कौटिल्य ज्ञान प्रबोधीनी अमरावती) यांचे भाषण आयोजीत करण्यात आले. जागतिक स्तरावरील दारिद्र्याचा वास्तववादी अभ्यास अभिजित बेनर्जी यांनी केला असून त्यांचे आर्थिक विचार भारतीय परिपेक्षाच्या संदर्भात कितपत लागू पडतात यावर विस्तृत प्रकाश टाकला.

या सत्राचे सूत्र संचलन प्रा. गजानन रहाटे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अजय तगलपल्लेवार यांनी केले. या राज्यस्तरीय परिसंवादात विविध विद्यापीठातील वाणिज्य व अर्थशास्त्राचे प्राध्यापक, प्राचार्य, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे उपाध्यक्ष सतीश फाटक, विश्वस्त, विद्यापीठ प्राधीकरणावरील सदस्य, पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद व कर्मचारी उपस्थित होते. अर्थशास्त्र प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष डॉ भांडवलकर व प्रभारी प्राचार्य डॉ माणिक मेहरे यांचे मार्गदर्शनात संयोजक प्रा. विनोद तलांडे व प्रबोधन मंडळाचे सचिव डॉ. संजय राचलवार यांनी या कार्यक्रमाची तयारी केली.

◆◆◆

# व्ही. एम. व्ही. कॉमर्स, जे. एम. टी. आर्टस आणि जे. जे. पी. विज्ञान महाविद्यालय नागपूर आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद दोघांच्याही सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त्य आयोजीत एक दिवसीय परिसंवाद

बुधवार दि. ४ सप्टेंबर २०१९ रोजी व्ही. एम. व्ही. कॉमर्स, जे. एम. टी. आर्टस आणि जे. जे. पी. विज्ञान महाविद्यालय नागपूर आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद या दोन्ही संस्थांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त्य अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ''उत्पन्न हस्तांतरण आणि भारतीय अर्थव्यवस्था'' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद आयोजीत करण्यात आला होता.

नागपूर गुजराथी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्री. चन्द्रकान्त भाई ठाकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाचे प्र. कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित होत्या. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. योगेशभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. पी. कारिया यांच्या प्रास्ताविकपर भाषणाने कार्यक्रमाची सुरवात झाली. उद्‌घाटनपर कार्यक्रमाचे संचालन डॉ. शुचिस्मिता मिश्रा यांनी केले. तर आभार प्रदर्शन परिसंवादाचे आयोजक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. श्रध्दा गावंडे यांनी केले.

प्रथम चर्चासत्राचे प्रमुख वक्ते अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले होते. आणि चर्चासत्राचे अध्यक्षीय भाषण मा. डॉ. अंजली कुळकर्णी हयांनी केले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्राची देशपांडे हयांनी केले.

दुसऱ्या चर्चासत्राच्या प्रमुख वक्ता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. तर या चर्चासत्राचे अध्यक्षपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. स्नेहा देशपांडे यांनी भूषविले.

समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी भूषविले आणि आभार प्रदर्शन सचिव प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन समन्वयक प्रा. डॉ. श्रध्दा गावंडे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील तसेच इतर महाविद्यालयातील अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाचे अनेक प्राध्यापक व अभ्यासक उपस्थित होते. त्यांनी चर्चेत सहभाग घेतला तसेच महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील २९० विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमानंतर सहभागी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

◆◆◆

# श्री शिवाजी महाविद्यालय, राजुरा आणि प्रभाकरराव मागुलकर महाविद्यालय, कोरपना संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, राजुरा व्दारा संचालित श्री शिवाजी महाविद्यालय, राजुरा आणि प्रभाकरराव मामुलकर महाविद्यालय,कोरपना यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन ''कृषी आणि ग्रामीण विकास : आव्हाने व उपाय'' या विषयावर संस्थेचे कार्याध्यक्ष श्री सुधाकरराव कुंदोजवार यांच्या अध्यक्षतेखाली एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे दिनांक ९ डिसेंबर २०१९ रोजी आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रात शेतकऱ्यांच्या विविध समस्येच्या ज्वलंत प्रश्नावर अनेक अर्थतज्ञ मान्यवरांच्या मार्गदर्शनातून सखोल मंथन करण्यात आले.

शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ज्या देशातील शेतकरी श्रीमंत असतो, त्या राष्ट्राची गणना श्रीमंतामध्ये होते. भारतात मात्र मोठया प्रमाणात शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात. अशा विपरीत परीस्थितीतुन शेतकऱ्यांना बाहेर काढण्याकरीता शासनाकडून योग्य व ठोस उपाययोजनाच्या अंमलबजावणीची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन राष्ट्रीय चर्चासत्राला संबोधित करतांना सुप्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी आपल्या बीजभाषणातून करत शेतकऱ्यांच्या समस्येचे वास्तव व शासनाच्या कृषीविषयक चुकीच्या धोरणावर प्रकाश टाकला. या चर्चासत्राचे प्रमुख अतिथी हैदराबादचे प्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. एन.के. शर्मा यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे महत्व विशद केले. चर्चासत्राच्या विविध सत्रामध्ये डॉ. नियाज अन्सारी (मध्यप्रदेश), डॉ.करमसिंग राजपूत ''शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना'' डॉ. श्रीकांत मुकारे यांनी ''ग्रामीण विकासात तंत्रज्ञानाची भूमिका'' डॉ.आर.बी. भांडवलकर यांनी ''जागतिकिकरणाचा कृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम'' अशा विविधांगी पैलूवर तज्ञ मान्यवरांनी अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक विचाराने चर्चासत्राला संबोधित केले.

या चर्चासत्रात एकूण १०९ संशोधकांनी आपले दर्जेदार शोधनिबंध व लेख सादर केले. सर्व शोधपत्र चार खंडात प्रकाशित करण्यात आले. या चर्चासत्राला महाराट्र तसेच देशभरातील नामवंत अर्थतज्ञ प्राध्यापक, तरूण संशोधक व स्थानिक अभ्यासु विचारवंत विद्यार्थी व शेतकरी वर्गानी मोठया प्रमाणात आपली उपस्थिती दर्शविली. अशाप्रकारे या चर्चासत्राचे आयोजक श्री शिवाजी महाविद्यालय, राजुराचे प्राचार्य डॉ.एस.एम.वारकड व प्रभाकरराव मामुलकर महाविद्यालय, कोरपनाचे प्राचार्य डॉ. टी.सी.जोसेफ तसेच संयोजक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ विशाल मालेकार व प्रा. नागनाथ मनुरे यांच्या कुशल नियोजनातुन हे राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वीपणे संपन्न झाले.

◆◆◆

**जगदंब महाविद्यालय, अचलपूर**

**अर्थशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**एक दिवशीय राज्यस्तरीय परिसंवाद**

**महाराष्ट्रातील ओला दुष्काळ – स्वरुप,परिणाम आणि उपाययोजना**

श्री जगदंब विणकर शिक्षण संस्था, अचलपूर व्दारा संचालित जगदंब महाविद्यालय, अचलपूरच्या अर्थशास्त्र विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'महाराष्ट्रातील ओला दुष्काळ –स्वरुप, परिणाम आणि उपाययोजना' या अत्यंत महत्वाच्या विषयावर विद्यार्थ्यांमधे व पर्यायाने समाजामधे जाणिव जागृती करण्याच्या उद्देशाने दिनांक ३ जानेवारी २०२० रोजी राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.या परिसंवादामधे ९७ विद्यार्थ्यासह महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद तथा जगदंब महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद अशा एकूण १५० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदविला होता.

पाहुण्याच्या आगमनानंतर दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने परिसंवादाची सुरूवात करण्यात आली. तद्नंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.जी. रोहणकर यांनी परिसंवादाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट करीत असतांना महाराष्ट्रातील ओला दुष्काळ–स्वरुप, परिणाम आणि उपाययोजना या विषयी समाजात जाणिव जागृतीची गरज प्रतिपादन केली.तसेच विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने या अत्यंत संवेदनशील विषयावर चर्चा घडवून आणण्यासाठी संधी महाविद्यालयाला उपलब्ध करून दिल्यावद्दल परिषदेचे आभार मानले.त्यानंतर डॉ.मुकुंद दातीर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, ज.म.वि. यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करुन दिला.

प्रा. डॉ. वनिता चोरे, सहयोगी प्राध्यापक कै.एन. ए.देशमुख महाविद्यालय, चांदुर बाजार यांनी महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळाचे स्वरुप स्पष्ट करीत असतांना असे प्रतिपादन केले की, हवामान बदल, महाचक्रीवादळ, क्यार वारे, आधुनिक तंत्रज्ञानाचा विकासामधे मोठ्या प्रमाणात वापर, पर्यावरणातील बदल, विकासाची बदलती व्यूहरचना, कार्बनडाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण या सर्वांच्या परिणामामूळे मान्सुनची प्रतिकूलता व त्यामुळे कोरडा किंवा ओला दुष्काळ पडतो. महाराष्ट्र राज्याच्या ३२५ तालुक्यांना ओल्या दुष्काळाचा तडाखा बसला आहे आणि ९० प्रतिशत अवकाळी झालेल्या पावसामुळे महाराष्ट्रात बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थकारणाला मोठी झळ पोहचली आहे.

प्रा. डॉ. जयराम गायकवाड , सहयोगी प्राध्यापक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांनी ओल्या दुष्काळाचे परिणाम स्पष्ट करीत असतांना असे प्रतिपादन केले की, ओल्या दुष्काळाने देशाच्या अर्थव्यवस्थेवर आर्थिक, सामाजिक, राजकीय परिणाम होत असल्याचे निदर्शनास येते.शेती कृषिधारीत उद्योग, ग्रामीण अर्थव्यवस्था, स्थलांतरण, जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत वाढ, बँकेचे व्यवहार ठप्प होणे,

अन्न सुरक्षितता धोक्यात येणे, बेकारी वाढणे, एकूण आर्थिक विकासाला खीळ बसणे, गुराढोरांवर होणारे परिणाम इत्यादी विपरित परिणाम होतात. ओल्या दुष्काळावरील उपाययोजना विशद करतांना प्रा. डॉ.आर.बी. भांडवलकर, सहयोगी प्राध्यापक अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ यांनी असे प्रतिपादन केले की, दुष्काळ हा निसर्ग निर्मित असला तरी त्यापासून पोहचणारी झळ मानवनिर्मित आहे. विविध पूर्वसुरींच्या विचारांचा परामर्ष घेत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जलव्यवस्थापनाचे दाखले दिले.तसेच चितळे आयोग, डॉ.विलास सपकाळ यांच्या सब सरफेस डॅमची संकल्पना , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नद्याजोड प्रकल्पाची योजना इत्यादीचा उपाययोजनांच्या संदर्भात आढावा घेतला.

त्यानंतर विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे विद्यमान कार्याध्यक्ष प्रा. डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने परिषदेची भुमिका विषद केली तथा या अत्यंत ज्वलंत व महत्वाच्या विषयावर महाविद्यालयाने चर्चासत्र आयोजीत केल्याबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले.वक्तांच्या महाराष्ट्रातील ओल्या दुष्काळावरील सर्वांगीण, सविस्तर विवेचनानंतर चर्चासत्राचे अध्यक्ष मा.डॉ. दि.व्यं. जहागिरदार, अध्यक्ष कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती यांनी अभ्यासपुर्ण वक्तव्यातून विषयाची प्रासंगिकता स्पष्ट करीत चर्चासत्राला कळस चढविला. पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड व संगोपन तथा साधी जीवनशैली या तंत्राचा वापर करून ओल्या किंवा कोरड्या दुष्काळाच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करता येऊ शकते असे त्यांनी प्रतीपादन केले.

या चर्चासत्राला मा. श्री. रमाकांतजी शेरेकर, अध्यक्ष श्री. जगदंब विणकर शिक्षण संस्था, अचलपूर शहर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.तसेच परिसंवादाला मा. डॉ.मुक्ता जहागिरदार ,माजी अध्यक्ष विदर्भ अर्थशास्त्र परिषद, मा. डॉ. राजेश चव्हाण, सचिव विदर्भ अर्थशास्त्र परिषद, मा. श्री. भिमरावजी दखने, सचिव श्री. जगदंब विणकर शिक्षण संस्था,सौ.रजनीताई शेरकार, सदस्य श्री. जगदंब विणकर शिक्षण संस्था,प्रा. टि.के वाहाने समन्वयक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष,जमवि.प्रा. कांत,माजी प्रा. अर्थशास्त्र विभागप्रमुख, ज.म.वि., प्रा. डॉ.किशोर साबळे, प्रा. डॉ.गजानन भारती, प्रा. डॉ. गोटमारे या विविध महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदासह महाविद्यालयातील प्रा. डॉ. जोशी, प्रा. टाले, प्रा. डॉ.पाखरे, प्रा. पाटील, तथा अर्थशास्त्र विभागाचे प्रा. गजभिये, प्रा.कराडे, प्रा. मेसरे, प्रा. लहाने तसेच वाणिज्य विभागाच्या प्राध्यापक वृंदासह मोठ्या प्रमाणावर पदवी व पदवीत्तर अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी उत्स्फुर्तपणे चर्चासत्रामधे सहभागी झाले. सदर चर्चासत्राचे उत्कृष्ट सुत्रसंचालन कु. ऐश्वर्या काळणे यांनी केले, तर परिसंवादाच्या समन्वयक प्रा. डॉ. कुमुदिनी जोगी यांनी प्रथम सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून परिसंवादाला प्राप्त झालेल्या विविध मान्यवरांच्या शुभेच्छांचे वाचन केले व शेवटी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. राष्ट्रगीताने परिसंवादाची सांगला झाली.

विशेष म्हणजे सदर परिसंवादामधे सहभागी तिनही मुख्य वक्त्यांच्या अभ्यासपुर्ण वक्तव्यांच्या आधारावर एकत्रित दर्जेदार लेख तयार करून तो विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची संशोधन पत्रिका अर्थमिमांसा जुलै -डिसेंबर -२०१९- ISSN-2330-0197 मधे प्रसिध्द करण्यात आला.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष निमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागात एक दिवसीय परिसंवाद

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागात एक दिवसीय परिसंवादाचे यशस्वी आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग आपले ६१ वे जयंती वर्ष साजरे करत आहे, तसेच या विभागातूनच स्थापन झालेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद सुद्धा आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने अर्थशास्त्र विभागाद्वारे, दि . २४ सप्टेंबर २०१९ रोजी Shaping Vidarbha's Economy या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्नेहा देशपांडे यांनी केले. परिसंवादाच्या या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरू, अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या शुभहस्ते पार पडले. आपल्या उद्घाटकीय भाषणात त्यांनी विदर्भाच्या अर्थव्यवस्थेला आकार देत असतांना त्याची सद्यकालीन दशा स्पष्ट केली. भावी दिशा नेमकी काय असावी या अनुषंगाने प्रतिपादन केले. या उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी जेष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने आपली भूमिका स्पष्ट करतांना, परिषद राबवत असलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावा घेतला. ५०व्या वर्षात वाटचाल करत असलेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद ही महाराष्ट्रातीलच नव्हे मध्य भारतातील अर्थशास्त्राची सर्वात जुनी आणि सक्रिय परिषद आहे याकडे लक्ष्य वेधले. उद्घाटकीय समारंभाचे अध्यक्ष स्थान रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे, प्र-कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विदर्भाच्या अर्थव्यवस्थेला आकार देत असतांना तिची दुर्बल आणि बलस्थाने काय आहेत याचा प्राधान्याने विचार करायला हवा यावर भर दिला, शिवाय सर स्वतः महाराष्ट्राच्या प्रादेशिक समतोल विकासावरील केळकर समितीचे सदस्य असल्यामुळे, शासनाने या समितीच्या शिफारसी पूर्णतः स्वीकारल्या नसल्याची खंत व्यक्त केली. या उद्घाटकीय समारंभाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागातील साहाय्यक प्राध्यापक डॉ. धीरज कदम यांनी केले, तर आभार विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. निवृत्ती पिस्तुलकर यांनीं मानले.

उद्घाटकीय समारंभानंतर या परिसंवादामध्ये दोन तांत्रिक सत्रे संपन्न झालीत. पहिल्या तांत्रिक सत्राचा विषय 'Measuring Natural Capital of Vidarbha' हा होता. या सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. सुहास बुद्धे, मुख्य प्रबंधक संचालक, बायो केयर प्रा.लि. तथा उपाध्यक्ष, विदर्भ इंड्रस्ट्रीज असोसिएशन हे होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात उत्पादन प्रक्रियेत उपयोगात येत असलेल्या विविध नैसर्गिक संसाधनांचे वास्तविक मूल्य व्यक्त करण्यात बाजार यंत्रणा कशी अपयशी ठरते व त्यामुळे पर्यावरणाची कशाप्रकारे

अपरिमित हानी होते आहे, हे प्रामुख्याने विदर्भाच्या संदर्भात विविध उदाहरणांच्या साहाय्याने स्पष्ट केले. तसेच नैसर्गिक भांडवल मापनाच्या प्रतिमानांचा आढावा घेतला. या सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. दि. व्यं. जहागिरदार, संचालक, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती यांनी भूषविले, त्यांनी आपल्या भाषणात नैसर्गिक भांडवलाचे मापन करणाऱ्या प्रतिमानांच्या मर्यादा स्पष्ट करून, पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकासासाठी गांधीजींनी सांगीतलेल्या साध्या जीवन शैलीचा अंगीकार हाच अंतिम पर्याय असल्याचे प्रतिपादन केले.

दुसऱ्या सत्राचा विषय 'Climate Change and Vidarbha's Economy' हा होता. या सत्रातील प्रमुख वक्ते प्रा. सुरेश चोपणे यांनी आपल्या व्याख्यानात हवामान बदलाची मीमांसा करतांना पर्यावरणीय ऱ्हासामुळे विशेषतः विदर्भातील शेती कशाप्रकारे संकटात आली आहे याचे विश्लेषण केले. या सत्राचे अध्यक्ष स्थान डॉ. अंजली कुलकर्णी यांनी भूषविले. दोन्ही सत्राचे सूत्रसंचालन एम. ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. नुपूर देशकर हिने केले, पाहुण्यांचा परिचय कु. पायल मेश्राम हीने करून दिला तर आभार सतीश शिवणकर यांनी मानले.

परिसंवादाच्या समारोपीय सत्रात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या माजी अध्यक्षांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये परिषदेचे १८ माजी अध्यक्ष उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. आर. वाय. माहोरे यांनी आपल्या भाषणात विदर्भातील आरोग्याशी संबंधित उपलब्ध पायाभूत सुविधांचा आढावा घेतला तसेच आरोग्याशी संबंधित समस्यांचा उहापोह केला. समारोपीय समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी भूषविले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक समीती माहोरे यांनी केले, तर आभार डॉ. धीरज कदम यांनी मानले.

◆◆◆

## बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा येथे आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्र

बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा रजत जयंती निमीत्य व विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण जयंती निमीत्य महाविद्यालयातील अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील शेतमालाच्या किफायतशिर किंमतीचे अर्थकारण व राजकारण या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे दिनांक २० सप्टेबर २०१९ ला आयोजन करण्यात आले होते. राज्यस्तरीय चर्चासत्राचे उदघाटन आमदार मा. सुनिलबाबू केदार, विश्वस्त बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय खापरखेडा यांच्या शुभहस्ते झाले. तर प्रमूख वक्ते म्हणून मा. विजय जांवधिया, शेतकरी नेते व शेती प्रश्नाचे अभ्यासक तसेच डॉ. श्रीनिवास खांदेवाले जेष्ठ अभ्यासक, डॉ. निवृत्ती पिस्तुलकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रथम सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य धनवटे होते. तर प्रमूख वक्ते म्हणून डॉ. दि. व्यं. जहागिरदार व डॉ. तुडूलकर होते. समारोपीय सत्रात प्राचार्य डॉ. संगीता टक्कामोरे व डॉ. सुधाकर जावळे यांनी आपले विचार व्यक्त केले. संचालन डॉ. प्रतीभा गडवे यांनी केले तर आभार डॉ. गजानन सोमकुंवर यांनी मानले.

◆◆◆

# सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाचा अहवाल

डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यु.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर व विदर्भ अर्थशास्त्र परिसंवाद यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन दिनांक ११ डिसेंबर २०१९ ला करण्यात आले. परिसंवादाचा विषय होता " Crashed : How a Decade of Financial Crises changed the world, Written by-Adam Toore" परिसंवादाला विशेष अतिथी, ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले हे होते. परिसंवादाच्या अध्यक्षा, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालीनी फडणवीस उपस्थित होत्या. या परिसंवादाच्या प्रमुख वक्ता डॉ. अपर्णा समुद्र, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर ह्या होत्या. परिसंवादाची संपुर्ण जबाबदारी पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे व विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी पार पाडली.

२००८ ची आर्थिक मंदी केवळ अमेरिकेची मंदी नव्हती तर त्या मंदीमध्ये आशिया, मध्य पूर्व युरोप व संपुर्ण विश्व होरपळून निघाले. भारतासारख्या देशावर याचे गंभीर परिणाम झाले असे मत प्रमुख वक्ता डॉ. अपर्णा समुद्र यांनी मांडले.

डॉ. मृणालिणी फडणवीस यांनी आपल्या भाषणातून वित्तीय संकटाचे जगावर परिणाम होवून जगामध्ये कशाप्रकारे बदल होत गेले व या वित्तीय संकटातून इतर देशांनी सावरण्यासाठी कोणेकोणत्या उपाययोजना केल्या याविषयी मार्गदर्शन केले.

जागतिक स्तरावर भांडवलदार वर्गावर कोणत्याही प्रकारचे निर्बंध व नियंत्रण नसल्यामुळे संपूर्ण विश्व हे आर्थिक मंदीच्या खाईत लोटल्या गेले व भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्यांचे गंभीर परिणाम झाले. त्यामुळे चीनसारख्या नवीन आर्थिक महाशक्तीचा उदय जागतिक पटलावर झाला असे मत अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या वतीने डॉ. यशवंत पाटील यांनी केले. तसेच परिषदेच्या वतीने डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले. परिसंवादाचे सूत्र संचालन डॉ. मेघा रामटेके यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. प्रज्ञा बागडे यांनी केले.

परिसंवादाला विविध महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

◆◆◆

# श्री. साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालयात विदर्भ अर्थशास्त्र परिषद व कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी अमरावती, यांच्या संयुक्त विद्यमाने कै. कमलाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृती राज्यस्तरीय परिसंवाद ''भारतातील शेतीसमोरील आव्हाने''

श्री. साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय वडनेर (जि. वर्धा), विदर्भ अर्थशास्त्र परिाद व कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी अमरावती, यांच्या संयुक्त विद्यमाने कै. कमलाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृती राज्यस्तरीय परिसंवाद ''भारतातील शेतीसमोरील आव्हाने'' या विषयावर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. दिवाकरजी गमे, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. उत्तम पारेकर, प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. निवृत्ती पिस्तुलकर, डॉ. मुक्ता जहागिरदार, डॉ. राजेंद्र भांडवलकर, डॉ. संजय धनवटे तर प्रमुख वक्ते म्हणूण डॉ. आशिष महातळे, डॉ. प्रतिभा चौधरी, डॉ. गजानन भारती, श्री. अविनाशजी गमे, डॉ. विठ्ठल घिनमिने आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शेती, शिक्षण, रोजगार व आरोग्य हे विकासाचे चार स्तंभ असून या चार घटकावर भारताचा सर्वागिण विकास अवलंबून आहे. त्यामुळे भारत सरकारने या चारही घटकांना प्राधान्य दयावे असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ञ व कौटिल्य ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांनी व्यक्त केले अर्थशास्त्र विभागाद्वारे आयोजित एकदिवशीय राज्यस्तरीय परिसंवादाचे उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उत्तम पारेकर यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमाचे आयोजन हे विद्यार्थ्यांचे सर्वागिण हित लक्षात घेऊनच आयोजित केले जातात त्यामुळे महाविद्यालयाची वाटचाल प्रगतीपथावर असल्याची भावना आपल्या स्वागत भाषणातून व्यक्त केली. प्रमुख अतिथी व विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. निवृत्ती पिस्तुलकर यांनी परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमीत्य विविध महाविद्यालयातील आयोजित विविध उपक्रमाची माहिती दिली.

या परिसंवादाचे प्रमुख वक्ते डॉ. आशिष महातळे यांनी 'भारतातील विपणनातील समस्या व त्यावरील उपाययोजना' यावर भाष्य करतांना कृषी विपणनातील समस्या ही कृषी विकासासाठी आव्हान असल्याचे प्रतिपादन केले. ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करण्याचा एकमेव उपाय कृषी प्रक्रिया उद्योगाचा ग्रामीण क्षेत्रात विकास व विस्तार करणे हा आहे असे प्रमुख वक्त्या डॉ. प्रतिभा चौधरी यांनी व्यक्त केले. कृषी क्षेत्रात वर्तमान काळात नवीन प्रारूपाची आवश्यकता असून कृषीविकासासाठी अर्थतज्ञाची महत्वपुर्ण भुमिका आहे. भारतीय शेतकरी सक्षम झाला तर देश सक्षम होईल असे प्रतिपादन या परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. दिवाकरजी गमे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. विनोद मुडे यांनी केले. उपस्थिताचे

आभार प्रा. संजय दिवेकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रविण कारंजकर, डॉ. गणेश बहादे, डॉ. नरेश भोयर, प्रा. पंकज मुन, डॉ. सारीका चौधरी, प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. आरती देशमुख, नरेश कातडे, संजय पर्बत, शंकर कापसे, प्रिती सायंकार, अरूण तिमांडे, अंकुश वैद्य, सुरेश तेलतुमडे, विजयालक्ष्मी जोराडे, मयुर भोयर, आकाश चौधरी, प्रणाली भगत, कोमल पारवटकर, प्रगती वेले, मयुरी महाजन, आरती उईके, अस्मिता देऊळकर, आकाश बोबडे, आर्या बोकडे, आर्दींनी सहकार्य केले.

या परिसंवादाला विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, शेतकरी, माजी विद्यार्थी, पालक व मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

◆◆◆

# आनंद निकेतन महाविद्यालयात विदर्भ अर्थशास्त्र परिषद द्वारा आयोजित कार्यक्रम

महारोगी सेवा समीती वरोरा द्वारा संचालित आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा, अर्थशास्त्र विभाग आणि विदर्भ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ अर्थशास्त्र परिषद सुवर्ण महोत्सवी व्याख्यानात ''विदर्भ राज्याची आर्थिक क्षमता व समृध्दी'' या विषयावर दिनांक बुधवार ११ सप्टेंबर २०१९ रोजी प्रमुख वक्ते मा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, भारतीय कृषी अर्थतज्ञ यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

या व्याख्यानमालेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषद आणि अर्थशास्त्र यांचे दैनंदिन जीवनातील महत्व विशद केले. या व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते डॉ. श्रीनिवास खांदेवाले भारतीय कृषी अर्थतज्ञ, यांनी विदर्भ वेगळा होणे काळाची गरज आहे. कारण विदर्भ साधन संपत्तीने नटलेला असुन सुध्दा विदर्भ मागासलेला आहे. विदर्भात तलावे, ताडोबा सारखे उद्यान आहेत तरी पण विदर्भाचा महाराष्ट्रापासून वेगळे करता येत नाही अशी संधी आपल्या घरातच असताना आपण आपल्या समस्या सोडवू शकत नाही असे दुःख व्यक्त केले. जोपर्यंत तरूण वर्ग, विद्यार्थी, विदर्भातील प्रत्येक नागरिक आंदोलनात सहभागी होणार नाही तोपर्यंत विदर्भ वेगळा होणार नाही, विदर्भाची ताकत दाखवायला हवी असे मोलाचे विचार या व्याख्यानमालेतून मांडले . या व्याख्यानमालेचे प्रमुख अतिथी डॉ. राजेंद्र भांडवलकर माजी अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषद, सचिव, मराठी अर्थशास्त्र परिषद, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतरही विकासाची वाटचाल परिषद करीत असल्याचे प्रतिपादन केले. यानंतरही या परिषदेचे योगदान अर्थव्यवस्थेच्या विकासात राहील असे सांगीतले. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने यांनी सुध्दा अर्थशास्त्र विषयात आवड निर्माण करण्याकरिता आणि अर्थशास्त्र विषयातील अडचणी सोडविण्याकरीता विदर्भ अर्थशास्त्र परिषद नेहमी कार्यक्रमाच्या माध्यमातुन प्रयत्न करीत असते असे विचार प्रस्तुत केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रा. हितेश दडमल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी विद्यार्थ्यांना केंद्र सरकार व राज्यसरकार विदर्भासाठी देण्यात येणारा निधीबद्दल चर्चा करून विदर्भाचे योगदान यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नरेंद्र पाटील, अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषद व्याख्यानमाला आणि पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा.डॉ. रंजना लाड, समाजशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. बबन बी. अवघडे, मराठी विभाग प्रमुख यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. रविंद्र शेंडे, डॉ. नितीन कावडकर, प्रा. मनोहर चौधरी, प्रा. नितीन आवारी, प्रा. प्रमोद सातपुते, प्रा. संदिप ताजने आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

◆◆◆

## संस्मरणे सदस्यांची

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या पगती पथाचा एक आढावा

**श्रीनिवास खांदेवाले**
माजी अध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

१९६६ साली मी नव्यानेच नागपूर विद्यापीठाच्या (आता रा.तु.म.नागपूर विद्यापीठ) पदवीत्तर अर्थशास्त्र विभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो होतो. पुढील वर्षी डॉ.भा.श.ढेकणे विभाग प्रमुख झाले. त्यांनी नागपूर विद्यापीठाची अर्थशास्त्र परिषद असावी असा विचार मांडला. अशी परिषद म्हणजे प्राध्यापकांची शिकण्याची पाठशाळा असल्यामुळे सगळ्यांनीच कल्पना उचलून धरली. तेव्हा अमरावती आता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ स्थापन झालेले नव्हते. त्यामुळे गोंदिया जिल्हा पासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत नागपूर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र होते म्हणून त्या परिषदेचे नाव नागपूर युनिव्हर्सिटी इकॉनोमिक असोसिएशन असे ठेवले गेले ते वर्ष १९७०. अमरावती विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर परिषदेचे नाव बदलून विदर्भ अर्थशास्त्र परिषद असे ठेवले गेले. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव ही पदे, एक पद अमरावती विद्यापीठाला तर दुसरे पद नागपूर विद्यापीठाला अशी देऊन नंतरच्या वर्षी ही पदे फिरवून देणे असे धोरण स्वीकारले गेले त्यामुळे दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापकांना परिषदेचे कार्य करण्याचा अनुभव मिळतो. जोपर्यंत सचिवाची दोन पदे केली नाही तोपर्यंत एकाच सचिवाला पूर्ण काम पाहावे लागे. अर्थात महाविद्यालयांची व सदस्यांची संख्या कमी होती. पण आतासारखी मोबाईल, व्हाट्सअप, ई-मेल, जीपी इत्यादी इलेक्ट्रॉनिक उपकरणे उपलब्ध नसल्याने सगळे व्यवहार सायकलोस्टाइल व पोस्टाने होत असत.

अर्थशास्त्र विभागात वयाने सगळ्यात लहान मीच असल्यामुळे मलाच सचिव म्हणून नेमण्यात आले. आजच्या तुलनेने त्या काळात महाविद्यालयाची इमारती व शैक्षणिक संस्था जवळ पैसा कमी असल्यामुळे वार्षिक अधिवेशन होण्याची तयारी कमी महाविद्यालयांची असे. एका वर्षी एका श्रीमंत महाविद्यालयाने अधिवेशन आयोजित करून इतकी उत्तम जेवणे घातली की त्या तोडीचे जेवणे आपण देऊ शकणार नाही म्हणून दुसऱ्या वर्षी यजमानत्व मिळण्यात अडचण गेली. म्हणून तेव्हापासून आपण यजमान महाविद्यालयांना सांगावयास सुरुवात केली की व्यवस्थेमध्ये नीटनेटकेपणा असावा परंतु डामडौल नसावा. नंतर असे लक्षात आले की देशभर ज्या प्रादेशिक अर्थशास्त्र परिषदा आहेत त्यापैकी विदर्भाची परिषद सर्वात जुनी आहे. इतर काही विषयांच्या प्राध्यापकांनी असे मत व्यक्त केले की ह्या परिषदेत चर्चेचे वातावरण फार मोकळे आणि चांगले असते. अर्थात ते आपल्या सर्वांचे सामूहिक यश आहे.

ह्याच बरोबर परिषद ही आपल्या प्रत्येकापेक्षा मोठी आहे, तिचे मोठेपण वाढविणे

आपले काम आहे ह्याची आठवण प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा परिषदेच्या प्रगतीवर त्याचे प्रतिकूल परिणाम होतात. हे असे घडले आहे म्हणून ही सावधगिरीची सूचना.

आपले प्राध्यापक किती अभ्यास करायचे याचे एक उत्तम उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. अगदी सुरुवातीला अकोल्याला अधिवेशन होते. एक विषय रिकार्डोचे अर्थशास्त्र असा होता. त्यावर कोणीच निबंध लिहिला नव्हता. ते सत्र वाया जाईल का अशी स्थिती निर्माण झाली. सचिव म्हणून काय उपाय करावा असे प्रा. पिंपरकर सरांना विचारले. ते म्हणाले की डॉ. नाणेकरांना बोलण्याची विनंती करा, काम होऊन जाईल. मी डॉ. नाणेकरांना परिस्थिती सांगून विनंती केली. त्यांनी मान्यता दिली आणि इतके प्रभावी भाषण केले की जणू काही ते पूर्ण तयारी करूनच आले होते.

डॉ. नाणेकरकरांच्या (नोकरीत असतांना) अकाली व अचानक मृत्यूनंतर त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आपण अर्थशास्त्राशी संलग्न अशा विषयांवर व्याख्याने ठेवतो. डॉ. पिंपरकर ही नोकरीत असतांना दिवंगत झाले, म्हणून आपण ही व्याख्यानमाला आपल्या या दोन विद्वान प्राध्यापकांच्या नावाने चालवतो. पण आपण आत्तापर्यंत, ती प्रकाशित करू शकलेलो नाही. विदर्भाबाहेरील एका मित्राने ह्या उपक्रमाची प्रशंसा करून त्याचा संच असल्यास त्याची मागणी केली. तशीच मागणी आपण एकेका अर्थशास्त्रज्ञावर जी भाषणे आयोजित करतो, त्या संचासाठी आहे. अर्थमीमांसामध्ये ही भाषणे आपण प्रकाशित करतो परंतु त्यांच्या स्वतंत्र पुस्तकांची सुद्धा मागणी आहे. ह्याचा विचार विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने करावा असे मला वाटते.

अर्थकारणाच्या जागतिकीकरणाबरोबर अर्थशास्त्राचेही जागतिकीकरण झाले आहे. त्यामुळे इंग्रजी पुस्तकांचे वाचन आपल्याला टाळता येणार नाही. आपण आपल्या आवडीनुसार दरवर्षी एक इंग्रजी ग्रंथ विकत घेऊन वर्षभरात तो वाचून काढला तरी आपली चांगली प्रगती होईल व इंग्रजी भाषेची भीती निघून जाईल.

नागपूर, अमरावती व गडचिरोली येथील विद्यापीठांच्या जोडीला डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ व पशुवर्धन व मत्स्य विद्यापीठेसुद्धा अर्थशास्त्राचीच आहेत. त्या सर्व विद्यापीठात आचार्य पदवीच्या विषयांचे संकलन दरवर्षी अर्थमीमांसामध्ये आपण प्रकाशित करावे असे वाटते. त्यातून आपल्या सगळ्यांच्याच ज्ञानकक्षा व सहकार्य वाढेल. या सोबत आणखी एक उपक्रम सुरू करावा. संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांनी विदर्भाच्या आर्थिक बाबींवर संशोधन करून २०-२५ पानांची एक पुस्तिका स्व-खर्चाने तयार करावी. ती परिषदेद्वारा प्रसिद्ध केली जावी.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची यशस्वी ५० वर्षे !

**मृणालिनी फडणवीस**
कुलगुरू
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

गेल्या तीस पस्तीस वर्षांपासून विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वेगवेगळ्या कार्यांमध्ये मी जोडलेली आहे. आतापर्यंतची विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कामगिरी बघता या परिषदेने अनेक प्रकारच्या बौद्धिक, चर्चात्मक आणि वैविध्यपूर्ण विषयांवर चांगला प्रकाश टाकलेला आहे. त्यावरून विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची उंची निश्चितच वाढलेली दिसून येते. आतापर्यंत झालेल्या सर्व परिषदांमध्ये महत्वाचे विषय म्हणजे नाविन्यपूर्ण होणारे बदल, भारताविषयीच्या वेगवेगळ्या समस्या, सैद्धांतिक बाजू अशा अनेक विषयांवर केवळ निबंध वाचन नव्हे तर त्याची सखोल अशी चर्चा केली जाते. विदर्भाचे अनेक नामवंत अर्थतज्ञ यात भाग घेत असल्याने विषयांवर सखोल माहिती घेऊन त्याचे विश्लेषण होत असल्याने विभिन्न विषयांना समजून घेण्याची एक चांगली संधी या परिषदेने दिलेली आहे.

अनेक तरुण प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक यामध्ये जोडले गेले असून त्याचा दर्जा निश्चितच चांगला झालेला आहे. पन्नास वर्षांच्या या प्रवासात अशा अनेक बाबी ज्याचे आकडे गोळा करून माहिती मिळवून त्याला अभ्यासपूर्ण माध्यमाने जे प्रयत्न प्राध्यापक वर्ग करीत आहेत, त्याचे रूपांतर विविध प्रकारच्या वैचारिक शक्ती वाढवण्यात पण झालेला आहे. विदर्भाचा प्रश्न हा जुना आणि महत्वपूर्ण असल्याने विदर्भाच्या विकासासाठीदेखील या विविध निबंधाचा फायदा होत आहे आणि भविष्यात याचा उपयोग अधिक वाढण्याची शक्यता आहे. दोन दिवसांचे अधिवेशन विदर्भाच्या ग्रामीण भागात बहुतांश प्रमाणात घेतल्या गेल्याने गावातल्या लोकांनाही यात सहभागी होत आले आणि निश्चितच त्यांना त्याचा फायदा झाला. यामध्ये मांडल्या गेलेल्या लेखांचे ग्रंथरूपात प्रकाशन झाल्याने या मंडळाकडे मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध असते. त्याचा उपयोग संशोधन आणि अनेक ठिकाणी विषयांमध्ये सखोलता आणण्याकरिता होऊ शकतो.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने सातत्याने विभिन्न प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी प्रेरित केले आहे. तरीदेखील येणाऱ्या काळामध्ये संशोधनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी दोन दिवसांपैकी एक ते दीड तास एखाद्या नवीन झालेल्या संशोधनाचा आढावा मांडण्यासाठी किंवा नवीन उपक्रम म्हणून इनोव्हेशन, इनक्युबेशन सारख्या नव्या विचारधारांचा देखील यामध्ये समावेश करणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास नवसंशोधन आणि नवाचाराला प्रोत्साहन मिळेल.

येणाऱ्या काळात विदर्भ अर्थशास्त्र परिषद ही आणखीन समृद्ध व्हावी, आणि नवनवीन आर्थिक विचारांवर अग्रेसर व्हावी हीच या परिषदेस शुभेच्छा...

◆◆◆

# पन्नाशीचा उंबरठा ओलांडलेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**विनायक श्रीधर देशपांडे**
कुलगुरू,
जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती.

वैदर्भीय समाजात संस्थात्मक जीवन फुलण्यास बराच वाव आहे हे विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने आपल्या पन्नास वर्षाहून अधिकच्या दीर्घकालीन अस्तित्वामुळे दाखवून दिले आहे. प्रादेशिक स्तरावरील परिषद असून मराठी सोबतच हिंदी व इंग्रजी भाषेत देखील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना आपले विचार प्रकट करता यावेत म्हणून विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने एकाच स्थानिक भाषेचा आग्रह कधीही धरला नाही. यांमुळे मुक्त चर्चा होण्यास खऱ्या अर्थाने वाव सर्व स्तरातील अभ्यासकांना निश्चितच मिळाला आहे. विदर्भ म्हणजे मध्यप्रांत वऱ्हाड यात हिंदी व मराठी लोक एकत्र सामील झाल्याने हा प्रांत विविध भाषा आणि संस्कृतीने नटलेला असल्याने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने निव्वळ मराठीतच आपले व्यवहार न ठेवता इंग्रजी व हिंदी भाषेला देखील मोकळीक दिली. १९७०-७१साली परिषदेच्या कार्याचा शुभारंभ झाला आणि तेव्हापासून आजपावेतो हा वटवृक्ष सातत्याने वाढत आहे. या वृक्षाच्या पारंब्यांमधून अमरावतीचा भूभाग विद्यापीठाच्या निर्मितीमुळे नागपूर विद्यापीठापासून स्वतंत्र झाला तरी त्यामुळे वृक्षाच्या रूपवैभवात काहीही फरक झालेला नाही. उलट विदर्भ अर्थशास्त्र परिषद या वटवृक्षाची पाळेमुळे गावोगावी आणि खेडोपाडी पसरलेली आहेत.

विदर्भ अर्थशास्त्र परिाद आणि सभोवतालचे जीवन यात एक अतूट नातेसंबंध प्रस्थापित झाले आहेत त्यामुळे सैध्दांतिक चर्चेसोबतच विदर्भ विकासाशी संबंधित कृषी, उद्योग आणि सामाजिक जनजीवन याचा देखील साकल्याने विचार करण्यात येतो. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय आणि वैश्विक पातळीवर जे विचारमंथन चालत असते ते आपल्या भागातील इतर प्राध्यापकांना, विद्यार्थ्यांना कळावे आणि हे आदानप्रदान सुचारू पध्दतीने चालावे म्हणून परिादेने आजपावेतो केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे यात शंका नाही. परिषदेच्या माध्यमाने हाती येणारे संचित विद्यार्थ्यांपर्यंत आणि समाजातील इतर घटकांपर्यंत पोहचावे म्हणून परिषदेचे सदस्य आटोकाट प्रयत्न करतात.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा शैशवावस्थेचा नाजूक काळ डॉ. भा.रा. ढेकणे, डॉ. सु. दा. बाळ, डॉ. के. रा. नाणेकर, डॉ. श्री. आ. देशपांडे, प्रा. ग.प्र. पिंपरकर, डॉ. श्री. वि. खांदेवाले, प्राचार्य रा.ना. खर्चे यांनी निठेने सांभाळून भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व देखील प्रदान केले. मराठी माध्यमाची सुरवात नागविदर्भात, पश्चिम व महाराष्ट्राच्या इतर भागापेक्षा पुष्कळ आधी झाली व त्यामुळे आपल्या येथील शिक्षणव्यवस्थेत मराठी जास्त रूळली, असे असून देखील इंग्रजी, मराठी आणि हिंदी माध्यमातून

शिकणाऱ्या आणि शिकविणाऱ्यांना विचारांचे आदान प्रदान करण्याचे एक उत्तम व्यासपीठ परिषदेविषयी अहर्निश विचार करणाऱ्या कर्तृत्ववान मंडळींनी उपलब्ध करून दिले. सदस्यांच्या वाणीला आणि लेखणीला वळण लावले,उदार अर्थशास्त्रीय दृष्टीकोन दिला आणि ज्ञानाचे एक कवच उपलब्ध करून दिले. या सर्व दिग्गजांचे परिषदेचे सर्व सदस्य सदैव ऋणी राहतील.

साधारणपणे इंग्रजीतून अर्थशास्त्र शिकलेल्या व इंग्रजी लिखाण वाचणाऱ्या अर्थशास्त्राच्या अभ्यासकांचा मराठी भाषेला विरोध असतो. परंतु विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या विविध अधिवेशनातील चर्चा सत्रातील विचारांचे आदान प्रदान होत असतांना हे कधीही जाणवले नाही. उत्तम इंग्रजीत लिहिणारे, वाचणारे आणि बोलणारे अर्थशास्त्राचे अभ्यासक तितक्याच ताकदीने विषयाची मांडणी मराठीत करतांना बघून खरोखर कौतुक वाटते. परिषदेच्या सदस्यांनी ही सर्जनशील वृत्ती सहजपणे धारण केली आणि विचार विनिमयात भाषेची आडकाठी येऊ दिली नाही. अर्थशास्त्राचे विदर्भातील प्राध्यापक अधिवेशनाच्या निमित्ताने अधिवेशन काळात सोबत राहू लागले विचारांची देवाण घेवाण होउन काही रचनात्मक फल निपत्ती निश्चितच झाली.

अधिवेशनाच्या दरम्यान अनेक नामवंत विद्वानांनी व्याख्यानमालांमध्ये आपले मौलिक विचार मांडून ज्ञानाच्या नव्या दिशा उजळल्या आहेत. ज्ञानसंवर्धनाचे उद्धिट साध्य करण्याचा परिषदेचा जागरूक दृष्टीकोन स्पष्ट होतो. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे एक नियतकालीक असावे हा विचार देखील अनेक वर्षापासून हितचिंतकांच्या मनात घोळत होता. परिषदेचे सक्रीय कार्यकर्ते डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांनी 'अर्थमिमांसा' हे नियतकालीक प्रकाशित करून त्यास मूर्त रूप प्राप्त करून दिले. यांत प्रकाशित होणारे लेख इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत असल्याने वाचकांना दोन्ही भाषेतील लेख स्वतंत्ररित्या वाचायला मिळतात. त्याचा दर्जा टिकवून ठेवण्याचे श्रेय अर्थात संपादक महोदय डॉ.जहागिरदार यांनाच द्यावयास हवे. मजकूर मिळविणे, तो जुळवून छापावयास देणे आणि पुढे मुद्रिते तपासणे ही सर्व कामे किचकट तसेच कालहरणाचे असून देखील गेल्या अनेक वर्षापासून डॉ. जहागिरदार अत्यंत सराईतपणे करीत आहेत.

वैज्ञानिक प्रगतीचा झपाटा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे अर्थशास्त्रातील संशोधन अधिकाधिक संकीर्ण होत चालले असून विशेषीकरणावरचा भर वाढतो आहे. परिषदेच्या कामकाजात या अनुषंगाने बदल होणे आवश्यक आहे. गणितीय अर्थशास्त्र, अर्थमिती, प्रायोगिक अर्थशास्त्र या नव्याने विकसित झालेल्या शाखांकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

विशुध्द ज्ञानप्राप्ती जितकी महत्त्वाची तितकीच मिळवलेल्या ज्ञानाचा समाजाला प्रत्यक्ष उपयोग कसा होईल आणि आपल्या प्रदेशाची आर्थिक प्रगती यांच्यात मेळ घालण्यासाठी प्रयत्न होणे देखील महत्त्वाचे आहे. परिषदेच्या माध्यमाने काही संशोधन प्रकल्पांना चालना देता आल्यास सैध्दांतिक आणि व्यावहारीक ज्ञान यांची सांगड घालणे शक्य होऊ शकेल. मानवी प्रश्न आणि मानवी समस्या यांच्याविषयी संवेदनक्षम आणि संवेदनशील अशी समाजाभिमुख परिषदेची प्रतिमा निर्माण होण्याची गरज आहे. आपण सभोवतीच्या समाजसंस्थेचाच एक अविभाज्य घटक आहोत हे विसरता कामा नये. शैक्षणिक विकासाच्या

झंझावातातही व्यापक समाजोन्नतीच्या प्रेरणांची जपवणूक आपल्या परिषदेच्या माध्यमाने व्हावी. परिषदेने धोरण विषयक ठराव करून शासनाला पाठवावे या बाबत देखील विचारविनिमय होत असतो. विद्यानिष्ठता राखावयाची असल्यास असे ठराव न करणेच योग्य! शासनाचे धोरण बदलणे हा परिषदेचा हेतू नसल्याने शासनापुढे असलेल्या आर्थिक प्रश्नांवर चर्चा नि:पक्षपणे होत रहावी. परिषदेने हे तत्व आजपावेतो जपले आहे. समकालीन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे विश्लेषण आणि त्याला नवा पैलू देणाऱ्या अनेक विषयांची चर्चा आपल्या परिषदेच्या व्यासपीठावरून झाली आहे. भावनांच्या आहारी न जाता, वस्तुनिष्ठतेने अर्थशास्त्रातील विविध प्रश्नांची उकल करण्याची परिषदेची परंपरा कायम राखणे ही काळाची गरज आहे.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा विकास नेत्रदीपक असा झाला असला तरी पुढील भविष्यातील आखणी अधिक सूत्रबद्ध पद्धतीने होण्याच्या दृष्टीने परिषदेने एक भविष्यवेधी ‘व्हीजन डॉक्युमेंट’ तयार करण्यास सुरूवात करावी असे सूचवावेसे वाटते.

अर्थशास्त्रीय वैचारिक देवाण घेवाण होण्याच्या दृष्टिने स्थापन झालेल्या आपल्या या परिषदेचे स्थान अभूतपूर्व आहे. ऐतिहासिक दृष्टीने पाहता विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची स्थापना, मराठी अर्थशास्त्र परिषदेपूर्वीची आहे त्याचे सिंहावलोकन करताना अभिमानाने उर भरून येत असले तरी आपल्यावरच्या ऐतिहासिक जबाबदारीची जाणीव सातत्याने ध्यानात ठेवणे हे आम्हा सर्वांचेच कर्तव्य आहे. आपल्या परिषदेला घडविणारे ज्ञानतपस्वी प्राध्यापक, शिक्षक, परिषदेचे सर्व पदाधिकारी, सदस्य आपल्या कर्तृत्वाने व कर्तव्याने परिषदेच्या वैभवशाली परंपरेत आपले मौलिक योगदान सातत्याने देत राहतील असा मला विश्वास वाटतो.

◆◆◆

# सुवर्ण महोत्सवी विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**निवृत्ती पिस्तूलकर**
कार्याध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

विदर्भ अर्थशास्त्र परिषद म्हणजे पन्नास वर्षाची समृद्ध अशी ऐतिहासिक व वैचारिक परंपरा असलेली मध्य भारतातील इतर प्रादेशिक परिषदांपैकी सर्वात जुनी परिषद आहे. सन १९७०-७१ मध्ये विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद या नावाने स्थापन झालेल्या अर्थशास्त्र परिषदेमुळे विदर्भातील सर्व विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयातील अर्थशास्त्र विषयाच्या प्राध्यापकांसाठी अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून वैचारिक मंथन करण्याकरता एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. १९७०-७१ साली स्थापन झालेल्या परिषदेने आपली ५० वर्षे पूर्ण केली. सुवर्ण महोत्सवी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे आतापर्यंत एकूण ४४ वार्षिक अधिवेशने संपन्न झाली आहेत. विदर्भातील सर्व अकराही जिल्ह्यांमध्ये विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने दोन दिवसीय अधिवेशन घेऊन सैद्धांतिक, राष्ट्रीय आणि जिल्हा पातळीवरील आर्थिक व सामाजिक विषयावर चर्चा घडवून आणली आहे. आतापर्यंत झालेल्या ४४ अधिवेशनापैकी २२ अधिवेशने नागपूर विभागात तर तेवढीच अधिवेशने अमरावती विभागात झाली आहेत. जिल्हानिहाय दृष्टीक्षेप टाकल्यास अमरावती जिल्ह्यात ८, यवतमाळ जिल्ह्यात ६ तर वर्धा, चंद्रपूर, भंडारा व बुलढाणा जिल्ह्यात प्रत्येकी ३ अधिवेशने पार पडली आहे. गोंदिया, अकोला व वाशिम जिल्ह्यात देखील प्रत्येकी एक अधिवेशन घेण्यात आले आहे. परंतु गडचिरोली जिल्ह्याला मात्र संधी मिळाली नाही. आतापर्यंत संपन्न झालेल्या एकूण अधिवेशानापैकी जवळपास २४ अधिवेशने ग्रामीण महाविद्यालयांमध्ये तर २० अधिवेशने विद्यापीठ व शहरी महाव्यिालयात संपन्न झाले आहे. परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०१९-२० सत्रात विदर्भातील अनेक जिल्ह्यात एकूण १७ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विविध विषयांवर राष्ट्रीय, राज्य आणि विद्यापीठ स्तरीय चर्चासत्रे व परीसंवादाचे आयोजन केले. परंतु कोविड-१९ च्या संकटामुळे नियोजीत सुवर्ण महोत्सवी सोहळा तसेच ४५ वे वार्षिक अधिवेशन मात्र होऊ शकले नाही. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेला आतापर्यंत लाभलेले अनेक अध्यक्ष हे ख्यातनाम अर्थतज्ञ, प्राचार्य, विद्यापीठ प्राधिकरणावरील पदाधिकारी आणि अतिशय सन्माननीय असणाऱ्या कुलगुरू सारख्या पदांवर विराजमान असल्याने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या नावलौकिकात अधिकच भर पडली आहे यात मुळीच शंका नाही. विशेषतः ६ महिला प्राध्यापिकांनी परिषदेचे अध्यक्षपद भूषविले असून ग्रामीण महाविद्यालयातील प्राध्याकांना देखिल परिषदेच्या अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. परिषदेच्या यशस्वीतेसाठी संस्थापक अध्यक्ष,

कार्याध्यक्ष व साचिवांपासुन तर वर्तमान पदाधिऱ्यांनीही मोलाची भर घातली आहे. त्यामुळेच आज परिषदेची आजीवसभासद संख्या आज ४५० पर्यंत पोहचली आहे. दर्जेदार संशोधन पत्रिका म्हणून नियमित प्रसिध्द होणारी परिषदेची 'अर्थमीमांसा', डॉ. नाणेकर- प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यानमाला, प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यामाला, श्रीमती कमलाबाई व्यंकटेश जहागिरदार स्मृति परिसंवाद तसेच उत्कृष्ट संशोधन व शोध निबंधाकरिता दिले जाणारे विविध प्रोत्साहन पुरस्कार आणि परिषदेचे पदाधिकारी आपल्या महाविद्याल्यात परिषदेच्या संयुक्त विद्यमाने अनेक राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावरील चर्चासत्रे व परिसंवादाचे करीत असलेले आयोजन परिषदेची अत्यंत जमेची बाजू आहे.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने आपल्या अधिवेशनाचा वैचारिक दर्जा कायम ठेवला आहे. दिवसेंदिवस आयोजक महाविद्यालये अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचे उत्तमोत्तम आयोजन करीत असतात. दोन दिवसीय अधिवेशनात अगदी थाटात होणाऱ्या उद्घाटन सत्रापासून तर समारोपीय सत्रापर्यंत अनेक चर्चासत्रे, परिसंवाद व व्याख्यानांची असणारी रेलचेल प्राध्यापक व विद्यार्थ्यांना एक पर्वणीच असते. व्यासपीठावरून होणारे ज्येष्ठ गुरुजनांचे मार्गदर्शन व त्यांच्याकडून पाठीवर पडणारी कौतुकाची थाप अभ्यासकांचा उत्साह अधिकच द्विगुणित करणारी असते. आजही परिषदेचे संस्थापक सचिव डॉ. श्रीनिवास खांदेवाले सर, डॉ.दि.व्य. जहागीरदार सर, डॉ. आर. वाय. माहोरे सर, डॉ. मुक्ता जहागिरदार मॅडम सारखे ज्येष्ठ मार्गर्शक प्रत्येक सत्रात आवर्जून उपस्थित राहून चर्चेत सक्रिय सहभाग घेतात. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची वार्षिक अधिवेशने केवळ भव्यदिव्य सोहळे किंवा नयनरम्य पर्यटन ठरू नयेत तर आर्थिक, सामाजिक व राजकीय घडामोडींवर चर्चा झाली पाहिजे. शहरी-ग्रामीण दुरी कमी करण्यासाठी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन ग्रामीण महाविद्यालयांमध्ये झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. ग्रामीण भागातील अपुऱ्या सोयी-सुविधांची जाणीव असल्यामुळे या मंडळींनी उपलब्धतेनुसार भोजन व निवास व्यवस्था गोड मानून अधिवेशने यशस्वी केली आहेत. अधिवेशने अधिक खर्चिक करण्यापेक्षा कमीत कमी खर्चात अधिवेशनाचे नियोजन केले तर अतिशय लहानातलहान महाविद्यालये देखील अधिवेशनासाठी पुढे येतील असे आदरणीय डॉ. खांदेवाले सर वारंवार सांगतात. पूर्वी स्वतःची वाहने नसल्यामुळे सगळेच प्रतिनिधी अधिवेशनस्थळी दोन ते तीन दिवस मुक्कामी असायचे. तेव्हा त्या दरम्यान तज्ज्ञांमध्ये होणाऱ्या विविध विषयांवरील सखोल चर्चा, अभ्यासपूर्ण वैचारिक मतमतांतरे व त्यांची समर्पक उत्तरे नवोदित प्राध्याकांसाठी एक पर्वणीच असायची. या निमित्ताने आदरणीय तज्ञ मंडळींच्या इतरही सुप्त पैलूंची ओळख होत असे. सायंकाळी खेळले जाणारे छोटेमोठे खेळ आणि रात्री प्रतिनिधीसाठी सादर केलेले मनोरंजनाचे कार्यक्रम सिनिअर-ज्युनिअर व ग्रामीण-शहरी दुरी कमी करण्यासाठी अत्यंत मोलाची भूमिका पार पाडत असे. त्यामुळे परिषदेच्या सदस्यांमध्ये अगदी स्नेहाचे संबंध निर्माण होवून परिषदेला एक कौटुंबिक स्वरूप आले आहे. आजही ही ज्येष्ठ मंडळी इतर कोणत्याही राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय अधिवेशनापेक्षा विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाला प्राधान्य देवून हिरहिरीने सहभागी होतात. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही अधिवेशने घेवून अत्यंत शिस्तीत सुरू ठेवलेली ही विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची वैचारीक चळवळ अधिक जोमाने पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४५ व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने ..........

**विनोद म. गावंडे**
अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषद
विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

पूर्वाश्रमीची विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद जी आज विदर्भ अर्थशास्त्र परिषद म्हणून सुपरिचित आणि सर्वश्रुत आहे. या परिषदेच्या स्थापनेपासूनच अर्थशास्त्रातील हे संघटन अर्थशास्त्र विषयाचे अभ्यासक विद्यार्थी, शिक्षक तसेच संशोधक यांना चांगल्या प्रकारे परिचित आहे. मी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेसोबत माझ्या विद्यार्थिदशेपासूनच जुळलेलो आहे. तत्कालीन शासकीय विदर्भ महाविद्यालय आणि आजचे शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती या संस्थेचे आणि संस्थेतील अर्थशास्त्र विभागाचे विदर्भ अर्थशास्त्र परिषदे सोबत फार जुने ऋणानुबंध आहेत. या संस्थेतील बहुतांश अर्थशास्त्र विभाग प्रमुखांना या परिषदेमध्ये सर्वच स्तरावर काम करण्याची संधी मिळाली आहे. किंबहुना विशेष बाब म्हणजे बहुतांश अर्थशास्त्र विभाग प्रमुखांना या परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळालेली आहे. ज्यामध्ये मला ज्ञात असलेल्या सन्माननीय विभाग प्रमुखांपैकी प्रा. डी. आर. अग्रवाल, डॉ. दि. व्य. जहागिरदार, प्रा. एस. एन. अंभोरे, डॉ. मुक्ता जहागीरदार आणि यावर्षीच्या ४५ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून मला ही संधी मिळाली आहे, एखाद्या महाविद्यालयातील पाच विभाग प्रमुखांना या परिषदेचे अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळावी ही माझ्यासाठी आणि माझ्या संस्थेसाठी बहुमानाची बाब आहे.

माझा विदर्भ अर्थशास्त्र परिषदे सोबतचा ऋणानुबंध तसा विद्यार्थिदशेपासूनचाच म्हणजेच १९९६ म्हणजेच जवळपास २६ वर्षापूर्वी पासून प्रस्तापित झाला आहे. मी विदर्भ महाविद्यालयाचा विद्यार्थी असल्यामुळे तत्कालीन माझे गुरुवर्य प्रा. डी. आर. अग्रवाल, डॉ. दि. व्यं. जहागीरदार, प्रा. एस. एन. अंभोरे, डॉ. एस. एस. नाईक आणि डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदे सोबत त्या दरम्यान आयोजित केलेल्या विविध चर्चासत्र तसेच परिषदांच्या माध्यमातून सदर परिषदेशी जोडण्याची संधी मला मिळाली. विद्यार्थीदशेमध्ये असताना या परिषदेच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या विविध चर्चासत्रांमध्ये परिषदेचे नामवंत सदस्य म्हणून डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. आर. वाय. माहोरे डॉ. विनायक देशपांडे डॉ.दि.व्य. जहागीरदार अर्थशास्त्रातील या तज्ञ मंडळी ज्यांची पुस्तके आम्ही एम.ए. ला असताना वाचत होतो. या सर्व तज्ञ मंडळींना भेटण्याचा आणि त्यांच्या सोबत चर्चा व त्यांचे विचार ऐकण्याची संधी या परिषदेच्या निमित्ताने मला प्राप्त झाली आहे ही बाब मला महत्त्वाची वाटते.

महाविद्यालयीन शिक्षक किंवा प्राध्यापक म्हणून विदर्भ अर्थशास्त्र परिषदे सोबत मी बुलढाणा

येथील परिषदेच्या वार्षिक अधिवेशानामध्ये सर्वप्रथम सदस्य म्हणून जुळलो. तो माझा परिषदे सोबतचा सदस्य म्हणूनचा पहिला प्रसंग होता. मराठी अर्थशास्त्र परिषद जी महाराष्ट्र राज्य पातळीवर कार्यरत आहे. त्या परिषदे पेक्षाही अधिक जुने संघटन आणि स्थापना असलेली संस्था म्हणजे विदर्भ अर्थशास्त्र परिषद होय. संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही एक आदर्श अशी संस्था आहे असे मला वाटते. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक अधिवेशन आयोजित करताना एक प्रकारचा स्नेहभाव आणि परिषदेमध्ये चर्चिल्या जाणाऱ्या विविध समाजोपयोगी आणि देशातील आणि राज्यातील आर्थिक समस्येला वाचा फोडणारे विषय हे या परिषदेचे वैशिष्ट्य राहिलेले आहे. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन म्हणजे एक पर्वणीच राहते. त्यानिमित्ताने विदर्भातील अनेक ठिकाणी जाऊन तेथील समाज जीवन जवळून न्याहाळण्याची एक संधी यानिमित्ताने प्रत्येक सदस्याला प्राप्त होते. १९९९ पासून माझा परिषदेचा सदस्य म्हणूनचा प्रवास अतिशय उत्साहवर्धक आणि चिंतनीय तसेच अभ्यासपूर्ण राहिलेला आहे. विविध चर्चांमध्ये सहभागी होणे, मान्यवर तज्ञांसोबत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करणे, अधिवेशनाच्या दरम्यान विषय तज्ञ म्हणून आयोजित करण्यात येणारे विविध विषयांवरील व्याख्याने आणि त्या व्याख्यानासाठी येणाऱ्या मान्यवरांसोबत चर्चा करण्याची एक संधी या निमित्ताने प्राप्त होते. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या निमित्ताने विदर्भातील जिल्हा, तालुका आणि अगदी तालुकाही नसलेल्या अनेक ठिकाणी भेटी देण्याचा योग जुळून आला. तेथील समाज जीवन आणि आर्थिक परिस्थिती जवळून पाहण्याची संधी यानिमित्ताने प्राप्त झाली आहे. हा लाभ केवळ परिषदेमुळेच प्राप्त झाला आहे. एखाद्या विषयाचा प्राध्यापक म्हटला की तो त्या महाविद्यालयात पुरता मर्यादित असतो. परंतु या परिषदेमुळे विदर्भातील जवळपास संपूर्ण अकरा जिल्ह्यातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व तज्ञ मार्गदर्शक इत्यादींना एखाद्या कौटुंबिक कार्यक्रमासारखे आपसात वर्षातून एकदा भेटण्याचा लाभ या संस्थेच्या वार्षिक अधिवेशनाच्या माध्यमातून प्राप्त होतो. परिषदेच्या निमित्ताने अकरा जिल्ह्यातील प्रध्यापाकांसोबत एक प्रकारचा स्नेहबंध निर्माण झालेला आहे. याचे श्रेय केवळ परिषदेच्या नियमित आणि उत्कृष्ट आयोजनास दिल्या जाते. अशा नामवंत परिषदेमध्ये मला गेली २६ वर्षे काम करण्याची संधी मिळाली. तसेच परिषदेच्या ४५ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनासाठी माझी सर्वानुमते सर्व सन्माननीय सदस्यांनी बिनविरोध निवड केली त्यासाठी मी स्वतःला खरोखरच भाग्यवान समजतो. परिषदेचे हे ऋण मी कधीही विसरू शकणार नाही. परिषदेच्या भावी वाटचालीस मन:पूर्वक खूप खूप शुभेच्छा.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद – एक सुखद अनुभूती

**अंजली कुलकर्णी**
माजी अध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची पन्नास वर्षाची वाटचालीचे व त्यातील सिंहावलोकन करताना अनेक आठवणींच्या सुखद अनुभूतीने मन हेलावून जाते. 'की घेतले न ते व्रत हे आम्ही अंधतेने' या उदात्त हेतूने प्रेरित होऊन या परिषदेची स्थापना झाली आहे. तिच्या स्थापनेपासून ती विविधतेने बहरावी, बुद्धिवंतांच्या अर्थशास्त्रात प्राविण्यप्राप्त प्राध्यापकांच्या परिपक्व शैक्षणिक अनुभवांचा सर्वांना मोठ्या शहरापासून गाव पातळीपर्यंत लाभ मिळावा, सर्व विद्यार्थी व सदस्यांना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी सुरुवातीपासूनच अपार कष्ट घेतल्या गेले आहे. 'इवलेसे रोप लावियले दारी त्याचा वेलू गेला गगनावरी' ह्याचे प्रत्यंतर परिषदेची वार्षिक अधिवेशने, त्यातील कार्यक्रम व गावोगावी होणारी चर्चासत्रे यातून आला. परिषदेच्या कार्यक्षेत्रातून ज्ञानाच्या कक्षा रुंदावत गेल्या आहे. त्यात सहभागी प्राध्यापक सदस्यांनी मोलाची कामगिरी करून परिषदेचा दर्जा उंचावण्यास हातभार लावला आहे.

परिषदेतर्फे आयोजित स्मृति व्याख्याने, चर्चेसाठी निवडलेले विषय ज्यात सैद्धांतिक, जागतिक पातळीवरील आर्थिक घटनांचा ऊहापोह करणारे विविध विषय व त्याचबरोबर स्थानिक पातळीवरील विविध आर्थिक समस्यांचा अंतर्भाव करण्याचा प्रयत्न होणे, हे स्तुत्य असून त्यातून परिषदेच्या अष्टपैलूत्वाचे दर्शन घडले आहे. त्यात सहभागी प्राध्यापकांनी एक आव्हान स्वीकारून चर्चा तसेच निबंध वाचनाचा, संशोधनात्मक लेखांचा दर्जा उंचावण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

अर्थशास्त्रातील मौलीक ग्रंथांची/पुस्तकांची विद्यार्थी तसेच प्राध्यापकांना त्यांच्या सविस्तर अभ्यासातून ओळख व्हावी या हेतूने गेल्या काही वर्षापासून अर्थशास्त्रातील मौलिक ग्रंथांवर/पुस्तकांवर एक स्वतंत्र व्याख्यान आयोजित करण्याचा उपक्रम परिषदेमार्फत राबवला जात आहे. त्यातील काही सहभागी प्राध्यापकांचे मार्गदर्शन व त्या ग्रंथांचे परीक्षण/पृथक्करण ह्याचा लाभ सर्व सभासद बंधू-भगिनींना जरूर झाला आहे. त्यामुळे अर्थशास्त्रातील जुने ग्रंथ वाचण्याची प्रेरणा त्यांना मिळाली तसेच नवीन येणाऱ्या पुस्तकांचे रसग्रहण करण्याची संधी परिषदेच्या व्यासपीठ द्वारे दिली गेली आहे.

परिषदेच्या वाटचालीत चढ-उतार आले. परंतु परिषदेला लाभलेले प्रांजल नेतृत्व व त्यांची परिषदेला नवचैतन्य देण्याची क्षमता त्यामुळे परिषदेला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे.

माझी एक सदस्य, अध्यक्ष, कार्याध्यक्ष या नात्याने माझी परिषदेशी नाळ जुळली आहे. अध्यक्ष व कार्याध्यक्ष भूमिका स्वीकारल्यावर मला मिळालेले मार्गदर्शन, ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळींचे सहकार्य, कार्यकारी

मंडळाची एक व्रतस्त्र म्हणून स्वीकारलेली जबाबदारी ही नक्कीच गौरवास्पद आहे. 'ऊतू नको मातू नको, परिषदेचा वसा टाकू नको' अशी भावना सर्व कार्यकारणीत निर्माण होणे हे नक्कीच कौतुकास्पद आहे. कार्याध्यक्ष असताना डॉ.जहागीरदार पती-पत्नी डॉ. खांदेवाले, डॉ. माहोरे, डॉ.देशपांडे यांचे मार्गदर्शन व सहकार्य माझ्या परिषदेतील खारीचा वाटा पेलण्यास खूप महत्त्वपूर्ण ठरले.

परिषदेचे कामकाज 'हे विश्वची माझे घर' या भावनेने नागपूर अमरावती या विभागात निरंतर चालावे, परिषदेने शैक्षणिक व्यासपीठ सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे स्वीकारलेले व्रत पूर्णत्वास न्यावे व ज्या उदात्त हेतूने परिषदेची स्थापना झाली त्याचा ठेवा पुढच्या पिढीला ज्ञानसाधनेच्या रूपाने मिळावा ही सदिच्छा व्यक्त करून परिषदेच्या शताब्दीसाठी मी योग्य नेतृत्व, मार्गदर्शन व समर्पित सदस्यांसाठी प्रभू चरणी प्रार्थना करते.

'अर्थमीमांसा' सारख्या संशोधन पत्रिकेसाठी डॉ. जहागीरदार पती-पत्नी व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या कष्टाचे वर्णन शब्दात करणे कठीण आहे. परिषदेचा हा 'अमूल्य' ठेवा जतन करून त्याची गुणवत्ता जोपासण्याची व पुढे अधिकाधिक वाढविण्याची जबाबदारी पुढच्या पिढीने समर्थपणे पेलावी व परिषदेच्या मानांकन समृद्ध करावे अशी आशा बाळगते.

◆◆◆

# अधिवेशना संबंधी काही आठवणी

**रा. य. माहोरे**
प्राध्यापक व माजी विभाग प्रमुख,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात काही कारणांमुळे सहा वर्षाचा खंड पडला होता. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे १२ वे अधिवेशन शहादा येथे आयोजित करण्यात आले होते. त्या अधिवेशनाच्या दरम्यान विदर्भातील उपस्थित प्रतिनिधींची बैठक शहादा येथे आयोजित करण्यात आली होती. १३ वे वार्षिक अधिवेशन सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथे घेण्याची संमती प्रा. सौ. नलिनी मोरे यांनी दर्शविली होती. धामणगाव रेल्वे येथील १२व्या अधिवेशनात १३व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून डॉ. व्ही. एस. शेणवाई श्री बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर यांची निवड झाली होती. त्यांनी सरदार पटेल महाविद्यालयात आयोजित अधिवेशनात अध्यक्ष म्हणून कार्य पार पाडले होते. या अधिवेशनासाठी मी, प्राचार्य सु. रा. ओझरकर आणि डॉ. श्री. आ. देशपांडे यांना घेऊन चंद्रपूरला एस. टी. बसने गेलो होतो. प्राचार्य सु. रा. ओझरकर आणि डॉ. श्री. आ. देशपांडे १२ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. एम. ए. पाटील आणि १३ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. व्ही. एस. शेणवाई, डॉ. दि.व्यं. जहागिरदार आणि माझी राहण्याची व्यवस्था हॉटेलमध्ये करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्णावस्थेत होते. महाविद्यालयात प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. १४ व्या वार्षिक अधिवेशनासाठी डॉ. एस.व्ही. खांदेवाले, अर्थशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांची निवड झाली होती. १४ वे अधिवेशन महात्मा फुले महाविद्यालय वरुड येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. बोकरे यांनी उद्घाटन प्रसंगी विशेष व्याख्यान दिले होते. वरुडला जाण्यापूर्वी मी प्राचार्य मधुकरराव देशमुख यशवंत महाविद्यालय सेलू यांच्याकडून लेखी पत्र घेतले होते. १५ व्या वार्षिक अधिवेशनासाठी प्राचार्य डॉ. एस. एच. जावंधिया जी. एस. कॉलेज खामगाव यांची निवड झाली होती. या अधिवेशनाची जबाबदारी यशवंत महाविद्यालय सेलू यांनी घेतली होती. या अधिवेशनात प्रतिनिधींची व्यवस्था कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये करण्यात आली होती. आम्ही एका लहानशा खोलीत बेंचवर झोपलो होतो. रात्री १२ वाजताचे सुमारास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. जी. बोकरे आले होते. त्यांनी मला विचारले की राहण्याची व्यवस्था कोठे आहे. तेव्हा मी त्यांना माझा बेंच रिकामा करून दिला होता. नंतर मी बाजूला हॉलमध्ये प्रतिनिधींच्या सोबत जिथे जागा मिळेल तिथे झोपलो होतो. माननीय कुलगुरूंनी कोणत्याही आलिशान

राहण्याच्या व्यवस्थेची अपेक्षा न करता लहानशा खोलीत रात्र काढली होती. हा त्यांचा मोठेपणा मानावा लागेल. प्राचार्य मधुकरराव देशमुख यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या २ चमू मध्ये रस्सीखेच स्पर्धा आयोजित केली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रतिनिधींची संख्या जास्त असल्यामुळे नागपूर विद्यापीठाची जम्मू विजयी झाली होती. हा एक आगळा वेगळा अनुभव होता.

१६ व्या अधिवेशनासाठी प्रा. के. आर. खेरडे, धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर यांची निवड झाली होती. फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या महाविद्यालयाने गायनाचा सुरेख कार्यक्रम आयोजित केला होता. या अधिवेशनापासून प्रा. ग. प्र. पिंपरकर आणि डॉ. के. आर. नाणेकर स्मृती व्याख्यानमाला परिषदेने सुरू केली. पहिले पुष्प प्रा.आर.व्ही. रानडे राज्यशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी गुंफले होते. प्रा. रानडे सर पुसदला व्याख्यानासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसने आले होते.

१७ व्या वार्षिक अधिवेशनासाठी प्रा. डी. एस. वखरे महात्मा फुले महाविद्यालय वरुड यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. १७ वे अधिवेशन कर्मवीर महाविद्यालय मूल येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशना प्रसंगी अर्थ–वाणिज्य परिषदेचे संयुक्त उद्घाटन आणि समारोप कार्यक्रम पार पडला होता. अधिवेशनाचे उद्घाटन तत्कालीन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शांतारामजी पोटदुखे यांनी केले होते. १८ व्या वार्षिक अधिवेशनासाठी डॉ. सौ. सुनंदा सोनारीकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांची निवड झाली होती. या परिषदेचे आयोजन शासकीय विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे झाले होते. १९ व्या वार्षिक अधिवेशनासाठी प्रा. व्ही. एस. कुलकर्णी यांची निवड झाली होती. अधिवेशनाचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय चिमूर येथे करण्यात आले होते. २० व्या वार्षिक अधिवेशनासाठी डॉ. सौ. अंजली कुलकर्णी यांची निवड झाली होती. जगदंबा महाविद्यालय अचलपूर द्वारे आयोजित अधिवेशन परतवाड्यातील मंगल कार्यालयात पार पडले होते. हे परिषदेचे रजत महोत्सवी वर्षातील अधिवेशन होते.

२१ व्या वार्षिक अधिवेशनासाठी प्रा. डी. आर. अग्रवाल शासकीय विदर्भ महाविद्यालय अमरावती हे अध्यक्ष होते. अधिवेशनाच्या आयोजनासाठी फार अल्प वेळ मिळाला होता. अर्थशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. २२ व्या वार्षिक अधिवेशनासाठी डॉ. आर. वाय. माहोरे यांची निवड झाली होती. जी. एस. कॉलेज खामगाव द्वारे आयोजित अधिवेशनासाठी संपूर्ण लक्झरी बस आरक्षित केली होती. योगायोग असा की त्यावेळी रिफ्रेशर कोर्स सुरू होता. मी त्या कोर्सचा समन्वयक होतो. शैक्षणिक सहल म्हणून सर्वांना अधिवेशनात येण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एक–दोन सहभागी प्राध्यापकांना अधिवेशनात येणे शक्य झाले नव्हते. परंतु त्यांनी बसचे भाडे दिले होते. ही माझ्या लग्नाची वरात आहे असे काही मित्रांनी म्हंटले होते.

२३ वे वार्षिक अधिवेशन अर्थशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने आयोजित केले होते. डॉ. दि व्यं. जहागिरदार

शासकीय विदर्भ महाविद्यालय अमरावती अधिवेशनाचे अध्यक्ष होते. उद्घाटन प्राध्यापक योगानंद काळे, प्र-कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी केले होते. कुलगुरू डॉ. चोपणे सुद्धा परिषदेला उपस्थित झाले होते. वेळ मिळाला तर नक्की येईल असे कुलगुरूंनी आश्वासन दिले होते. योगायोग असा कि यावेळी सुद्धा रिफ्रेशर कोर्स सुरु होता. यामध्ये काही विधी शाखेतील प्राध्यापक सहभागी होते. मी या कोर्सचा समन्वयक होतो. दोन दिवसाच्या अधिवेशनासाठी सर्व सहभागी प्राध्यापक उपस्थित होते. विधी शाखेतील प्राध्यापक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

२४ व्या अधिवेशनासाठी डॉ. व्ही. एम. वैद्य अर्थशास्त्र विभाग प्रमुख नागपूर विद्यापीठ हे होते. नांदगाव खंडेश्वर येथे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.

२९ व्या अधिवेशनाच्या वेळी एस. एन. मोर महाविद्यालयाने तुमसर येथे मंगल कार्यालयात मोठ्या खोल्यांमध्ये राहण्याची व्यवस्था केली होती. ३२ व्या अधिवेशना प्रसंगी श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयाने अंजनगाव सुर्जी येथे मंगल कार्यालयात प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था केली होती.

३०व्या आर्णी येथील वार्षिक अधिवेशनाच्या वेळी काही प्रतिनिधींची व्यवस्था प्राध्यापकांच्या तर काहींची व्यवस्था डॉ. पिस्तूलकर यांच्या घरी केली होती.

अलीकडे राहण्याच्या चांगल्या सोयी उपलब्ध आहेत. बदलत्या काळानुसार महाविद्यालयांनी चांगली व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला आहे. ४१ व्या अधिवेशना प्रसंगी विद्यासागर महाविद्यालय खैरी (रामटेक) येथे मंगल कार्यालयात चांगली व्यवस्था करण्यात आली होती. ४२, ४३ आणि ४४ व्या अधिवेशना प्रसंगी जी. एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुर बाजार, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर आणि भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे महाविद्यालयांनी हॉटेलमध्ये जास्तीत जास्त पदाधिकाऱ्यांची आणि पाहुण्यांची व्यवस्था केली होती. अधिवेशनात फक्त राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था कशी एवढेच महत्त्वाचे नाही.

दिवसेंदिवस इंटरनेटचा वाढत्या सोयीमुळे शोधनिबंधाची गुणवत्ता वाढली आहे. तरुण प्राध्यापक मोठ्या संख्येने शोधनिबंध लिहिण्याचा प्रयत्न करतात. मी आणि डॉ. दि व्यं. जहागिरदार परिषदेचे ९ वर्ष सचिव होतो. प्रत्येक सभासदांना परिषदेचे नियमितपणे निमंत्रण पाठविले होते. सभासदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देवून सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मनपूर्वक आभार.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद गगनावरी गेलेला इवलासा वेलू

**संजय धनवटे**
प्राचार्य, ना.का. स्मृती मॉडेल कॉलेज,
कारंजा (घा.) जि. वर्धा

मी विद्यार्थी असतांनाच्या काळापासूनच अर्थशास्त्रातील ज्या काही पुस्तकांचा, संस्थांचा आणि व्यक्तींचा थोडाफार परिचय झाला, त्यामध्ये 'विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद' या नावाने कार्य करणाऱ्या संस्थेबद्दल प्रचंड आकर्षण होतेच. सन १९७०-७१ मध्ये इवलासा वेलू आज आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करीत आहे, याचा मला निश्चितच आनंद आहे. मध्य भारतातील सर्वात जुन्या आणि नियमितपणे अभ्यासू दृष्टीतून कार्य करण्याच्या या परिषदेच्या परिवाराचा मी जेव्हा सदस्य म्हणून वावरू लागलो. तेव्हापासून आजपर्यंत परिषदेच्या प्रत्येक घडामोडीत काम करतांना 'मी' चा कुठेही अंतर्भाव झाला नाही किंवा परिषदेच्या जडणघडणीत कार्य करणाऱ्या माझ्या गुरूवर्य, ज्येष्ठ आणि सहकारी मित्रांच्या मार्गदर्शनातून व सहकार्यातून तसे घडून आले नाही याचाही मला अभिमान आहे.

विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे कार्यक्षेत्र असणाऱ्या या परिषदेने वैदर्भीयांच्या आशा-आकांक्षांना खऱ्या अर्थाने मूर्तरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. अतिशय शिस्तबद्ध आणि विशिष्ट ध्येयाने राष्ट्रीय, राज्य तसेच विदर्भ प्रदेशांच्या आर्थिक प्रश्नांना मूर्तरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. अतिशय शिस्तबद्ध आणि विशिष्ट ध्येयाने राष्ट्रीय, राज्य तसेच विदर्भ प्रदेशाच्या आर्थिक प्रश्नांसंबंधी अभ्यास करणारी एक संस्था आपल्या सर्वांच्या सहकार्याने नावारूपास आली आहे, याचा अभिमान बाळगला पाहिजे. 'विदर्भ अर्थशास्त्र परिषद' म्हणजे नवीन विद्यार्थ्यांच्या मनातील अर्थशास्त्राची भीती घालवून लिहायला, वाचायला व बोलायला शिकविणारे एक व्यासपीठ आहे. असे म्हटल्यास अतिश्योक्ती होणार नाही. एवढेच नव्हे तर परिषदेची वार्षिक अधिवेशने म्हणजे आमच्यासाठी उद्‌बोधन, उजळणी वर्गाबरोबरच नात्या गोत्याच्या त्या मंडळींना भेटण्याचे दिवाळी सणापेक्षाही मोठे आकर्षण आहे. मी महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून कार्य करीत असतांना मला बऱ्याच वेळा अधिवेशनाच्या तारखा गैरसाईच्या असत, तरीपण माझी अनुपस्थिती राहिली नाही. एवढा जिव्हाळा आणि प्रेम परिषदेने माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना दिले आहे, असेच म्हणावे लागेल.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे काही वर्षे अपवाद वगळता नियमित अधिवेशन संपन्न झालीत. यामध्ये मी स्वत: सहभागी होत असतांना माझ्या सहकारी मित्रांच्या भेटी, ज्येष्ठांच्या सोबत चर्चा करतांना अर्थशास्त्रीय प्रश्नांवर संवाद ही तर मेजवानीच

होती. हळूहळू चर्चेत सहभाग आणि निबंध वाचन व सादरीकरण एवढी अपेक्षा बागळून नवीन मित्रमंडळींना परिषदेशी जोडण्याचा प्रयत्न करीत असतांना दि. ९ व १० फेब्रुवारी २०१३ रोजी श्री वसंतराव नाईक शासकीय कला आणि समाज विज्ञान संस्था, नागपूर येथे संपन्न झालेल्या अधिवेशनात ३८ व्या वार्षिक अधिवशनाचा अविरोध अध्यक्ष होण्याचा सन्मान प्राप्त झाला तो क्षण माझ्या जीवनातील अनेक क्षणांपैकी अतिशय आनंदाचा आणि उर्जा देणारा ठरला असेच मी समजतो.

दि. १५ व १६ फेब्रुवारी २०१४ रोजी ३८ वे वार्षिक अधिवेशन अतिशय मागासलेल्या आणि आदिवासी क्षेत्रात असलेल्या इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, राळेगांव जि. यवतमाळ येथे संपन्न झाले. माझ्या माहितीप्रमाणे विना अनुदानित असलेल्या महाविद्यालयात होणारे परिषदेचे हे एकमेव अधिवेशन असावे ग्रामपंचायतचा दर्जा असलेल्या, कुठल्याही हॉटेल्स आणि विश्रामगृहाची सुविधा नसणाऱ्या राळेगांवात मला अध्यक्षपद भूषविता आले, याचा मला अभिमान आहे. परंतु त्याहीपेक्षा एका विना अनुदानित संस्थेतील माझे सहकारी डॉ. दिलीप गुर्जर यांनी अधिवेशन आयोजित करण्याचे जे धाडस दाखविले ते खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यामुळे कुठल्याही मानसन्मानाचा विचार माझ्या मनात देखील आला नाही ही प्रवृत्ती माझ्यात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या संस्कारातून आली, असे मी मानतो. अध्यक्षीय भाषणातून विदर्भाच्या सिंचनासबंधी ज्वलंत प्रश्नांचा परामर्श घेण्याची संधी मला प्राप्त झाली याचे मला समाधान वाटते.

अतिशय ग्रामीण महाविद्यालयातील वार्षिक अधिवेशनात खेळ सिद्धांत, भारतातील दारिद्र्याची वास्तविकता आणि विदर्भातील पशुधन या विषयावर तीन स्वतंत्र सत्रात चर्चा घडून आली. खेळ सिद्धांत या नवीन विषयाची संकल्पना अभ्यासक्रमांमध्ये रूजविण्याचा प्रयत्न होत असतांना दुसरे दोन विषय मात्र अधिवेशन क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे प्रत्यक्ष व्यावहारिक स्थितीचे मंथन घडून आले. याशिवाय डॉ. नाणेकर व प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यानामध्ये पारनेर येथील ॲड. सत्यनारायण अंबोटी यांचे 'पूर्णवादी अर्थशास्त्र' या विषयावरील व्याख्यान विदर्भातील अभ्यासकांना नवीन दिशा देणारे ठरले असे म्हणता येईल. परिषदेच्या एक आगळा वेगळा उपक्रम म्हणजे 'An Uncertain Glory : India and Its Contradiction' या ग्रंथांवर डॉ. अंजली कुळकर्णी यांनी केलेले भाष्य महत्त्वपूर्ण ठरले. खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थशास्त्राचा अभ्यास करणारे आणि चिंतन करण्यास बाध्य करणारे हे अधिवेशन ठरले एवढेच नाही तर तो एक अविस्मरणीय अधिवेशन म्हणता येईल.

'विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या' मार्गात वाटचाल करीत असतांना 'Indian Economic Association' च्या कार्यकारी मंडळामध्ये सदस्य म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. हे सर्व श्रेय केवळ आणि केवळ 'विदर्भ अर्थशास्त्र परिषदेलाच' द्यावे लागेल. विदर्भातील अर्थशास्त्राचा गोतावळा तयार झाला. त्याचा मी एक पारिवारीक सदस्य आहे. याचा मनस्वी आनंद आहे. ही परिषद आज सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण करून शताब्दीकडे वाटचाल करतांना वटवृक्षात रूपांतरित व्हावी हीच सदिच्छा !

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद : पालखीचा वारकरी

**आर. बी. भांडवलकर**
अमोलकचंद महाविद्यालय,
यवतमाळ.

विदर्भ अर्थशास्त्र परिषद आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे याचा मनस्वी आनंद आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची स्थापना सन १९७०-७१ च्या काळात झाली असून ही मध्य भारतातील सर्वात जुनी आणि विशिष्ट ध्येयाने कार्य करणारी परिषद म्हणून सर्वपरिचित आहे हे सन्मानाने नमूद करावेसे वाटते. परिषदेने आपल्या अस्तित्वाने आणि कार्याने गौरवपूर्ण वाटचाल करून अर्धशतक पूर्ण केले आहे असे म्हणता येईल. या अर्धशतकाच्या वाटचालीत परिषदेने आपल्या उपक्रमांचा ठसा शैक्षणिक व बिगर शैक्षणिक क्षेत्रावर निर्माण करून अभ्यासकांची परिषद म्हणून मान्यता मिळविलेली आहे. एका अनुशेषग्रस्त विदर्भ प्रदेशातील विद्यानिष्ठ संस्था पन्नास वर्षे एवढा काळ टिकाव धरते, कालाघौत वर्धिष्णू होते आणि यशावकाश नावारूपाला येते याचे विदर्भ अर्थशास्त्र परिषद चांगले आणि आदर्श उदाहरण मानता येईल, विदर्भातील सर्वच विद्यापीठांच्या क्षेत्रात अर्थशास्त्र विषयासंबंधी प्रोत्साहन देणे, दर्जेदार पुस्तके निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणे, विदर्भाच्या विकासाचे मुद्दे सातत्याने उचलून वेळोवेळी आर्थिक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी विचारपीठ निर्माण करणे अशा विविधांगी गरजा भागविणे ही काळाची गरज होती नव्हे तर ती एक निकड आहे. भविष्यात विदर्भाचे वेगळे राज्य होईल ना होईल परंतु वैदर्भीयांच्या आशा-आकांक्षांना मूर्तरुप देण्यासाठी शिस्तबध्द व विशिष्ट उद्दिष्टांप्रत पोचण्यासाठीचे प्रयत्न होणे या गरजेतून अशी परिषद संघटीतपणे उभी करणे हे एकट्या दुकट्याचे काम नसून तिला अनेकांचे सहकार्य प्राप्त होऊन तिचा विकास झाला आहे.

कोणत्याही संस्थेच्या बाबतीत संस्था उभारणे, संस्था वाढवून नावारूपाला आणणे आणि नंतर येणाऱ्या पिढ्यांनी ती संस्था नव्या उंचीवर नेणे हे तीन टप्पे संस्थेच्या बाबतीत महत्वाचे असतात. संस्थापकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देवून जिद्दीने संस्थेला आकार दिलेला असतो. हळूहळू त्यांच्या योगदानाचा विसर पडतो , संस्था नावारूपाला आल्यानंतर तिचा ताबा घेण्यासाठी माणसे पुढे येतात. सर्वच संस्थांना कधी ना कधी या अवस्थामधून जावे लागते. परंतु याचवेळी काळजी करण्यासारख्या अशा काही बाबींनी संस्थापक मंडळी बेचैन होतात. अशावेळी ज्येष्ठांचा पाठिंबा घेऊन समर्थ नेतृत्व पुढे येत असतांना राजकारणांचा लवलेश निर्माण होणार नाही, नव्यांनीही नि:स्वार्थ सेवेचे व्रत घेऊनच परिषदेच्या कार्यात उडी घेतली पाहिजे. ते करतांना मी परिषदेला काय देणार ? हाच प्रश्न

त्यांना सातत्याने पडत राहिला पाहिजे. श्रम, बुद्धी व पैसा या तिन्ही रूपाने आपल्याला परिषदेला हातभार लावता येतो. परिषद आपली आहे, आपल्यासाठी आहे आणि तिला वाढविण्याची माझी जबाबदारी आहे नव्हे तर हा माझा परिवार आहे या भावनेतून पुढच्या पिढ्यांनी परिषद सांभाळली पाहिजे.

संस्थापकांनी याच उद्दिष्टातून परिषदेची पालखी आपल्या खांदयावर घेऊन ही दिंडी सुरु केली आहे. वाटेत अनेकजण त्या दिंडीत सहभागी झालेत. जीवनाच्या मार्गक्रमणात मलाही सन १९९९-२००० चया २४ व्या वार्षिक अधिवेशनापासून स्व. प्रा. भास्कर ढाले यांचे सहकार्याने व मार्गदर्शनात अखंडितपणे वारकरी म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो. पुढे वाटचाल करीत असतांना परिषद हीच माझी ओळख झाली याचा कधीही न पडणारा विसर आणि आनंद आहे.

'विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद' या नावाने स्थापन झालेल्या आजच्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्यक्षेत्र संपूर्ण विदर्भ प्रदेश म्हणजेच नागपूर व अमरावती महसूल विभागातील समाविष्ट अर्थशास्त्र विषयांचे शिक्षक यांचा अंतर्भाव आहे. सदर परिषद काही अपवादात्मक वर्षे वगळता दरवर्षी वार्षिक अधिवेशनाचे आयोजन विदर्भातील विविध सदस्यांच्या आणि महाविद्यालयाच्या सहकार्याने शहरी आणि विशेषत: ग्रामीण भागातून करीत असते. यामध्ये सहभागी होऊन एकमेकांच्या भेटीचा आनंद ही एक पर्वणीच असते. परिषदेच्या जडणघडणीत ज्यांचे मोलांचे योगदान राहिले आहे त्यामध्ये डॉ. बी. आर. ढेकणे, डॉ. सु. द. बाळ , डॉ. के आर. नाणेकर, प्रा. ग.प्र. पिंपरकर, प्राचार्य रा.ना. खर्चे, डॉ. श्री. आ. देशपांडे, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. दि.व्यं. जहागिरदार, आणि डॉ. आर.वाय. माहोरे इत्यादी अनेक ज्येष्ठ व ख्यातनाम अर्थतज्ज्ञांच्या मार्गदर्शनात परिषदेची वाटचाल समर्थपणे सुरु आहे. त्यांचे मी ऋण व्यक्त करतो आणि आज गगनावरी गेलेला इवलासा वेलू असाच बहरत राहावा अशी मनोमन इच्छा व्यक्त करतो.

संस्थापक सदस्यांनी सुरु केलेल्या पालखी सोहळ्यात जे समर्थ हात लागलेत त्यामध्ये प्रा. आर. एम. जोशी, डॉ. ए.पी. हरदास, प्रा. ए. एन. लोथे , प्रा. एस. आर. ओझरकर, डॉ. एस.एल. लोकरे, प्रा. एस. ए. पाटील, डॉ. एम. एस. शेणवाई , प्रा. एस. व्ही. जावंधिया , डॉ. के. आर. खेरडे, डॉ. डी. एस. वखरे, डॉ. सौ. सुनंदा सोनारीकर, प्रा. व्ही. एस. कुलकर्णी, डॉ.सौ. अंजली कुळकर्णी, प्रा. डी. आर. अग्रवाल, डॉ. व्ही. एम. वैद्य, प्रा.एस.एन. अंभोरे, प्रा. के. ई. पाटील, प्राचार्य एन. एफ. सुदा , प्राचार्य डॉ. आर.जी. भोयर, प्रा. एस. एस. देशमुख, डॉ. सौ. पुष्पा इंदूरकर, डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार, प्राचार्य डॉ. सौ. पुष्पा तायडे, प्रा. कमलाकर हनवंते, डॉ. एस. पी. कुळकर्णी, डॉ. एन. ए. पिस्तुलकर, प्राचार्य डॉ. आर.जी.टाले, डॉ. आर. आर. गव्हाळे, प्राचार्य डॉ. संजय धनवटे, डॉ. वनिता चोरे, डॉ. विनायक देशपांडे, प्राचार्य डॉ. एच. आर. तिवारी, डॉ. जे. एम. काकडे, कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस इत्यादी वारकऱ्यांसह मलाही या पालखीचा वारकरी म्हणून पालखी खांदयावरून वाहण्याचा योग आला हे माझे भाग्य समजतो. त्यामुळे जीवन धन्य झाल्याचे समाधान आहे.तसेच पन्नास वर्षांच्या या प्रवासातील अनेक सहप्रवासी आज या जगात नाहीत मात्र त्यांचे समर्पण, त्याग,

निष्ठा कधीच विसरता येणे शक्य नाही.

परिषदेच्या ३२ व्या वार्षिक अधिवेशनात माझी परिषदेचा अमरावती परिक्षेत्राचा सचिव म्हणून निवड झाली. पदभार स्वीकारतांना परिषदेची आर्थिक बाजू एक आव्हान होते परंतु पदभार सोडतांना आर्थिक स्थिती समाधानकारक झाली याचे समाधान आहे. सचिव पदाच्या कार्यकाळात परिषदेची एकूण सात वार्षिक अधिवेशने संपन्न झालीत हे कार्य करीत असतांना अनेक चांगले- वाईट अनुभव, मान-अपमान सहन करावे लागलेत परंतु याचे मनाला कुठेही दुःख झाले नाही. एक सेवा कार्य हातून घडल्याचा आनंद आहे. अधिवेशनाचे आयोजन करताना सर्वात महत्वाची कसोटी असते ती अधिवेशनाचे स्थळ शोधणे. परंतु या कामात माझे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. दि. व्यं. जहागिरदार सर यांचा उत्साह तरुणाला लाजवेल याही पेक्षा जास्त असल्यामुळे मला कधीच थकवा आला नाही, हे आवर्जून सांगावेसे वाटते. अधिवेशनाचे स्थळ निश्चित करतांना जेव्हा आम्ही स्वखर्चाने जायचो तेंव्हा एक सहल झाली यादृष्टीतून आम्ही प्रवासाकडे बघत होतो. प्रवासात मधे कुठे जेवणाचा किंवा फराळ करण्याचा प्रसंग आल्यास डॉ. जहागिरदार सर कॅश काऊंटरवर आधीच पैसे ॲडव्हॉन्स म्हणून जमा करीत हा त्यांच्या दातृत्वाचा मोठा पैलू आम्हाला कळून आला. वाहनांचा खर्च जो समसमान वाटा यायचा त्यामध्ये सुध्दा सरांचा सहभाग राहत असे हे आवर्जून सांगावेसे वाटते. या संपूर्ण कार्यकाळात अधिवेशनाच्या निमित्याने अनेक लोकांना परिषदेशी जोडता आले. विशेषत्वाने नवीन तरुण वर्ग या काळात परिषदेशी जुळला, चर्चासत्रात सहभागी झाला याचे फार मोठे समाधान आहे. नव्हे तर ही सर्व अधिवेशने अतिशय चांगल्या व दर्जेदार पध्दतीने पार पडलीत याचा मनस्वी आनंद आहे. मुद्दाम याचा सविस्तर आढावा घ्यावासा वाटतो.या मैलाच्या दगडावरुन मागे वळून पाहतांना व सिंहावलोकन करतांना स्मृतिपट डोळ्यापुढून सरकतो आहे.

दि. १४ व १५ फेब्रुवारी २००९ रोजी जनता महाविद्यालय, चंद्रपूर येथे संपन्न झालेले ३३ वे वार्षिक अधिवेशन माझ्या कार्य काळातील पहिले अधिवेशन होते. अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.कमलाकर हनवंते सर आणि कार्याध्यक्ष डॉ. आर. वाय. माहोरे यांच्या सहकार्याने हे अधिवेशन यशस्वी पार पाडता आले. डॉ. एच. ए.हुद्दा आणि डॉ. आशिष महातळे यांनी मला कुटुंबातील सदस्याप्रमाणे प्रेमपूर्वक वागणूक दिली ज्यामुळे आम्ही सर्वजण भारावून गेलो . या अधिवेशनात 'पर्यावरण आणि विकास', 'भारताची अकरावी पंचवार्षिक योजना' आणि 'जिल्हा निहाय रस्ते विकास' या तीन विषयावर स्वतंत्र चर्चासत्रे संपन्न झालीत. प्रा. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यान यामध्ये प्राचार्य डॉ. मदन धनकर यांचे 'विदर्भाची अर्थव्यवस्था समस्या व आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. या अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनामुळे माझ्यामध्ये एक प्रकारचा उत्साह निर्माण झाला. दि. १२ व १३ फेब्रुवारी २०१० रोजी ३४ वे वार्षिक अधिवेशन कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मारेगांव रोड, जि. यवतमाळ येथे संपन्न झाले. अतिशय ग्रामीण, आदिवासी क्षेत्र असलेल्या, कुठल्याही हॉटेल्स किंवा विश्रामगृहाची सुविधा नसलेल्या ग्रामपंचायत स्तरावरील गावात अधिवेशनाचे यशस्वी आयोजन स्व. डॉ. माणिक ठिकरे यांनी करून दाखविले. या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे

महाशिवरात्री उपवासाचा दिवस बहुतांश सदस्यांना असणारा उपवास भोजनाच्या ऐवजी उपवासाच्या पदार्थाचा भरघोस आस्वाद घेतांना एक वेगळाच अनुभव होता तर अधिवेशनाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे बस थांब्यापासून महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत प्रत्येक पदाधिकाऱ्याचे नावाचे स्वागताचे फ्लेक्स मोठ्या प्रमाणात लावण्यात आले होते. जे कुठेही आधी किंवा नंतर मी बघितले नाही. या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. कुळकर्णी सर आणि कार्याध्यक्ष डॉ. आर. वाय. माहोरे यांचेसह माझेवर बंधूव्रत प्रेम करणारे नागपूर परिक्षेत्राचे सचिव डॉ. एच. ए. हुद्दा यांचे भरपूर सहकार्य प्राप्त झाले. सदर अधिवेशनात 'महात्मा गांधीचे आर्थिक विचार वर्तमान स्थितीत यथार्थता' , 'जागतिक वित्तीय संकट आणि भारतीय अर्थव्यवस्था' तसेच 'विदर्भातील विशेष आर्थिक क्षेत्र' (जिल्हा निहाय) या तीन विषयावर स्वतंत्र चर्चासत्रे संपन्न झाली. प्रा. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यानमध्ये आ. प्रा. वसंतराव पुरके यांचे 'संत तुकाराम, साहित्य व अर्थशास्त्र' याविषयावर व्याख्यान झाले.

दि. २६ व २७ फेब्रुवारी २०११ रोजी ३५ वे वार्षिक अधिवेशन न्यु आर्टस कॉलेज, वर्धा येथे संपन्न झाले. ग्रामीण भागापेक्षाही अतिशय गैरसोय झालेल्या या अधिवेशनाला अर्थशास्त्र परिवाराने गोड करून घेतले याचा आनंद आहे. सदर अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. निवृत्ती पिस्तुलकर आणि कार्याध्यक्षा डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार यांचे मनाचा मोठेपणा हे अधिवेशन संपन्न होण्यात महत्वपूर्ण ठरला. या अधिवेशनामध्ये 'पिगूनंतरचे आर्थिक कल्याणाचे सिद्धांत', 'नवीन आर्थिक धोरणानंतर भारतातील अन्नधान्य उत्पादन आणि किमती' आणि 'विदर्भातील जिल्हानिहाय सिंचन व्यवस्था' या विषयावर स्वतंत्र चर्चासत्रे पार पडली. डॉ. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यानमध्ये मा. अशोक ठाकूरदासजी बंग यांनी 'खेडी, शेती आणि अर्थकारण' या विषयावर व्याख्यान दिले. या अधिवेशनात मला स्वतःला महाराष्ट्र राज्य विधानमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात पदव्युत्तर अर्थशास्त्र विद्यार्थ्यांचा दरवर्षी अभ्यासवर्ग शासनाचे खर्चाने घेण्यात यावा आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळाने अनुशेषांतर्गत विदर्भातील सर्वच विद्यापीठातील सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील विषयाचा अभ्यासक्रम उर्वरित महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे राबविण्याकरीता प्रयत्न करावा या विषयी चर्चा करता आली याचे समाधान आहे.

दि.२८ व २९ जानेवारी २०१२ रोजी ३६ वे वार्षिक अधिवेशन आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव) जि.वाशिम येथे परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर.जी.टाले आणि कार्याध्यक्षा डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार तसेच नागपूर परिक्षेत्राचे सचिव डॉ. एच. ए. हुद्दा यांचे सहकार्याने संपन्न झाले. ग्रामपंचायतचा दर्जा असलेल्या शेंदुरजना (अढाव) या गावात अधिवेशन संपन्न होत असतांना खऱ्या अर्थाने ग्रामीण अर्थव्यवस्था व गावातील आठवडी बाजार यांचे जवळून निरीक्षण करता आले. संस्थेचा अतिशय सुंदर आध्यात्मिक परिसर आणि प्राचार्य डॉ. एच. आर. तिवारी व डॉ. भिसे मॅडम यांचा उत्साह कौतुकास्पद होता. या अधिवेशनामध्ये 'केन्स व केन्सनंतरचे मौद्रिक सिद्धांत', 'नियोजनाची साठ वर्षे' आणि 'विदर्भातील सहकारी चळवळ दशा व दिशा' या विषयावर तीन स्वतंत्र चर्चासत्रे पार पडली. डॉ. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यान मध्ये

तत्कालीन अधिष्ठाता व सिनेट सदस्य डॉ. विवेक देशमुख, यवतमाळ यांचे 'साहित्यातून जीवनाचा अर्थ' या विषयावर व्याख्यान झाले. या अधिवेशनामध्ये परिषदेचे नामकरण 'विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद' ऐवजी 'विदर्भ अर्थशास्त्र परिषद' असे करण्याचे निश्चित करण्यात आले.

दि.९ व १० फेब्रुवारी २०१३ रोजी ३७ वे वार्षिक अधिवेशन श्री वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथे माझे सहकारी मित्र डॉ.एच.ए. हुद्दा यांनी अतिशय (Mini IE-) दर्जेदार-अधिवेशनाचे आयोजन करून परिषदेच्या ऋणातून मुक्त झाल्याचे दाखवून दिले. परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर. आर. गव्हाळे व कार्याध्यक्षा डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार यांचे सहकार्याने संपन्न झाले. या अधिवेशनात विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व भारतीय सामाजिक संशोधन आयोगाचे (ICSSR) चे अध्यक्ष डॉ. सुखदेवराव थोरात आणि महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव मा.जे.पी. डांगे साहेब यांची उपस्थिती परिषदेच्या मानात तुरा रोवणारी ठरली याचा आनंद आहे. या अधिवेशनापासून 'विदर्भ अर्थशास्त्र परिषद' या नावाने परिषदेची पुढील वाटचाल कार्यरत राहील यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. याच अधिवेशनापासून परिषदेच्या 'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेला ISSN- 2320-0197 क्रमांक प्राप्त करण्यात यश आले. तसेच अर्थशास्त्रातील जुन्या ग्रंथावर विचार मंथन हा नवीन उपक्रम सुरु करण्यात आला. यामध्ये 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' ग्रंथावर डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांनी भाष्य केले. सदर अधिवेशनामध्ये 'माहितीचे अर्थशास्त्र', 'किरकोळ क्षेत्रातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक' आणि 'विदर्भातील पर्यटन विकास' (जिल्हानिहाय) या विषयावर तीन स्वतंत्र चर्चासत्रे संपन्न झाली. डॉ. नाणेकर व प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यानमध्ये मा.देविदासजी घोडेस्वार यांचे 'सामाजिक न्यायव्यवस्था' या विषयावर व्याख्यान झाले. दि.१५ व १६ फेब्रुवारी २०१४ रोजी ३८ वे वार्षिक अधिवेशन ग्रामपंचायत स्तरावरील राळेगाव येथील इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय येथे संपन्न झाले. या महाविद्यालयातील कला शाखा विना अनुदानीत असतांना डॉ. दिलीप गुर्जर यांनी अधिवेशन यशस्वी पार पाडण्याचे धाडस दाखविल्याबद्दल त्यांचे खरोखरच अभिनंदन केले पाहिजे. सदर अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय धनवटे यांनी अध्यक्ष म्हणून कुठल्याही मानसन्मानाची अपेक्षा न ठेवता अधिवेशन संपन्न करण्यात मोलाचे योगदान दिले. यासोबत परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ० सौ. मुक्ता जहागिरदार आणि नागपूर परिक्षेत्राचे सचिव डॉ. एस.बी.कटमुसरे यांचेही सहकार्य लाभले. अधिवेशनात 'खेळ सिद्धांत', 'भारतातील दारिद्र्याची वास्तविकता' आणि 'विदर्भातील पशुधन' (जिल्हानिहाय) या विषयावर तीन स्वतंत्र चर्चासत्रे संपन्न झालीत. डॉ. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यान मध्ये पारनेर येथील ॲड. सत्यनारायण अंबोटी यांचे 'पूर्घावादी अर्थशास्त्र' याविषयावर व्याख्यान झाले. अर्थशास्त्रातील ग्रंथावर डॉ. अंजली कुळकर्णी यांनी An Uncertain Glory India and its contradiction. या ग्रंथावर भाष्य केले. या अधिवेशनामध्ये मनाला वेदना देणारी एक घटना म्हणजे पहिल्यांदा परिषदेच्या अध्यक्ष पदाकरीता मतदान झाले-वास्तविक विदर्भ अर्थशास्त्र परिषदेला ही घटना भूषणावह निश्चितच नाही याचे

दुःख मला आजही आहे.

दि. ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०१५ रोजी ३९ वे वार्षिक अधिवेशन अतिशय दुर्गम अशा तिबेटीयन वस्ती लागूनच असलेल्या आणि आदिवासी क्षेत्रातील अर्जुनी/ मोर येथील शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात संपन्न झाले. परिषदेच्या अध्यक्षा डॉ. वनिता चोरे आणि कार्याध्यक्षा डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार मॅडम यांचे अतिशय मोलाचे योगदान या अधिवेशनात लाभले याचे कारण यजमान महाविद्यालयातील स्थानिक सचिव डॉ. एस. पी. झांबरे यांचेकडे दुःखद् घटना घडल्यामुळे त्यांना अधिवेशनाचे एक दिवस आधी परगावी जावे लागले तर नागपूर परिक्षेत्राचे सचिव डॉ. एस. बी. कटमुसरे यांची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे तेही उपस्थित राहू शकले नाही. या दोन कार्यकुशल व्यक्तीच्या अनुपस्थितीत हे अधिवेशन पार पाडतांना माझी मात्र कसरत झाली. परंतु त्या महाविद्यालयातील मा. प्राचार्य व इतर सर्व सहकाऱ्याचे योगदानातून हे अधिवेशन यशस्वीरित्या संपन्न झाले. सदर अधिवेशनामध्ये 'आदान-प्रदान विश्लेषण', 'अन्नसुरक्षितता आणि भारत' तसेच 'विदर्भातील फळउत्पादन' (जिल्हानिहाय) या विषयावरील तीन स्वतंत्र चर्चासत्रे संपन्न झालीत. जुन्या अर्थशास्त्रीय 'दास कॅपिटल' या ग्रंथावर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी भाष्य केले. डॉ. नाणेकर व प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यान मध्ये मा. फुन्सोक तोपक्याल यांचे 'तिबेटीयन वस्तीतील उद्योग' या विषयावर व्याख्यान झाले. याच अधिवेशनापासून 'अर्थमीमांसा' ह्या संशोधन पत्रिकेला ICSSR कडून आर्थिक साहाय्य मिळण्यास सुरुवात झाली हे आपणा सर्वांचे प्रयत्नातून आलेले यश आहे. तसेच यवतमाळ येथील श्रीमती सरोज ढाले यांनी दिलेल्या आर्थिक योगदानातून दरवर्षी विदर्भातील एखादया महाविद्यालयात स्व.प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यान उपक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याच अधिवेशनात 'अर्थमीमांसा' संशोधन पत्रिकेकरिता सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली. एकंदरीत ही परिषद केडेमिक दृष्टीने प्रगती करीत असल्याचे समाधान प्राप्त झाले. माझी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यवाह-खजिनदार पदी निवड झाल्यामुळे मी मुदतपूर्व अमरावती परिक्षेत्राच्या सचिव पदाचा राजीनामा दिला. सर्व सभासदांचा आग्रह असूनसुद्धा मनुष्याने कुठे थांबले पाहिजे याचे भान मला असल्यामुळे त्यांच्या आग्रहाचा मला सन्मान करता आला नाही. आणि नवीन सचिव डॉ. राजेश चव्हाण यांची निवड करण्यात आली तसेच डॉ. एस. बी. कटमुसरे यांनी तब्येतीचे कारणावरुन नागपूर परिक्षेत्राचे सचिव पद सोडल्यामुळे डॉ. गणेश मायवाडे यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली. डॉ. वनिता चोरे यांनी पुढाकार घेऊन एक मोठी टेम्पो ट्रॅव्हलर गाडी भाड्याने ठरवली आणि सर्वांना एकत्र या अधिवेशनाला जाता आल्यामुळे लांबचा प्रवास असूनही सहलीचा आनंद उपभोगता आल्यामुळे प्रवास जाणवला नाही हे आवर्जून सांगावेसे वाटते. अमरावती येथील जहागिरदार परिवाराने डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांच्या मातोश्री स्व. कमळाबाई जहागिरदार यांचे जन्मशताब्दी निमित्य विदर्भातील वेगवेगळ्या महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा, चर्चासत्र किंवा व्याख्यान सुरु करणार असल्याचे घोषित केले यासाठीचा संपूर्ण खर्च जहागिरदार परिवार, अमरावती हे करणार ही बाब अतिशय

महत्वाची आणि स्पृहणीय आहे.

माझ्या या सचिव पदाच्या कार्यकाळात चर्चासत्रातील उत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरणास डॉ. श्रीनिवास खांदेवाले आणि डॉ. दि. व्यं. जहागिरदार प्रोत्साहनपर पारितोषिक तसेच विदर्भ स्तरावरील विषयाला स्व. देविदासजी हनवंते स्मृती पारितोषिक सुरु झाले ही शोध निबंध लेखकाला प्रेरणा देणारी गोष्ट ठरली आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषद ही संस्था मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी (महा. ३६१/२०१५) करण्यात यश आले ही फार मोठी उपलब्धी आहे. सध्या डॉ. राजेश चव्हाण आणि डॉ. विठ्ठल घिनमीने ही दोन महत्वपूर्ण अशी परिषदेच्या रथाची चाके असून अर्जुनाच्या भूमिकेत डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. सदस्यांच्या बळावर हा रथ दौडत निघाला आहे अजून बरेच चालायचे आहे याची जाणीव ठेवून भविष्यात विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा जिव्हाळा कुठेही कमी होणार नाही हीच माझी आपणांकडून अपेक्षा आहे.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या तालमीतून मला जीवनाचा मार्ग कळला एवढेच नव्हेतर विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष पदाचा सन्मान प्राप्त झाला. मराठी अर्थशास्त्र परिषदेचा कार्यवाह – खजिनदार म्हणून कार्य करतांना संबंध महाराष्ट्रातील अर्थशास्त्र परिवारातील सदस्यांचे प्रेम व सदिच्छा प्राप्त करता आल्यात ही माझ्या आयुष्यातील मोठी उपलब्धी आहे तव्दतच मला Indian Economic Association च्या कार्यकारिणीमध्ये महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. त्यामुळे माझ्या जीवनातील या परिषदेच्या कार्याचा प्रवास कदापीही विसरणे शक्य नाही. या प्रवासात साथ दिलेल्या सर्वाप्रति कृतज्ञता व्यक्त करतांना मला खरोखरच गलबलून येत आहे आणि शब्दही अपुरे पडत आहे.

अलिकडे राजकारणाच्या दलदलीत समाजात आणि शासन दरबारी अशा अभ्यासू परिषदेकडे पाहण्याचा दृष्टीकोन अतिशय खालावलेला आहे असे खेदाने म्हणावे लागते. विदर्भातील आर्थिक आणि अनुशेषासारख्या प्रश्नांच्या बाबतीत शासनाने सदर परिषदेची वेळीच दखल घेतली असती तर संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ प्रदेश मागासलेला राहिला नसता. वास्तविकपणे विदर्भ विकास मंडळ असेल किंवा जिल्हा नियोजन मंडळ असेल यामध्ये परिषदेतील अभ्यासू व्यक्तीला स्थान दिल्या गेले असते तर विदर्भाची ही अवस्था बदलण्यास वेळ लागला नसता असे माझे ठाम मत आहे. याकरीता आपण शासन स्तरांवर प्रयत्न करणे गरजेचे झाले आहे. एवढेच नव्हेतर विद्यापीठातील अभ्यास मंडळे आज राजकारणाची अड्डे बनू पाहत आहेत. याही बाबतीत परिषदेच्या जागरुक सदस्यांनी आवाज उठविण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण परिवर्तनासाठी काळच उत्तर असते यांचे चिंतन होणे आवश्यक आहे नाहीतर ही राजकारणी विचाराची झळ एखाद्या अभ्यासू परिषदेला बसून अशा संस्था उध्दवस्त होण्यास वेळ लागणार नाही. म्हणून गट–तटाच्या आणि राजकीय विचारांच्या चपला – जोडे बाहेर काढूनच या निःस्वार्थ पालखी सोहळ्यात सहभागी झाले पाहिजे. तरच ह्या परिषदेची बघता–बघता ५० वर्षे लोटली आहे त्या रोपट्याचा वटवृक्ष बनण्यास वेळ लागणार नाही या शुभेच्छासह शताब्दी वर्षाकडे वाटचालीस मन:पूर्वक सदिच्छा!

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा वाटसरु

**आर. आर. गव्हाळे**
जी.एस. कॉलेज,
खामगांव, जि. बुलडाणा.

अर्थशास्त्र विषयाचा अभ्यासक आणि शिक्षक म्हणून जी.एस. कॉलेज, खामगांव जि. बुलडाणा येथे रुजू झाल्यानंतर परिषदेबाबत आकर्षण निर्माण करणारे माझे मार्गदर्शक स्व. प्राचार्य डॉ. श्या.ह.जावंधिया साहेब यांच्या मुळेच माझी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेशी नाळ जुळली जी आजही कायम आहे याचा मला अभिमान आहे, सरांसोबत परिषदेच्या अधिवेशनात सहभागी झाल्यानंतर या कौटुंबिक परिषदेचा जिव्हाळा आणि प्रेम कदापीही विसरणे शक्य नाही. नव्हेतर हा माझा परिवार समजून नियमीतपणे मला सहभागी होता आले याचा मनस्वी आनंद आहे. मध्य भारतातील आणि महाराष्ट्रातील सर्वात जुन्या आणि आदर्शवत परिषदेचा सदस्य असतांना या परिषदेची वाटचाल सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे होतांना मन भारावून जाते कारण या वाटचालीत मी एक वाटसरु आहे.

विदर्भात कार्यरत असणाऱ्या या परिषदेच्या माध्यमातून माझ्या विद्यार्थ्यांना मी जे काही ज्ञानदानाच्या रूपाने देऊ शकलो त्यामध्ये विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे योगदान मोलाचे आहे. परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे निमित्ताने विद्यार्थी दशेत ज्या महामानवाची आणि लेखकांची पुस्तके वाचलीत ज्यांचे नाव ऐकून होतो अशा ज्येष्ठ तज्ज्ञांसोबत अधिवेशन काळात सहवास मिळत गेला तो स्मरणात राहणाराच असतो. त्यांच्या संपर्कात आल्यानंतर राष्ट्रीय, राज्य आणि प्रादेशिक स्तरावरील आर्थिक प्रश्नांबाबत चर्चा ही जीवनाल एका विशिष्ट मार्गाने घेऊन जाणारी ठरते असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. तर पुढे परिषदांच्या चर्चासत्रात सहभागी होण्याची संधी व हिंमत प्राप्त झाल्यामुळे संशोधनपर निबंध लिहू शकलो याचे श्रेय निश्चितच विदर्भ अर्थशास्त्र परिषदेला आहे. हळहळू मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आजीव सदस्य झालो आणि त्याही परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात वारीप्रमाणे नियमित जाऊ लागलो आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीचा सदस्य सुद्धा झालो होतो. ही वाटचाल अविरत चालू असतांना Indian Eco-nomic -ssociation, Indian Society of Labour Economics , Indian Society of -gricultural Marketing यासारख्या संस्थांचे आजीवन सदस्य होता आले. एवढेच नव्हे तर इंडियन सोसायटी ऑफ अग्रीकल्चरल मार्केटिंगच्या कार्यकारणीवर सदस्य होण्याची सुद्धा संधी प्राप्त झाली.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अभ्यास मंडळावर माझ्या अर्थशास्त्र परिवारातील मित्रांच्या सहकार्याने कार्य करण्याची संधी दोनदा

मिळाली.

अलिकडे राजकारणाच्या दलदलीत या संस्था नष्ट होणार की काय? अशी भिती वाटायला लागली आहे. वास्तविक अशी आदर्श परिषद हिला स्वार्थाचा गंध होता कामा नये, अभ्यास व निस्सीम सेवा करणाऱ्यांना समजून घेतले पाहिजे. तरच या परिषदेचे वटवृक्षात रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाला नियमीत जात असतांना शेंदुरजना (अढाव) जिल्हा वाशिम येथील ३६ व्या वार्षिक अधिवेशनात ३७ व्या वार्षिक अधिवेशनाचा सर्वानुमते अध्यक्ष म्हणून माझी निवड झाली. या क्षणांचा आनंद आजही माझ्या स्मरणात आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ३७ वे वार्षिक अधिवेशन श्री वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथे माझे सहकारी मित्र डॉ. एच. ए.हुड्डा सर यांच्या सहकार्याने भव्यदिव्य अशा स्वरूपात पार पडले. या अधिवेशनाच्या उद्घाटन सोहळ्यात विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व भारतीय सामाजिक संशोधन आयोगाचे (ICSSR) अध्यक्ष डॉ. सुखदेवराव थोरात आणि समारोप कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव मा.श्री.जे.पी. डांगे साहेब(आयएएस)यांची उपस्थिती माझ्या दृष्टीने एक आनंदाचा क्षण होता.दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे याच अधिवेशनात अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेला ISSN प्राप्त झाले तसेच यानंतरची पुढील सर्व व्यवहार विदर्भ अर्थशास्त्र परिषद या नोंदणीकृत संस्थेच्या माध्यमातून व नावाने होतील यावर एकमत झाले ही माझ्या अध्यक्षपदाच्या काळातील आपल्या सर्वांच्या सहकार्याने अविस्मरणीय नोंद होय. याच अधिवेशनात 'माहितीचे अर्थशास्त्र', 'किरकोळ क्षेत्रातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक' आणि 'विदर्भातील पर्यटन विकास' (जिल्हानिहाय) या तीन विषयावर नाविण्यपूर्ण असे चर्चासत्र संपन्न झाले. तर अर्थशास्त्रातील जुन्या ग्रंथावर 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' ह्या ग्रंथावर डॉ. दि. व्यं. जहागिरदार यांनी केलेले व्याख्यान महत्वपूर्ण ठरले. तसेच प्रा. नाणेकर व प्रा. पिंपरकर स्मृती व्याख्यानामध्ये 'सामाजिक न्याय व्यवस्था' या विषयावर मा. देविदासजी घोडेस्वार यांचे व्याख्यान झाले. विदर्भ प्रदेशाच्या राजधानीत आणि महाराष्ट्राच्या उपराजधानीत होणारे हे अधिवेशन माझ्या करीता गौरवास्पद ठरले. यातून मला बरेच काही शिकता आले. त्याच शिदोरीच्या भरवश्यावर माझी अर्थशास्त्र विषयक अभ्यासक म्हणून अविरत वाटचाल सुरु आहे. अशा या परिषदेचा शताब्दी महोत्सव पाहण्याचा योग मला प्राप्त व्हावा हीच प्रभू चरणी प्रार्थना! परिषदेची उत्तरोत्तर होणारी वाटचाल अधिक उच्च शिखरावर नेण्याचे दृष्टीने नविन अभ्यासकांनी या वाटचालीतील मोठ्या संख्येने वाटसरू व्हावे. बोलण्यापेक्षा कर्तृत्व श्रेष्ठ ठरावे. राजकीय विचार परिषदेमध्ये निषिध्द व्हावेत तरच हा अर्थशास्त्र परिवार आदर्शवत ठरेल. ही परिषद आणि अधिवेशन सहलीचे प्रेक्षणीय स्थळ ठरु नये तर विचारमंथनातून अमृत निघावे ही मनोकामना प्रत्येकाचे मनात निर्माण होणे आवश्यक आहे. पदाची लालसा न ठेवता ज्येष्ठांचा आदर हीच परिषदेची शिकवण ठरावी तेंव्हाच ही निरंतर श्रृंखला कायम राहील.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद
# आर्थिक विचारवंतांचा गोतावळा

**वनिता चोरे**
माजी अध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**प्रास्तविक :**

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची दैदिप्यमान वाटचाल हीच आम्हा अर्थशास्त्र अभ्यासकांची पर्वणी. परिषदेला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. अर्थशास्त्राचे विदर्भातील नामवंत अभ्यासक डॉ. नाणेकर, प्रा.पिंपरकर, डॉ.श्री. आ. देशपांडे, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.दि. व्यं. जहागिरदार यांचे परिषदेची यशस्वी जडणघडण करण्याकरीता मोठे योगदान आहे. अशा या ऐतिहासिक परिषदेला अर्थशास्त्राची अभ्यासक म्हणून आजीवन सदस्य होण्याचे भाग्य मला लाभले ही माझ्याकरीता मोठी बाब आहे.

मी विद्यार्थी दशेमध्ये एम.ए. अर्थशास्त्र विदर्भ महाविद्यालयामध्ये शिकत असताना डॉ. जहागिरदार सर/मॅडम यांनी विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा कार्यक्रम घेतला आणि तेव्हापासून आम्हाला अनेक थोर अभ्यासकांचे विचार ऐकायला मिळाले त्या विचारांचे बोधामृत आजही आम्ही जोपासत आहे. त्यानंतर १९९३ मध्ये विदर्भ महाविद्यालयांमध्ये अर्थशास्त्र परिषदेचे आयोजन करण्यात आले तेव्हा मी १ वर्षापूर्वीच अर्थशास्त्राची प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते आणि १९९३ मध्ये मी परिषदेची आजीवन सदस्य झाले. त्यानंतर मात्र परिषदेचा सातत्याने अर्थशास्त्राच्या अभ्यासकांसाठी नवीन नवीन विचारांच्या परिवर्तनाचा जुन्या विचारांशी संबंध जोडताना डॉ. खांदेवाले , डॉ. जहागिरदार, डॉ.जहागिरदार मॅडम, डॉ.अंजली कुलकर्णी, डॉ.माहोरे, डॉ.विनायक देशपांडे, डॉ.फडणवीस मॅडम यांची कार्य करण्याच्या शैलीचे तर शब्दांमध्ये वर्णनच करता येणार नाही. अशी उज्वल परंपरा असलेल्या आपल्या विचारांची मांडणी करण्याकरिता आम्हाला मिळालेले हक्काचे व्यासपीठ म्हणजे आमची विदर्भ अर्थशास्त्र परिषद.

**परिषदेची यशस्वीता :**

आजही परिषदेचा मुख्य भाग म्हणजे आर्थिक चिंतन. द्विदिवसीय परिषदेचे सातत्याने सलग ४५ वर्ष अधिवेशन होत आहे. दोन दिवसांमध्ये संपूर्ण आर्थिक विचारांचे बोधामृत आम्हाला मिळते. डॉ.खांदेवाले सर, डॉ.विनायक देशपांडे सर यासारख्या अनेक दिग्गज विचारवंतांसोबत आम्हाला सातत्याने राहण्याची संधी मिळाली नव्हे तर कधीही कुठल्याही समस्या असल्या आणि त्यांच्या सोबत चर्चा करताना एक वेगळा आनंद आम्हाला मिळतो. आपणही फुल ना फुलाची पाकळी अभ्यास करावा असं सहज वाटतं ते केवळ त्यांच्या सोबत जुळल्या मुळेच थोर विचारवंतांची देणं लाभलेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद.

विदर्भ अर्थशास्त्र परिषद म्हणजे तीन

विद्यापीठांचा त्रिवेणी संगम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, गोंडवाना विद्यापीठ असे तीन विद्यापीठांचे अभ्यासक द्विदिवसीय अधिवेशनामध्ये एकत्र येऊन गुण्यागोविंदाने नांदण्याची परंपरा आजगायत सुरू आहे. पन्नास वर्षाच्या इतिहासात परिषदेचा अध्यक्ष हा एक मताने निवडण्यात येतो त्याला मात्र एकच वर्ष अपवाद तो अपवाद म्हणजे राळेगाव येथे परिषदेचे ३७ वे अधिवेशन असताना ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षांची निवड होताना निवडणूक झाली आणि त्या निवडणुकीत सदस्यांनी मला अध्यक्ष म्हणून निवडून दिले त्या वेळी जी साथ सदस्यांनी मला दिली यादृष्टीने राळेगाव परिषदेचे आधिवेशन हे माझ्यासाठी चिरस्मरणीय ठरले. अध्यक्ष म्हणून निवड केल्याबद्दल परिषदेच्या सदस्यांना मी धन्यवाद देते.

विदर्भ व अर्थशास्त्र परिषदेमध्ये आर्थिक विचारांची होणारे आदान-प्रदान सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये कार्यक्रमाचे विशेष आयोजन प्रत्येक अधिवेशनातील विषयांची मांडणी ज्या महाविद्यालयांमध्ये अधिवेशन होतात. ते अत्यंत चांगल्याप्रकारे घेण्याची परंपराच परिषदेला लाभली आहे. तसेच २६ वे वार्षिक अधिवेशन घेण्याचा बहुमानही आमच्या महाविद्यालयाला मिळाला. विशेषत्वाने उल्लेखनीय बाब म्हणजे ३८ वे वार्षिक अधिवेशन अर्जुनी मोरगाव येथे आयोजित होते. तेव्हा मी अध्यक्ष होते. मात्र स्थानिक सचिव श्री झामरे सरांकडे अडचण आल्यामुळे त्यांना ऐनवेळी उपस्थित राहता आले नाही. मात्र तेथील प्राचार्य व त्यांच्या चमूने अतिशय उत्कृष्टरित्या अधिवेशन पार पाडले. अशा अनेक सुखद आठवणींचा ठेवा माझ्याकडे आहे. परिषदेला एक उज्वल परंपरा लाभलेली आहे. ती टिकवून ठेवण्याकरिता जेव्हा आम्ही आमच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ सदस्यांची धडपड बघतो त्यांच्यामुळे परिषदेला जे व्याख्याते मिळतात. वेगवेगळ्या सत्राच्या वेळी चर्चा होते. अनेक मनातील प्रश्नांची उत्तरे त्या वक्तव्यातून मिळतात ही आमच्यासाठी फार मोठी व परिषदे करिता जमेची बाजू आहे.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचा कार्यभार अनेकांना हेवा वाटावा इतका पारदर्शक. प्रत्येक अधिवेशनामध्ये अंकेक्षण अहवालासह परिषदेची व परिषदेच्या वतीने निघणारे 'अर्थामिमांसा' संशोधन पत्रिकेचे दरवर्षी हिशोब सादर केले जातात. 'अर्थामिमांसा' ची उत्कृष्ट मांडणी डॉ.जहागिरदार सर संपादक. त्यामुळे आजही उच्च दर्जाची संशोधन पत्रिका प्रसिद्ध होत आहे. त्या रूपाने आम्हालाही आमचे लेख प्रसिद्ध करण्यास संधी मिळते. आजतागत 'अर्थामिमांसा' संशोधन पत्रिका प्रसिद्ध करताना तूट येत असली तरी ती भरून काढण्यासाठी सरांची धडपड आम्ही बघत असतो.

परिषदेच्या इतक्या उज्वल परंपरेला कधी वेगळ्या पद्धतीने विचारणा करण्याचा प्रयत्न काही सदस्यांकडून झाला. तेव्हा मात्र मन उद्विग्न झाले.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदचे ४५ वे वार्षिक अधिवेशन होत आहे. परिषदेची उज्वल परंपरा बघता आमच्या ज्येष्ठ सदस्यांची परिषदेविषयी आस्था ही नवीन सर्व सदस्यांना लिखाणाची रुची, उत्कुष्ट शोधनिबंधाची निवड व पारितोषिके ही फार श्रेष्ठ बाब आहे. परिषदेची जडणघडण उद्दात हेतूने झाली आहे. जे विचार प्रचलित आहे ते कसे टिकवून ठेवता येईल. आम्हा अभ्यासकांना ते अजून कसे मोठे करता येईल, नवोदित अभ्यासकांना जुळवून घेतांना परिषदेचा हेतू विचारसरणी टिकवून

ठेवण्याकरिता सर्व सदस्यांनी कार्यरत होण्याची गरज आहे. परंतु काही प्रसंगी याला कुठे गालबोट तर लागणार नाही. अशी भीतीही वाटते. नव्हे तर काही कटू प्रसंग जेव्हा येतात तेव्हा आजही आमचे सर्व जेष्ठ सदस्य योग्य मार्गाची निवड करतात व मार्ग काढतात.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या अनेक अधिवेशनांना कुलगुरू पदावर कार्यरत व्यक्ती अध्यक्ष म्हणून लाभले. दोन्ही विभागातील सचिव परिषदेकरिता कोणतीही मानधन न घेता कार्य करीत असतात. परिषदेचा निधी वाढवण्याचा सतत प्रयत्न करतात. सर्व सदस्य निधी जमा करायचा असल्यास परिषदेमध्ये आपले योगदान देतात. ही आत्मीयता केवळ परिषद मोठी व्हावी. तसेच परिषदेचे कार्य सुकर व्हावे याकरता असते. या परिषदेमुळे आम्हाला आमची ओळख निर्माण करण्याची संधी प्राप्त झाली. संशोधन लेख लिहिता येतात व विचारांची आदानप्रदान होते. अशा या गौरवशाली परंपरेची एक आजीवन सदस्य म्हणून मला परिषदेचा सार्थ अभिमान आहे.

◆◆◆

# अनेक कार्यकर्त्यांच्या निष्ठा आणि त्यागातून विकसित झालेली विदर्भ अर्थशास्त्र परिषद

**दि.व्यं.जहागिरदार**
माजी अध्यक्ष,
विदर्भ अर्थशास्त्र परिषद

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची स्थापना १९७०-१९७१ मध्ये होऊन या संस्थेने ५० वर्षाचा कालखंड पूर्ण केला ही आपणा सर्वांसाठी आनंदाची व अभिमानाची बाब आहे. परिषदेची नियमित होणारी अधिवेशने, परिसंवाद वा व्याख्यानां होणारी बरसात, अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेचे प्रकाशन, लेखकांना दिली जाणारी पारितोषिके या गौरवास्पद बाबी असून त्यातून आर्थिक विषयांवर दर्जेदार लेखन करणाऱ्या प्रपाध्यापकांची एक आश्वासक फळी विदर्भात उभी राहिली आहे. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्र पातळीवरील मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे स्त्री प्राध्यापकांना उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीचे पारितोषिक विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या स्त्री प्राध्यापकांना सर्वाधिक वेळा प्रापत झाली आहेत. ही बाब निश्चितच विदर्भ अर्थशास्त्र परिषदेसाठी भूषणास्पद मानली पाहिजे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या जी विविध पारितोषिक दिली जातात ती विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या सभासदांनी मोठ्या प्रमाणात प्राप्त केली आहेत. परिषद ५० वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचे हे फलित आहे.

परिषदेचा कार्याचा एक महत्त्वाचा अध्यक्ष निवडीचा भाग परिषदेची सामजस्याची, समन्वयाची दृष्टी स्पष्ट करणारा आहे. परिषदेच्या अध्यक्षपदासाठी एकदा नागपूर विभागातील प्राध्यापकाची निवड होते. तर दुसऱ्यावर्षी अमरावती विभागातील प्राध्यापकांची निवड होते. तसेच एकदा नागपूर विभागात तर नंतरच्या वर्षात अमरावती विभागातील महाविद्यालयात अधिवेशन भरविली जाते. सर्व सभासदांच्या सहकार्यने ही प्रथा उत्तम प्रकारे चालू आहे. परिषदेच्या वतीने नवीन उपक्रम राबविले जाऊन परिषदेचे शैक्षणिक कार्य विस्तारले गेले आहे. १६ व्या वार्षिक अधिवेशनापासून (१९९१-९२) सुरू केलेली डॉ. नाणेकर-प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यानमाला अधिवेशन काळात आयोजित केली जाते. यंदाच्या नवरगाव येथील ४५ व्या वार्षिक अधिवेशनात तीसावे व्याख्यान होणार आहे. पहिले व्याख्यान हे (कै.)आर.व्ही. रानडे यांनी गुंफले होते. पुसद येथील या व्याख्यानासाठी ते पूर्णवेळ अधिवेशनात उपस्थित होते व त्यांनी या उपक्रमाबद्दल गौरवोद्गार काढले होते. विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची भाषणे ऐकण्याचा दुर्मिळ योग प्रतिनिधींना प्राप्त होतो व प्रतिनिधी या व्याख्यानासाठी आतुरतेने वाट पाहतात. शक्यतो अर्थशास्त्राशी संबंधित विषयांवर तज्ञ व्यक्तींना पाचारण केले जाते. परिषदेच्या ३२ व्या वार्षिक अधिवेशनापासून (२००७-०८) 'अर्थमीमांसा' ही संशोधनपर पत्रिका नियमितपणे प्रसिद्ध होत आहे. या संशोधनपर पत्रिकेच्या संपादकपदी गेली अनेक वर्ष मला परिषदेने जी संधी

उपलब्ध करून दिली त्याबद्दल परिषदेच्या सर्व सभासदांचे विशेषत: प्रा. कांत, डॉ. भांडवलकर, डॉ. चव्हाण, डॉ. धिनमिने यांचे मी आभार व्यक्त करतो. परिषदेने संशोधन पत्रिका काढावी यावर २००५ पासून विचार सुरू होता. प्रा. कांता यांनी असा उपक्रम सुरू करावा आणि काही अडचण आल्यास मी परत करतो असे म्हटले. सुदैवाने तशी आर्थिक अडचण उदभवली नाही. परिषदेच्या सभासदांना अर्थशास्त्रातील प्रसिद्ध ग्रंथांच्या परिचय व्हावा म्हणून नागपूरला झालेल्या ३७ व्या अधिवेशनापासून (इ.स. २०१२-१३) 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' ही व्याख्यानमाला सुरू झाली. या व्याख्यानमालेतील पहिले भाषण देण्याचा मान परिषदेने मला दिला. मी 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या सर्वात जुन्या आर्थिक ग्रंथांची ओळख करून दिली होती. परिषदेशी असलेल्या जुन्या संबंधामुळे मला ही संधी प्राप्त झाली. अभिजात ग्रंथांचा परिचय करून देण्याचा या व्याख्यानमालेत डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. खांदेवाले, डॉ.विनायक देशपांडे, प्राचार्य डॉ. तिवारी, कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस, डॉ. मुक्ता जहागीरदार, डॉ. रामदास माहोरे अशा सन्माननीय व्यक्तींनी भाषणे दिलीत.

इसवी सन २०१५ हे वर्ष माझ्या मातोश्री कै.श्रीमती कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. त्यानिमित्ताने मी त्यांच्या स्मृतीनिमित्त विविध महाविद्यालयांमध्ये विदभ अर्थशास्त्र परिषदेच्या उपक्रमातील एक भाग म्हणून प्रतिवर्षी आर्थिक विषयांवर परिसंवाद प्रायोजित करीत आहे. हा कार्यक्रम अमरावती, नागपूर, परतवाडा, खामगांव, कारंजा (घाडगे), वडनेर (जि. वर्धा) अशा शहर व गावातील महाविद्यालयात उत्साहाने साजरे झाले . विशेष म्हणजे covid-19 या वर्षात ६ मार्च २०२१ मध्ये परिषद व चांदूर बाजार येथील कै. ना.अ. देशमुख महाविद्यालयाच्या वतीने आभासी पद्धतीने तो साजरा झाला. या कार्यक्रमाचे हे सातवे वर्ष होते. हे परिसंवाद आयोजित करण्यात विविध महाविद्यालयाकडून मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या जडणघडणीतील आणखी काही बाबींचा उल्लेख केला पाहिजे. आतापावेतो डॉ. सुनंदा सोनारीकर, डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. पुष्पा इंदुरकर, डॉ. मुक्ता जहागिरदार, प्राचार्य डॉ. पुष्पा तायडे, प्राचार्य डॉ. वनिता चोरे, कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या सात स्त्री सभासदांनी परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भुषविले आहे. वैदर्भीय संस्कृतीचा, स्त्रीयांना योग्य सन्मान देण्याच्या दृष्टिकोनाचा हा परिणाम आहे. वार्षिक अधिवेशने आयोजित करण्यात सचिवाचे कार्य महत्त्वाचे असते. परिषदेच्या ४ महिला प्राध्यापकांनी(डॉ.पुष्पा तायडे , डॉ. कविता हिरुरकर, डॉ. वनिता चोरे आणि डॉ. संगीता टक्कामोरे) ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. खामगाव येथे भरलेल्या २२व्या वार्षिक अधिवेशनात परिषदेचे कार्याध्यक्ष हे पद निर्माण केले. प्रथम कार्याध्यक्ष होण्याचा मान डॉ. खांदेवाले यांना, नंतर डॉ. आर.वाय.माहोरे यांना आणि नंतर डॉ.मुक्ता जहागिरदारांना प्राप्त घाले. विशेष म्हणजे या तिघांनी प्रत्येकी ६ वर्षे हे पद भूषविले. चौथे कार्याध्यक्ष डॉ. अंजली कुलकर्णी यांनी ३ वर्षे हे पद भूषविल्यावर सध्या या पदावर डॉ. पिस्तुलकर कार्यरत असून या सर्वांनी परिषदेच्या कार्यपद्धतीवर आपला ठसा उमटविला आहे.

अमरावती येथे परिषदेचे तिसरे वार्षिक अधिवेशन (१९७२-७३) भरले होते. डॉ. नाणेकर

अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेमुळे अधिवेशनाचा स्तर उंचावला होता. त्यांचे अध्यक्षीय भाषण अजूनही आठवते. मी प्रथमच परिषदेच्या अधिवेशनास उपस्थित होतो. तेव्हापासून काही अपवादात्मक वर्षे सोडल्यास मी सर्व अधिवेशनांना हजर होतो. या अर्थाने मी परिषदेच्या अधिवेशनास हजर राहणारा एक वारकरी झालो. या संपूर्ण प्रवासात विशेषत: वेगवेगळी जबाबदारी पार पाडत असतांना डॉ. खांदेवाले यांचे मला नेहमीच मार्गदर्शन प्राप्त झाले. इ.स.१९७९-८० मध्ये प्रा.ओझरकर यवतमाळ येथे भरलेल्या १० व्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनात रात्री भाऊसाहेब पाटणकरांचा शेरो शायरीचा आकर्षक कार्यक्रम सर्व सभासदांच्या वृत्ती प्रफुल्लित करून गेल्या. पुढचे अधिवेशन लगेच पुढच्या वर्षी न होता एक वर्ष उशिराने झाले. पण दुर्दैवाने १२व्या वार्षिक अधिवेशनानंतर (१९८२-८३) हा खंड वाढला. त्या अधिवेशनात डॉ. शेणवाईची १३व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. पण २-३ वर्षे झालीत तरीही अधिवेशन झाले नाही. आत्मस्तुतीचा दोष पत्कारून असे सांगावेसे वाटते की डॉ. रामदास माहोरे व मी या दोघांनी या विषयावर विचार करून अधिवेशन भरवायचे असे ठरविले. परिषद विस्कळीत झाली होती. शेवटी ६ वर्षाच्या खंडानंतर चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयात १३ वे वार्षिक अधिवेशन (१९८८-८९) पार पडले. त्यानंतर सतत ही अधिवेशने नियमितपणे होत राहिली. विशेष म्हणजे या यशस्वी कार्यामुळे मला व डॉ. माहोरे यांना सभासदांनी जवळपास ९ वर्षे सचिवपदाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी टाकली. या काळात अक्षरश: आम्ही दोघांनी झोकून काम केले व अनेक दृष्टीने परिषदेला सशक्त केले. यावेळी अधिवेशने घेतांना अनेक प्रकारच्या गैरसोई सभासदांना सहन कराव्या लागत. सेलू येथील अधिवेशनाचे वेळी मी व डॉ. माहोरे अक्षरश: एका कापूस असलेल्या गोदामात झोपलो होतो. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी रात्रीच्या वेळी सभासद रात्री ११-१२ पर्यंत गप्पा मारीत. करमणुकीचे कार्यक्रम होत. प्रा.हनुमंते त्यांनी लिहिलेल्या कथा सांगत. चंद्रपूरला प्रा. तिवारी हिंदीतून गंमतीदार घटना व स्वतःच्या कविता वाचत. सभासदांना जवळ आणणारे हे कार्यक्रम परिषदेच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरले. आता मात्र सभासदांचे एकत्र येणे फारच कमी झाल्यासारखे वाटते. पुसद येथील १६व्या वार्षिक अधिवेशनात एक अडचण उद्भवली. अधिवेशनाचे उद्घाटक मंत्रीमहोदय बॅरिस्टर रामराव आदिक होते. उद्घाटन १०।। वाजता होते. आम्हाला सकाळीच निरोप आला की मंत्रीमहोदय दुपारी दीड वाजेपर्यंत येतील. उद्घाटन इतके उशिरा घेतले तर पुढची सत्रे घेण्यास वेळ उरणार नव्हता. यावर उपाय शोधण्यासाठी आम्ही दोघे सचिव, अध्यक्ष प्रा. खेरडे, डॉ.खांदेवाले व डॉ. श्री.आ. देशपांडे एकत्र बसून चर्चा करू लागले. तेव्हा असे ठरले की पहिले चर्चासत्र १०.३० वाजता सुरू करावे. नंतर जेवण ठेवावे व १.३० वाजता अधिवेशनाचे उद्घाटन करावे. इ.स. सन १९७३-७४ मध्ये शिवाजी कॉलेज अकोला द्वारे ४ थे अधिवेशन झाले. (कै) प्राचार्य डॅडी देशमुखांनी हे अधिवेशन दिमाखात घेतले. अकोला येथील खुल्या नाट्यगृहात बाबला अँड पार्टीचा ऑर्केस्ट्रा होता. डॅडी देशमुखांनी सर्व सभासदांना या व्यावसायिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची सूचना केली. तेव्हाचा अत्यंत लोकप्रिय ऑर्केस्ट्रा मोफत पाहता आला. या अधिवेशनात 'आधुनिक खंड सिद्धांत' हा चर्चासत्रासाठीचा विषय होता.

पण यासाठी एकही निबंध आला नव्हता. अध्यक्ष प्रा. पिंपरकरांनी या विषयावर आपले विचार मांडण्याची डॉ.नाणेकरांना विनंती केली. ऐनवेळी जवळपास या विषयावर दीड तासाचे भाषण डॉ. नाणेकरांनी दिले. या विषयावरील डॉ. नाणेकरांचे भाषण ऐकतांना सभासद मंत्रमुग्ध झाले. त्यांनी या विषयावर केलेले विवेचन हे त्यांच्या अर्थशास्त्रावरील प्रभुत्वाचा निर्विवाद पुरावा ठरला. अनेक वार्षिक अधिवेशनात कुठलेही तीव्र मतभेद झाले नसले तरी त्याला काही अपवादही होते. पण असे मतभेद सर्व सभासदांनी दाखविलेल्या समंजस्यामुळे चहाच्या कपातील वादळाप्रमाणे लगेचच निवळले. थोडेबहुत मतभेद असले तरी परिषदेपुढे ते क्षुल्लक असतात हे सभासदांनी दाखवून दिले याचाही आनंद वाटतो. अधिवेशनांचे अध्यक्ष अनेक वेळा एक मताने ठरलेत याचा उल्लेख केला पाहिजे. अध्यक्षासारखे मानाचे पद सभासदांनी बहाल करावे, त्यासाठी संघर्ष करावा लागू नये. या पदावर बिनविरोध प्रतिष्ठित होण्याचा आनंद वेगळाच असतो.

शेवटी लाखमोलाचा प्रश्न डोळ्यासमोर येतो. तो असा की, परिषदेने आम्हास काय दिले? परिषदेने आम्हास एखादी संस्था चांगल्या प्रकारे कशी चालवावी याचे प्रशिक्षण दिले. सभासदांनी परस्परांचे मत कसे ऐकून घ्यावे हे शिकवले, परस्परांविषयी प्रेम निर्माण करून खऱ्या अर्थाने बंधुभाव शिकवला, आणि परस्परांना कसा मान द्यावा याचा वास्तुपाठ दिला. परिषदेच्या अधिवेशनामध्ये निबंध लिहून ते सादर करणाऱ्यांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अर्थमीमांसेत संशोधनपर चांगले लिखाण करणाऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. जुन्या अनुभवी लेखकांसोबत अनेक नवीन लेखक समोर आणलेत. त्यांच्यातील अशा गुणांना परिषदेने भरपूर संधी दिली. यासंदर्भात डॉ. धीरज कदम, डॉ. सुमित माहोरे, डॉ. जे.व्ही.गायकवाड, डॉ. हरमकर, डॉ. वनिता चोरे डॉ. गंगणे, डॉ. रोटे, डॉ. दिलीप महाजन, डॉ. रायभोग, डॉ. करमसिंग राजपूत, डॉ. घोडेस्वार, डॉ. मेश्राम, डॉ.प्रतिभा चौधरी, डॉ. जोगी यांची नावे आठवतात. काही मोजक्या ज्येष्ठ प्राध्यापकांनी परिषदेला नेतृत्व प्रदान केले असले तरी परिषदेचा भक्कम आधार म्हणजे तिचे शेकडो सभासद आहेत. त्यांनीच परिषदेला नाव व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. विशेषत: संस्थेचे सचिवपद सांभाळणारे गेल्या १२-१५ वर्षातील सचिवांनी परिषदेचे कार्य अत्यंत तत्परतेने व निष्ठेने केले हे ही लक्षात घेतले पाहिजे. आपल्या परिषदेची शक्ती म्हणजे तिला भेटलेल्या, तिच्यासाठी प्रसंगी झीज सोडून तळमळीने कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मोहोळ. आपली परिषद जेव्हा ७५ वे वर्ष साजरे करेल त्यावेळी आमच्या सारखे जुने कार्यकर्ते राहणार नाहीत. पण त्यावेळच्या कार्यकर्त्यांना याचे स्मरण होईल. की पहिल्या पन्नास वर्षांत ज्या कष्टाळू व परिषदेसाठी सचोटीने काम केलेल्या कार्यकर्त्यांमुळेच परिषद अमृत महोत्सवाचा आनंद घेत आहे. मागच्या पिढीतील व्यक्तींनी जे कार्य केले तसेच कार्य आपणही करावे ही जाणीव भविष्यकालीन पिढीला होईल. खऱ्या अर्थाने विदर्भ अर्थशास्त्र परिषदेने निर्माण केलेला तो ठेवा असेल व तो वेगाने वृद्धिंगत होईल अशी अपेक्षा करतो.

◆◆◆

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे विविध उपक्रम

## १) डॉ. नाणेकर-प्रा.पिंपरकर स्मृती व्याख्यान

| अधिवेशन | दिनांक व वर्ष | वक्त्याचे नाव | व्याख्यानाचा विषय |
|---|---|---|---|
| २९ | २३ जानेवारी २००५ | डॉ. सो.वि.सुपे | Social Economic Constraint in transfer of Agro Technology |
| ३० | १५ जानेवारी २००६ | श्रीमती संजीवनी देशमुख | बचत गटांचे स्वरूप व कार्य |
| ३१ | २८ जानेवारी २००७ | प्राचार्य व्ही.सी.कुमारन | खराष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्रामीण विकासाचा विचार |
| ३२ | १० फेब्रुवारी २००८ | श्री. किरण पातुरकर | विदर्भाच्या औद्योगिकरणा पुढील आव्हाने |
| ३३ | १५ फेब्रुवारी २००९ | प्राचार्य डॉ.मदन धनकर | विदर्भाची अर्थव्यवस्था : समस्या व आव्हाने |
| ३४ | १३ फेब्रुवारी २०१० | प्रा. वसंतराव पुरके | महाराष्ट्राचा अर्थसंकल्प |
| ३५ | २७ फेब्रुवारी २०११ | श्री.अशोक ठाकूरदासजी बंग | खेडी, शेती आणि अर्थकारण |
| ३६ | २९ फेब्रुवारी २०१२ | डॉ. विवेक देशमुख | साहित्यातून जीवनाचा अर्थ |
| ३७ | १० फेब्रुवारी २०१३ | ॲड.देविदास घोडेस्वार | सामाजिक न्याय व्यवस्था |
| ३८ | १६ फेब्रुवारी २०१४ | ॲड. सत्यनारायण अबोटी | पूर्णवादी अर्थशास्त्र |
| ३९ | १ फेब्रुवारी २०१५ | फून्त्सोक तोपक्याल | तिबेटीयन वस्तीतील उद्योग |
| ४० | ३१ जानेवारी २०१६ | प्रा.सुधीर पाठक | शिवकालीन चलन व्यवस्था |
| ४१ | ५ मार्च २०१७ | डॉ.सतीश वटे | पर्यावरणीय अर्थशास्त्र |
| ४२ | २८ जानेवारी २०१८ | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | रशियन राज्यक्रांतीची १०० वर्षे |
| ४३ | ३ फेब्रुवारी २०१९ | प्राचार्य सुधीर बोधनकर | महात्मा गांधी आणि त्यांचे आर्थिक विचार |
| ४४ | २ फेब्रुवारी २०२० | डॉ. काशीनाथ बऱ्हाटे | कोरकू समाज संस्कृती |
| ४५ | २६ मार्च २०२२ | डॉ. शुभदा देशमुख | आदिवासी समाजाचे आरोग्य |

(**टिप :** ही व्याख्यानमाला १६ व्या वार्षिक अधिवेशनापासून सुरू झाली होती. प्रारंभीच्या वर्षांतील माहितीच्या अनुपलब्धतेमुळे ही माहिती २९ व्या अधिवेशनापासून दिली आहे. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.)

## २) आर्थिक ग्रंथातील विचार विश्व

### (व्याख्यानमाला)

| क्र. | वर्ष | स्थान | व्याख्याता | ग्रंथ |
|---|---|---|---|---|
| १ | ३७ वे वार्षिक अधिवेशन दि. १०-२-२०१३ | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | डॉ. दि.व्यं.जहागिरदार | कोटिल्याचे अर्थशास्त्र (लेखक : कौटिल्य) |
| २ | ३८ वे वार्षिक अधिवेशन दि. १६-२-२०१४ | इंदिरा गांधी कला व विज्ञान महाविद्यालय, राळेगांव (जि. यवतमाळ) | डॉ. अंजली कुळकर्णी | An uncertain Glory - India & its contradiction (लेखक : अमर्त्य सेन) |
| ३ | ३९ वे वार्षिक अधिवेशन दि. १-२-२०१५ | शिवप्रसाद सदानंद जयस्वाल कॉलेज अर्जुनी मोर (जि. गोंदिया) | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | Das Capital (लेखक : कार्ल मार्क्स) |
| ४ | ४० वे वार्षिक अधिवेशन दि. ३१-१-२०१६ | बा.रू.कला व ना.भ. वाणिज्य कॉलेज, दिग्रस | डॉ. एच.आर.तिवारी | The theory of Leisure class (लेखक- थॉर्स्टटाईन वेब्लेन) |
| ५ | ४१ वे वार्षिक अधिवेशन दि. ५-३-२०१७ | विद्यासागर कला महाविद्यालय, रामटेक | डॉ. विनायक देशपांडे | Principles of Political Economy (लेखक : डेव्हिड रिकार्डो) |
| ६ | ४२ वे वार्षिक अधिवेशन दि. २८-१-२०१८ | गो.सी.टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार (जि.अमरावती) | डॉ. मृणालिनी फडणवीस | Poverty & UnBritish Rule in India (लेखक : दादाभाई नौरोजी) |
| ७ | ४३ वे वार्षिक अधिवेशन दि. ३-२-२०१९ | भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि.नागपूर | डॉ. मुक्ता जहागिरदार | Economic Theory and Under developed Regions (लेखक : गुन्नार मिर्दल) |
| ८ | ४४ वे वार्षिक अधिवेशन दि. २-१-२०२० | भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि.अमरावती. | डॉ. आर.वाय.माहोरे | Poor Economics (लेखक : अभिजीत बॅनर्जी व एस्टर डफ्लो) |
| ९ | ४५ वे वार्षिक अधिवेशन दि. २६-३-२०२२ | श्री. ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव (जि. चंद्रपूर) | डॉ. उषा पाटील | हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास (इ.स.१८५० ते १९२०) (लेखक : धनंजयराव गाडगीळ) |

## ३) कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृती परिसंवाद

| क्र. | वर्ष | स्थान | व्याख्याते | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | १३-०१-२०१५ | डॉ. जोशी सभागृह, अमरावती | १) डॉ. द.व्यं. जहागिरदार<br>२) डॉ. श्रीहरी मांडवगणे<br>३) डॉ. संतोष दास्ताने | विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र - वर्तमान व भविष्य |
| २ | १५-१-२०१६ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर | १) जयदीप हर्डीकर<br>२) निखिल अटाळे<br>३) डॉ. प्रशांत हरमकर | भारतीय अर्थव्यवस्थेतील उदारीकरण - स्वरूप व परिणाम |
| ३ | १८-१-२०१७ | मोहता महिला महाविद्यालय, खामगांव | १) डॉ. श्रीनिवास खांदेवाले<br>२) डॉ. विनायक देशपांडे<br>३) डॉ. वनिता चोरे | भारतातील विमौद्रीकरण - स्वरूप व परिणाम |
| ४ | १३-१-२०१८ | नारायण काळे स्मृती महाविद्यालय, कारंजा (घाटगे) | १) डॉ. वैशाली देशमुख<br>२) डॉ. प्राची देशपांडे<br>३) डॉ. कपिल चांद्रायण | जी.एस.टी. : स्वरूप व परिणाम |
| ५ | ८-१-२०१९ | स्व. छगनलाल मूलजीभाई कढी महाविद्यालय, परतवाडा | १) डॉ. जयराम गायकवाड<br>२) डॉ. करमसिंग राजपूत<br>३) डॉ. उमेश घोडेस्वार | भारतीय शेतीच्या समस्या व वर्तमान दुष्काळ |
| ६ | १८-१-२०२० | साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर (जि.वर्धा) | १) डॉ. आशीष महाजळे<br>२) डॉ. प्रतिभा चौधरी<br>३) डॉ. गजानन भारती | भारतातील शेती समोरील आव्हाने |
| ७ | ६-३-२०२१ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार | १) डॉ. विनायक देशपांडे<br>२) प्रा. अभय देशमुख<br>३) डॉ. दि.व्यं.जहागिरदार | नवीन कृषी कायदा |

(टिप : उपरोक्त उपक्रम विदर्भ अर्थशास्त्र परिषद, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती आणि आयोजक महाविद्यालय यांच्या संयुक्त वतीने होतात.

## ४) प्रा. भास्कर ढाले स्मृती व्याख्यान

| क्र. | वर्ष | स्थान | व्याख्याते | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | २२-०८-२०१५ | आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळ | १) डॉ. दि.व्यं. जहागिरदार<br>२) डॉ. करमसिंग राजपूत | योजना आयोग ते नीती आयोग |
| २ | १६-०९-२०१६ | श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती. | १) डॉ. मुक्ता जहागिरदार | मानव विकास |
| ३ | ५-१२-२०१७ | गो.से.विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव | १) डॉ. प्राजक्ता पोहरे<br>२) डॉ. करमसिंग राजपूत | नोटाबंदीचे अर्थशास्त्र |
| ४ | १०-०८-२०१८ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूंब, जि. चंद्रपूर. | १) डॉ. मेघा कानेटकर | ग्रीन बँकींग |
| ५ | ३१-१२-१९ | लो. टिळक महाविद्यालय, वणी | डॉ. विनायक गोविलकर | चलन प्रवास |
| ६ | २०-०३-२१ | छगनलाल मुलजीभाई कढी, महाविद्यालय, अचलपूर कम्प | डॉ. मारोती नेगमपुरे | भारतीय शेतीची अवस्था |

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद

### वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | प्रा.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | डॉ. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.पी.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ. एम.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | प्रा.एस.एच्.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | प्रा.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्‌लय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.अ‍ॅन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |
| ३९. | शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया. | २०१४-१५ | प्राचार्य डॉ. वनिता चोरे |
| ४०. | बी.बी.आर्टस, एन.बी.कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रस, जि.यवतमाळ | २०१५-१६ | डॉ. विनायक देशपांडे |
| ४१. | विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा) ता. रामटेक, जि.नागपूर. | २०१६-१७ | डॉ. एच.आर.तिवारी |
| ४२. | जी.एस.टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अम. | २०१७-१८ | डॉ.जे.एम.काकडे |
| ४३. | भिवापूर महाविद्यालय, भिवापूर. जि.नागपूर. | २०१८-१९ | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| ४४. | भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती. | २०१९-२० | डॉ. मृणालिनी फडणवीस |
| ४५. | ज्ञानेश महविद्यालय, नवरगांव, जि. चंद्रपूर. | २०२१-२२ | डॉ. विनोद गावंडे |